# तृतीय वर्ष कला

## सत्र - VI (CBCS)

## अर्थशास्त्र अभ्यासपत्रिका क्र. XIV

# आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र

## विषय कोड - ECOIE602

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्रभारी कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. डॉ. अजय भामरे**
प्रभारी प्र-कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. प्रकाश महानवर**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रकल्प समन्वयक** : **प्रा. राजश्री पंडित**
सहाय्यक प्राध्यापक (अर्थशास्त्र),
प्रभारी वाणिज्य विद्याशाखा प्रमुख,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**अभ्यास समन्वयक** : **डॉ. प्रतिक्षा नारायण टिकार**
सहाय्यक प्राध्यापक (अर्थशास्त्र),
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई-४०० ०९८.

**संपादक** : **डॉ. सुरेश एकनाथ घुमटकर**
सहयोगी प्राध्यापक आणि प्रमुख,
अर्थशास्त्र विभाग, बलभीम कला,
विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, बीड – ४३११२२

**लेखक** : **डॉ. प्रतिक्षा नारायण टिकार**
सहाय्यक प्राध्यापक (अर्थशास्त्र),
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई-४०० ०९८.

: **डॉ. गोपाल एकनाथ घुमटकर**
सहाय्यक प्राध्यापक (अर्थशास्त्र),
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई-४०००९८.

**एप्रिल २०२३, प्रथम मुद्रण,**

**प्रकाशक**
संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

**अक्षरजुळणी**
मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
सांताक्रुझ, मुंबई

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | आंतरप्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय व्यापार | १ |
| २. | आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत | १४ |
| ३. | व्यापार शर्ती | ३१ |
| ४. | व्यापारशेष व व्यवहारशेष | ४३ |
| ५. | परकीय विनिमय बाजार आणि विनिमय दर निर्धारण | ७७ |
| ६. | परकीय चलन बाजार: संबंधित संकल्पना | ८८ |
| ७. | आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्था | १०२ |
| ८. | आर्थिक एकात्मीकरण | १२२ |


*****

## TYBA ECONOMICS (SEMESTER-VI)

| COURSE CODE | GROUP-II : ELECTIVE PAPER<br>PAPER NO – XIV | CREDIT | MARKS |
|---|---|---|---|
| ECOIE602 | INDIAN FINANCIAL SYSTEM-II | 3 | 80 |

### Course Objectives

The paper is framed to provide information on various financial markets including the participants, regulators of the respective markets and role of intermediaries. The syllabus also provides students with an overview of the features of the markets in India and the reforms that have been carried out in them over a period of time. Certain topics have been also incorporated to facilitate the students with practical exposure to the functioning of these markets and they indicate potential topics for case studies and taking up small research projects.

### Course outcomes

- Focuses on features and functioning of financial markets as well as reforms therein.

- Empowers students about the evolution and significance of financial services, overview of new products and practices in the provision of financial services.
- Project work based on empirical case studies involving data analysis; suggestive examples: equity research, derivative pricing, analysis of financial performance of corporates, study of capital structure of corporates, mapping the trends in stock market indices, CIBIL score & lending practices of banks.

**Module 1: Money Market and Debt Market** **(12 Lectures)**

Money market: meaning and functions- Structure of money market in India (dichotomous & heterogeneous) - Participants and instruments in Indian money market- Features of Indian money market - Reforms in Indian money market - Role of the RBI.

Debt market: meaning & functions - Segments in debt market- Participants & instruments in debt market - Role of intermediaries and the government in debt market - Recent trends in India’s debt market.

**Module 2: Capital market** **(12 Lectures)**

Capital market: meaning, role and factors affecting growth of capital market - Structure of capital market- New issues or primary market: features, participants & intermediaries - Overview of issue mechanisms or methods of raising primary issues- Reforms in primary segment of Indian capital market & role of the SEBI.

Secondary market: features, participants & intermediaries - Listing of securities: types, advantages, requisites of listing - Basic mechanism of trading in securities - DEMAT- introduction to major stock exchanges in India: BSE, NSE and OTCEI- Reforms in secondary segment of Indian capital market.

**Module 3: Derivatives Market** **(12 Lectures)**

Derivatives: Need and significance - Participants in derivative markets- Types of derivatives (a. based on the underlying entity- financial, commodity, foreign currency, credit & interest rates and b. based on instruments- forwards, futures, options, swaps) - Pricing of derivatives: futures pricing, cost-of-carry model, options pricing -Derivative markets in India: evolution & growth, NCDEX, MCX, regulation of derivatives trading in India.

**Module 4: Financial Services in India** **(12 Lectures)**

Insurance: meaning, types, evolution and growth, E-portal for insurance policies, IRDA and PFRDA- Mutual Funds: meaning, composition, advantages, types of schemes-Evolution & growth, AMFI- Merchant banking: Evolution & growth, scope and recent developments in India - Credit rating: meaning, role and significance, agencies- depository services.

**References:**


1. Bhole, L. M. (2008): Financial Institutions and Markets, Growth and Innovation, Tata McGraw-Hill, New Delhi.
2. Khan, M.Y. (2007): Financial Services, Tata McGraw Hill, New Delhi.
3. M.Y. Khan, Indian Financial System
4. Pathak, Bharati (2008): The Indian Financial System –Markets, Institutions, and Services, (2nd Edition), Pearson Education, New Delhi.
5. Rajesh Kothari, Financial Services in India: Concept and Application
6. Vasant Desai, Indian Financial system.

# १

# आंतरप्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय व्यापार

**घटक रचना**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ आंतरराष्ट्रीय व्यापाराचा अर्थ

१.३ आंतरराष्ट्रीय व्यापाराची व्याप्ती

१.४ आंतरराष्ट्रीय व्यापाराचे महत्त्व

१.५ आंतरप्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामधील फरक

१.६ सारांश

१.७ प्रश्न

## १.० उद्दिष्टे

जागतिक अर्थव्यवस्थेत आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रामुळे देशाचा आर्थिक, सामाजिक व राजकीय विकास घडून येण्यास मदत होते. अंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र या पाठात आपण आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने अभ्यास करणार आहोत. या पाठाची उद्दिष्टे खालीलप्रमाणेः

- आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राची संकल्पना व महत्त्व यांचा अभ्यास करणे.
- आंतरप्रादेशिक व आंतरराष्ट्रीय व्यापार यातील फरक अभ्यासणे.
- आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या व्याप्तिचा अभ्यास करणे.

## १.१ प्रस्तावना

जागतिक अर्थव्यवस्थेच्या स्वरूपात आणि व्यवहार पद्धतीत अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. जागतिकीकरणाने वेग घेतला आहे. जागतिक व्यापार संघटना (WTO) कार्यान्वित होत असल्याने आयात-निर्यात व्यापारावरील विविध नियंत्रणे आणि बंधने कमीत कमी होत आहेत. समाजवादी अर्थव्यवस्थांच्या मर्यादा रशियाच्या विघटनामुळे जगापुढे आल्या आहेत. केंद्रिय पद्धतीच्या नियोजीत अर्थव्यवस्था बाजारव्यवस्थेकडे झुकू लागल्या आहेत. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ झाली आहे. व्यापाराचे स्वरूप आणि रचना यामध्ये अलीकडच्या काळात खूप मोठा बदल होत आहे. उत्पादन घटकांची आतरराष्ट्रीय गतिशीलता वाढत आहे. वाहतूक दळणवळण आणि

तंत्रज्ञान इत्यादींमध्ये खूपच सुधारणा होत आहे. त्याचाही आंतरराष्ट्रीय व्यापारास आणि म्हणून आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रास महत्त्व प्राप्त झाले आहे.

सध्या जगातील सर्वच देश आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या माध्यमातून जोडले गेले आहेत. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या गुंतवणूक, रोजगार, उत्पादन, बचत आणि किंमत पातळीवर परिणाम होत असतो. व्यापाराचा परिणाम कसा आहे ? तो कसा असावा ? त्यासाठी धोरणात्मक साधने कशी वापरता येतील याचा अभ्यास आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रात केला जातो.

जकात आणि व्यापारासंबंधीच्या सर्वसाधारण कराराची (GATT) उरुग्वे फेरी स्वीकारण्यामुळे जगातील देश व्यापाराच्या बाबतीत अधिकाधिक जवळ येत आहेत. १ जानेवारी १९९५ रोजी जागतिक व्यापार संघटनेची (WTO) स्थापना करण्यात आली असून सध्या संघटनेचे १४० देश सदस्य आहेत. यावरून आंतरराष्ट्रीय व्यापाराचे महत्त्व जगातील बहुतेक सर्वच देशांनी मान्य केल्याचे स्पष्ट होते. आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणजे काय हे स्पष्ट करण्यासाठी व्यापार म्हणजे काय ते पाहणे ठरते. “दोन व्यक्ति किंवा संस्थांमधील वस्तू व सेवांच्या ऐच्छिक, वैज्ञानिक आणि परस्परांमधील देवाण-घेवाणीस व्यापार म्हणतात.” अशा प्रकारचा व्यापार पैशाच्या माध्यमातून होत असतो. व्यापारामध्ये वस्तुच्या उत्पादनापासून त्या उत्पादनाची विक्री होईपर्यंत ज्या क्रिया घडून येतात त्या सर्व क्रियांचा समावेश व्यापारामध्ये होत असतो.

**व्याख्या:**

**अ) आंतरप्रादेशिक व्यापार (Interregional Trade):**

"जेव्हा एकाच देशातील दोन किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्ति किंवा व्यक्तिसमुहामध्ये व्यापार चालतो तेव्हा अशा व्यापारास आंतरप्रादेशिक किंवा देशांतर्गत व्यापार असे म्हणतात."

उदा. महाराष्ट्रातील एखादी व्यक्ती / व्यापारी गुजरातमधील एखाद्या व्यापाऱ्याबरोबर व्यापार करतो तेव्हा तो आंतरप्रादेशिक व्यापार ठरतो.

**ब) आंतरराष्ट्रीय व्यापार (International Trade):**

“दोन किंवा अधिक राष्ट्रांमध्ये चालणाऱ्या व्यापारास आंतरराष्ट्रीय व्यापार असे म्हणतात.”

उदा. भारताचा व्यापार अमेरिका, रशिया, चीन, इंग्लंड इत्यादी देशांशी चालत असेल तर आंतरराष्ट्रीय व्यापार ठरतो. आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये विविध देशांतील भिन्न चलनाच्या साहाय्याने व्यापार चालतो.

**आपली प्रगती तपासा:**

१) आंतरप्रादेशिक व्यापार म्हणजे काय ?

२) आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणजे काय ?

## १.२ आंतरराष्ट्रीय व्यापाराचा अर्थ

अंतर्गत व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यापारात अनेक मुलभूत स्वरूपाचे फरक आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी स्वतंत्र सिद्धांत मांडण्याची आवश्यकता अनेक अर्थशास्त्रज्ञांनी मान्य केली आहे. अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या तुलनात्मक अभ्यासानंतर आपणास आंतरराष्ट्रीय व्यापाराची काही ठळक वैशिष्ट्ये थोडक्यात सांगता येतील.

१) आंतरराष्ट्रीय व्यापारात उत्पादन घटक अगतिशील असतात असे स्पष्ट मत सनातन अर्थशास्त्रज्ञ मांडत होते. तुलनात्मकदृष्ट्या आंतरराष्ट्रीय व्यापारात उत्पादन घटक कमी गतिशील असतात तर ते अंतर्गत व्यापारात अधिक गतीक्षम असतात.

२) बाजारपेठांची विविधता हे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे वैशिष्ट्य आहे. अंतर्गत व्यापारात बाजारपेठ अधिक अंशी एकजिनसी असते. वजनमापे चालीरीती, भाषा, लोकांची आवडनिवड याबाबतीत बराच एकजिनसीपणा असतो. परंतु आंतरराष्ट्रीय व्यापारात बाजारपेठांमध्ये वरील बाबतीत भेद असतात. त्यामुळे बाजारपेठांमध्ये एकजिनसीपणा अजिबात राहत नाही.

३) आंतरराष्ट्रीय व्यापारात वेगवेगळ्या चलनांचा वापर होत असतो. अंतर्गत व्यापारात एकमेव चलन वापरले जात असते तर आंतरराष्ट्रीय व्यापारात प्रत्येक देशाचे चलनच वापरले जात असते. त्यामुळे विविध चलनांचा वापर हे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे वेगळे वैशिष्ट्य असते.

४) अंतर्गत व्यापारात एकाच देशातील लोक सहभागी होत असल्याने लोकांचे एकच गट असतो. परंतु आंतरराष्ट्रीय व्यापारात विविध देशातील लोक सहभागी होत असल्याने विविध गट अस्तित्वात येतात.

५) अंतर्गत व्यापार एकाच राजकीय कुलात होत असतो. तर आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी होणारे देश राजकीय दृष्टीने सार्वभौम असतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणजे विविध स्वतंत्र राजकीय कुलांमधील व्यापार असतो. प्रत्येक देशाची धोरणे स्वतंत्र व वेगवेगळी असतात. त्याचा परिणाम आंतरराष्ट्रीय व्यापारावर निश्चित होत असतो. प्रत्येक देशातील सरकार व्यापारातून आपल्या लोकांचे महत्तम कल्याण कसे होईल या दृष्टीने प्रयत्नशील असते. परंतु आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी होणारे देश या दृष्टीने प्रयत्नशील असतीलच असे नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारापासुन सर्वांचा समान फायदा होईलच असे नाही.

६) राष्ट्रीय नियम, कायदे, व्यापारासंबंधी कायदे आणि धोरणे, व्यापार, उद्योग व कराविषयक कायदे याबबतीत अंतर्गत व्यापारात सारखेपणा असतो. परंतु आंतरराष्ट्रीय व्यापारात अशाप्रकारचा सारखेपणा नसतो. सरकारचे जकातिविषयक धोरण, कोटा पद्धती, अनुदाने यांचा आंतरराष्ट्रीय व्यापारावर परिणाम होणे अपरिहार्य असते. अंतर्गत व्यापारावर या बदलांचा फारसा परिणाम होत नाही.

७) व्यापारामध्ये सहभागी होणाऱ्या देशांच्या विकासाचा स्तर वेगवेगळा असतो. विकासाचा स्तर व वेग यामधून व्यापारिविषयक धोरण निश्चित होत असते. हा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा प्रमुख गुणधर्म आहे.

८) आंतरराष्ट्रीय सहकार्य व शांतता यावर व्यापारविषयक संबंध अवलंबून असतात. जर शांतता व सहकार्य असेल तर व्यापारविषयक संबंध अधिकाधिक दृढ होत जातात. दुसऱ्या महायुद्धानंतर व्यापार वाढीसाठी ही परिस्थिती अधिक जबाबदार झाली आहे असा अनुभव घेतला आहे.

९) आंतरराष्ट्रीय व्यापार अधिक भौगोलिक अंतरावर होत असतो. तर आंतरप्रादेशिक व्यापार कमी भौगोलिक अंतरामध्ये होत असतो. कारण दोन देशांमधील अंतर खुप असते.

**आपली प्रगती तपासा:**

१) आंतरराष्ट्रीय व्यापाराची ठळक वैशिष्ट्ये कोणती आहेत ?

## १.३ आंतरराष्ट्रीय व्यापाराची व्याप्ती

**१. वस्तूंची निर्यात आणि आयात:**

आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये वस्तूंची आयात आणि निर्यात यांचा समावेश होतो. याला दृश्य व्यापार असेही म्हणतात.

**२. सेवांची निर्यात आणि आयात:**

याला अदृश्य व्यापार असेही म्हणतात. अदृश्य वाणिज्य वस्तूंमध्ये पर्यटन, वाहतूक, दूरसंचार, बँकिंग, गोदाम, वितरण आणि जाहिरात यांचा समावेश होतो.

**३. परवाने आणि फ्रेंचायझी:**

परवाना ही एक करारात्मक व्यवस्था आहे जी एका कंपनीला (परवानाधारक) तिचे पेटंट, कॉपीराइट, ट्रेडमार्क किंवा तंत्रज्ञान दुसऱ्या परदेशी कंपनीला (परवानाधारक) रॉयल्टी नावाच्या दराने प्रवेश देते. पेप्सी आणि कोका-कोला हे परवाना प्रणाली अंतर्गत जगभरात उत्पादित आणि विकले जातात. फ्रँचायझी हे परवान्यासारखेच असते, परंतु सेवांच्या तरतुदीच्या संदर्भात वापरलेली संज्ञा. उदाहरणार्थ, मॅकडोनाल्ड्स त्याच्या फ्रेंचायझी प्रणालीद्वारे जगभरात फास्ट-फूड रेस्टॉरंट्स चालवते.

**४. परकीय गुंतवणूक:**

यामध्ये आर्थिक नफ्याच्या बदल्यात परदेशात निधीची गुंतवणूक करणे समाविष्ट आहे. परकीय गुंतवणुकीचे दोन प्रकार आहेत.

**(A) थेट विदेशी गुंतवणूक (FDI) -** परदेशात वस्तू आणि सेवांचे उत्पादन आणि विपणन करण्याच्या उद्देशाने वनस्पती आणि यंत्रसामग्री यासारख्या परदेशी मालमत्तेमध्ये गुंतवणूक करणे.

**(ब) पोर्टफोलिओ गुंतवणूक-** परदेशी कंपनीच्या समभागांमध्ये गुंतवणूक करणे किंवा लाभांश किंवा व्याजाद्वारे उत्पन्न मिळविण्याचे दायित्व.

## १.४ आंतरराष्ट्रीय व्यापाराचे महत्त्व

आधुनिक अर्थव्यवस्थेत आंतरराष्ट्रीय व्यापारास अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. इंग्लडसारख्या देशाने तर आपला विकास आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या माध्यमातूनच साध्य केला आहे. आधुनिक अर्थिक विकासाचा मूलाधार आंतरराष्ट्रीय व्यापारच असल्याचे स्पष्ट झाले आहे. अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, जपान इत्यादी प्रगत देशांनी जी औद्योगिक प्रगती केली आहे त्याचे महत्त्वाचे कारण त्यांनी स्वीकारलेल्या व्यापार धोरणात सापडते. म्हणूनच सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ आंतरराष्ट्रीय व्यापार हे उत्पादनात वाढ घडवून आणण्याचे केवळ साधन नसून अर्थिक विकासाचे इंजिन मानतात.

आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासाचे महत्त्व पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येते.

१) आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासामुळे लोकांचा दृष्टिकोन अधिक व्यापक व विशाल बनतो. संकुचित राष्ट्रवादी विचारातुन लोक बाहेर पडतात. देशाचे विकास करायचा असेल तर आंतरराष्ट्रीय व्यापाराशिवाय पर्याय नाही. आपल्या देशात ज्या साधनांची कमतरता आहे अशा वस्तू व साधनांची परदेशातून आयात करता येते आणि विकासाचा दर वाढविता येतो. तसेच आपल्याकडे ज्या वस्तूंचे अतिरिक्त उत्पादन होते त्यांची विदेशातून निर्यात करून त्या बदल्यात आपणास वस्तू आणि पैसा मिळविता येतो. या गोष्टी आपणास आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासामुळेच समजतात.

२) विदेशी व्यापार आणि विदेशी भांडवल यांच्या साहाय्यनेच अनेक देशांनी आपला विकास साध्य केला आहे. आज ज्या देशांना प्रगत देश मानले जाते त्यांचा विकास अंतर्गत संसाधनाचे परिणाम आणि त्यांची गतिशीलता याच कारणामुळे झाला आहे, असे मानून परकिय व्यापारामुळे त्याच्या विकासाचा दर वाढला आहे. जर त्यांना आपल्या देशाच्या विकासाची गती अशीच कायम ठेवायची असेल तर त्यांनी इतर देशांबरोबर व्यापारी संबंध ठेवलेच पाहिजेत. कोणताही देश पूर्णपणे स्वावलंबी असूच शकत नाही. कारण प्रत्येक देशाला कोणत्या ना कोणत्या वस्तूसाठी दुसऱ्या देशावर अवलंबून राहावेच लागते. म्हणजेच त्यास अलिप्त राहून चालत नाही.

३) अर्थिक विकासात परास्परावलंबित्वाची भूमिका काय आहे? आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे अर्थिक वृद्धीसाठी काही मदत होते या गोष्टी आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासामुळे समजण्यास मदत होते.

४) आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासामुळे लोकांचा, राज्यकर्त्यांचा आणि अर्थशास्त्रज्ञांचा दृष्टीकोन आंतरराष्ट्रीय बनतो. अशा व्यापक दृष्टीकानामुळे चालू

आंतरराष्ट्रीय अर्थिक समस्या सोडविण्यास मदत होते. अनेक देशात दारिद्रयाची, बेकारीची गंभीर समस्या आहे. इतर देशांतून साधनांची निर्यात किंवा स्थानांतर कसे घडवून आणता येईल हे आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासावरून समजते. तसेच कोणताही देश दीर्घकाळ इतर देशांच्या विरुद्ध धोरण अवलंबून आपला विकास किंवा आपले अस्तित्व टिकवून ठेवू शकत नाही. त्याचा प्रत्यय आज सर्वच देशांना आला आहे. आपल्या शेजारील देशाला गरीब बनविण्याचे धोरण कसे चुकीचे आणि अयोग्य आहे हे जगाला अनुभवाने आणि आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासामुळे समजले आहे.

५) जागतिक पातळीवर वेगवेगळ्या देशांमध्ये अनेक समस्या आहेत. त्यांची सोडवणूक तो एकटा देश करू शकत नाही. त्यासाठी आंतरराष्ट्रीय अर्थिक सहकार्याची गरज असते. आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासामुळे आंतरराष्ट्रीय सहकार्यास व एकमेकांच्या हितासाठी विविध देश सहजपणे तयार होतात. मुक्त व्यापार परस्परांच्या हिताचा कसा आहे हे सांगण्याचे कार्य आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र करते. जागतिक पातळीवर शांतता प्रस्थापित करण्यासाठी निर्हस्तक्षेपाचे धोरणच गरजेचे आहे. आयात-निर्यात निर्बंध कमी करण्याची आवश्यकता आहे. या सर्व गोष्टींचे आकलन आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासामुळेच होते.

**आंतरराष्ट्रीय व्यापाराचे महत्त्व:**

अर्थिक विकासाच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय व्यापाराचे महत्त्व पुढील मुद्यांच्या साहाय्याने स्पष्ट करता येईल.

**१) श्रमविभागणी आणि विशेषीकरणाचे फायदे:**

आंतरराष्ट्रीय व्यापार दोन किंवा अधिक देशात चालत असतो. त्यामुळे व्यापाराची व्याप्ती वाढते. प्रत्येक देश उपलब्ध असणारी साधनसामग्रीचा पर्याप्त वापर करण्यासाठी श्रमविभागणी आणि विशेषीकरणाचा अवलंब करतो. त्यामुळे कमी वेळात अधिक व दर्जेदार उत्पादन होऊन मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे सर्व फायदे मिळतात.

**२) बाजाराची कक्षा रूंदावते:**

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे बाजारपेठेची व्याप्ती वाढत जाते. व्याप्ती वाढल्यामुळे प्रत्येक देशाला आपल्या उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तिचा अधिकाधिक वापर करता येतो.

**३) उत्पादनात वाढ:**

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे ज्या वस्तूंचे उत्पादन करणे कमी खर्चाचे व अधिक फायद्याचे असते. अशाच वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी प्रत्येक देश श्रमविभागणी आणि विशेषीकरणाचा वापर करतो. विशेषीकरणामुळे अधिक व दर्जेदार उत्पादन होऊन एकूण जागतिक उत्पादनात वाढ होते. उत्पादन वाढल्यामुळे उपभोक्त्यांना जास्तीत जास्त वस्तूंचा उपभोग घेता येतो.

### ४) उत्पादनपद्धतीत सुधारणा:

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे देशा देशात उत्पादनवाढीची स्पर्धा निर्माण होते. अशा स्पर्धेत टिकून राहण्यासाठी प्रत्येक देश उत्पादनात नवीनवीन शोध लावून अधिकाधिक उत्पादन करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे उत्पादन पद्धतीत नवसंशोधनास चालना मिळून उत्पादन पद्धतीत सुधारणा धडून येते. आधुनिक पद्धतीने उत्पादन केल्यास उत्पादनाचा सरासरी खर्च कमी येतो म्हणजेच आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे देशातील रोजगार पातळी आणि उत्पन्न पातळी उंचावते.

### ५) रोजगार आणि उत्पादनात वाढ:

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे उत्पादन घटक एका देशातून दुसऱ्या देशात सहजपणे जावू शकतात. त्यामुळे उत्पादन घटकांची गतिशीलता वाढते. गतिशीलता वाढल्यामुळे एकूण रोजगार पातळीत वाढ होऊन लोकांच्या उत्पन्न पातळीत वाढ होते. त्यामुळे देखील देशाच्या एकूण उत्पन्नात भर पडते. निर्यात वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली जाऊन रोजगाराच्या अधिक संधी निर्माण होतात. थोडक्यात आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे देशातील रोजगार पातळी आणि उत्पादन पातळी उंचावते.

### ६) उपभोक्त्यांचे समाधान वाढते:

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे विशेषीकरण आणि श्रमविभागणीच्या तत्वाचा अवलंब होऊन कमी खर्चात अधिक उत्पादन होते. तसेच ज्या वस्तूंचे उत्पादन देशात होत नाही अशा वस्तूंची आयात केली जाते. त्यामुळे उपभोक्त्यांना कमी किमतीत जास्तीत जास्त वस्तूंचा उपभोग घेता येतो. त्यामुळे उपभोक्त्यांचे समाधान वाढते.

### ७) अर्थिक संकटात मदत:

बऱ्याच वेळा देशात अतिवृष्टी, महापूर, दुषकाळ, भूकंप यांसारखी नैसर्गिक आपत्ती निर्माण झाल्याने उत्पादनात घट होते. अशा परिस्थितीत आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या माध्यमातून इतर देशातून अत्यावश्यक वस्तूंची आयात करता येते आणि उद्भवलेल्या नैसर्गिक परिस्थितीवर प्रभावीपणे मात करता येते.

### ८) मक्तेदारीचे नियंत्रण:

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे उत्पादकांमध्ये स्पर्धा निर्माण होते. प्रत्येक उत्पादक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी दर्जा उंचविण्यासाठी प्रयत्न करतो. त्यामुळे विशिष्ट वस्तू उत्पादनात एखाद्या उत्पादकाची मक्तेदारी निर्माण होत नाही.

### ९) उत्पादनात सातत्य:

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे वस्तूच्या आयातीबरोबरच कच्च्या मालाची देखील आयात करता येते. त्यामुळे देशात कच्च्या मालाची टंचाई निर्माण झाल्यास इतर देशातून कच्चा माल आयात करून उत्पादनात सातत्य टिकवून ठेवता येते.

**१०) किंमत पातळी स्थिर राहते:**

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे एखाद्या देशात विशिष्ट वस्तूची मागणी वाढल्यास इतर देशातून वस्तूची आयात करून मागणी आणि पुरवठा यांच्यात समतोल राखता येतो. त्यामुळे किंमत पातळी स्थिर राहण्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यापारास महत्त्व प्राप्त होते.

**११) तांत्रिक मागणी:**

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे प्रगत देशातून आधुनिक यंत्रसामुग्री, भांडवली वस्तू व तंत्रज्ञानाची आयात करता येते. अशा आयातीमुळे तशाच प्रकारचे तंत्रज्ञान देशात विकसित करण्याचा प्रयत्न केला जावून देशाची तांत्रिक प्रगती होते.

**१२) आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढते:**

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे वस्तू व सेवांच्या आयात-निर्याती बरोबरच इतर देशातील रूढी, परंपरा, संस्कृती आणि विचारांची देवाण-घेवाण ते देशादेशांमधील संबंध वाढत जावून सहकार्य वाढीस लागते. त्यातून आंतरराष्ट्रीय सामंजस्य आणि एकात्मता निर्माण होण्यास मदत होते.

**आपली प्रगती तपासा:**

१) आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राचा अभ्यास कसा महत्त्वाचा आहे ?

२) आंतरराष्ट्रीय व्यापाराचे आर्थिक दृष्टीने महत्त्व काय आहे ?

## १.५ आंतरप्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामधील फरक

‘व्यापार म्हणजे वस्तूंचा विनिमय’ असा सर्वसाधारण व्यवहारामध्ये व्यापाराचा अर्थ घेतला जातो. व्यापार अंतर्गत त्याचप्रमाणे बाह्य देखील असतो. देशाच्या भौगोलिक सीमांच्या अंतर्गत चालणारा व्यापार म्हणजे अंतर्गत किंवा देशी व्यापार त्यालाच आंतरप्रादेशिक व्यापार असेही म्हटले जाते.

आंतरराष्ट्रीय व्यापार देशाच्या राजकीय सीमा ओलांडून होत असतो. म्हणून आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणजे वेगवेगळ्या देशांमध्ये होणारा वस्तू व सेवांचा विनिमय होय. या व्यापारालाच 'परकीय व्यापार' असेही म्हटले जाते.

थोडक्यात दोन देशांमध्ये होणारा व्यापार म्हणजे ‘आंतरराष्ट्रीय व्यापार’ आणि देशाच्या दोन प्रदेशातील व्यापार म्हणजे ‘अंतर्गत’ किंवा ‘आंतरप्रादेशिक व्यापार’ होय.

एका देशातील वस्तू व सेवा यांचा इतर देशांबरोबर होणाऱ्या विनिमयाशी संबंधित असणारी अर्थशास्त्राची शाखा म्हणजे आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र होय. अंतर्गत व्यापारासाठी जे आर्थिक कारण जबाबदार असते ते म्हणजे परस्पर गरजांची पूर्तता तेच कारण आंतरराष्ट्रीय व्यापारास जबाबदार असते. आंतरराष्ट्रीय व्यापाराशिवाय अधिक समाधानकारक जीवन व्यतित करणे कोणत्याही समाजाला आज शक्य नाही. जीवनमानात सुधारणा करण्यासाठी

आंतरराष्ट्रीय व्यापाराची गरज असते. आधुनिक समाजाने आपल्या जीवनमान पातळीत जी सुधारणा करून घेतली आहे ती केवळ आंतरराष्ट्रीय व्यापारामुळेच शक्य झाली आहे.

ज्या वस्तूंचे उत्पादन एखाद्या देशाला करता येत नाही त्या वस्तूंची इतर देशांमधून आयात केली जाते. तसेच ज्या वस्तूंचे गरजेपेक्षा अधिक उत्पादन होत असते त्या वस्तूंची इतर देशांना निर्यात केली जाते. काही वस्तूंच्या उत्पादनाच्या बाबतीत एखाद्या देशाला इतर देशांपेक्षा विशेष लाभ मिळत असतात. त्यामुळे त्या वस्तू इतर देशांपेक्षा कमी खर्चात उत्पादित करतो. परतु सर्वच वस्तूंच्या बाबतीत अशी शक्यता नसते म्हणून काही वस्तूंचे उत्पादन करणे अधिक खर्चिक होत असते. उत्पादनाच्या बाबतीत ही परिस्थिती लक्षात घेतल्यास सहजपणे असे सांगता येते की आंतरराष्ट्रीय पातळीवर उत्पादनाच्या बाबतीत श्रमविभागणी किंवा विशेषीकरणाची गरज असते. आंतरप्रादेशिक व्यापार जसा श्रमविभागणी किंवा विशेषीकरणाच्या तत्वावर आधारित आहे. उदा. कोळसा, चहा, आणि ताग यांचे उत्पादन पश्चिम बंगाल घेतो तर महाराष्ट्राने कापड उत्पादनाच्या बाबतीत विशेषीकरण केले आहे. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय व्यापारात प्रत्येक देश ज्या वस्तूच्या उत्पादनाच्या बाबतीत विशेष लाभ मिळतो त्या वस्तूंचे अधिक उत्पादन करून त्या वस्तूंची इतर देशांना निर्यात करतो व त्यांच्या बदल्यात इतर वस्तूंची इतर देशांकडून आयात करतो.

अंतर्गत व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यापार यांच्या मुळाशी असलेले तत्त्व जरी सारखे असले तरी त्या दोघांमध्ये अनेक फरक आहेत. फार पूर्वी फ्रेड्रिक लिस्ट (Friedric List) यांनी म्हटल्याप्रमाणे

"देशी व्यापार हा आमच्या लोकांमधील व्यापार असतो तर आंतरराष्ट्रीय व्यापार हा आमच्यात आणि त्यांच्यात होत असतो."

**आंतरप्रादेशिक व आंतरराष्ट्रीय व्यापारातील फरक:**

अंतर्गत व बाह्य व्यापार यातील फरकाचे काही प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे:

**१) उत्पादन घटक गतिशीलता:**

श्रम व भांडवल देशातल्या देशात अधिक गतिशील असातात. तर दोन देशात ते कमी गतिशील असतात. याच कारणाने रिकार्डोने आंतरराष्ट्रीय व्यापारसाठी स्वतंत्र सिद्धांत मांडण्याची आवश्यकता सांगितली आहे.

घटक गतिशीलतेतील तुलनात्मक फरकामुळे वस्तूंच्या उत्पादन खर्चात वेगवेगळ्या देशात तुलनात्मक फरक निर्माण होत असतो आणि हा फरक कायमस्वरपी राहत असतो. अंतर्गत व्यापारात असा फरक राहत नाही. कारण समजा, एखाद्या उद्योगात उत्पादन खर्चापेक्षा किंमत अधिक असेल तर त्या उदयोगात उत्पादन घटक संक्रमित होतील तेथील उत्पादन वाढेल व किंमती कमी होतील. त्यांची घटण्याची प्रवृत्ती त्या उत्पादन खर्चाइतकी होईपर्यंत चालू राहील. याउलट दुसऱ्या उद्योगात घटक बाह्य स्थानांतरण सुरू राहील. त्यामुळे उत्पादन कमी होऊन किंमती वाढतील व त्यांच्यातील वाढ उत्पादन खर्चातील समानतेपर्यंत चालू राहील.

दोन देशांमध्ये घटक गतिशीलता तुलनेने कमी असते त्यामुळे खर्च व किंमतीमध्ये आपोआप समता प्रस्थापित होत नाही. त्यांच्यामध्ये कायमस्वरूपी अंतर राहत असते. उदा. दीर्घकाळात भारतातील चहाची किंमत त्याच्या उत्पादन खर्चाइतकी भारतात राहील. परंतु इंग्लंडमध्ये भारतीय चहाची किंमत त्याच्या भारतातील उत्पादनखर्चापेक्षा निश्चितपणे कायमस्वरूपी अधिक राहील. अशा तऱ्हेने अंतर्गत व्यापारापेक्षा आंतरराष्ट्रीय व्यापार वेगळा ठरतो.

**२) नैसर्गिक घटक देणग्या:**

वेगवेगळ्या देशांना वेगवेगळ्या नैसर्गिक घटना देणग्या लाभलेल्या असतात. त्यामुळे एखादी विशिष्ट वस्तू एखाद्या विशिष्ट देशामध्येच का निर्माण होते हे लक्षात येते. उदा. दक्षिण अफ्रिकेमध्ये सोन्याचे उत्पादन होते. ब्राझिलमध्ये कॉफीचे उत्पादन होते तर भारतात चहाचे उत्पादन होते या घटक देणग्यांचे लाभ दुसऱ्या देशांना पाठविता येत नाहीत. त्यामुळे आंतर प्रादेशिक व्यापार आंतरराष्ट्रीय व्यापार यांच्यामध्ये फरक निर्माण होतो.

**३) व्यापारावरील निर्बंध:**

जेव्हा व्यापार एकाच देशातील विविध प्रदेशांमध्ये चालतो तेव्हा त्या व्यापारावर सरकारची फारशी नियंत्रणे नसतात. मात्र जेव्हा व्यापार दोन किंवा अनेक देशात चालतो तेव्हा त्या व्यापारावर सरकारकडून विविध प्रकारची नियंत्रणे व निर्बंध लादले जातात. आंतरराष्ट्रीय व्यापार हा सरकारने घातलेल्या नियमांच्या चौकटीतून चालत असतो. दोन देशांच्या सीमारेषेपलीकडे चालणाऱ्या व्यापारावर आयात जकाती आकारणे, आयातीचा वाटा ठरवून देणे, विशिष्ट वस्तूची आयात करण्यावर पूर्ण बंदी घालणे, अत्यावश्यक वस्तूच्या आयातीवरील जकात कमी करणे, व्यापाराचा परवाना देणे इत्यादींसारखी नियंत्रणे सरकारकडून घातली जातात.

**४) वाहतूक खर्चात फरक:**

आंतरप्रादेशिक व्यापारात वस्तूची वाहतूक करण्यासाठी रेल्वेची मालवाहतूक, रस्त्यावरील वाहतुकीची साधने वापरली जातात. मालवाहतुकीचे अंतर कमी असते त्यामुळे वाहतुकीचा खर्च कमी असतो. याउलट आंतरराष्ट्रीय व्यापार दोन किंवा अनेक देशांमध्ये चालत असल्याने वाहतुकीचे अंतर प्रचंड असते. अशा वेळी समुद्र मार्गाच्या मालवाहतुकीसाठी जहाज आगबोटी तसेच हवाई वाहतुकीसाठी विमानाचा वापर केला जातो. अशा वाहतुकीमध्ये धोक्याचे प्रमाण अधिक असल्याने वाहतुकीचा खर्चही अधिक असतो.

**५) भिन्न राष्ट्रीय धोरणे:**

प्रत्येक देशाचे स्वतंत्र अधिक धोरण असते. सरकारच्या आर्थिक धोरणात चलनविषयक धोरण, राजकोषीय धोरणाचा समावेश होतो. त्या धोरणाचा परिणाम देशातंर्गत किंमत पातळी, रोजगार पातळी आणि व्यापारावर होत असतो. तसेच या धोरणाचा परिणाम उत्पादन खर्चावर होत असतो. अशा देशांतर्गत धोरणाचा परिणाम दोन देशात चालणाऱ्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर होतो. प्रत्येक राष्ट्राचे स्वतंत्र अर्थिक धोरण असल्याने त्याचा परिणाम आंतरराष्ट्रीय व्यापारावर ठळकपणे दिसून येतो. आपल्या देशाची अर्थव्यवस्था

स्वयंपूर्ण व्हावी, आपल्या देशातील उद्योगांना जागतिक स्पर्धेतून संरक्षण मिळावे यासाठी इतर देशातून होणा-या विशिष्ट वस्तूच्या आयातीवर निर्बंध लादतात. तसेच एखादा देश दुस-या देशाची बाजारपेठ काबीज करण्यासाठी आपल्या देशात उत्पादित झालेली वस्तू देशातील ग्रहकांना अधिक किमतींना विकतात व तीच वस्तू दुसऱ्या देशात कमी किमतीला विकण्याचे धोरण राबवितात. त्यालाच अर्थशास्त्रीय भाषते 'अवपूंजन' (Dumping) असे म्हणतात.

### ६) बाजारपेठांमध्ये तफावत:

आंतरप्रादेशिक व्यापारामध्ये देशातील सर्व बाजारपेठांमध्ये एकाच प्रकारची वजने व मापे वापरली जातात, विक्रीची विशिष्ट प्रकारची पद्धती असते. उदा. भारतात मालाचे वजन करण्यासाठी मेट्रिक पद्धतीची किलोग्रॅम क्विंटल टन इत्यादी मापे वापरील जातात. तसेच शेतमालाची विक्री करण्यासाठी लिलाव पध्दती वापरली जातेय तसेच देशांतर्गत बाजारपेठांच्या रचनेत फारसा फरक असत नाही. मात्र जेव्हा व्यापार दोन किंवा अधिक देशात चालतो तेव्हा वजने व मापे यामध्ये फरक असतो, विक्रीची वेगळी पद्धती वापरली जाते. म्हणूनच आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आंतरप्रादेशिक व्यापारात बाजारपेठांमध्ये फरक दिसुन येतो.

### ७) मानवी क्षमता:

देशादेशांमधील मानवी क्षमतांमध्ये भिन्नता असते. काही देशांमधील लोक शारीरीक दृष्टीने अधिक दणकट असतात. तर काही देशांमधील लोक अधिक बुद्धिमान असतात. काही लोकांमध्ये अधिक कलाकौशल्य असते, तर काही देशांमधील लोकांकडे व्यवस्थापन व संघटन कौशल्य असते. या विविध भिन्नतेमुळे देशी व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यापार यामध्ये भिन्नता निर्माण होते.

### ८) भांडवलाचा साठा:

इंग्लंड, अमेरिका, जपान यांसारख्या देशांजवळ खूप मोठा साठा आहे. तर इतर देशांमध्ये भांडवलाची टंचाई आहे. त्यामुळे वेगवेगळ्या देशांच्या उत्पादनात फरक निर्माण होतो. अंतर्गत व्यापारात अशी स्थिती निर्माण होत नाही.

### ९) राजकीय सार्वभौमत्व:

प्रत्येक देश राजकीय दृष्टीने सार्वभौम असल्याने आंतरराष्ट्रीय व्यापारात अनेक समस्या निर्माण होत असतात. वस्तूंचे चलनवलन, वेतन व किंमती, राजकोषीय व्यवहार, बँकाविषयक कायदे, परकीय कर्जे इ. बाबतीत प्रत्येक देश स्वतंत्र धोरण राबवित असतो. देशाच्या सीमा ओलांडून होणारी वस्तूंची आयात-निर्यात याबाबतीत प्रत्येक देश वेगवेगळ्या मर्यादा घालत असतो. परंतु या प्रकारच्या मर्यादा आंतरप्रादेशिक व्यापार व अंतर्गत व्यापारांमध्ये नसतात. त्यामुळे आंतरप्रादेशिक व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यापारात भेद निर्माण होतो.

**१०) चलन पद्धती:**

देशादेशांच्या जलन पद्धती भिन्न-भिन्न असतात. त्यामुळे एका देशातून दुसऱ्या देशामध्ये वस्तूंच्या प्रवाहावर प्रतिकुल परिणाम होतो. चलन विनिमयाच्या अनेक समस्या निर्माण होत असतात, त्या समस्या अंतर्गत व्यापारात नसतात.

जी व्यक्ति आंतर-प्रादेशिक व्यापारात भाग घेत असते तिला चलनांच्या तुलनात्मक मुल्यांचा विचार करण्याची आवश्यकता नसते. परंतु जी व्यक्ति आंतरराष्ट्रीय व्यापारात भाग घेत असते तिला चलनांच्या तुलनात्मक मुल्यांचा विचार करावाच लागतो.

**११) भांडवली गतिशीलता:**

चलनांमध्ये असलेला वरील भेद भांडवलाच्या अंतर्गत व आंतरराष्ट्रीय गतिशीलतेवर भिन्नपणे परिणाम करीत असतो. देशातील चलनांच्या अंतर्गत मूल्यात बदल होत असेल तर देशातील सर्व प्रदेशात कर्जरोख्यांच्या मूल्यावर होणारा परिणाम सारखा असेल.

त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीच्या तुलनेने देशांतर्गत भांडवल अधिक मुक्तपणे गतिशील असते, परंतु एखाद्या देशाच्या विनिमय दरात बदल होत असेल तर त्या देशाच्या चलनामध्ये धारण केलेल्या भांडवलाच्या मूल्यामध्ये निश्चितपणे बदल होईल. त्यामुळे परकीय चलनामध्ये भांडवल धारण करण्यामध्ये अनेक धोके असतात. म्हणून लोक परकीय चलनामध्ये भांडवल स्विकारताना तुलनेने अधिक दक्ष असतात. या वैशिष्ट्यांमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर तुलनेने भांडवल कमी गतिशील राहते.

**१२) स्वतंत्र बाजारपेठा:**

आंतरराष्ट्रीय बाजारपेठांची स्वतंत्र संस्कृती असते. त्यामुळे प्रत्येक देशाची एक स्वतंत्र बाजारपेठ बनत असते. उदा. ब्रिटीश उजव्या बाजूला स्टेअरिंग असलेल्या कार वापरतात. तर फ्रेंच डाव्या बाजूला स्टेअरिंग असलेल्या कार वापरतात. त्यामुळे कारच्या बाजारपेठा परिणामकारकपणे वेगवेगळ्या होत असतात. त्याचप्रमाणे भाषा, सवयी, पसंती, चालरिती यामुळे बाजारपेठांमध्ये वेगळेपण निर्माण होत असते.

**१३) आर्थिक राष्ट्रवाद:**

प्रत्येक देशाची स्वतंत्र अर्थिक जीवनपद्धती असते. राजकीय स्वातंत्र्याबरोबरच आर्थिक स्वावलंबनाची मागणी केली जात असते. आपल्या देशाचा अर्थिक विकासाचा दर वाढविण्याचा प्रत्येक राष्ट्र प्रयत्न करीत असते. त्यामुळे राष्ट्राराष्ट्रांचा स्वतंत्र अर्थिक राष्ट्रवाद निर्माण होत असतो आणि तो आंतरप्रादेशिक व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यापारातील फरक वाढविण्यास मदत करतो.

**१४) व्यापार व विनिमय नियंत्रणे:**

प्रत्येक आधुनिक राष्ट्र कमी अधिक प्रमाणात व्यापार व विनिमयावर नियंत्रणे लादत असते. त्यांचा वस्तू व सेवांच्या आंतरराष्ट्रीय आवक-जावकवर परिणाम होत असतो. त्यामुळे आंतर-प्रादेशिक व्यापार आंतरराष्ट्रीय व्यापार यामध्ये भेद निर्माण होतो.

**आपली प्रगती तपासा:**

१) आंतरप्रादेशिक व आंतरराष्ट्रीय व्यापार यामध्ये काय फरक आहे ?

## १.६ सारांश

प्रस्तुत प्रकरणामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापाराचा अर्थ व आंतरराष्ट्रिय व्यापाराच्या विविध व्याख्या दिल्या आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय व्यापाराची व्याप्ती विस्तृतपणे मांडण्यात आली आहे व आंतरराष्ट्रीय व्यापाराचे आणि आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राचे महत्त्व देखील अधोरेखित करण्यात आले आहे. आंतरप्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराचा अर्थ आणि या दोन व्यापारामधील फरक देखील आपण अभ्यासला आहे. यावरून असे लक्षात येते की, आंतरराष्ट्रीय व्यापार हा प्रत्येक राष्ट्रासाठी आवश्यक व फायदेशीर आहे.

## १.७ प्रश्न

प्र.१ आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र म्हणजे काय ? आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राचे महत्व विषद करा?

प्र.२ आंतरराष्ट्रीय व्यापाराची ठळक वैशिष्ट्ये कोणती ?

प्र.३ आंतरराष्ट्रीय व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यापार यातील फरक स्पष्ट करा ?

प्र. ४ आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये विशद करा.

# २

# आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत

**घटक रचना**

२.० उद्दिष्टे

२.१ आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांतांचा परिचय

२.२ ॲडम स्मिथचा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत

२.३ रिकार्डोचा तुलनात्मक खर्चातील फरकाचा सिद्धांत

२.४ हेकशेर-ओहलिन सिद्धांत

२.५ लिओन्टिफचा विरोधाभास

२.६ क्रुगमनचे प्रतिमान

२.७ सारांश

२.८ प्रश्न

## २.० उद्दिष्टे

- ॲडम स्मिथचा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत व त्याचे महत्व समजून घेणे.
- रिकार्डोचा तुलनात्मक खर्चातील फरक सिद्धांताचा अभ्यास करणे.
- हेकशेर-ओहलिन सिद्धांत समजून घेणे.
- लिओन्टिफचा विरोधाभास व क्रुगमनचे प्रतिमान यांचा अभ्यास करणे.

## २.१ आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांतांचा परिचय

व्यापारवाढ्यांच्या नियंत्रित व्यापार धोरणावर ॲडमास्मिथने जोरदार टिका केली आहे. देशाच्या आर्थिक प्रगतीमध्ये नियंत्रित व्यापारामुळे अडथळे निर्माण होतात. व्यापारावर मर्यादा घालण्याच्या जुनाट धोरणाचा त्याग करुन श्रमविभागणीला मदत करणाऱ्या आणि मुवज व्यापार धोरणाचा पाया प्रथम ॲडम स्मिथयांनी घातला आहे. मुक्त व्यापार धोरण हे देशाला श्रीमंत बनविण्याचे धोरण आहे. कारण त्यामुळे बाजारपेठांच्या कक्षा रुंदावून श्रमविभागणी किंवा विशेषीकरणाचे लाभ देशाला मिळू शकतात. श्रमविभागणीच्या तत्वावर आधारित असलेल्या व्यापार सिध्दांताला तुलनात्मक खर्च लाभाचा सिध्दांत म्हणून ओळखला जाते.

तुलनात्मक खर्च लाभाचे तत्व ॲडम स्मिथ, केव्हिड रिकार्डो या अर्थतज्ञांनी विकसित केले. तुलनात्मक खर्च लाभाचे तत्व रिकार्डोपूर्वी अनेक अर्थतज्ञांनी केले या तत्वामध्ये सुधारणा करण्याचे कार्य इलिएट, केर्नस, मार्शल, बॅस्टबल, हॅबरलर हेक्चर, ओहलिन इ. अर्थतज्ज्ञांनी

केले. रिकार्डोपासून या सिध्दांताच्या झालेल्या विकासाची चर्चा आपण पुढील लिखाणातून करणार आहोत.

## २.२ ॲडम स्मिथचा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत / आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सनातन सिद्धांत (The Classical Theory of International Trade)

### २.२.१ प्रस्तावना :

सनातनपंथीय अर्थशास्त्रज्ञांच्या मते, खुला व्यापार व पूर्ण स्पर्धा यामुळे एका देशाच्या प्रगतीत इतर देशांनाही सहभागी होता येते. निरनिराळ्या देशात निरनिराळी उत्पादन सामग्री विपुल प्रमाणात उपलब्ध असते. त्यामुळे त्या त्या सामुग्रीच्या सहाय्याने ते देश कमी खर्चात अधिक उत्पादन करुन इतर देशांमध्ये त्याची निर्यात करतात व ज्या वस्तूंचे उत्पादन देशात करणे तुलनात्मकदृष्ट्या जास्त खर्चिक असते त्या वस्तूंची आयात करतात. यामुळे सर्व देशांना कमी खर्चात अधिक वस्तू उपभोगावयास मिळून जगाच्या आर्थिक कल्याणात वाढ होते. परंतू कोणाला किती लाभ होईल हे व्यापाराच्या शर्थीवर अवलंबून असते.

आंतरराष्ट्रीय व्यापाराचा आधुनिक सिद्धांत आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सनातन सिद्धांत हे एकत्रित आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत आहेत. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत रॉबर्ट टॉरेन्स, डेव्हिड रिकार्डो आणि जे. एस्. मिल यांनी स्पष्ट करुन त्या आधारालाच आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सनातन सिद्धांत म्हणतात. त्याला तुलनात्मक खर्चाचा फायद्याचा आधार आहे अशा रीतीने ॲडम स्मिथ यांनी निरपेक्ष खर्च लाभाच्या तत्त्वाच्या आधारावर आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत स्पष्ट केला. तो इतर सनातनवादी अर्थशास्त्रज्ञानी नाकारला. विशेषतः रिकार्डोने नाकारला. व तुलनात्मक खर्च सिद्धांत स्पष्टपणे मांडला.

### २.२.२ॲडम स्मिथचा निरपेक्ष खर्च लाभ सिद्धांत (Adam Smith Theory of Absolute Cost Advantage) :

आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सनातन सिद्धांत म्हणून ॲडम स्मिथच्या सिद्धांताचा उल्लेख केला जातो. स्मिथ यांच्या मते, देशाला नैसर्गिक मक्तेदारी काही वस्तूंच्या उत्पादनात असते. इतर देशांच्या तुलनेने निरपेक्ष खर्च खूप कमी असतो. इतर देशांच्या वस्तूसाठी आणि निर्यातीसाठी उत्पादनात विशेषीकरणाला प्राधान्य दिले जाते. प्रत्येक देश ज्या वस्तूच्या उत्पादनाच्या बाबतीत निरपेक्ष खर्च लाभ असल्यास ती वस्तु निर्यात करेल व ज्या वस्तूच्या बाबतीत निरपेक्ष तोट्याची स्थिती असेल ती वस्तू आयात करेल.

आंतरराष्ट्रीय व्यापाराचे ॲडम स्मिथ यांचे विचार श्रमविभागणी या तत्त्वाशी निगडीत आहेतच परंतू व्यापार वाद्यांची संरक्षणवादी मते खोडून मुक्त व्यापाराचा पुरस्कार स्मिथने या सिद्धांताच्या आधारे केला आहे. त्यांच्या मते, मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे श्रमविभागणी शक्य होते. ॲडम स्मिथच्या मते, जर दोन देशांमध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार होणार असेल तर त्यापैकी एका देशाला विशिष्ट वस्तूच्या उत्पादनात निव्वळ लाभ मिळाला पाहिजे.

थोडक्यात आंतरराष्ट्रीय व्यापार घडून येण्यासाठी एका देशाला एका व्यापारातील एक वस्तू अत्यल्प खर्चात तर दुसऱ्या देशाला दुसरी वस्तू अत्यल्प खर्चात निर्माण करता आली पाहिजे.

स्मिथच्या मते, एखाद्या वस्तूचे मूल्य तिच्या उत्पादनासाठी खर्ची पडलेल्या श्रमाने ठरतो असे श्रम मूल्य सिद्धांत सांगतो. म्हणजेच दोन वस्तूंचा परस्परामधील विनिमयाचा दर त्या वस्तूच्या उत्पादनासाठी खर्च झालेल्या श्रममात्राच्या प्रमाणात ठरतो.

वेगवेगळ्या देशातील श्रमिकांची उत्पादकता सारखी नसल्याने देशादेशामधील वस्तूंचे सापेक्ष मूल्य वेगळे असते आणि वस्तूंच्या सापेक्ष मूल्यातील फरकांमुळे आंतरराष्ट्रीय व्यापार लाभप्रद ठरतो.

**निव्वळ खर्च लाभ सिध्दांत:**

| देश / वस्तू | चहा | साखर |
|---|---|---|
| भारत | १०० किलोग्रॅम | ५० किलोग्रॅम |
| इंग्लड | ५० किलोग्रॅम | १०० किलोग्रॅम |

भारत व इंग्लड हे दोन देश असून ते चहा व साखर यांचे उत्पादन करतात. उत्पादन खर्च श्रमाच्या स्वरूपात मोजला आहे.

ॲडम स्मिथच्या मते भारत चहाच्या उत्पादनात तर इंग्लड साखरेच्या उत्पादनात विशेषीकरण करेल. भारत साखरेचे उत्पादन थांबवून फक्त चहाच्या उत्पादनात विशेषीकरण करतो व साखरेची आयात करतो. कोणत्याही वस्तूचे देशांतर्गत उत्पादन महाग असेल तर परदेशातून त्या वस्तूची आयात करणे सोयीस्कर व फायदयाचे ठरते. म्हणून भारताला साखरेची आयात करणे व इंग्लडला चहाची आयात करणे फायदेशीर ठरते. भारत चहाची तर इंग्लड साखरेची निर्यात करेल या व्यापारामुळे दोन्ही देशांचा फायदा होतो.

अशाप्रकारे दोन देश व दोन वस्तूंचे साधे प्रतिमान घेऊन त्या आधारे स्मिथ यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारापासून होणारे लाभ स्पष्ट केले व मुक्त व्यापाराची आवश्यकता दाखवून दिली. थोडक्यात एखाद्या देशाला वस्तूच्या उत्पादनात निरपेक्ष खर्च लाभ जास्त असेल तर दोन्ही देश व्यापारापासून लाभ प्राप्त करुन घेऊ शकतात.

### २.२.३ स्मिथच्या सिद्धांताची गृहीते :

१) अर्थव्यवस्थेत वस्तूचा उत्पादन खर्च श्रमात मोजला आहे.

२) अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार आहे. श्रमिक देशात गतिमान परंतू विदेशात पूर्णपणे देशात अगतिमान असतात.

४) आंतरराष्ट्रीय व्यापारात दोन देश व दोन वस्तू सहभागी होतात.

५) स्थिर उत्पादन फल अस्तित्त्वात आहे.

### २.२.४ ॲडम स्मिथच्या सिद्धांताचे टिकात्मक मूल्यमापन :

१) ॲडम स्मिथने उत्पादन खर्च श्रमात मोजला आहे परंतू श्रमात खर्च मोजणे अतिशय कठीण आहे.

२) ॲडम स्मिथ यांनी दोन देश व दोन वस्तूचा विचार केला आहे. परंतू प्रत्यक्षात एकाचवेळी देशादेशांमध्ये अनेक वस्तूंचा व्यापार केला जातो त्यामुळे संपूर्ण होणाऱ्या व्यापाराचे हा सिद्धांत स्पष्टीकरण देऊ शकत नाही.

३) स्मिथचा सिद्धांत श्रमाच्या विशेषीकरणाच्या आणि प्रादेशिक विस्ताराच्या विरुद्ध आहे कारण अविकसित देशाला कृषी आणि औद्योगिक क्षेत्रात विकसित देशाच्या मानाने निरपेक्ष लाभ मिळणे शक्य नसते. विकसित देशांशी असा देश स्पर्धा करु शकत नाही. म्हणजेच अविकसित देश विकसित देशाला निर्यात करण्याची आशा नसते. तसेच विकसित देशही अविकसित देशांची खरेदी शक्ती कमी असल्याने निर्यात करणार नाही. यावरुन आयातक्षमता निर्यात क्षमतेवर अवलंबून असते हे समजते.

### २.२.५ सारांश:

ॲडम स्मिथच्या सिद्धांतात वरील दोष असले तरी निरपेक्ष लाभाचे तत्त्व, मुक्त व्यापार, आंतरराष्ट्रीय श्रमविभागणी इ. तत्त्वावरील आधारित आंतरराष्ट्रीय व्यापारातील अनेक समस्या सोडवण्याचा प्रयत्न स्मिथने केला आहे. हेच या सिद्धांताचे महत्त्व आहे.

## २.३ रिकार्डोचा तुलनात्मक खर्चातील फरकाचा सिद्धांत

### २.३.१ प्रस्तावना:

१६ व्या शतकात व्यापारवादी धोरणावर झालेल्या टीकेतून तुलनात्मक खर्च सिद्धांताची निर्मिती झाली आहे. ॲडम स्मिथने "राष्ट्राची संपत्ती" या ग्रंथामध्ये व्यापारवादी धोरणावर जोरदार टीका केली. मुक्त व्यापार धोरण संरक्षित व्यापार धोरणापेक्षा अधिक श्रेष्ठ असते, याचे स्पष्टीकरण तुलनात्मक खर्च सिद्धांताने अधिक स्पष्टपणे मांडले आहे. या तत्वाचा महत्वाचा गुण म्हणजे निरपेक्ष खर्च लाभ असेल तरच आंतरराष्ट्रीय व्यापार होतो. ही ॲडम स्मिथची आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी आवश्यक अट होती. त्याची गरज नसते हे रिकार्डोने आपल्या सिद्धांतामधून दाखवून दिले आहे.

डेव्हिड रिकार्डो यांनी १९१८ मध्ये प्रकाशित प्रकाशित केलेल्या “The Principle of political Economy and Taxation” या प्रथांत आपला आंतरराष्ट्रीय व्यापाराचा शुद्ध सिद्धांत मांडला. हाच सिद्धांत १६१५ मध्ये रॉबर्ट टॉरेन्स यांनी मांडला होता. रिकार्डोच्या सिद्धांताचा केंद्रबिंदू म्हणजे तुलनात्मक लाभाचे महत्व होय. ज्या वस्तूच्या उत्पादनाचा बाबतीत देशाला विशेष लाभ मिळतो. त्या वस्तूंच्या उत्पादनात देशाने विशेषीकरण करावे. रिकार्डोचे पुढील विधान आजही लागू पडते.

“It is .... Important to the happiness of mankind that our enjoyment should be increased by the better distribution of Labour by each country is producing those commodities for which by its situation, its climate and its

other natural or artificial advantages, it is adopted and by exchanging them for the ccommodities of other counties"

प्रत्येक देशाने आपले हवामान, नैसर्गिक संसाधने किंवा इतर कृत्रिम लाभाच्या दृष्टीने ज्या वस्तूंचे उत्पादन करणे अधिक लाभदायक आहे अशा वस्तूंचे मूल्य उत्पादन करावे आणि इतर देशांना त्यांच्या वस्तूंच्या बदल्यात त्यांचा विनिमय करावा. हे मानवी सुखाच्या वाढीसाठी महत्त्वाचे आहे.

### २.३.२ संकल्पना:

श्रममूल्य सिद्धांतामधुन रिकार्डोने तुलनात्मक खर्च तत्वाचा विकास केला आहे. या सिद्धांतानुसार कोणत्याही वस्तूचे तिच्या श्रम खर्चाने निधारित होत असते. रिकार्डोच्या शब्दांत सांगायचे झाल्यास "श्रमांच्या साहाय्याने विविध वस्तूंचे कमी - अधिक प्रमाणात उत्पादन केले जाते. त्यामुळे त्यांचा श्रमातील खर्च कमी अधिक होत राहतो. तोच वस्तूंच्या भूतकाळातील आणि वर्तमान किमती ठरवित असतो."

ज्या नियमाने एकाच देशातील वस्तूंच्या किमती नियंत्रित केल्या जातात. त्याच नियमाने आंतरराष्ट्रीय व्यापारात प्रवेश करणा-या वस्तूंच्या किमती नियंत्रित होत नाहीत. अंतर्गत व्यापारासाठी श्रममूल्य सिद्धांत रास्त ठरतो. परंतु आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी रास्त ठरत नाही. याचे कारण म्हणजे देशातल्या देशात श्रम गतिशील असतात तर आंतरराष्ट्रीय पातळीवर ते अगतिशील असतात. जर श्रमिक दोन देशांमध्ये पूर्ण गतिशील असतील तर वस्तूंचे विनिमय मूल्य त्यांच्यामध्ये असलेल्या श्रममूल्यानुसार ठरतील. त्यांच्या विनिमय मूल्यात थोडा जरी बदला असेल तर तो बाजार प्रेरणांनी कमी केला जातो.

### २.३.३ उदाहरण:

रिकार्डोने अंकगणितीय उदाहरणाच्या साहाय्याने तुलनात्मक खर्चाचे तत्व उत्पादनाचा श्रम खर्च स्पष्ट केले आहे.

| | | | देशांतर्गत विनिमय दर (देशांतर्गत व्यापार शर्ती) |
|---|---|---|---|
| देश | दारू | कापड | |
| पोर्तुगाल | ८० | ९० | ८०:९० = १ नग दारू = ०.८९ नग कापड |
| इंग्लंड | १२० | १०० | १२०:१०० = १ नग दारू = १.२ नग कापड |
| तुलनात्मक खर्च गुणोत्तर | ८०/१२०=०.६७ | ९०/१०० = ०.९० | |


उदाहरणात पोर्तुगालला इग्लंडपेक्षा दोन्हीही वस्तूच्या उत्पादनात निरपेक्ष खर्च लाभ अधिक आहे. कारण कापड उत्पादनात १ नग कापडासाठी पोर्तुगालला ९० श्रमिक तर इंग्लंडला १०० लागतात. तर दारू उत्पादनात एका नगासाठी पोर्तुगालला ८० श्रमिक तर इंग्लंडला

१२० श्रमिक लागतात. तथापि, दारू उत्पादनात पोर्तुगालला इंग्लंडपेक्षा तुलनात्मक लाभ अधिक आहे. कापड उत्पादनाचे गुणोत्तर ९०/१०० तर दारू उत्पादनाचे गुणोत्तर ८०/१२० असे आहे. त्यांची तुलना केल्यास ८०/१२०<९०/१०० असे दिसते. दुसरीकडे इंग्लडला दोन्हीही वस्तूंच्या उत्पादनात निरपेक्ष तोटा असल्याचे दिसते. परंतु कापड उत्पादनातील तुलनात्मक तोटा कमी आहे. हे आपणांस १००/९०<१२०/८० या गुणोत्तरावरून लक्षात येते.

तुलनात्मक लाभाचा खर्च स्पष्ट करण्यासाठी कमीत कमी दोन देश व दोन वस्तू असाव्यात असे बटलरने म्हटले आहे आणि आपणास एका वस्तूंच्या दोन्ही देशातील उत्पादन खर्च गुणोत्तराची ८०/१२० दुसऱ्या वस्तूंच्या दोन्ही देशातील उत्पादन खर्च गुणोत्तराशी ९०/१०० तुलना करावी लागते. वरील गुणोत्तरांचे शब्दात वर्णन करावयाचे झाल्यास पोर्तुगालला कापड उत्पादनापेक्षा दारू उत्पादनात इंग्लडवर तुलनात्मक लाभ अधिक आहे. याउलट इंग्लंडचा दारूतील पोर्तुगालवरील तोटा कापडापेक्षा अधिक आहे. दुसऱ्या पद्धतीने सांगायचे झाल्यास इंग्लंडला कापड उत्पादनात निरपेक्ष तोटा आहे. परंतु त्याच वेळेस त्याला कापड उत्पादनात तुलनात्मक लाभ आहे. वरील असमानता (८०/१२०<९०/१००) या समीकरणाने तंतोतंत मांडता येते.

श्रमखर्च रचनेच्या तुलनेवरून आंतरराष्ट्रीय व्यापाराचा दोघांनाही किती लाभ मिळतो त्याचे मोजमाप करता येते. इंग्लंडमध्ये दारूचा श्रमखर्च (१२० तास) कापडाच्या श्रम खर्चा (१०० तास) पेक्षा अधिक आहे. त्यामुळे दारूच्या बदल्यात अधिक कापड खरेदी करता येते. म्हणून इंग्लंडमधील अंतर्गत व्यापार शर्ती १ नग = १.२ नग कापड अशा असतील. पोर्तुगालमध्ये दारूचा श्रमखर्च (८० तास) कापडाच्या श्रम खर्चापेक्षा (९० तास) कमी आहे. म्हणून दारूच्या बदल्यात कमी कापड खरेदी केले जाऊ शकते. पोर्तुगाल मधील व्यापारशर्ती १ नग दारू = ०.८९ नग कापड अशा असतील.

**आकृती क्र. २.१**




आकृतीमध्ये PA रेषा पोर्तुगालचे दारू व कापड (OP/OA किंवा १ कापड = १.१३ नग दारू) यांचे अंतर्गत गुणोत्तर दर्शविते. तर EA रेषा इंग्लंडचे दारू व कापड (OE / OP किंवा १ कापड = ०.८३ नग दारू) यांचे अंतर्गत विविध गुणोत्तर दर्शविते. TA रेषा दोन्ही

देशातील आंतरराष्ट्रीय व्यापारशत (१ नग दारू १नग कापड किंवा OT / OA) दर्शविते. TA खंडित रेषा ही PA ला समांतर काढली आहे. ती पोर्तुगालचे अंतर्गत विनिमय गुणोत्तर (१ नग दारू = ०८९ नग कापड किंवा OT / OP) दर्शविते.

दोन्ही देशाच्या अंतर्गत व्यापारशतीवरून असा निष्कर्ष काढता येतो की, इंग्लंडशी तुलना करता पोर्तुगालला दारू व कापड या दोन्ही वस्तूंत निरपेक्ष लाभ आहे तर इंग्लंडला कापडात किमान तोटा आहे. जर पोर्तुगालने दारूत आणि इंग्लंडने कापडात विशेषीकरण केले आणि त्यांच्यातील व्यापारशर्ती TA रेषेने दर्शविल्याप्रमाणे म्हणजे १ नग दारू = १ नग कापड अशा ठरल्या तर दोन्हीही देशांना लाभ मिळेल. इंग्लंड १ कापडाच्या बदल्यात अंतर्गत व्यापारापेक्षा ०.१७ नग (ET) अधिक नग दारू मिळवतो.

त्याचप्रमाणे पोर्तुगाल व नग दारूच्या बदल्यात अंतर्गत व्यापारापेक्षा ०.११ नग (PA) कापड अधिक मिळवतो. यावरून असे लक्षात येते की दोन देशात दोन वस्तूंच्या उत्पादन खर्चात तुलनात्मक फरक असेल तर त्या दोन देशात आंतरराष्ट्रीय व्यापार होऊन त्या दोघांनाही फायदा होतो.

### २.३.४ गृहीते:

१) फक्त दोनच देश आहेत आणि ते दोन वस्तूंचा विनिमय करतात. म्हणजेच त्यांनी दोन देश आणि दोन वस्तू असे साधे प्रतिमान गृहीत धरले आहे.

२) श्रम हा महत्त्वाचा उत्पादन घटक आहे. इतर उत्पादन घटक श्रमामध्ये रूपांतरित करून प्रतिमानातील क्लिष्टता कमी करता येते.

३) श्रमाचे सर्व नग एकजिनसी असतात.

४) उत्पादन घटक देशातल्या देशात पूर्ण गतिशील असतात तर इतर देशात ते पूर्ण अगतिशील असतात.

५) वाहतूक खर्चाचा अभाव आहे.

६) वस्तूंच्या किंमती त्यांच्या वास्तव खर्चानुसार ठरतात.

७) दोन्हीही देशात स्थिर उत्पादन फलाच्या नियमानुसार उत्पादन होत आहे.

८) वस्तू बाजार व घटक बाजारात पूर्ण स्पर्धा असते.

९) दोन्हीही देशात पूर्ण रोजगार पातळी असते.

१०) मुक्त व्यापाराचे अस्तित्व.

### २.३.५ टीका:

बर्टील ओहलीन व फ्रँक ग्रॅहमसह अनेक अर्थशास्त्रज्ञांनी या सिद्धांतावर टीका केली आहे.

१) श्रम खर्च हाच एकमेव खर्च नाही.

या सिद्धांताने असे गृहीत धरले आहे की अंतर्गत विनिमय दर हा केवळ वस्तूच्या श्रम खर्चावरून ठरत असतो. परंतु टीकाकारांचे असे मत आहे की वस्तू उत्पादनासाठी श्रम हाच एकमेव उत्पादन घटक वापरला जात नाही.

२) सनातन सिद्धांताने असे गृहीत धरले आहे की उपभोक्त्यांची पसंती, उत्पादन कलेने आणि घटक देणग्या देखील कायम असतात. त्यांच्यात बदल होत नाही. परंतु स्थितीशील समतोल विश्लेषणावरून काढलेले निष्कर्ष आजच्या गतिमान जगाला लागू होणार नाहीत.

३) सनातन अर्थशास्त्रज्ञांनी वाहतूक खर्चाकडे दुर्लक्ष केले आहे. परंतु आंतरराष्ट्रीय व्यापारात तो खर्चाचा एक महत्वाचा घटक आहे.

४) स्थिर खर्चाच्या गृहीतामुळे देखील अडचणी निर्माण होतात.

५) या सिद्धांतात दोन देश, दोन वस्तू आणि एक उत्पादन घटक लक्षात घेतले आहे. परंतु प्रत्यक्षात व्यापारात एकापेक्षा अधिक देश, अधिक वस्तू सहभागी होत असतात.

६) सनातन सिद्धांताचा महत्त्वाचा दोष म्हणजे या सिद्धांताने गृहीत धरलेले पूर्ण रोजगार पातळी अस्तित्व होय.

७) काही वस्तूंच्या उत्पादनात देशाला नैसर्गिक लाभ मिळत नसताना देखील देश त्या वस्तूंचे उत्पादन आपल्या देशात चालू ठेवतो. हे तुलनात्मक खर्च लाभ तत्वांशी विसंगत आहे.

८) बर्टील ओहलीनने या सिद्धांताला बोजड व अवास्तव संबोधून त्यावर टीका केली आहे. कारण हा सिद्धांत वेगवेगळ्या देशांतील पूर्ण खर्च फरक विचारात घेत नाही.

### २.३.६ निष्कर्ष:

अशा प्रकारे या सिद्धांतावर काही टीका करण्यात आल्या असल्या तरी आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने हा सिद्धांत महत्त्वाचा ठरतो.

**आपली प्रगती तपासा:**

१) रिकार्डोचे तुलनात्मक खर्च लाभ तत्व म्हणजे काय ?

## २.४ हेकशेर-ओहलिन सिद्धांत

### २.४.१ प्रस्तावना:

या सिद्धांतालाच आंतरराष्ट्रीय व्यापाराचा आधुनिक सिद्धांत म्हणून ओळखले जाते. हेक्श्वर ओहीलीनचा सिद्धांत, तुलनात्मक खर्च सिद्धांताला खोटे ठरवित नाही तर त्याला आधार देतो. उत्पादन खर्चामध्ये तुलनात्मक फरक का निर्माण होतो ? याचे उत्तर सनातन सिद्धांताला देता आले नाही. हे उत्तर देण्याचे काम 'एली हेक्श्वर' व 'बर्टिल ओहलीन' यांनी तुलनात्क खर्चाचा श्रममूल्य सिद्धआंताजागी आधुनिक मूल्य सिद्धांत मांडून केले आहे.

### २.४.२ संकल्पना:

काही देशांकडे भांडवल खूप मोठ्या प्रमाणात असते तर काही देशांकडे श्रम असतात. हा सिद्धांत असे सांगतो की, "भांडवल श्रीमंत देश भांडवलप्रधान वस्तूंची निर्यात करतो तर श्रमाच्या बाबतीत श्रीमंत असलेला देश श्रमप्रधान वस्तूंची निर्यात करतो.."

ओहलीनच्या मते आंतरराष्ट्रीय व्यापाराचे महत्त्वाचे कारण म्हणजे काही वस्तू इतर प्रदेशातून अगदी स्वस्त किमतीला खरेदी करता येतात. परंतु त्याच वस्तूंचे आपल्या प्रदेशात उत्पादन करणे खूप खर्चिक असते. म्हणून प्रदेशा-प्रदेशातील व्यापाराचे कारण म्हणजे वस्तूंच्या - किंमतीमध्ये असलेला फरक होय.

### २.४.३ गृहिते:

१) हा सिद्धांत 2 x 2 x 2 प्रतिमान आहे. म्हणजेच सिद्धांतात दोन देश दोन वस्तू आणि दोन उत्पादन घटक (श्रम व भांडवल गृहीत धरले आहे.)

२) वस्तू बाजार व घटक बाजारात पूर्ण स्पर्धचे अस्तित्व असते.

३) ससाधनांमध्ये पूर्ण रोजगार पातळी असते.

४) वेगवेगळ्या प्रदेशात उत्पादन घटकाच्या उपलब्धतेत संख्यात्मक स्वरूपाचे भेद असतात. गुणात्मकदृष्टया ते एकजिनसी असतात.

५) दोन वेगवेगळ्या वस्तूंच्या उत्पादन फलनांमध्ये घटक तीव्रता वेगवेगळी असते. काही श्रमप्रधान तर काही भांडवलप्रधान असतात.

६) वाहतूक खर्चाचा अभाव असतो.

७) दोन देशात मुक्त व अनिर्बंध व्यापार असतो.

८) प्रत्येक वस्तूच्या बाबतीत प्रत्येक देशात स्थिर उत्पादन फलनाची स्थिती असते.

९) दोन्ही देशांमध्ये ग्राहकांची पसंती आणि मागणीची रचना विशिष्ट असते.

१०) तांत्रिकज्ञानामध्ये कोणताही बदल होत नाही.


वरील गृहीत परिस्थिती लक्षात घेता, हेक्श्चर व ओहलीन यांचे असे मत आहे की, वस्तूंच्या किंमतीमध्ये तुलनात्मक फरकामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार निर्माण होत असतो.

### २.४.४ घटक किंमतीच्या स्वरूपातील घटक मुबलकता:

हेक्श्चर ओहीलीन यांनी घटक देणग्यांची मुबलकता, घटक किंमतीच्या स्वरूपातून स्पष्ट केली आहे. जर 'A' देशांमध्ये भांडवल तुलनेने स्वस्त असेल तर देशात भांडवल मुबलक आहे आणि 'B' देशात श्रम स्वस्त असेल तर त्या देशात 'B' श्रम विपुल आहे. हेच आपणांस पुढीलप्रमाणे लिहिता येते. $(PC/PL)A<(PC/PL)B$ येथे PC व PL म्हणजे अनुक्रमे भांडवल व श्रमाची किंमत आणि A व B ही देशांची नावे आहेत.

दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास जर A देशात भांडवल तुलनेने स्वस्त असेल तर A देशात भांडवल विपुल आहे आणि जर B देशात श्रम स्वस्त असतील तर B देश श्रम विपुल आहे. म्हणून A देश भांडवलप्रधान वस्तू निर्यात करेल आणि B देश श्रमप्रधान वस्तू निर्यात करेल.

**आकृती क्र. २.२**




आकृतीमध्ये 'X' ही श्रमप्रधान वस्तू आहे आणि आडव्या अक्षावर मोजली आहे. तर 'Y' ही भांडवलप्रधान वस्तू आहे ती उभ्या अक्षावर मोजली आहे. 'X X' हा 'X' वस्तू समउत्पादन वक्र आहे. 'Y Y' हा 'Y' वस्तूचा समउत्पादन वक्र आहे. ते A आणि B देशांच्या बाबतीत सारखेच आहे. 'A' देशातील तुलनात्मक घटक किंमती A A घटक किंमत रेषेने दर्शविल्या आहेत.

आपण असे गृहीत धरू की प्रत्येक सम उत्पादन वक्र त्या त्या वस्तूचे प्रत्येकी १ नग उत्पादन दर्शवितो. म्हणून Y वस्तूचे एका नगाचे उत्पादन करण्यासाठी भांडवलाचे OC नग तर श्रमाचे OD नग लागतील. कारण E बिंदूजवळ Y Y समउत्पादन वक्र समखर्च रेषा AA ला स्पर्श करून जातो.

त्याचप्रमाणे या पद्धतीनेच आपण A देशात X वस्तूचे एका नगाचे उत्पादन करण्यासाठीचा खर्च शोधून काढू शकतो. तो खर्च म्हणजे भांडवलाचे OM नग तर श्रमाचे ON नग इतका असेल. A' देशात भांडवल मुबलक व स्वस्त असल्याने त्यामुळे Y या भांडवलप्रधान वस्तूच्या उत्पादनात विशेषीकरण करेल. हे आकृतीवरून स्पष्ट होते. Y वस्तूचे एक नग उत्पादन करण्यासाठी भांडवलाचे अधिक नग (OC) व श्रमाचे कमी नग (OD) वापरेल. त्याचप्रमाणे X X समउत्पादन वक्रावरील L बिंदूवर भांडवलाचे कमी नग आणि श्रमाचे अधिक नग वापरून X वस्तूचे उत्पादन करेल. परंतु उत्पादन Y च्या तुलनेने महाग पडले. त्यामुळे A देश भांडवलप्रधान व स्वस्त अशी Y वस्तू उत्पादित करेल आणि त्याची B देशाला निर्यात करेल.

B' देशातील X आणि Y वस्तूच्या प्रत्येकी एका नगाचा उत्पादन खर्च शोधून काढण्यासाठी YY समउत्पादन वक्राच्या G बिंदूजवळ स्पर्श करणारी BB ही पसरट घटक किंमत रेषा काढली आहे. अशीच घटक किंमत रेषा B1 B2 ही BB ला समांतर काढली आहे. ती X X च्या समउत्पादन वक्राला 'S' जवळ स्पर्श करते. म्हणून आपणास असा निष्कर्ष काढता येतो की Y वस्तूचे B देशात एका नगाचे उत्पादन करण्यासाठी भांडवलाचे OK नग तर श्रमाचे OH नग लागतील आणि X वस्तूचे एक नग उत्पादित करण्यासाठी याच देशात भांडवलाचे OT नग तर श्रमाचे OR नग लागतील.

यावरून आपणांस हेक्श्चर ओहलीनचा सिद्धांत मांडता येतो. भांडवल विपुल देश, तुलनात्मक दृष्टीने स्वस्त असलेल्या भांडवलप्रधान वस्तू निर्यात करेल आणि श्रम विपुल देश तुलनेने स्वस्त असलेल्या श्रमप्रधान वस्तू निर्यात करेल.

समजा A आणि B देश आहेत. A देशात भूमिची विपुलता आहे आणि श्रम व भांडवलाची कमतरता आहे. त्यामुळे तिथे भूमी स्वस्त आहे. याउलट B देशात श्रमाची विपुलता आहे आणि इतर साधनांची कमतरता आहे. या गृहीतांच्या आधारावर उत्पादन साधनांच्या किंमतीची स्थिती पुढीलप्रमाणे:

| **साधन** | **A देश**<br>**B देश** | **साधनाचे परिणाम** |
|---|---|---|
| भूमी<br>श्रम<br>भांडवल | १ रू. २० रू.<br>६००रू. १०० रू.<br>८० रू. १५०रू. | एक एकर – एक वर्ष<br>एक एकर एक वर्ष<br>१०००रू. |

समजा X व Y या दोन वस्तू आहेत. X वस्तूच्या उत्पादनासाठी भूमिचा अधिक वापर करावा लागतो आणि श्रम व भांडवलाचा वापर कमी करावा लागतो. याउलट Y वस्तूच्या उत्पादनसाठी तुलनेने भूमी कमी व श्रम अधिक लागतात. समजा X व Y वस्तूंच्या उत्पादनासाठी उत्पादन साधनाचा वापर पुढीलप्रमाणे करावा लागतो. X आणि Y वस्तुंसाठी साधनांची गरज

| **साधन** | **X वस्तू (१ मे. टन)** | **Y वस्तू (१ मे. टन)** |
|---|---|---|
| भूमी<br>श्रम<br>भांडवल | १०००<br>१<br>१ | २<br>१<br>१/२ |

वरील दोन्ही साधनांच्या आधारे आपणास A आणि B देशात X आणि Y वस्तूची उत्पादनखर्चाची स्थिती काय असेल ते स्पष्ट करता येते. वरील तक्ते आणि विश्लेषणांद्वारे असे म्हणता येईल की, हेक्श्चर आणि ओहलीन यांनी रिकार्डोचा सिद्धांत खोटा न ठरवता त्याच्यातील उणिवा दूर करून दोन देशामध्ये व्यापार का होतो ? या कारणाचे सविस्तर स्पष्टीकरण केले आहे.

### २.४.५ हेक्श्चर ओहलीन सिद्धांताचे श्रेष्ठत्व:

१) हेक्श्चर ओहलीन सिद्धांताने सर्वसाधारण मूल्य सिद्धांतामार्फत आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांत मांडला आहे. त्यामुळे श्रममूल्य सिद्धांताच्या तावडीतून सनातन सिद्धांताची सुटका केली आहे.

२) सनातन सिद्धांत आंतरराष्ट्रीय व्यापार हा आंतरप्रादेशिक व्यापारापासून पूर्णपणे भिन्न आहे असे मानतो. परंतु, हेक्श्चर ओहलीन यांच्या मते, आंतरप्रादेशिक व्यापाराचा किंवा स्थानिक व्यापाराचा एक विशेष प्रकार म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापार होय असे मानतात.

३) सनातन सिद्धांतामध्ये श्रम या एकाच उत्पादन घटकाचा विचार तर हेक्श्चर - ओहलीन सिद्धांतात श्रम आणि भांडवल अशा दोन उत्पादन घटकांचा विचार केला आहे.

४) उत्पादन घटकांच्या पुरवठ्यात वेगवेगळ्या देशात असलेला फरक हा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा मुख्य आधार आहे असे हेक्श्चर ओहलीनचा सिद्धांत मानतो, परंतु त्याचा सनातन सिद्धांतामध्ये अजिबात विचार झालेला नाही.

५) उत्पादन घटकांच्या तुलनात्मक किमतीमध्ये असलेल्या फरकामुळे वस्तू किमतीमध्ये तुलनात्मक फरक निर्माण होतो व त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार घडून येतो असे हेक्श्चर-ओहलीन सिद्धांतात म्हटले आहे. परंतु सनातन सिद्धांतात केवळ वस्तूच्या तुलनात्मक फरकाचा विचार करतो.

६) सनातन सिद्धांत केवळ श्रमाची उत्पादकता विचारात घेतो तर हेक्श्चर-ओहलीन सिद्धांत श्रम व भांडवलाच्या उत्पादकतेतील तुलनात्मक फरकाचा विचार करतो.

७) सनातन सिद्धांत केवळ श्रम या एकाच घटकाचा दर्जा विचारात घेतो. तर हेक्श्चर-ओहलीन सिद्धांतात देशातील उत्पादन घटकांचा परिणामात्मक पुरवठा व त्यांचा दर्जा या दोन्हीही गोष्टी विचारात घेतो.

८) वस्तू उत्पादनात तुलनात्मक लाभात फरक का निर्माण होतो याचे विश्लेषण रिकार्डोचा सिद्धांत देऊ शकला नाही. परंतु त्याचे स्पष्टीकरण हेक्श्चर ओहलीन सिद्धांताने दिले आहे.

९) दोन देशांमधील व्यापारामुळे काय लाभ मिळतात त्याचे स्पष्टीकरण सनातन सिद्धांत करतो. म्हणून तो कल्याणकारी सिद्धांताशी निगडीत आहे. तर हेक्श्चर ओहलीन सिद्धांत शास्त्रीय सिद्धांत आहे तो व्यापार का निर्माण होतो यावर अधिक भर देतो.

१०) हेक्श्चर ओहलीन सिद्धांताने सर्वप्रथम घटक बाजाराचा आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांताशी संबंध जोडला आहे.

### २.४.६ टीका:

१) ओहलीन 2 x 2 x 2 प्रतिमान अत्यंत साध्या गृहीतावर आधारित आहे म्हणून त्यावर टीका केली जाते.

२) सनातन सिद्धांताप्रमाणेच हा सिद्धांत स्थितीशील सिद्धांत आहे. तो फक्त एका विशिष्ट वेळेला अर्थव्यवस्थेची असलेली वैशिष्ट्ये सांगतो. परंतु उत्पादन स्थितीमध्ये होणाऱ्या बलदानुसार अर्थव्यवस्था कशी विकसित होईल याचे कोणतेही निर्देश हा सिद्धांत देत नाही.

३) हेक्श्वर-ओहलीन सिद्धांत घटक देणग्यांची गुणोत्तरे मोजण्यासाठी उत्पादन घटक एकजिनसी असतात असे गृहीत धरतो. परंतु वास्तवतेत कोणत्याही वेगवेगळ्या देशातील उत्पादन घटक एकजिनसी नसतात, एकच घटक विविध प्रकारचा असतो.

४) हेक्श्वर-ओहलीन सिद्धांत असेही गृहीत धरतो की, दोन देशांमध्ये एकाच वस्तूसाठी वापरण्यात येणारी उत्पादन तंत्रे एकजिनसी असतात असे गृहीत धरतो. परंतु प्रत्यक्षात एकाच वस्तूसाठी दोन देशांमध्ये वापरण्यात येणारी उत्पादन तंत्रे वोगवोगळी असतात.

५) ओहलीनच्या मते उत्पादन घटकांच्या तुलनात्मक किंमती त्यांच्या तुलनात्मक पुरवठ्यानुसार ठरतात. त्याचा अर्थ घटक किमती ठरण्यामध्ये घटकांचा पुरवठा हाच मागणीपेक्षा महत्त्वाचा घटक आहे. परंतु घटक किमती निश्चितीमध्ये घटक मागणी महत्त्वाची असते आणि त्यामुळे प्रत्यक्ष परिस्थिती सिद्धांताच्या विरुद्ध दिसुन येऊ शकते.

६) विजन होलस यांच्या मते घटक किमती वस्तूंच्या किमती ठरवित नाहीत तर वस्तूंच्या किमती घटकांच्या किमती ठरवितात. हे मत आहलीन सिद्धआंताच्या विरूद्ध आहे. वस्तूंच्या किमती त्यांच्या उपयोगितीवरून ठरत असतात. जास्त उपयोगितांच्या वस्तूंना अधिक किमती मिळतात. त्यामुळे त्या वस्तूंचे उत्पादन करणा-या उत्पादन घटकांना आपोआप अधिक किमती मिळतील.

७) ओहलीन सर्वसमावेशक अशी सामान्य समतोलाची संकल्पना विकसित करू शकला नाही. म्हणून हॅबर्लरने त्याच्यावर टीका केली आहे.

८) ओहलीनचा सिद्धांत एक संदिग्ध व काही अटींवर आधारलेला सिद्धांत म्हणूनही त्याच्यावर टीका केली जाते.

**२.४.७ निष्कर्ष:**

हेक्श्वर-ओहलीन सिद्धांतात अशा अनेक टीका करण्यात येत असल्या तरी सनातन सिद्धांतापेक्षा तो एक सुधारित सिद्धांत आहे. सामान्य समतोलाशी संबंध जोडून आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या पायाचे विश्लेषण मांडण्याचा प्रयत्न या सिद्धांतात करण्यात आला आहे.

**आपली प्रगती तपासा:**

१) हेक्श्वर-ओहलीन यांची घटक विपुलता संकल्पना म्हणजे काय ?

## २.५ लिओन्टिफचा विरोधाभास

### २.५.१ प्रस्तावना:

मुबलक उत्पादन घटकांच्या साहाय्याने उत्पादित केलेल्या वस्तूंची देश निर्यात करतो आणि दुर्मिळ उत्पादन घटकांच्या साहाय्याने उत्पादित होणाऱ्या वस्तूंची देश आयात करतो. असा निष्कर्ष हेक्श्वर ओहलीन सिद्धांतावरून निघतो. लिऑटिफ यांनी १९४७ या वर्षातील अमेरिकेच्या आयात-निर्यातीच्या रचनेचा अभ्यास केला. त्यावेळेस सर्वानुमते अमेरिका भांडवल विपुल देश होता. त्यामुळे कोणीही असा निष्कर्ष काढेल की अमेरिका भांडवलप्रधान वस्तूंची निर्यात करेल आणि श्रमप्रधान वस्तूंची आयात करेल.

### २.५.२ संकल्पना:

अमेरिकेत निर्यात १ दशलक्ष डॉलरने कमी करण्यासाठी आणि आयात पर्यायी वस्तू १ दशलक्ष डॉलरने वाढविण्यासाठी लागणाऱ्या उत्पादन घटकांच्या वापरावर होणाऱ्या परिणामाचे लिऑटिफने मोजमाप केले. त्यांनी भांडवल व श्रम असे दोनच घटक व्यक्तपणे विचारात घेतले. जेव्हा निर्यात कमी केली जाते तेव्हा श्रम व भांडवल असे दोन्हीही घटक मुक्त होतात. तसेच आयात-स्पर्धात्मक वस्तूंचे उत्पादन वाढविले जाते तेव्हा श्रम व भांडवल असे दोन्हीही घटक लागतात. लिऑटिफच्या गृहीतानुसार निर्यात उद्योगातून तुलनेने अधिक भांडवल मुक्त होईल आणि आयात स्पर्धात्मक उद्योगात तुलनेने अधिक श्रम लागतील.

पुढील तक्ता लिऑटिफने केलेले गणितीय विश्लेषण दर्शवितो. हेक्श्वर ओहलीन प्रमेयानुसार आपण जी अपेक्षा करतो त्याच्याबरोबर विरूद्ध त्याची अनुमाने आहेत. अमेरिकेच्या निर्यात उद्योगात आयात उद्योगाच्या तुलनेने अधिक श्रमिक वापरले जातात. त्याचा अर्थ अमेरिका श्रमप्रधान वस्तू निर्यात करते तर भांडवलप्रधान वस्तूंची आयात करते.

१९४७ मध्ये अमेरिकेत निर्यात १ दशलक्ष डॉलरने कमी करण्यासाठी व आयात पर्यायी वस्तू १ दशलक्ष डॉलरने वाढविण्यासाठी लागणारे भांडवल व श्रम.

| उत्पादन घटक | निर्यात वस्तू | आयात पर्यायी वस्तू |
|---|---|---|
| भांडवल (१९४७ च्या किमतीनुसार) | २५५१ | ३०९१ |
| (००० डॉलर) | १८२ | १७० |
| श्रम (श्रमवर्ष) | १३.९९ | १८.१८ |
| भांडवल श्रम गुणोत्तर | | |

तक्त्यावरून असे लक्षात येते की, निर्यात उद्योगात उत्पादन १ दशलक्ष डॉलरने कमी केल्यास २५५१ हजार डॉलर भांडवल व १८२ श्रम वर्ष श्रम मुक्त होतात. तर आयात पर्यायी उद्योगात उत्पादन १ दशलक्ष डॉलरने वाढविण्यासाठी ३०९१ हजार डॉलर अधिक भांडवल व १७० श्रम वर्ष अधिक श्रम लागतात. म्हणजे अमेरिकेसारख्या भांडवल श्रीमंत देशातून श्रमप्रधान वस्तूंची निर्यात व भांडवलप्रधान वस्तूंची आयात होते. निर्यात उद्योगात

भांडवल श्रम गुणोत्तर १३.९९ तर आयात पर्यायी वस्तू उद्योगात ते १८.१८ इतके आहे. आयात उद्योगात निर्यात उद्योगापेक्षा भांडवलाचा अधिक वापर होतो.

### २.५.३ टीका:

लिऑटिफच्या निष्कर्षाच्या प्रकाशानंतर अनेक अर्थशास्त्रज्ञांनी त्याच्या सांख्यीकीय माहितीच्या बिनचुकतेबद्दल आणि योग्यतेबद्दल तसेच त्याच्या पाहणी पद्धतीच्या स्वरूपाबद्दल प्रश्न उपस्थित केले होते. 'बुचनन' यांनी लिऑटिफच्या भांडवलाच्या मापनावर आक्षेप घेतला आहे. त्यांच्या मते लिऑटिफ भांडवलाचा टिकाऊपणा विचारात घेत नाही. 'लोब' यांच्या मते निर्यात क्षेत्रातील आणि आयात स्पर्धात्मक क्षेत्रातील भांडवल सधनतेमधील भेद सांख्यकिय दृष्टीकोनातून अर्थपूर्ण नाही. स्वरलिंग यांच्या मते १९४७ हे वर्ष असाधारण वर्ष होते.

आर. जोन्स असा युक्तीवाद करतात की अमेरिकेत निर्यात आणि आयात स्पर्धात्मक वस्तू इतर देशांच्या तुलनेत अधिक भांडवलधान तंत्राने उत्पादित केल्या जातात. त्यामुळे ओहलीनचे प्रमेय चूक ठरत नाहीत. लिऑटिफने अमेरिकेतील आणि इतर देशातील घटक देणग्यांचे तुलनात्मक मापन करण्याचा अजिबात प्रयत्न केला नाही. त्याने अमेरिकेचा फक्त एकांगी विचार केला आहे. त्याचप्रमाणे असे म्हटले जाते की, अमेरिकेत भांडवलप्रधान वस्तूंची मागणी खूप मोठी आहे. त्या तुलनेने भांडवलप्रधान वस्तूंचा पुरवठा कमी होत असेल. म्हणून अमेरिकेला भांडवलप्रधान वस्तूंची बाहेरून आयात करणे भाग पडत असेल.

### २.५.४ निष्कर्ष:

लिऑटिफ यांनी तुलनात्मक खर्च लाभ तत्व गणितीय पद्धतीने विश्लेषण करून अमेरिका भांडवलप्रधान देश असूनही तुलनात्मक खर्च लाभ मिळवण्यासाठी श्रमप्रधान वस्तूची निर्यात करतो व भांडवलप्रधान वस्तूंची आयात करतो हे विश्लेषणाच्या आधारे आंतरराष्ट्रीय व्यापारातील विरोधाभास स्पष्ट केले आहे.

**आपली प्रगती तपासा:**

१) लिऑटिफ विरोधाभास म्हणजे काय ?

## २.६ क्रुगमनचे प्रतिमान

व्यापाराचा हा सिद्धांत खऱ्या अर्थाने नवीन पिढीच्या व्यापार प्रतिमानाचे प्रतीक आहे जे हेक्सर-ओहलिन प्रतिमानाला बौद्धिक पाठिंब्याने अक्षरशः आणि आत्मीयतेने पाठींबा संपल्यानंतर समोर आले आहे.

प्रतिमानामध्ये खालील अद्वितीय वैशिष्ट्यपूर्ण वैशिष्ट्ये आहेत जी या प्रतिमानाला पारंपारिक प्रतिमानापेक्षा वेगळे करतात:

(i) प्रमाण मित्तव्ययता

(ii) मक्तेदारीयुक्त स्पर्धा

क्रुगमनचे प्रतिमान श्रम हाच उत्पादनाचा एकमात्र घटक मानतो. उद्योगसंस्थेच्या अंतर्गत मित्तव्ययतांचा समावेश उत्पादनाच्या पातळीसाठी आवश्यक श्रमाचे प्रमाण निर्धारित करण्यासाठी समीकरणात केला जातो, जसे की:

$$L = a + bQ$$

जेथे L म्हणजे उद्योगसंस्थेला आवश्यक असलेल्या श्रमाचे परिमाण, a हे एक तांत्रिक चल आहे, Q ही उद्योगसंस्थेची उत्पादन पातळी आहे आणि b हा उद्योगसंस्थेला आवश्यक असलेल्या श्रमाचे परिमाण आणि उत्पादन पातळी यांच्यातील फरक स्पष्ट करतो. अंतर्गत प्रमाण मित्तव्ययता जमा होण्याच्या संदर्भात वर लिहिलेल्या समीकरणाला खूप महत्त्व आहे.

जर a = 10, b = 2 असताना उद्योगसंस्थेने 20 युनिट्सचे आउटपुट तयार केले, तर त्याला 50 युनिट्स मजुरांची आवश्यकता आहे. आता समजा की उद्योगसंस्थेने त्याचे उत्पादन 40 युनिट्सपर्यंत दुप्पट केले. 40 युनिट्स उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या मजुरांची संख्या 90 युनिट्स असेल. अशाप्रकारे, यावरून असे दिसून येते की, हे समीकरण अंतर्गत प्रमाण मित्तव्ययतेची उपस्थिती दर्शवते ज्यासाठी उत्पादन तंतोतंत दुप्पट करण्यासाठी श्रमांची एकके दुप्पट पेक्षा कमी असणे आवश्यक आहे.

येथे हे लक्षात घेण्यासारखे आहे की प्रमाण मित्तव्ययतेचे समर्थन करण्याची संकल्पना पारंपारिक रिकार्डियन प्रतिमानापासून भिन्नता दर्शवते, कारण त्यानंतर स्थिर प्रत्यय परिमाण दर्शविते. परिणामी, उत्पादनाच्या स्थिर खर्चामुळे संबंधित श्रम-वापर समीकरण L = bQ बनते, म्हणजे, श्रम आदानाचा उत्पादनाच्या प्रमाणात स्थिर संबंध असतो.

क्रुगमन प्रतिमानाचे दुसरे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे मक्तेदारीयुक्त स्पर्धेच्या बाजार संरचनेचे अस्तित्व होय. मक्तेदारीयुक्त स्पर्धेत, उद्योगात अनेक उद्योगसंस्था आहेत आणि मुक्त प्रवेश आणि मुक्त निर्गमन देखील आहे. शिवाय, दीर्घकाळात प्रत्येक उद्योगसंस्थेचा नफा हा शून्य असतो. तथापि, पारंपारिक व्यापार सिद्धांताच्या परिपूर्ण स्पर्धेच्या विपरीत, उद्योगातील उद्योगसंस्थांची उत्पादने एकसंध नसतात. उत्पादने एकमेकांपेक्षा भिन्न असतात आणि प्रत्येक उद्योगसंस्थेच्या उत्पादनामध्ये विशिष्ट प्रमाणात ग्राहक ब्रँड निष्ठा असते.

क्रुगमनच्या मनात असलेल्या मक्तेदारी स्पर्धेचा प्रकार चेंबरलिनच्या मूळ आवृत्तीशी जवळीक असल्यामुळे त्याला मूलत: 'नियो-चेम्बर्लिनियन' म्हणून संबोधले जाऊ शकते.

## २.७ सारांश

या प्रकरणामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांतांचा परिचय करुन घेवून आपण ॲडम स्मिथचा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत, रिकार्डोचा तुलनात्मक खर्चातील फरकाचा सिद्धांत, हेकशेर-ओहलिन सिद्धांत, लिओन्टिफचा विरोधाभास व क्रुगमनचे प्रतिमान हे विविध सिद्धांत गृहीते, आकृती व तक्त्यादवारे स्पष्टिकरण व टिकात्मक मुल्यमापन यासह सविस्तर अभ्यासली आहेत.

## २.८ प्रश्न

१) रिकार्डोचा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सनात्तन सिध्दांत स्पष्ट करा.

२) रिकार्डोचा तुलनात्मक खर्चातील फरकाचा सिद्धांत स्पष्ट करा.

३) हेकशेर-ओहलिन सिद्धांत स्पष्ट करा.

४) लिऑन्टिफ विरोधाभास स्पष्ट करा.

५) क्रुगमनचे प्रतिमान स्पष्ट करा.

*****

# ३

# व्यापार शर्ती

**घटक रचना**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ व्यापार शर्तींची संकल्पना

३.२.१ निव्वळ वस्तुविनिमय

३.२.२ सकल वस्तुविनिमय

३.२.३ उत्पन्न व्यापार शर्ती

३.३ सारांश

३.४ प्रश्न

## ३.० उद्दिष्टे

- व्यापारशर्तींची संकल्पना समजून घेणे.
- निव्वळ वस्तुविनिमय, सकल वस्तुविनिमय व उत्पन्न व्यापारशर्ती या संकल्पना अभ्यासणे.

## ३.१ प्रस्तावना

आंतरराष्ट्रीय व्यापारातील लाभांचे मापन करण्याच्या दृष्टीने व्यापारशर्तींचा अभ्यास सनातनपंथीय व्यापार सिद्धांतापासून सुरू झाला. व्यापारशर्ती ही संकल्पना व्यापार सिद्धांतात अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. व्यापारशर्तींच्या आधारे आंतरराष्ट्रीय व्यापारातील दोन देशांना मिळणारी अनुकूलता (लाभ) किंवा प्रतिकूलता मोजली जाते. रिकार्डोच्या विश्लेषणात आंतरराष्ट्रीय व्यापारातील तौलनिक लाभ सिद्धांतात अंतर्गत अर्थव्यवस्थेत उत्पादन व्ययातला तौलनिक फरक हा आंतरराष्ट्रीय व्यापारातील लाभ ठरविणारा मुख्य घटक आहे. पण आंतरराष्ट्रीय व्यापारातले लाभ कोणत्या देशाला किती प्रमाणात मिळतील किंवा ते कसे वितरित होतील, याचे विश्लेषण रिकार्डोने केले नाही. रिकार्डोच्या सिद्धांतातील उणीव पुढे जॉन स्टुअर्ट मिल यांनी भरून काढली. आपल्या अन्योन्य मागणीच्या सिद्धांतातून त्यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारशर्ती एका देशातील उपभोक्त्यांच्या दुसऱ्या देशातल्या वस्तूसाठी असलेल्या मागणीच्या लवचिकतेवर कशाप्रकारे अवलंबून असतात हे दाखवून दिले. अशाप्रकारे रिकार्डो यांनी पूर्णपणे दुर्लक्षिलेली मागणीची बाजू आंतरराष्ट्रीय व्यापारशर्ती ठरविणारी महत्त्वाची बाजू असल्याचे जे. एस. मिल यांनी दाखवले. असे करताना पुरवठ्याची बाजू मात्र दुर्लक्षिली गेली. ही बाजू अल्फ्रेड मार्शल यांनी

१९२३ या वर्षी लिहिलेल्या "Money, Credit and Commerce " या ग्रंथातून देयता वक्र तंत्राच्या मदतीने मांडली. अल्फ्रेड मार्शल यांनी एखाद्या देशाच्या व्यापारशर्ती मागणी एवढ्याच पुरवठ्यावरदेखील अवलंबून असतात, हा मुद्दा मांडला. मागणीच्या लवचिकतेवर पुरवठ्याची लवचिकता व्यापारशर्तींच्या निश्चितीत किती महत्त्वपूर्ण आहे. हे दाखवण्यासाठी त्यांनी देयता वक्राचे तंत्र विकसित केले.

## ३.२ व्यापार शर्तीची संकल्पना

आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांतातून आपल्याला असे दिसून येते की, व्यापारशर्ती केवळ व्यापारातले लाभच व्यक्त करीत नाहीत तर अंतर्गत अर्थव्यवस्थेतील उत्पादनाचे विशेषीकरणाचे, निर्यातीचे, आयातीचे असे विविध निर्णय व्यापारशर्तीवर अवलंबून असतात. यामुळे अर्थशास्त्रज्ञ, सत्ताधीश आणि संख्याशास्त्र या सर्वांच्या दृष्टीने व्यापारशर्तीची संकल्पना महत्त्वाची ठरते. विविध व्यापार सिद्धांताचा अभ्यास करताना 'दोन वस्तूंच्या सापेक्ष किमती दर्शविणारी संकल्पना' या दृष्टीने आपण व्यापली उल्लेख केला आहे; परंतु व्यापारशतींच्या विविध संकल्पना अलिकडच्या काळात विकसित झाल्या आहेत.

**व्यापारशर्तींच्या विविध संकल्पना:**

व्यापारशर्तींच्या मुख्य संकल्पांचे दोन गटांत वर्गीकरण केले आहे.

१) वस्तुविनिमयाशी संबंधित व्यापारशर्ती

२) उत्पादक घटकांशी संबंधित व्यापारशर्ती

**१) वस्तुविनिमयाशी संबंधित व्यापारशर्ती:**

एक देश अनेक देशांशी व्यापार करीत असल्यामुळे निर्यात वस्तूंच्या किंमत निर्देशांकाशी आयात वस्तूंच्या किंमत निर्देशांकांचा दर माहीत केला जातो. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी सर्व देशांच्या व्यापरशर्ती वरील पद्धतीच्या आधारावर प्रसिद्ध करतो. या पद्धतीने माहीत केलेल्या व्यापारशर्तींना निव्वळ वस्तुविनिमयाच्या व्यापारशर्ती असे संबोधले जाते. वस्तुविनिमयाच्या व्यापारशेर्तींचे तीन प्रकार सांगता येतील.

अ) निव्वळ वस्तुविनिमयाच्या व्यापार (नागेविधी वापरत असलेली संकल्पना)

आ) सकल वस्तुविनिमयाच्या व्यापारी

इ) उत्पन्न व्यापारशर्ती

यापैकी निव्वळ वस्तुविनिमय व्यापारीशर्तींची संकल्पना जेराल्ड मियर यांनी विकसित केली. सकल वस्तुविनिमय व्यापार शर्तीची संकल्पना टॉसिगने तर उत्पन्न व्यापार शर्तींची संकल्पना जी. एस. डोरान्सने विकसित केली.

**आकृती क्र. ३.१**

**व्यापारशर्तींचे वर्गीकरण**

**व्यापारशर्ती (Terms of Trade)**

- वस्तुविनिमय व्यापारशर्ती
  Commodity Terms of Trade
  (जेराल्ड मीयरने केलेले वर्गीकरण)
  - निव्वळ वस्तुविनिमय व्यापारशर्ती
    Net Barter Terms of Trade
    (जेराल्ड मीयरने मांडलेली संकल्पना)
  - सकल वस्तुविनिमय व्यापारशर्ती
    Gross Barter Terms of Trade
    (तौसिगने विकसित केलेली संकल्पना)
  - उत्पन्न व्यापारशर्ती
    Income Term of Trade
    (जी. एस. डोरान्सने विकसित केलेली संकल्पना)
- घटक व्यापारशर्ती
  Factoral Terms of Trade
  (पहिल्यांदा अल्फ्रेड मार्शलने मांडली)
  - एक घटक व्यापारशर्ती
    Single Factoral Terms of Trade
    (जॅकब व्हयनरने विकसित केली)
  - द्वि घटक व्यापारशर्ती
    Double Factoral Terms of Trade
    (जॅकब व्हायनरने विकसित केली)

### ३.२.१ निव्वळ वस्तुविनिमय व्यापारशर्ती (Net Barter Terms of Trade):

एखाद्या देशाच्या निर्यात किंमत निर्देशांकाचा त्या देशाच्या आयात किंमत निर्देशांकाशी असलेला दर त्या देशाच्या वस्तुविनिमयाच्या व्यापारशी व्यक्त करतो.

दुसऱ्या शब्दात, जेव्हा एखादा देश आयात करीत असलेल्या वस्तूंच्या किमती घटतात आणि निर्यात वस्तूंच्या किमती वाढतात किंवा स्थिर राहतात तेव्हा त्या देशाला निव्वळ वस्तुविनिमयाच्या व्यापारशर्ती अनुकूल होतात. कारण त्या देशाला पूर्वीइतकीच निर्यात करूनही पूर्वपेक्षा अधिक आयात त्या मोबदल्यात मिळते.

निव्वळ वस्तुविनिमय व्यापारशतीची (N) संकल्पना व्यापाराची अनुकूलता किंवा प्रतिकूलता स्पष्ट करण्याच्या दृष्टीने पुरेशी ठरत नाही. व्यापारातल्या लाभाचे विश्लेषण करण्यासाठी निव्वळ, सकल आणि उत्पन्न अशा वस्तुविनिमय व्यापार शर्तीचे तीनही प्रकार विचारात घ्यावे लागतात.

**निव्वळ वस्तुविनिमय व्यापारशतींच्या मर्यादा:**

१) वस्तुविनिमयाच्या व्यापारशर्तीत फक्त किमतीतील बदल लक्षात घेतले जातात.

२) वस्तुतः व्यापारातील लाभ फक्त किमतीवरच नव्हे, तर आयातीच्या तुलनेत निर्यात किती वाढली यावरदेखील अवलंबून असतात.

३) निव्वळ वस्तुविनिमय व्यापारशर्तीत वस्तूंची केवळ किंमत लक्षात घेऊन दर्जाकडे दुर्लक्ष केले जाते.

४) व्यापाराच्या रचनेतील बदल म्हणजे समजा एखादा देश एखाद्या कालखंडात मुख्यतः प्राथमिक वस्तूंची (उदा. धान्य, फळं, भाजीपाला इ.) निर्यात करत असेल आणि कालखंडात समजा, प्राथमिक वस्तूंच्या जोडीला कारखानदारी उत्पादनांची निर्यात करू लागला आणि तंत्रज्ञानाची यंत्रसामग्रीची आयात करू लागला तर याचेही परिणाम व्यापारातील लाभांवर होतात. हे लाभ निव्वळ वस्तुविनिमय व्यापारशर्तीतून व्यक्त होत नाहीत. व्यापाराच्या रचनेवरदेखील व्यापारातील लाभ अवलंबून असतात.

५) निर्यात उद्योगाची उत्पादकता वाढल्यास त्याचा अनुकूल परिणाम होतो. हा परिणाम लक्षात घेण्यास वस्तुविनिमय व्यापारशर्तीअसमर्थ ठरतात. निर्यात उद्योगाची उत्पादकता वाढल्यामुळे उत्पादन व्यय कमी होऊन नफा कमी न होता किमती घटू शकतात. अशावेळी निर्यात वस्तूंच्या किमती कमी झाल्यामुळे निर्यात मूल्य निर्देशांकात घट होईल आणि निव्वळ वस्तुविनिमयाच्या व्यापारशर्ती प्रतिकूलता दाखवतील; पण प्रत्यक्षात मात्र आपला देश निर्यात करत असलेल्या वस्तूंच्या किमती कमी झाल्यामुळे कदाचित त्याची परदेशातली मागणी वाढेल आणि व्यापारातून अधिक लाभ होऊ शकेल. याच विचार निव्वळ वस्तुविनिमय व्यापारशर्तींच्या मदतीने करता येत नाही.

सुत्ररूपाने ही संकल्पना पुढील प्रमाणे मांडता येईल:

$$\text{निव्वळ वस्तुविनिमय व्यापारशर्ती (N)} = \frac{\text{निर्यात मूल्य निर्देशांक}}{\text{आयात मूल्य निर्देशांक}} \times १००$$

**निव्वळ वस्तुविनिमय व्यापारशर्तीची अनुकूलता:**

उदा. समजा १९९९-२००० हे पायाभूत वर्ष (Base Year) आहे. (पायाभूत वर्षाचा निर्देशांक १०० मानला जातो.) याला २००८-०९ या वर्षाचा भारताचा निर्यात मूल्य निर्देशांक १९४ तर आयात मूल्य निर्देशांक २३९ आहे. तर २००७-०८ या वर्षीचा निर्यात मूल्य निर्देशांक १६६ आणि आयात मूल्य निर्देशांक २१० आहे.

$$\text{(N)} = \frac{\text{निर्यात मूल्य निर्देशांक}}{\text{आयात मूल्य निर्देशांक}} \times १००$$

$$\text{N (२००७-०८)} = \frac{१६६}{२१०} \times १००$$

$$= ७९$$

२००७-०८ यावर्षी भारताच्या निव्वळ वस्तुविनिमय व्यापारशर्तींचे (N) मूल्य ७९ होते.

$$N\ (२००८\text{-}०९) = \frac{१९४}{२३९} \times १००$$

$$= ८१$$

२००८-०९ या वर्षी भारताच्या निव्वळ वस्तुविनिमय व्यापारशर्तींचे (N) मूल्य ८१ असे झाले आहे. याचा अर्थ भारताच्या निव्वळ वस्तुविनिमय व्यापारशर्ती २००८-०९ या वर्षी आधीच्या वर्षापेक्षा सुधारल्या आहेत. अनुकूल झाल्या आहेत. याचे कारण निर्यात मूल्याच्या निर्देशांकातील वाढ आयात मूल्याच्या निर्देशांकातल्या वाढीपेक्षा जास्त आहे.

**निव्वळ वस्तुविनिमय व्यापारशर्तीची प्रतिकूलता:**

२००१-०२ या वर्षी भारताचा निर्यात मूल्य निर्देशांक १०३ तर आयात मूल्य निर्देशांक ११२ होता; तर २००२-०३ या वर्षी भारताचा निर्यात मूल्य निर्देशांक १०६ तर आयात मूल्यनिर्देशांक १२८ होता.

$$(N) = \frac{\text{निर्यात मूल्य निर्देशांक}}{\text{आयात मूल्य निर्देशांक}} \times १००$$

$$N\ (२००१\text{-}०२) = \frac{१०३}{११२} \times १००$$

$$= ९२$$

$$N\ (२००२\text{-}०३) = \frac{१०६}{१२८} \times १००$$

$$= ८३$$

२००२-०३ या वर्षी आधीच्या वर्षाच्या तुलनेत निव्वळ वस्तुविनिमय व्यापारशर्ती प्रतिकूल झाल्या आहेत; कारण निर्यात वस्तूंच्या किमतीच्या वाढीपेक्षा आयात वस्तूंच्या किमतीत जास्त वाढ झाली आहे.

वस्तुविनिमयाच्या व्यापारशतींचे मूल्य वाढले तर त्याचा अर्थ त्या देशाला एका विशिष्ट निर्यातीच्या संख्येच्या मोबदल्यात पुर्वीपेक्षा जास्त आयात करता येते असा होतो.

### ३.२.२ सकल वस्तुविनिमय व्यापारशर्ती (Gross Barter Terms of Trade):

निव्वळ वस्तुविनिमय व्यापारशर्तींच्या मर्यादा लक्षात घेऊन तॉसिंग यांनी सकल वस्तुविनिमयाच्या व्यापारशर्तीची संकल्पना विकसित केली. सकल वस्तुविनिमय व्यापारशर्ती म्हणजे आयातीच्या आकारमानाशी निर्यातीच्या आकारमानाचा दर होय.

$$\text{सफल वस्तुविनिमय व्यापारशर्ती (G)} = \frac{\text{आयात आकारमान निर्देशांक}}{\text{निर्यात आकारमान निर्देशांक}} \times १००$$

**सकल वस्तुविनिमय व्यापारशतींची (G) अनुकूलता:**

२००७-०८ यावर्षी भारताचा आयात वस्तूंचा आकारमान निर्देशांक २१८ तर निर्यात वस्तूंचा आकारमान निर्देशांक २४५ होतो तर २००८-९ यावर्षी भारताचा आयात आकारमान निर्देशांक २६२ तर निर्यात आकारमान निर्देशांक २६७ झाला.

$$(G) = \frac{\text{आयात आकारमान निर्देशांक}}{\text{निर्यात आकारमान निर्देशांक}} \times १००$$

$$G\ (२००७\text{-}०८) = \frac{२१८}{२४५} \times १००$$

$$= ८९$$

२००७-०८ यावर्षी भारताच्या सकल वस्तुविनिमय व्यापारशर्तींचे मूल्य ८९ होते.

$$G\ (२००८\text{-}०९) = \frac{२६२}{२६७} \times १००$$

$$= ९८$$

२००८-०९ या वर्षी भारताच्या सकल वस्तुविनिमय व्यापारशतींचे (G) मूल्य ९८ झाले. याचा अर्थ भारताच्या सकल वस्तुविनिमय व्यापारशत (G) २००८-०९ मध्ये २००७-०८ पेक्षा सुधारल्या. याचवर्षी २००८-०९ मध्ये निव्वळ वस्तुविनिमयाच्या व्यापारशर्तीही सुधारल्या होत्या; पण निव्वळ वस्तुविनिमयाच्या व्यापारशतीपेक्षाही सकल वस्तुविनिमयाच्या व्यापारशर्तीत अधिक सुधारणा झाल्याचे दिसते.

**सकल वस्तुविनिमय व्यापारशर्तीची (G) प्रतिकूलता:**

२००१-०२ या वर्षी भारताचा आयात वस्तूंचा आकारमान निर्देशांक १०३ तर निर्यात वस्तूंचा आकारमान निर्देशांक १२६ होता तर २००२-०३ यावर्षी भारताचा आयात आकारमान निर्देशांक १०९ तर निर्यात आकारमान निर्देशांक १५० झाला.

$$(G) = \frac{\text{आयात आकारमान निर्देशांक}}{\text{निर्यात आकारमान निर्देशांक}} \times १००$$

$$G\ (२००१\text{-}०२) = \frac{१०३}{१२६} \times १००$$

$$= ८२$$

२००१-०२ या वर्षी भारताचा सकल वस्तुविनिमय व्यापारशर्तींचे (G) मूल्य ८२ होते.

$$G\ (२००२\text{-}०३) = \frac{१०९}{१५०} \times १००$$

$$= ७३$$

२००२-०३ या वर्षी भारताच्या सकल वस्तुविनिमय व्यापारशर्तींचे (G) मूल्य ७३ झाले. याचा अर्थ भारताच्या सकल वस्तुविनिमय व्यापारशर्ती (G) २००२-०३ मध्ये २००१-०२ पेक्षा प्रतिकूल झाल्या. याच वर्षी (२००२-०३) मध्ये निव्वळ वस्तुविनिमय व्यापारशर्तीही (G) प्रतिकूल झाल्या होत्या.

सकल वस्तुविनिमय व्यापारशर्ती (G) अनुकूल झाल्या तर त्याचा अर्थ एका ठराविक निर्यात नगसंख्येच्या आकारमानाच्या मोबदल्यात त्या देशाला जास्त आयात करता येते असा होतो. दुसऱ्या शब्दात, एखादा देश आयात करीत असलेल्या वस्तूंच्या आकारमानात निर्यात वस्तूंचे आकारमान स्थिर असताना वाढ झाली असता सकल वस्तुविनियम व्यापारशर्ती त्या देशाला अनुकूल आहेत, असे समजले जाते.

निव्वळ वस्तुविनिमय व्यापारशर्तीप्रमाणेच सकल वस्तुविनिमय व्यापारशर्तींच्या संकल्पनेसही मर्यादा आहेत. कारण या संकल्पनेतून आपल्याला निर्यात उद्योगाच्या उत्पादकतेतील बदलाचा व्यापारातून मिळणाऱ्या लाभांवर काय परिणाम होतो, वस्तूंच्या दर्जाची (quality of goods) काय भूमिका आहे, व्यापाराच्या रचनेतील बदलांचा काय परिणाम होतो, याची उत्तरे मिळत नाहीत.

### ३.२.३ उत्पन्न व्यापार शर्ती (Income Terms of Trade):

जी. एस. (डोरान्स) यांनी १९४८ या वर्षी उत्पन्न व्यापारशर्तींची संकल्पना मांडली. या संकल्पनेत देशाचा निर्यात नगसंख्या निर्देशांक आणि आयात तसेच निर्यात किमतीचा निर्देशांक असे तीन घटक समाविष्ट आहेत. एखाद्या देशातून केल्या जाणाऱ्या निर्यातीच्या मोबदल्यात आयात करण्याची त्या देशाची क्षमता मोजणे हे या संकल्पनेचे उद्दिष्ट आहे. या संकल्पनेत निव्वळ वस्तुविनिमय व्यापारशर्ती आणि निर्यात नगसंख्या निर्देशांक यांचा एकत्रित विचार करण्यात आला आहे.

उत्पन्न व्यापारशर्तीची संकल्पना निर्यातीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून निर्माण होणारी देशाची आयात क्षमता व्यक्त करते. उदा. समजा भारत पोलादाची निर्यात करत आहे. भारतीय पोलादाची परदेशातील मागणी लवचिक आहे. अशावेळी भारताने जर पोलादाची निर्यात नगसंख्या वाढवली, तर पोलादाच्या किमती कमी होतील आणि म्हणून निव्वळ वस्तुविनिमय व्यापार प्रतिकूल होतील. असे असले तरी पोलादाची निर्यात वाढल्यामुळे उत्पन्न व्यापारशर्ती मात्र पूर्वीपेक्षा अनुकूल राहतील. सूत्ररूपाने ही संकल्पना पुढीलप्रमाणे मांडता येईल:

$$\text{उत्पन्न व्यापारशर्ती } Y = \frac{\text{(निव्वळ वस्तुविनिमय व्यापारशर्ती)}}{१००} \times \text{निर्यात आकारमान निर्देशांक}$$

किंवा

$$Y = \frac{N}{१००} \times \text{निर्यात आकारमान निर्देशांक}$$

**उत्पन्न व्यापारशर्तीची अनुकूलता:**

२००७-०८ या वर्षी भारताच्या निव्वळ वस्तुविनिमय व्यापारशर्तीचे (N) मूल्य ७९ होते तर निर्यात आकारमान निर्देशांक २४५ होता. २००८-०९ या वर्षी भारताचा निव्वळ वस्तुविनिमय व्यापारशर्तीचे (N) मूल्य ८१ झाले तर त्याचवर्षी निर्यात आकारमान निर्देशांक २६७ होता.

$$Y = \frac{N}{१००} \times \text{निर्यात आकारमान निर्देशांक}$$

$$Y\ (२००७\text{-}०८) = \frac{७९}{१००} \times २४५$$

$$= १९४$$

२००५ -०८ या वर्षी भारताच्या उत्पन्न व्यापारशतीचे (Y) मूल्य १९४ होते. (कोणत्याही व्यापारशर्तीचे मूल्य १०० पेक्षा जास्त असेल तर ती पायाभूत वर्षाच्या तुलनेत अनुकूलता दाखवणारी स्थिती असते हे लक्षात घेतले तर आपण यापूर्वी लक्षात घेतलेल्या २००१-०२, २००२-०३, २००७-०८ आणि २००८-०९ च्या निव्वळ आणि सकल वस्तुविनिमय व्यापारशी पायाभूत वर्षाच्या (१९९९-२०००) तुलनेत प्रतिकूलच होत्या. सात्र प्रत्यक्षातल्या आकडेवारीवरून असे दिसते की, २००१-०२ पासून २००८-०९ पर्यंत व्यापारशर्ती मात्र अनुकूलच राहिल्या आहेत.

$$Y\ (२००८\text{-}०९) = \frac{८१}{१००} \times २६७$$

$$= २१६$$

२००८-०९ या वर्षी भारताच्या उत्पन्न व्यापारशर्तींचे मूल्य (Y) २१६ असे झाले. याचा अर्थ भारताच्या उत्पन्न व्यापारशर्ती २००८-०९ या वर्षी आधीच्या वर्षापेक्षा सुधारल्या आहेत.

**उत्पन्न व्यापारातीची प्रतिकूलता:**

२०००-०१ या वर्षी भारताच्या निव्वळ वस्तुविनिमय व्यापारशर्तींचे (N) मूल्य ९४ होते तर निर्यात आकारमान निर्देशांक १२५ होता. २००१-०२ या वर्षी भारताच्या निव्वळ वस्तुविनिमय व्यापारशर्तींचे (N) मूल्य ९२ झाले; तर त्याच वर्षी निर्यात आकारमान निर्देशांक १२६ होता.

$$Y = \frac{N}{१००} \times \text{निर्यात आकारमान निर्देशांक}$$

$$Y\ (२०००\text{-}०१) = \frac{९४}{१००} \times १२५$$

$$= ११८$$

२०००-०१ या वर्षी भारताच्या उत्पन्न व्यापारशर्ती (Y) चे मूल्य ११८ इतके होते.

$$Y\ (२००१\text{-}०२) = \frac{९२}{१००} \times १२६$$

$$= ११६$$

२००१-०२ या वर्षी भारताच्या उत्पन्न व्यापारशर्ती (Y) चे मूल्य आधीच्या वर्षाच्या तुलनेत घटले आहे. उत्पन्न व्यापारशर्ती काहीशा प्रतिकूल झाल्या आहेत.

२) **उत्पादन घटकांशी संबंधित व्यापारशर्ती (Factoral Terms of Trade):**

उत्पन्न व्यापारशतींची संकल्पना निव्वळ आणि सकल वस्तुविनिमय व्यापारातीपेक्षा अधिक उपयुक्त मानली जात असली तरीही त्यातून आपल्याला उत्पादकतेतल्या बदलांमुळे व्यापारातल्या लाभांवर काय प्रभाव पडतो याचे विश्लेषण करता येत नाही.

घटक व्यापारशर्तींची संकल्पना पहिल्यांदा मार्शल यांनी देयता वक्रांचे विश्लेषण करताना वापरली. आपल्याला विशिष्ट आयात प्राप्त करायची असेल, तर निर्यात उद्योगान उत्पादन घटकांची आणखी किती एकके वाढवावी लागतील हे आपल्या घटक माहीत करता येते.

**अ) एक घटक व्यापारशर्ती (Single Factoral Terms of Trade):**

जेव्हा निर्यातीत होणारी वाढ तंत्रज्ञानातल्या (technology) प्रगतीमुळे (उत्पादकता वाढल्यामुळे उत्पादनात वाढ होते आणि कधीकधी नफा कमी न करता किमती घटू शकतात. त्यामुळे निर्यात वस्तूची मागणी किमतीला लवचिक असली तर वाढू शकते.) घडून येते तेव्हा एक घटक व्यापार शर्तीची संकल्पना वापरली जाते.

जॅकॉब व्हायनर यांनी एक घटक व द्वितीय व्यापारशर्तींची संकल्पना पुढे विकसित केली.

$$\text{एक घटक व्यापारशर्ती (Sf)} = \left(\begin{array}{c}\text{निव्वळ वस्तुविनिमय}\\ \text{व्यापारशर्ती}\end{array}\right) X \left(\begin{array}{c}\text{निर्यात उद्योगाचा}\\ \text{उत्पादकता निर्देशांक}\end{array}\right)$$

Sf = N x निर्यात उद्योगाचा उत्पादकता निर्देशांक

निर्यात उत्पादकता निर्देशांक म्हणजे निर्यात उद्योगातील सर्व उत्पादन घटकांच्या उत्पादकतेचा निर्देशांक होय. प्रत्यक्षात असा निर्देशांक काढणे शक्य होत नाही. त्यामुळे एक घटक व्यापारशर्तीची संकल्पना प्रत्यक्षात वापरता येत नाही.

मात्र संकल्पनेच्या पातळीवर आपण निर्यात उद्योगाच्या एकूण घटक उत्पादकतेत (विशेषतः भांडवल - श्रम यांच्या उत्पादकतेत) वाढ झाली तर त्याचे अनुकूल परिणाम व्यापाराबाबत दिसण्याची अपेक्षा करू शकतो.

**ब) द्वि - घटक व्यापारशर्ती (Double Factoral Terms of Trade):**

जॅकब व्हायनर यांनी द्विघटक व्यापारशर्तीची संकल्पना मांडली. यात निर्यात उत्पादकता निर्देशांकाबरोबर व्हायनरने आयात स्पर्धक उद्योगात उत्पादकता निर्देशांक लक्षात घेतला.

$$\text{द्वि घटक व्यापार शर्ती (Df)} = N \times \frac{\text{निर्यात उद्योगांची उत्पादकता निर्देशांक}}{\text{आयात स्पर्धकांचा उत्पादकता निर्देशांक}}$$

आयात स्पर्धक उद्योग म्हणजे आपण ज्या वस्तूंची आयात करत असू त्याला पर्यायी अशा देशी वस्तूंचे उत्पादन होय. म्हणजे आपण कापडाची आयात करत असलो तर त्या बरोबरीने आपण या आयातीला पर्याय ठरेल असे कापडाचे उत्पादन आपल्या देशातही करत असतो. या आयात पर्यायी उत्पादने करणाऱ्या उद्योगांना आयात स्पर्धक उद्योग म्हटले जाते.

ज्याप्रमाणे निर्यात उद्योगांचा उत्पादकता निर्देशांक काढणे अवघड आहे त्याचप्रमाणे आयात स्पर्धक उद्योगांचा उत्पादकता निर्देशांक काढणे अवघड आहे.

त्यामुळे इकॉनोमिक सर्व्हेसारख्या आकडेवारीच्या मूलभूत स्त्रोतांमध्ये घटक व्यापारशर्तींची आकडेवारी आपल्याला मिळत नाही. मात्र निव्वळ, सकल आणि उत्पन्न व्यापारशर्तीची आकडेवारी मिळते.

जेव्हा एक घटक व्यापारशर्तीत वाढ होते तेव्हा याचा अर्थ निर्यात उत्पादनात वापरलेल्या प्रत्येक घटकामागे अधिक आयात नगसंख्या त्या देशाला प्राप्त होते असा होतो. उदाहरणार्थ, समजा भारतातील लोखंडाच्या उत्पादनाच्या निर्यात उद्योगातील श्रमाची उत्पादकता दुपटीने वाढली, तर इतर परिस्थिती समान असता, निव्वळ वस्तुविनिमयाच्या व्यापारशर्ती स्थिर राहिल्या तरी एक घटक व्यापारशर्ती मात्र दुपटीने वाढतात. म्हणजे निर्यात उद्योगाच्या उत्पादकतेत जितक्या पटीने वाढ होईल त्या पटीत निव्वळ वस्तुविनिमय व्यापाराशर्तीवर एक घटक व्यापारशर्ती वाढतील, अनुकूल होतील. उत्पादकता निर्देशांक सर्व निर्यातीबाबत काढणे कठीण जाते. म्हणून घटक व्यापारशर्तीचा अकडेवारीच्या मदतीने व्यावहारिक वापर अर्थशास्त्रीय उपयोजनासाठी करणे अवघड जाते.

व्यापारातील लाभांच्या मापनाच्या दृष्टीने वस्तुविनिमय व्यापारशर्ती परिपूर्ण ठरत नाही. त्यामुळे व्यापारशर्तींच्या विश्लेषणात आधी आल्फ्रेड मार्शल आणि नंतर जॅकोब व्हायनर यांनी घटक व्यापार शर्तीच्या संकल्पनेची भर घातली आहे.

गुन्नर मिरडाल, सिंगर आणि प्रेबिश यांच्या मते प्राथमिक वस्तूंची निर्यात करणाऱ्या विकसनशील देशांना औद्योगिकीकरण झालेल्या देशांच्या तुलनेत आंतरराष्ट्रीय व्यापारात सातत्याने प्रतिकूलता दिसून व्यक्त होते.

## ३.३ सारांश

सनातनपंथीय सिद्धांतापासून व्यापारशर्तीच्या विश्लेषणाला व्यापार सिद्धांतात महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. व्यापाशर्तीवर मागणीचा प्रभाव ओळखण्याचे श्रेय अर्थात जे. एस. मिल यांना जाते. त्यानंतर मागणी बरोबरीने पुरवठ्याच्या लवचिकतेची व्यापारशर्तींच्या निश्चितीतील भूमिका मांडणाऱ्या आल्फ्रेड मार्शल यांच्याकडे व्यापारशर्ती संकल्पनेच्या विकासाचे श्रेय द्यावे लागेल. अलीकडे सांख्यिकीय तंत्राच्या विकासाबरोबर व्यापारशर्तींच्या संकल्पना विकसित होत गेलेल्या दिसून येतात. व्यापारशर्ती केवळ व्यापारातील लाभच नव्हे तर अर्थव्यवस्थेतील उत्पादन, विशेषीकरण, आयात-निर्यात असे अनेक निर्णय व्यापारशर्तीवर अवलंबून असतात. व्यापारशर्तीचे पुढील प्रकार उपयोजित अर्थशास्त्रात वापरले जातात.

घटक व्यापारशर्ती ही संकल्पना मात्र प्रत्यक्ष वापरासाठी फारशी उपयोगी समजली जात नाही.

विकसित आणि विकसनशील देशातल्या व्यापारशर्तीत भिन्न प्रवृत्ती आढळून येते. वस्तुविनिमय व्यापारशर्ती १९९२ ते ९५ या काळात विकसित देशात अनुकूल होत गेलेल्या दिसतात. या अनुकूलतेतून या देशांच्या निर्यातीतून प्राप्त होणाऱ्या क्रयशक्तीत वाढ झाल्याचे ध्वनित होते. उलट विकसनशील देशांची निर्यातीतून उत्पन्न होणारी आयातीबाबतची क्रयशक्ती सतत कमी झाल्याचे दिसून येते.

या प्रतिकूलतेची सिंगर व प्रेबिश यांनी तीन कारणे सांगितली आहेत.

१) आयात मागणीच्या लवचिकतेतीतल फरक

२) तंत्रज्ञानातील बदल.

३) विकसित देशांची उद्योगातील मक्तेदारी.

प्रत्यक्षात अनेक घटक व्यापारशर्ती प्रभावित करीत असतात.

१) आयात-निर्यात मागणी व पुरवठ्याची सापेक्ष लवचिकता.

२) बाजारातील स्पर्धेचा प्रकार (मक्तेदारी, पूर्णस्पर्धा इत्यादी)

३) आयात पर्यायांची उपलब्धता.

४) लोकांच्या आवडीनिवडी

५) विनिमय दरातील बदल.

६) संख्यात्मक निबंध

७) आर्थिक विकासाची पातळी.

व्यापारशर्तींचा अभ्यास 'आंतरराष्ट्रीय व्यापारातील सापेक्ष किमती' अशा अर्थाने सुरू झाला असला तरी व्यापारशर्तींच्या अभ्यासाचे तंत्र विकसित होत चालले आहे. या अभ्यासाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. विशेषतः जागतिक व्यापार संघटना आणि निर्बंधमुक्त व्यापाराची पूर्वतयारी या पार्श्वभूमीवर भविष्यात व्यापारशर्तींच्या अभ्यासाचे स्थान निश्चितपणे महत्त्वपूर्ण राहणार आहे.

## ३.४ प्रश्न

टिपा लिहा.

१) निव्वळ वस्तुविनिमय व्यापार शर्ती

२) सकल वस्तुविनिमय व्यापार शर्ती

३) उत्पन्न व्यापार शर्ती

४) एक घटक व्यापारशर्ती

५) द्वि-घटक व्यापारशर्ती

*****

# ४

# व्यापारशेष व व्यवहारशेष

**घटक रचना**

४.० उद्दिष्टे

४.१ व्यापारशेष (BOT)

४.२ व्यवहारशेष (BOP)

४.३ व्यापारशेष (BOT) आणि व्यवहारशेष (BOP) मधील फरक

४.४ खरेदी शक्ती समता सिद्धांत

४.५ अन्योन्य मागणी सिद्धांत

४.६ मार्शल – एजवर्थ देयता वक्र

४.७ व्यापारापासून नफा

४.८ मुक्त व्यापाराच्या बाजूने किंवा विरुद्ध युक्तिवाद

४.९ संरक्षण धोरण

४.१० सारांश

४.११ प्रश्न

## ४.० उद्दिष्टे

- व्यापारशेष व व्यवहारशेष ह्या संकल्पना समजून घेणे.
- व्यापारशेष व व्यवहारशेष यांमधील मधील फरक अभ्यासणे.
- खरेदी शक्ती समता सिद्धांत अभ्यासणे.
- अन्योन्य मागणी सिद्धांत समजून घेणे.
- व्यापारापासून लाभ कसा मिळतो, हे समजून घेणे.
- मार्शल - एजवर्थ ऑफर वक्र अभ्यासणे.
- मुक्त व्यापाराच्या बाजूने किंवा विरुद्ध युक्तिवाद अभ्यासणे.
- संरक्षण धोरण समजून घेणे.

## ४.१ व्यापारशेष (BOT)

आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या विषयातील व्यापारशेष आणि व्यवहारशेष या दोन भिन्न संकल्पना आहेत.

**व्यापारशेष (BOT):**

व्यापारशेष (BOT) म्हणजे देशाच्या वस्तूंच्या निर्यातीचे एकूण मूल्य आणि वस्तूंच्या आयातीचे एकूण मूल्य. देशाच्या व्यापार संतुलनाच्या विधानामध्ये केवळ वस्तूंची निर्यात आणि आयात समाविष्ट केली जाते. वस्तूंच्या हालचाली (वस्तूंची निर्यात आणि आयात) याला ‘दृश्यमान व्यापार’ म्हणूनही ओळखले जाते, कारण देशांमधील वस्तूंची हालचाल डोळ्यांनी पाहिली जाऊ शकते आणि हाताने अनुभवली जाऊ शकते आणि एखाद्या देशाच्या कस्टम अधिकार्यांकडून प्रत्यक्षपणे सत्यापित केली जाऊ शकते.

**अनुकूल व्यापारशेष:**

जेव्हा एखाद्या देशाच्या वस्तूंच्या निर्यातीचे एकूण मूल्य त्या देशाच्या वस्तूंच्या आयातीच्या एकूण मूल्यापेक्षा जास्त असते, तेव्हा असे म्हटले जाते की त्या देशाचा व्यापार संतुलन 'अनुकूल' आहे.

**प्रतिकूल व्यापारशेष:**

जर एखाद्या देशाच्या वस्तूंच्या निर्यातीचे एकूण मूल्य त्या देशाच्या वस्तूंच्या आयातीच्या एकूण मूल्यापेक्षा कमी असेल, तर त्या देशाचा व्यापार संतुलन ‘प्रतिकूल’ आहे असे म्हटले जाते.

## ४.२ व्यवहारशेष (BOP)

### ४.२.१ प्रस्तावना:

एका देशाचे दुसऱ्या देशाबरोबरचे पैशातील देणे-घेणे फक्त व्यापारी वस्त्रांच्या आयाती-निर्याती मधूनच निर्माण होते असे नाही तर अशा अनेक बाबी आहेत की, त्याच्यामुळे देश दुसऱ्या देशाला काही देणे लागतो व त्याचवेळेस दुसऱ्या देशातून काही उत्पन्नही येत असते.

'व्यापारी बाबींना किंवा वस्त्रच्या आयात निर्यातीला दृश्य बाबी असे म्हणतात.' या बाबींची नोंद बंदरावरील कस्टमस अधिकाऱ्यांकडे असते. म्हणजे आपल्या देशातून किती वस्तू बाहेरच्या देशात निर्यात झाल्या आणि किती आयात झाल्या याची प्रत्यक्ष नोंद बघण्यास मिळते. म्हणून या बाबींना दृश्य बाबी असे म्हणतात.

'अदृश्य बाबी म्हणजे ज्याची नोंद बंदरावरील कस्टम्स अधिकाऱ्यांकडे होत नाही. परंतु देशाच्या बाबतीत देणे आणि घेणे निर्माण होत असते. उदा. वाहतूक, बँक व विमासेवा, पर्यटन इत्यादी. उदा. समजा, आपल्या देशातील बँकेने परकीयांना सेवा दिली तर परकीय लोक त्याचा काही मोबदला आपल्या बँकेला देतील. त्यामुळे ते आपल्या देशाचे उपत्न असते.'

आंतरराष्ट्रीय व्यवहार देणे आणि येणे अशा दोन गटात वर्गीकरण केले जाते.

$$B = RF - PF =$$

व्यवहारतोल = परकीय येणे - परकीय खर्च

B = व्यवहारतोल

RF = परकीय येणे

PF = परकीय खर्च

परिस्थिती ऋण फरकाची असेल तुटीचा व्यवहारतोल असे म्हटले जाते.

व्यापारशेषामध्ये फक्त दृश्य वस्तूंच्या आयात निर्यातीचा विचार केला जातो. देशात अन्नधान्य, कापड, यंत्रसामुग्री मसाल्याचे पदार्थ यासारख्या दृश्य वस्तूची आयात निर्यात होत असते. व्यापारशेष ही संकुचित संकल्पना आहे.

"व्यापारशेष म्हणजे विशिष्ट कालावधीमध्ये, सर्वसाधारणपणे एक वर्ष, दृश्य आणि अदृश्य वस्तूंच्या निर्यातीमुळे निर्माण होणारी येणी आणि आयातीमुळे निर्माण होणारी देणी ह्यांचा ताळेबंद होय."

निर्यातीचे मूल्य आयातीपेक्षा जास्त असेल तर त्याला अनुकूल व्यापारशेष असे म्हटले जाते. निर्यात मूल्य व आयात मूल्य समान असेल तर त्यास समतोल व्यापारशेष म्हणतात. आणि निर्यात मूल्य आयातमूल्यापेक्षा कमी असेल तर त्यास प्रतिकूल व्यापारशेष म्हणतात.

### ४.२.२ व्यवहारशेषाच्या विविध व्याख्या:

व्यवहारशेष ही व्यापारशेषापेक्षा विस्तृत संकल्पना आहे. व्यापारशेष हा व्यवहार शेषाचा एक भाग आहे. देशात अन्नधान्य, कापड यंत्रसामुग्री मसाल्याचे पदार्थ यासारख्या दृश्य वस्तूची आयात निर्यात होत असते. शिवाय बँकसेवा, जहाज वाहतूक, विमा, तांत्रिक सेवा यासारख्या अदृश्य वस्तू आणि सेवांचा पुरवठा होत असतो. अशा व्यवहारातून देशाला जे येणे-देणे निर्माण होते त्याचाही समावेश व्यवहारशेषात केला जातो.

एका वर्षाच्या कालावधीत देशात होणाऱ्या दृश्य वस्तू आणि सेवा यांच्या आयात निर्यातीचे हिशोब पत्रक म्हणजे व्यवहारतोल होय."

व्यवहारतोलात देशाच्या सर्व प्रकारच्या परकीय येण्या देण्याचा हिशोब एकत्रित मांडला जातो. सामान्यतः देशाला येणी असणारी रक्कम व्यवहारतोलाच्या डाव्या बाजूला मांडली जाते तर देशाचे देणे उजव्या बाजूला मांडले जाते. एखाद्या देशाच्या व्यवहारतोलावरून त्या देशाच्या आर्थिक स्थितीची कल्पना येते. म्हणून व्यवहार शेष हा अर्थव्यवस्थेचा जणू आरसा असतो.

व्यवहारतोलाच्या वेगवेगळ्या अर्थशास्त्रज्ञांनी व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यापैकी काही प्रमुख व्याख्या पुढीलप्रमाणे :

#### १) पी. टी. एल्सवर्थ (P. T. Ellsworth):

व्यवहारतोल म्हणजे एका विशिष्ट कालखंडात एखाद्या देशातील रहिवाशी व इतर जगाच्या दरम्यान केल्या गेलेल्या सर्व देण्याघेण्याचे संक्षिप्त लिखित विवरण होय."

**२) बॉल्टर क्रास (Walter Krause) :**

व्यवहारतोल एखाद्या देशातील नागरिकांच्या व शेष जगाच्या नागरिकांच्या दरम्यान एका विशिष्ट कालखंडातर्गत, सर्वसाधारणपणे एका वर्षाच्या कालावधीत करण्यात आलेल्या सर्व आर्थिक देण्याघेण्याचे एक व्यवस्थितपणे मांडलेले पत्रक होय."

**३) जेम्स इन्ग्राम (James Ingram) :**

"एका देशाचे रहिवासी आणि इतर जगाशी विशिष्ट कालावधीत होणारे संपूर्ण आर्थिक व्यवहारांचे संक्षिप्त विवरण म्हणजे व्यवहारतोल होय."

### ४.२.३ व्यवहारतोलाची वैशिष्ट्ये (Fetures of the Balance of Payment):

वरील व्याख्यावरुन व्यवहारतोलाची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :

१. व्यवहारतोल देशाच्या परकीय देशांबरोबरचा देण्याघेण्याचा एक संक्षिप्त आढावा आहे. एका देशाचे इतर देशांबरोबर लाखो व्यवहार होत असतात ते सर्व व्यवहारतोलात दाखविणे शक्य नसते म्हणून त्यांचा संक्षिप्तपणे विचार व्यवहारतोलात केलेला असतो. असंख्य व्यापारी व्यवहारांचे काही थोड्या गटांमध्ये वर्गीकरण करुन त्यांची नोंद करण्यात येत असते.

२. व्यवहारतोल सर्व आंतरराष्ट्रीय व्यवहारांचे रेकॉर्ड असते. देशातील व्यक्ती आणि जगातील इतर देशांच्या व्यक्ती यांच्यामध्ये वस्तू सेवा आणि इतर मालमत्ता यांचा विनिमय होत असतो. त्याचप्रमाणे देणग्या, सेवांचे मोबदले यांच्या माध्यमातूनही वित्तीय व्यवहार होत असतात. ते सर्व व्यवहारतोलात समाविष्ट असतात.

३. आंतरराष्ट्रीय व्यवहार देणे आणि घेणे अशा दोन गटात वर्गीकृत केले जातात. ज्या ज्या गोष्टीमार्फत विदेशातून उत्पन्न आपल्या देशात येते त्या सर्व गोष्टी येणे बाजूला येतात तर ज्या ज्या गोष्टीमुळे देश दुसऱ्या देशाला देणे लागतो त्या सर्व बाबी देणे बाजूला येतात.

४. देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यवहारांची केली जाणारी नोंद ही द्विनोंदी पद्धतीने केली जात असते याचा अर्थ प्रत्येक आंतरराष्ट्रीय विनिमय व्यवहार दोन वेळा नोंदला जातो. एकदा येणे आणि दुसऱ्यांदा देणे म्हणून नोंदविला जातो.

### ४.२.४ व्यवहारतोलाची रचना (The structure of Balance of Payments):

आंतरराष्ट्रीय व्यापारखात्यावर जे जे आर्थिक व्यवहार होतात. त्या सर्वाच्या नोंदी व्यवहारतोलात येतात. व्यवहारतोलाचे दोन भाग केले जातात.

१. चालू खाते (Current Account)

२. भांडवली खाते (Capital Account)

आर्थिक व्यवहारांचे १) वास्तव व्यवहार व २) वित्तीय व्यवहार असे दोन प्रकार केले जातात. परकीयांबरोबर वस्तू व सेवांचे वास्तव स्वरुपात होणारे व्यवहार वास्तव व्यवहारात

येतात. उदा. आयात-निर्यात, निर्यात, उत्पन्न निर्माण करते. तसेच देशातील लोक परकीयांकडून वस्तू व सेवा खरेदी करतात, त्याला आयात म्हणतात. ती परकीयांसाठी उत्पन्न निर्माण करते म्हणून वास्तव व्यवहार उत्पन्न निर्माण करणारे असतात.

याउलट पेशाच्या किंवा चलनाच्या स्वरुपात होणारे व्यवहार वित्तीय व्यवहारात मोडतात. वित्तीय व्यवहार बऱ्याचदा भांडवली व्यवहार म्हणून ओळखले जातात. हे व्यवहार देशाच्या उत्पन्नपातळीवर प्रत्यक्षपणे परिणाम करत नाहीत. या व्यवहारांमध्ये फक्त भांडवल आणि भांडवली संपत्ती तसेच देशाची देयता यांच्यात बदल होत असतो म्हणून उत्पन्न निर्माण करणारे व्यवहार, व्यवहारतोलाच्या चालू खात्यांमध्ये येतात. तर वित्तीय व्यवहार भांडवली खात्यात येतात.

**१) चालू खाते (Current Account) :**

चालू खात्यात दोन प्रकारच्या बाबी येतात. १) दृश्य बाबी २) अदृश्य बाबी,

दृश्य खात्यांमध्ये वस्तूंची आयात व निर्यात समाविष्ट होते तर अदृश्य खात्यामध्ये सेवांचे मोबदले व देणग्या यांचा समावेश होतो. सर्वसाधारणपणे बँक, विमा, कर्जावरील व्याज, पर्यटकांचा खर्च, वाहतूक शुल्क, देणग्या यांचा समावेश या खात्यात होतो.

पुढील तक्त्यावरुन चालू खाते आणि भांडवली खाते यांची कल्पना येते.

| बाबी (Items) | जमा | खर्च |
|---|---|---|
| **चालू खाते (Current Account)** | | |
| अ) वस्तू व्यापार आयात-निर्यात<br>ब) सेवा<br>१) प्रवास<br>२) वाहतूक<br>३) विमा<br>४) गुंतवणूक<br>५) सरकारी खर्च,<br>६) संकीर्ण (तंत्रज्ञ, चित्रपट)<br>३) बदली येणे. | | |
| **भांडवली खाते (Capital Account)** | | |
| अ) कर्ज<br>१) खाजगी कर्जे<br>२) बँकांकडील कर्जे<br>(३) सरकारी कर्जे<br>(४) प्रत्यक्ष सरकारी गुंतवणूक<br>(५) निधी वगैरे | | |
| **समायोजन खाते (Settlement Account)** | | |
| **चूकभूल (Errors & Missions)** | | |
| **एकूण** | | |

### २) भांडवली खाते (Capital Account) :

कर्ज आणि इतर दावे भांडवली खात्यात येतात. आयात-निर्यातीसाठी करण्यात भांडवल पुरवठा तसेच आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थाकडून येणारा भांडवल पुरवठा होणाऱ्या कर्जाऊ व्यवहारांचा समावेश या खात्यात होतो. त्यानुसार खाजगी भांडवली खाते, आंतरराष्ट्रीय संस्था भांडवली खाते आणि सरकारी खाते, आंतरराष्ट्रीय संस्था भांडवली खाते आणि सरकारी भांडवली खाते अशी विविध खाती भांडवली खात्यात येतात.

खाजगी भांडवली खात्यात महामंडळे आणि व्यापारी बँका यांचे आंतरराष्ट्रीय भांडवली व्यवहार येतात. हे व्यवहार अल्पकालीन आणि दिर्घकालीन असू शकतात. आतरराष्ट्रीय भांडवली खात्यात जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय वित्तपुरवठा महामंडळ, आंतरराष्ट्रीय विकास संस्था, यासारख्या संस्थांनी अल्पकालीन आणि दिर्घकालीन केलेल्या भांडवली व्यवहारांचा समावेश होतो. सरकारी भांडवली खात्यात अनुदाने अल्पकालीन आणि दिर्घकालीन कर्जाचे सरकारी पातळीवर होणारे व्यवहार समाविष्ट होतात.

### व्यवहारतोल नेहमी संतुलित असतो :-

कोणत्याही देशाचा व्यापारतोल द्विनोंदी लेखाकर्म पद्धती तयार केलेला असतो. व्यवहार तोलाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या दोन्ही बाजू म्हणजेच जमा आणि खर्च सारखे असतात. असे होण्याचे कारण म्हणजे प्रत्येक बाब देणे आणि येणे बाजूला येते. त्यामुळे लेखाकर्मच्या दृष्टीने देशाचे देणे आणि घेणे दोन्ही सारखे दिसतात.

## ४.२.५ व्यवहारतोलाचे महत्त्व (IMPORTANCE OF BALANCE OF PAYMENT):

कोणत्याही देशाच्या व्यवहारतोलावरुन त्या देशाच्या आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण करता येते. या विश्लेषणाचे प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे :

१) व्यवहारतोलावरुन आपल्या देशाला परकीय देशांकडून किती रक्कम मिळते आणि आपण परकीयांना किती रक्कम देतो हे समजते.

२) विकसनशील देशांच्या व्यवहारतोलावरुन ते देश आर्थिक विकासासाठी परकीय भांडवलावर किती अवलंबून आहेत हे समजते. त्याचप्रमाणे विकसित देशाच्या व्यवहारतोलावरुन त्यांना परदेशी गुंतवणूकीपासून किती उत्पन्न मिळते ते समजते.

३) व्यवहारतोल देशाच्या आर्थिक परिस्थितीचा मापनदंड आहे असे मानले जाते. कारण व्यवहारतोलाची भूतकाळातील स्थिती आणि चालू स्थिती यांची तुलना करुन देशाच्या आर्थिक परिस्थितीत काय बदल होत आहेत यासंदर्भात निष्कर्ष काढता येतात.

(४) व्यवहारतोलाच्या वेगवेगळ्या भागाचा अभ्यास करुन देश आपल्या आर्थिक स्थितीबद्दल अंदाज करु शकते. सामान्यपणे व्यवहारतोल जेव्हा प्रतिकूल असतो तेव्हा देशाची आर्थिक स्थिती काळजी करण्यासारखी असते. याउलट व्यवहारतील

अनुकूल असेल तर त्याची आर्थिक स्थिती समाधानकारक असल्याचा तो निर्देशक आहे.

(५) व्यवहारतोल स्थितीवरुन सरकारला चलनविषयक, राजकोषीय, परकीय व्यापार आणि परकीय चलन नियंत्रण या संदर्भात धोरण ठरविणे सोपे जाते.

(६) व्यवहारतोलावरून देश आयातीचे देणे हे वस्तूंची निर्यात करून कर्ज उभारून अथवा परकीयांकडून देणग्या स्विकारुन फेडत आहे हे समजते.

(७) देशाच्या चलनाचे परकीय चलनातील मूल्य सुधारत आहे की घटत आहे याची कल्पना येते.

(८) व्यवहारतोलावरुन चलनाच्या अवमूल्यनांचे परीक्षणही करता येते. अवमूल्यनामुळे मध्ये परिणामकारक वाढ होईल की नाही या संदर्भातही भाकीत करता येते.

### ४.२.६ व्यवहारतोलातील असमतोलाची कारणे (Causes Disequilibrium in Balance of Payments):

व्यवहारतोलात सातत्याने मोठ्या प्रमाणात तूट निर्माण होणे कोणत्याही देशाच्या दृष्टीने हानीकारक असते ह्या तूटीचे देशाच्या अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होतात. हे परिणाम टाळण्यासाठी योग्य ते उपाय तातडीने योजावे लागतात. परंतू उपाय योजण्यासाठी असमतोलास कारणीभूत घटक लक्षात घेणे आवश्यक असते. एकाच वेळी अनेक कारणांमुळे व्यवहारतोलात असमतोल निर्माण होतो. व्यवहारतोल अनुकूल असल्यास देशाला तो फायदेशीर असतो. परंतू तुटीचा असल्यास ती समस्या असते. त्यामुळे व्यवहारतोलातील असमतोल तूट निर्माण करणारी प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे –

**१) विकास कार्यक्रमावर होणार खर्च :**

विकसनशील देश आर्थिक विकासाकरिता सदैव प्रयत्नशील असतात आर्थिक विकासाची योजना राबविताना प्रचंड प्रमाणात खर्च करतात. विकासासाठी आवश्यक वस्तूंची आयात करावी लागते. तसेच जीवनावश्यक वस्तूंची आयात करावी लागते. उदा. यंत्रसामुग्री, अन्नधान्य, औषधे यांची आयात वाढल्याने व्यवहारतोलात असमतोल निर्माण

**२) व्यापारचक्रे :**

अनेक देशातील आर्थिक घटनांमध्ये सातत्याने चक्रिय स्वरुपाचे बदल घडून येतात. अविकसीत देशात आर्थिक अस्थिरता असते. त्यामुळे गुंतवणूक वाढत नाही. त्यामुळे गरजा भागविण्याकरता परिणामी आयात वाढून व्यवहारतोलास तूट येते.

**३) बाह्यउचल :**

जेव्हा एखाद्या देशाकडून मोठ्या प्रमाणावर विदेशी उचल घेतली जाते तेव्हा याचा परिणाम म्हणून व्यवहारशेषात तूट तसेच असमतोल निर्माण होतो.

**४) भांडवल :**

आर्थिक विकासावर केलेल्या खर्चामुळे देशातील लोकांची क्रयशक्ती मोठ्या प्रमाणावर सुधारते. परिणामी जनतेकडून देशी तसेच विदेशी वस्तूची मागणी वाढते. देशी वस्तूंच्या वाढत्या मागणीमुळे वस्तूंची टंचाई निर्माण होते. त्यामुळे त्या देशाची निर्यात घटण्याची शक्यता असते. तसेच वाढत्या मागणीमुळे देशात भाववाढीची स्थिती निर्माण होऊन आयात वृद्धी होण्याची शक्यता असते. त्यामुळे व्यवहारतोलात असमतोल निर्माण होतो.

**५) वाढती लोकसंख्या :**

अविकसित देशात लोकसंख्या झपाट्याने व मोठ्या प्रमाणात वाढत असते. सतत वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे देशात लोकसंख्येच्या वाढत्या आवश्यक गरजांच्या पूर्ततेच्या हेतूने आयात वाढ होऊन निर्यात घट होते. परिणामी देशाचा व्यवहारतोल बिघडतो.

**६) प्रदर्शन प्रभाव :**

प्रदर्शन प्रभाव हे विशेषतः अविकसित देशांच्या व्यवहारतोलातील असमतोलाचे कारण आहे. अविकसित देशांतील लोकांना परदेशातील विविध वस्तू वापरण्याचा मोह होतो परिणामी विदेशी वस्तूची आयात वाढते. त्यामुळे देशाचा व्यवहारतोल बिघडतो व व्यवहारशेषात असंतूलन निर्माण होते.

**७) विकसित देशांकडून गुंतवणूकीचा अभाव :**

विकसित देशांनी अविकसित देशात जर मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली तर अविकसित देशात उद्योगधंदे वाढून रोजगार निर्मिती व उत्पादनात वाढ होते. परिणामी निर्यात वाढते आणि त्यांच्या व्यवहारतोलातील असमतोल दूर होऊ शकतो. परंतू अलिकडच्या काळात विकसित देश अविकसित देशात गुंतवणूक करण्यास असमर्थ ठरले आहेत. त्यामुळे अविकसित देशांच्या व्यवहारशेषात असमतोल निर्माण झाला आहे.

**८) नावलौकिक:**

बऱ्याच विकसनशील देशांनी आपल्या मालाविषयी नावलौकिक प्राप्त केलेला आहे. कारण त्या देशांचा माल चांगला, टिकाऊ, दर्जेदार व खात्रीलायक असतो. अशी जगभर प्रसिद्धी झालेली आहे. त्यामुळे जगातील बहुतांशी देशात अशा देशातीलच मालाची मागणी केली जाते व त्यामुळे मोठ्या प्रमाणावर आयात झाल्याने व्यवहारतोलात असमतोल निर्माण होतो.

**९) आर्थिक विषमता :**

अविकसित देशांचा विकास होत असताना देशांत आर्थिक विषमता वाढते. आर्थिक विषमतेमुळे अविकसित देशात श्रीमंताचा एक वर्ग निर्माण होतो. हा श्रीमंताचा वर्ग परदेशी प्रवास करणे, परदेशी वस्तू अधिक प्रमाणात वापरणे अशा अनेक गोष्टी करतात. त्यामुळे अविकसित देशांचा पैसा परदेशात जातो. देशाची परदेशी मालाची आयात वाढते आणि त्याचा परिणाम म्हणून देशाच्या व्यवहारशेषात असमतोल निर्माण होतो.

**१०) राजकीय घटक :**

देशात जर राजकीय अस्थिरता असेल तर मोठ्या प्रमाणात परकीय भांडवल देशाबाहेर जाऊ शकते. तसेच देशांतर्गत गुंतवणूकीचे प्रमाण घटते. परिणामी देशांतर्गत उत्पादन प्रक्रियेत येतात. या सर्वामुळे तूट निर्माण होते.

**११) तंत्रज्ञानातील बदल :**

एखाद्या देशाला तांत्रिक प्रगतीमुळे वस्तू कमी उत्पादनखर्चात उत्पादन करणे शक्य होते त्यामुळे त्या देशाला व्यापाररार्थी अनुकूल होतात. दुसऱ्या देशाच्या दृष्टीने या स्पर्धेत टिकाव धरणे शक्य न झाल्याने निर्यात कमी होत व्यापाररार्थी प्रतिकूल होतात त्यामुळे व्यवहारतोला तूट निर्माण होते.

**४.२.७ व्यवहारतोलातील असमतोल दूर करण्याचे उपाय (Measures for correcting Disequilibrium):**

विकास प्रक्रियेत अनिवार्य वाढती आयात आणि त्या वेगाशी बरोबरी न करू शकणारी निर्यात ह्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यवहारात तूट निर्माण होते व व्यवहारशेष प्रतिकूल बनतो. प्रतिकूल व्यवहारशेष संपूर्णपणे नष्ट करणे शक्य नसले तरी त्याची तीव्रता कमी करणे शक्य आणि आवश्यक असते. हे साध्य करण्यासाठी विविध उपायांचा अवलंब केला जातो.

व्यवहारशेषातील असमतोलाचे नियंत्रण दोन प्रकारे केले जाते :

१) स्वयंचलित नियंत्रण

२) जाणीवपूर्वक नियंत्रण

१) **स्वयंचलित नियंत्रण :-**

पाठिकाणी व्यवहारशेषातील अंसतुलन दूर करण्यासाठी कोणतेही जाणीवपूर्वक नियंत्रण करण्याची गरज भासत नाही. चलन बाजारातील परकीय विनिमयाची मागणी व पुरवठा यांच्यात आवश्यक तो समतोल आपोआप घडून येतो आणि व्यवहारशेष समतोलात रहातो.

२) **जाणीवपूर्वक नियंत्रण :-**

केवळ स्वयंचलित नियंत्रणावर विसंबून व्यवहारशेष समतोलात रहाणे सोपे नसते. परिणामी, अनेकवेळा व्यवहारशेषाच्या समतोलासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावा लागतो. जाणीवपूर्वक नियंत्रणाच्या उपायायांची दोन प्रकारात विभागणी केली जाते.

**असमतोल विरोधी उपाय**

मौद्रिक उपाय

१) चलनसंकोच
२) मूल्य घट
३) अवमूल्यन
४) विनिमयदर नियंत्रण

मौद्रिकेत्तर उपाय

१) आयात नियंत्रण
२) आयात पर्यायीकरण
३) निर्यात वृद्धी
४) परकीय भांडवल

**मौद्रिक उपाय (Monetary Measures) :**

**१) चलनसंकोच (Deflation) :**

सुर्वण परिमाणावर आधारित असलेल्या देशासाठी हा उपाय सुचविण्यात येतो. तो एक देशातील एकूण चलन व पतपैसा कमी करुन आंतरराष्ट्रीय व्यवहारशेषातील असमतोल दुर करण्याचा पूर्वीपासूनचा उपाय आहे. त्यानुसार चलनसंख्येत घट करुन महाग पैशाचे धोरण अवलंबले जाते. त्यामुळे गुंतवणूक, रोजगार पातळी उत्पन्न व खर्चामध्ये घट होऊन देशांतर्गत वस्तूंची किंमतपातळी कमी होते. परिणामी देशांतर्गत वस्तू आंतरराष्ट्रीय बाजारात सापेक्षतेने अधिक स्वस्त होऊन त्या वस्तूंची निर्यात वाढते. तसेच चलनघटीमुळे देशांतर्गत उत्पन्न पातळी कमी होत असल्याने देशातील मागणी कमी होऊन निर्यातीत वाढ होते. देशातील लोकांचे उत्पन्न कमी झाल्याने आयात घटते. अशाप्रकारे चलन घटीद्वारे आयात नियंत्रित केली जाते व निर्यात वाढीस मदत होते आणि आंतरराष्ट्रीय व्यवहार शेषातील तूट म्हणजेच असमतोल नाहीसा केला जातो.

**२) मूल्य घट:**

एखाद्या देशाच्या चलनाच्या संदर्भात इतर देशांच्या चलनातील विनिमय दरात घट घडून येणे म्हणजे मूल्य घट होय. आंतरराष्ट्रीय व्यवहार शेषातील असमतोल दूर करण्यासाठी स्वकीय चलनाच्या विनिमय मूल्याची घट होऊ देणे हा उपाय सुचवण्यात येतो. आंतरराष्ट्रीय व्यवहारशेषात असमतोल निर्माण झालेल्या देशाची विदेशी चलनाकरिता मागणी वाढते. परिणामी त्या देशांकरिता विदेशी चलनाचे मूल्य वाढते तर स्वदेशी चलनाचे मूल्य घटते. या बाह्य मूल्य घटीला घट किंवा किंमत प्रभाव म्हणतात. मूल्य घटींमुळे स्वदेशी वस्तू स्वस्त होऊन निर्यात वाढते. तसेच इतर देशाच्या वस्तू महाग ठरतात. त्यामुळे आयात कमी केली जाते. अशाप्रकारे निर्यात वाढून व्यवहारतोलातील असंतूलन नष्ट होते.

अपरिवर्तनीय कागदी चलन पद्धतीत व विदेशी चलन व्यवहारात सरकारकडून हस्तक्षेप केला जात नसताना मूल्यघट ही यंत्रणा स्वयंचलित ठरते. एखाद्या देशाची आयातीकरता मागणी आणि त्या देशाच्या निर्यातीकरता विदेशी मागणी या दोन्ही लवचिक असतील तर त्या देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यवहार तोलातील सौम्य प्रतिकूलता मूल्य घटीमुळे सहज नाहीशी होऊ शकते. परंतू अन्य देश या पद्धतीस कितपत अनुकूल आहेत किंवा सहकार्य

करतील यावर तिचे यश अवलंबून रहाते. इतर देशांनीही स्पर्धात्मक मूल्यघट ही पद्धत अनुसरल्यास हे साधन कोणत्याही देशास उपयुक्त ठरणार नाही.

### ३) अवमूल्यन (Devaluation):

देशातील सरकारने कायद्याद्वारे आपल्या चलनाचा विनिमय दर कमी करणे म्हणजे अवमूल्यन होय. बाजारात विशिष्ट चलनास असलेली मागणी व त्या चलनाचा पुरवठा या दोन्हीच्या प्रभावामुळे त्या चलनाच्या विनिमय दरात आपोआप होणारी घट म्हणजे मूल्यघट. तर एखाद्या देशातील शासनाने त्या देशातील चलनाच्या विनिमय दरात हेतुपूर्वक आणि कायद्याद्वारे घट घडवून आणणे म्हणजे अवमूल्यन होय.

एखाद्या देशाने इतर देशाच्या चलनाच्या प्रमाणात आपल्या चलनाचे अवमूल्यन केल्यास त्या देशातील आयातीची अंतर्गत किंमत वाढते आणि निर्यातीची विदेशी किंमत घटते. म्हणजेच आयात महाग तर निर्यात स्वस्त होते. परिणामी निर्यातीत वाढ तर आयातीत घट होते. आणि त्यामुळे व्यवहारशेषातील तूट कमी होते.

### ४) विनिमय नियंत्रण (Exchange Control) :-

परकीय चलनांच्या व्यवहारावरील नियंत्रण हे एखाद्या देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यवहारशेषातील असमतोल दूर करण्याचे एक महत्त्वाचे साधन आहे. ही पद्धत म्हणजे असमतोल दुरुस्तीची देशाच्या सरकारकडून उपयोगात आणली जाणारी एक खात्रीशीर पद्धत आहे.

मध्यवर्ती बँकेकडून विदेशी चलनाच्या उपयोगावर आणलेल्या बंधनास विनिमय नियंत्रण म्हटले जाते. जेव्हा विनिमय नियंत्रणाचा अवलंब केला जातो. तेव्हा निर्यात दाराना मिळणारे परकीय चलन मध्यवर्ती बँकेकडे जमा केले जाते. आणि हे चलन परवानाधारक आयातदारांना नियंत्रित प्रमाणात वाटप केले जाते. ही पद्धत आयात प्रत्यक्ष ताब्यात ठेवणारी आहे. या पद्धतीद्वारे व्यवहारशेषातील तूट नाहीशी करण्याचा प्रयत्न केला जातो. पण ती तूट निर्मिती कारणे नष्ट करत नाही. म्हणजेच ही पद्धत असमतोलाचा प्रश्न कायमचा सोडविण्यास उपयुक्त ठरत नाही. देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यवहारशेषातील समतोलाच्या स्थापनेसाठी मूलभूत बदल घडवून आणण्यापर्यंतच्या कालावधीत वापरावयाचे हे एक तात्पुरते साधन आहे.

### अमौद्रिक उपाय (Non Monetary Measures):

### १) आयात नियंत्रण (Import Restriction):

वाढती आयात हे व्यवहारशेषातील तूटीचे आणि असमतोलाचे प्रमुख कारण असते. आयातीवर निर्बंध हे व्यवहारशेषातील तूट कमी करण्याचे प्रभावी साधन आहे. आयात निर्बंध दोन स्वरुपात लादले जातात.

**अ) आयात जकाती:**

आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर कर आकारला जातो त्याला आयात जकात म्हणतात. या उपायाचा वापर हा विदेशी वस्तूंचा देशातील प्रवाह रोखण्यासाठी केला जातो. जर जकातीत वाढ केली तर आयात वस्तू महाग होतात व त्यांची मागणी घटते. परिणामी व्यवहारशेष समतोलात आणणे सोपे होते.

**ब) आयात कोटा :**

आयात कमी करण्याचा हा अधिक परिणामकारक व प्रत्यक्ष स्वरुपाचा उपाय आहे वस्तूनिहाय व देशनिहाय कोटा निश्चित करुन आयात नियंत्रित करता येते. विशिष्ट कालखंडात एखाद्या वस्तूची जास्तीत जास्त किती आयात करता येईल हे त्या उपायाद्वारे निश्चित करता येते. जकातीपेक्षा कोटा हा उपाय अधिक परिणामकारक असते.

**२) आयात पर्यायीकरण (Import Substitution):**

आयातीचे प्रमाण कमी करण्याचा परिणामकारक उपाय म्हणजे आयात वस्तूंच्या पर्यायांचे देशांतर्गत उत्पादन ह्यालाच आयात पर्यायीकरण असे म्हटले जाते. यामध्ये विदेश वस्तूंच्या आयातीस देशी वस्तू उपलब्ध करुन दिल्या जातात. त्यामुळे उत्पादनाची गुणवत्ता सुधारुन विदेशी वस्तूना योग्य पर्याय उपलब्ध होतो. त्यामुळे व्यवहारशेष अनुकूल होतो.

आयात पर्यायीकरणाच्या प्रक्रियेत सरकार करसवलत, करमाफी, उद्योगांना प्राथमिक सुविधा उपलब्ध करुन देते. तसेच मानव साधनसामुग्रीच्या विकासासाठी शिक्षण, प्रशिक्षण, वैद्यकीय सुविधा इत्यादीवरील खर्चात वाढ करते. त्यामुळे देशी उद्योगाना उच्च दर्जाचे उत्पादन करणे शक्य होते.

आयात पर्यायीकरण यशस्वी झाल्यास देशाच्या आयातीत लक्षणीय घट होऊन परकीय चलन वाचते आणि व्यवहारशेषातील तूट खऱ्या अर्थाने दुर करता येते.

**३) निर्यात प्रोत्साहन (Export Promotion) :**

आयात पर्यायीकरणातून आयात घट घडवून आणून परकीय देणी कमी करण्याचा प्रयत्न केला जातो. व्यवहारशेषातील तूट कमी करण्यासाठी येणी म्हणजे प्राप्तीदेखील वाढवणे आवश्यक असते. ह्यासाठी निर्यातवृद्धी हा मार्ग असतो. निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी सरकार कर सवलत, अनुदाने, प्राथमिक सुविधा, स्वस्त दराने कर्ज पुरवठा उपलब्ध करुन देते, निर्यात शुल्क कमी केले जाते.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे परदेशी स्पर्धकांवर मात करु शकेल अशा गुणवत्तेच्या वस्तूंचे उत्पादन केल्याशिवाय बाजारपेठा काबीज करता येणार नाहीत. निर्यात वाढीच्या मार्गात अनेक अडचणी असल्या आणि त्यावर काही मर्यादा पडत असल्या तरी व्यवहारशेषातील तूट भरून काढण्यासाठी हाच एकमेव वास्तव व खात्रीचा व दिर्घकालीन उपाय आहे.

### ४) परकीय भांडवल:

विकसनशील देशातील उद्योगधंद्याचा विकास होण्यासाठी देशांतर्गत भांडवल अपूरे पडते. म्हणून जास्तीत जास्त प्रमाणावर परकीय भांडवल आकर्षित करण्यावर ह्या अर्थव्यवस्थानी लक्ष दिले पाहिजे. देशात जर राजकीय शांतता असेल, विकासास योग्य वातावरण असेल तर परकीय भांडवल आकर्षित होते.

### सारांश:

व्यवहारशेषातील असमतोल दूर करण्याचे मौद्रिक व अमौद्रिक उपाय तात्पुरत्या स्वरुपाचे आहेत. हे उपाय कायमचे नाहीत. व्यवहारशेष अनुकूल करण्याचा कायमचा खात्रीलायक उपाय म्हणजे जलद आर्थिक विकास होय. कारण त्यामुळेच आयातीत घट व निर्यातीत वृद्धी घडवून आणणे शक्य होते.

## ४.३ व्यापारशेष (BOT) आणि व्यवहारशेष (BOP) मधील फरक

### १) व्याख्या

- व्यापारशेष किंवा BoT हे एक आर्थिक विधान आहे जे देशाच्या इतर जगासह वस्तूंची आयात आणि निर्यात लक्षात घेते.

- व्यवहारशेष किंवा BoP हे एक आर्थिक विवरण आहे जे देशाच्या उर्वरित जगासह सर्व आर्थिक व्यवहारांची नोंद ठेवते.

### २) काय हाताळते?

- व्यापारशेष हे वस्तूंच्या आयात आणि निर्यातीतून देशाला होणारा निव्वळ नफा किंवा तोटा हाताळतो.

- व्यवहारशेष हे राष्ट्राद्वारे केलेल्या व्यवहारांचे योग्य हिशेब हाताळते.

### ३) मूलभूत फरक

- व्यापारशेष (BoT) हा मालाची निर्यात आणि आयात यातून मिळणारा फरक आहे.
- व्यवहारशेष (BoP) हा परकीय चलनाचा प्रवाह आणि बहिर्वाह यातील फरक आहे.

### ४) व्यवहारांचा कोणता प्रकार समाविष्ट आहे

- वस्तूशी संबंधित व्यवहार BoT मध्ये समाविष्ट आहेत.

- हस्तांतरण, वस्तू आणि सेवांशी संबंधित व्यवहार BoP मध्ये समाविष्ट आहेत.

**५) भांडवली हस्तांतरण समाविष्ट आहे का?**

- व्यापारशेषामध्ये **भांडवली हस्तांतरण समाविष्ट** नाही.
- व्यवहारशेषामध्ये **भांडवली हस्तांतरण समाविष्ट** आहे.

**६) त्याचा निव्वळ परिणाम काय आहे?**

- BoT चा निव्वळ परिणाम सकारात्मक, नकारात्मक किंवा शून्य असू शकतो.
- BoP चा निव्वळ परिणाम नेहमी शून्य असतो.

## ४.४ खरेदी शक्ती समता सिद्धांत

पहिल्या महायुद्धानंतर गुस्टाव कॅसल (Gustav Cassel) यांनी हा सिद्धांत विकसित केला. पहिल्या महायुद्धाच्या काळात सुवर्ण चलन पद्धत संपुष्टात येवून अपरिवर्तनीय कागदी चलन पद्धती अस्तित्वात आली. कागदी चलन पद्धतीचा स्वीकार जगातील बहुतेक सर्वच देशांनी केल्यामुळे दोन वेगवेगळ्या देशातील वेगवेगळ्या कागदी चलनाची देवाण-घेवाण कोणत्या रीतीने करावी व विनिमय दर कसा निश्चित करावा यासाठी स्वीडिश अर्थशास्त्र गुस्ताव फॅसल यांनी विनिमय दर निश्चितीचा खरेदी शक्ती समता सिद्धांत मांडला. प्रसिद्ध स्वीडिश अर्थ शास्त्रज्ञ गुस्ताव कॅसल यांनी १९१८ मध्ये जो सिद्धांत मांडला तोच विनिमय दर निश्चिती संबंधीचा 'शक्ती समता सिद्धांत' (Purchasing Power parity theory of Exchange Rate) या नावाने ओळखला जातो. कॅसल यांच्या मते चलनाच्या खरेदी शक्ती क्षमतेच्या आधारे विनिमय दराची निश्चिती करण्यात यावी. ज्या काळात सुवर्ण परिणाम पद्धतीचे अस्तित्व सुपष्टात आले होते, त्याच कालवधीत, क्रयशक्ती समता सिद्धांत लोकप्रिय ठरत होता.

कॅसल यांच्या मते लोकांकडून विदेशी चलनाची मागणी ही त्या चलनामध्ये वस्तू खरेदी करण्याची क्षमता असल्यामुळे केली जाते. जेव्हा एका चलनाच्या ऐवजी दुसऱ्या चलनाची बदलाबदल केली जाते. तेव्हा त्या चलनामध्ये असणाऱ्या क्रयशक्तीची अदलाबदल होत असते. त्यामुळे विनिमय दर हा दोन देशांच्या चलनामध्ये असणाऱ्या खरेदी शक्तीवरून ठरतो. जेव्हा दोन देशातील चलनाची खरेदी शक्ती समान होते; त्या ठिकाणी समतोल विनिमय दर ठरतो.

म्हणजेच "दोन अपरिवर्तनीय कागदी चलनाचा विनिमय दर हा साधारणपणे त्या दोन चलनाच्या खरेदी शक्तीच्या गुणोत्तराबरोबर असतो." “The rate of exchange between two inconvertible paper currencies tends to approximate the ratio of their purchasing power.” “दोन अपरिवर्तनीय कागदी चलनाचा समतोल विनिमय दर हा त्या चलनाच्या क्रयशक्तीत समानता निर्माण होऊन निश्चत होतो." "The equilibrium rate of exchange between two in convertible paper currencies comes to be determined by equality of their purchasing power." उदा. जर आपण भारत आणि अमेरिकेचा विचार केला तर असे म्हणता येईल की, भारतीयांकडून अमेरिकन डॉलरची मागणी ही अमेरिकन वस्तू खरेदी करण्यासाठी केली जाते. डॉलरच्या साहाय्याने

किती नगसंख्येची खरेदी करता येईल. हे तेथील किंमत पातळींवर अवलंबून राहील. त्याप्रमाणे, अमेरिकन लोक भारतीय रूपयाची मागणी करताना रूपयाच्या साहाय्याने किती भारतीय वस्तू खरेदी करता येतील याचा विचार करतात. भारतीय रूपयाच्या साहाय्याने किती वस्तू खरेदी करता येतील हे भारतातील किंमत पातळीवर अवलंबून राहील आणि म्हणून कॅसल यांनी असे मत व्यक्त केले आहे की, अमेरिकन डॉलर आणि भारतीय रूपया मधील समतोल विनिमय दराची निश्चिती ही त्या दोन चलनाच्या खरेदी शक्तीच्या समानतेवर अवलंबून राहील. कॅसल यांनी आपला क्रयशक्ती समता सिद्धांत दोन दृष्टिकोनातून स्पष्ट केला आहे.

**अ. निरपेक्ष दृष्टिकोन (Absolute Version):**

क्रयशक्ती समता सिद्धांताच्या निरपेक्ष दृष्टिकोनामध्ये दोन देशाच्या चलनाचा विनिमय त्या चलनाच्या अंतर्गत खरेदीशक्तीत प्रतिबिंबित होत असतो. या दृष्टिकोनानुसार एखादी वस्तू दोन भिन्न देशात खरेदी करण्यासाठी किती खर्च करावा लागेल. यावरून विनिम दर ठरविता येतो. ज्या ठिकाणी दोन चलनांची खरेदी शक्ती समान होते. त्या ठिकाणी दोन चलनाचा विनिमय दर ठरतो.

उदा. X वस्तूची खरेदी करण्यासाठी भारतात ४५,००० रूपये लागत असतील आणि तिच वस्तू अमेरिकेत १००० अमेरिकन डॉलरला खरेदी करता येत असेल तर भारतातील ४५,००० रूपयाची व अमेरिकेतील १००० डॉलरची खरेदी शक्ती X वस्तूच्या ठिकाणी समान होते.. म्हणून दोन चलनांतील विनिमय दर ४५००० रू./ १००० डॉलर म्हणजेच ४५ रूपये = १ डॉलर असा निश्चित होईल.

दोन देशातील विनिमय दर पुढील सूत्राच्या साहाय्याने ठरविता येतो.

वरील सूत्रामध्ये R = pb.Qo / pa.Qo

R = Exchange Rate

pb = Prices in country 'B' 'ब' देशातील त्या वस्तूची किंमत

pa = Prices in Country 'A' 'अ' देशातील त्या विशिष्ट वस्तूची किंमत

Qo = Weights विशिष्ट नगसंख्या

P = एखाद्या वस्तूची विशिष्ट नगसंख्येची किंमत

वरील सूत्राच्या साहाय्याने दोन देशांतील विनिमयाचा दर हा त्या दोन देशांतील चलनाच्या अंतर्गत खरेदीशक्तीवर अवलंबून असतो. "दोन देशांतील चलनाच्या अंतर्गत क्रयशक्तीचे गुणोत्तर म्हणजेच त्या चलनाची क्रयशक्ती समता होय." निरपेक्ष दृष्टीकोनानुसार विविध देशांतील चलनाचा समतोल विनिमय दर त्या दोन चलनाच्या खरेदी शक्तीच्या समानतेवरून ठरविला जातो. क्रयशक्ती समता सिद्धांताचा निरपेक्ष दृष्टिकोन व्यापारामुळे वस्तूच्या किंमती जगातील सर्व देशात समान असतात. या ग्रहीतावर आधारलेला आहे.

**ब. सापेक्ष दृष्टिकोन (Relative Version):**

कॅसल यांनी क्रयशक्ती समता सिद्धांताचा सापेक्ष दृष्टिकोन पूर्वीच्या मांडलेला निरपेक्ष दृष्टिकोनापेक्षा आधुनिक असल्याने तो अधिक लोकप्रिय ठरला आहे. या दृष्टिकोनामध्ये अंतर्गत क्रयशक्ती आणि विनिमय दरात कसे बदल होतात. हे स्पष्ट करण्यात आले आहे. सापेक्ष दृष्टिकोनानुसार समतोल विनिमय दरातील बदल हे अंतर्गत क्रयशक्तीतील बदलामुळे घडून येतात. या ठिकाणी पूर्वीचे विनिमय दर समतोल विनिमय दर म्हणून गृहीत धरले जातात. आणि ते दर पायाभूत दर म्हणून स्वीकारले जातात आणि क्रयशक्तीतील बदल किंमत पातळीतील बदलाच्या निर्देशंकाच्या साहाय्याने मोजले जातात व विनिमय दरातील बदलाचे मापन संबंधित किंमत पातळीतील बदलाच्या गुणोत्तराच्या साहाय्याने करता येते. त्यामुळे नवीन विनिमय दर निश्चित होतो.

सापेक्ष दृष्टिकोनानुसार विनिमय दर ठरविण्यासाठी पुढील सूत्राचा वापर केला जातो. 'A' आणि 'B' देशांमधील विनिमय दर कसा निश्चित केला जातो. हे पुढील सूत्राच्या साहाय्याने स्पष्ट करता येईल.

सूत्र : R3 = Ro pb1/pb0 pa1/pa0 या सूत्रात

R1 = नवीन विनिमय दर / दुरुस्त विनिमय दर

R1 = मूळ किंवा जुना समतोल विनिमय दर

pb1 = 'B' देशातील चालू किंमत निर्देशांक

pb0 = 'B' देशातील मूळ किंमत निर्देशांक

pa1 = 'A' देशातील चालू किंमत निर्देशांक

pa0 = 'A' देशातील मूळ किंमत निर्देशांक

वरील सूत्र दुसऱ्या पद्धतीने पुढीलप्रमाणे मांडता येते.

Foreign Exchange Rate = (Current Period)

= Base Rate x Foreign Price Index (in base period)

Domestic P. Index (in base period)

Domestic P. Index (in current period)

भारत आणि अमेरिका यांच्यातील विनिमय दर कसा निश्चित होतो. हे पाहण्यासाठी असे गृहीत धया की भारत-अमेरिका यांच्यातील मूळचा विनिमय दर १ रू. २० सेंट्स आणि दोन्ही देशांतील मूळचा किंमत निर्देशांक १०० आहेत. समजा नंतरच्या काळात भारताचा किंमत निर्देशांक ३०० पर्यंत आणि अमेरिकेचा किंमत निर्देशांक १५० पर्यंत वाढला असेल तर नवीन विनिमय दर.

१ रू. २० सेंट्स X १५०/१०० X २००/३००

= २० x १/२

= १० सेंट्स असेल.

यावरून असे म्हणता येईल की भारताचा किंमत निर्देशांक अमेरिकेच्या तुलनेने दोन पटीने वाढल्यामुळे रूपयाचे डॉलर मधील विनिमय मूल्य निमपटीने घटेल आणि डॉलरचे रूपयातील विनिमय मूल्य दोन पटीने वाढल्याचे दिसून येईल.

अशा रितीने गुस्ताव कॅसल यांनी आपल्या क्रयशक्ती समता सिद्धांताच्या साहाय्याने विनिमय दर कसा निश्चित केला जातो हे स्पष्ट केले आहे. दोन देशांतील चलनाची क्रयशक्ती ज्या बिंदूमध्ये समान होते; त्याठिकाणी समतोल विनिमय दर ठरतो असे स्पष्ट केले आहे. या सिद्धांतानुसार दोन देशातील किंमत पातळीमध्ये जसजसे बदल होत जातील त्या प्रमाणात चलनाच्या क्रयशक्तीत बदल होऊन विनिमय दरात देखील बदल होतात. क्रयशक्ती सिद्धांतात किंमत वाढीचा / तेजीचा परिणाम विनिमय दरावर होतो. क्रयशक्ती समता सिद्धांतानुसार विनिमय दर दोन देशांतील किंमत निर्देशांकातील फरकावर अवलंबून असतो आणि क्रयशक्ती समता ही त्या संबंधित देशातील किंमत वाढीवर अवलंबून असते.

PPP = DIR - FIR

PPP = क्रयशक्ती समता Purchasing Power Parity.

DIR = देशांतर्गत किंमतवाढीचा दर Domestic inflation Rate

FIR = विदेशी किंमत वाढीचा दर

**Foreign inflation Rate:**

जेव्हा देशांतर्गत किंमत वाढ बाह्य किंमत वाढीच्या दरापेक्षा अधिक असते. (DIR > FIR) तर देशाच्या चलनाचे मूल्य घटते आणि देशांतर्गत किंमत वाढ बाह्य किंमत वाढीपेक्षा अधिक असते. (DIR < FIR) तेव्हा देशाच्या चलनाचे मूल्य वाढते. म्हणजेच चलनवाढ / किंमत वाढ आणि विनिमय घट हे एकमेकांवर अवलंबून असतात आणि ते एकत्रितपणे निश्चित होतात.

**क्रयशक्ती समता सिद्धांतावरील टीका:**

क्रयशक्ती क्षमता सिद्धांताच्या सापेक्ष दृष्टिकोनामध्ये देखील अनेक प्रकारचे दोष आहेत. प्रत्यक्षातील विनिमय दर हे खरेदी शक्ती समता सिद्धांतानुसार निर्धारित करण्यात आलेल्या विनिमय दरापेक्षा भिन्न असतात. आणि म्हणून क्रयशक्ती समता सिद्धांतावर पुढील प्रकारची टीका करण्यात येते.

१. क्रयशक्ती समता विनिमय दर यामध्ये प्रत्यक्ष कार्यात्मक संबंध असतो असे स्पष्ट करण्यात आले आहे. प्रत्यक्षात मात्र असा कार्यात्मक संबंध दिसून येत नाही. तसेच विनिमय दरावर क्रयशक्ती बरोबरच जकात, सट्टेबाजीचे व्यवहार, भांडवलाच्या

हालचाली इत्यादींचा देखील परिणाम होत असतो. परंतू इतर घटकांकडे सिद्धांतात दुर्लक्ष करण्यात आले आहे.

२. क्रयशक्ती समता सिद्धांतामध्ये नवीन विनिमय दर ठरविण्यासाठी आपणास मूळ विनिमय दर / जुना समतोल दर माहीत असला पाहिजे. परंतु पूर्वी अस्तित्वात असलेला एखादा विशिष्ट विनिमय दर हाच समतोल दर आहे असे ठरविणे कठीण असते.

३. जर आर्थिक स्थितीत बदल होत नाहीत असे गृहीत धरले तरच क्रयशक्ती समता सिद्धांतानुसार दोन देशांतील चलनाचा नवीन विनिमय दर ठरविणे शक्य असते.

४. क्रयशक्ती समता सिद्धांतामध्ये चलनासाठी केली जाणारी मागणी ही प्रामुख्याने वस्तुच्या खरेदीसाठीच केली जाते असे मानण्यात आले आहे. परंतु भारतीय नागरिक अमेरिकन / चलनाची मागणी अमेरिकेत गुंतवणूक करण्यासाठी करतात. त्याचप्रमाणे अमेरिकन नागरिक भारतीय रूपयाची मागणी करतात. गुंतवणूक करण्यासाठी करतात. चलनाला असणारी मागणी ही भांडवलाची एका देशातून दुसऱ्या देशात होणाऱ्या हालचालीमुळे होते याकडे सिद्धांतात पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे. हा सिद्धांत विविध देशांत भांडवलाच्या शून्य हालचाली होतात. या गृहीतावर आधारलेला आहे.

५. देशांतर्गत किंमत पातळीतील बदलामुळे दोन देशांच्या चलनामधील विनिमय दरात बदल होतात. तसेच विनिमय दरातील बदलाचा किंमत पातळीवर कोणताही परिणाम होत नाही असे क्रियशक्ती समता सिद्धांतात स्पष्ट करण्यात आले आहे. प्रत्यक्षात मात्र किंमत पातळीतील बदलाचा विनिमय दरावर परिणाम होण्याऐवजी विनिमय दरातील बदलाचाच किंमत पातळीवर परिणाम होतो असे दिसून येते.

६. क्रयशक्ती समता सिद्धांतानुसार विनिमय दर ठरविताना प्रत्यक्ष व्यवहारामध्ये अनेक अडचणी येतात. सिद्धांतात चलानाची क्रयशक्ती मोजण्यासाठी किंमत निर्देशांकाचा उपयोग करावा असे सूचित करण्यात आले आहे. परंतु कोणत्या किंमत निर्देशांकाचा उपयोग करावा. उदा. घाऊक / ठोक किंमत निर्देशांक राहणीमानाचा निर्देशांक यापैकी कोणत्या निर्देशांकाचा उपयोग चलनाची क्रयशक्ती मोजण्यासाठी करावा हे ठरविणे अवघड असते. तसेच दोन देशातील किंमत निर्देशांकाची तुलना करता येत नाही. कारण असे निर्देशांक काढताना वेगवेगळी पायाभूत वर्षाची निवड व वस्तूची निवड केलेली असते. त्यामुळे अशा भिन्न देशांतील किंमत निर्देशांक विचारात घेऊन चलनाची खरी क्रयशक्ती समता समजू शकत नाही.

७. क्रयशक्ती समता सिद्धांत सरकारच्या निर्हस्तक्षेप आणि मुक्त व्यापार धोरणाच्या गृहीतावर आधारलेला आहे. परंतु ही गृहीते सध्य स्थितीत आवास्तव ठरली आहेत. पहिल्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय व्यापारावर सरकार अनेक प्रकारचे निर्बंध लादत आहे. तसेच जकाती, कोटा निश्चिती, निर्यात मदत इत्यादी मार्गाने देशी उद्योगांना संरक्षण दिले जात आहे. या सर्व निर्बंधाचा आंतरराष्ट्रीय व्यापारावर आणि विनिमय

दराच्या निश्चितीवर परिणाम होत आहे आणि म्हणून विनिमय दराची निश्चिती क्रयशक्ती समता आणि किंमत पातळीवर केली जाते असे म्हणता येत नाही.

८. क्रशशक्ती समता सिद्धांतामध्ये विनिमय दर निश्चित करताना व्यवहारतोलातील चालू खात्यातील व्यवहारांना जरी महत्त्व दिले असले तरी भांडवली खात्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे.

९. या सिद्धांतामध्ये किंमत पातळीतील बदलानुसार विनिमय दरात बदल घडून येतात असे स्पष्ट करण्यात आले आहे. म्हणजेच विनिमय दरातील बदल देशांतर्गत किमान पातळीवर मुळीच परिणाम करीत नाहीत असे नमूद करण्यात आले आहे. परंतु ते सर्वस्व चुकीचे आहे. मागील अनुभवानुसार असे स्पष्ट होते की विनिमय दराचा किंमत पातळीवर परिणाम होत असतो. किंमत पातळीचा विनिमय दरावर परिणाम होत नसतो हे सिद्ध झाले आहे.

१०. क्रयशक्ती समता सिद्धांत स्थितीशील अर्थव्यवस्थेत खरा ठरणारा आहे. दोन देशांत जे बदल होतात; त्याकडे सिद्धांतात दूर्लक्ष करण्यात आले आहे. या सिद्धांतांत विनिमय दरातील बदलामुळे दोन देशांच्या संबंधावर परिणाम होतो. याचा सिद्धांताला विसर पडला आहे. जेव्हा दोन देशांच्या आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये नवीन एखादा तिसरा देश प्रवेश करतो. तेव्हा पूर्वीच्या दोन्ही देशांच्या व्यापारावर आणि त्याच्या अंतिम परिणाम विनिमय दरावर देखील झालेला दिसून येतो.

११. क्रयशक्ती क्षमता सिद्धांतात मागणी आणि पुरवठ्याची स्थिती आणि त्याचा विनिमय दरावर होणारा परिणाम याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. आधुनिक अर्थशास्त्रज्ञ जे. एम. केन्स यांच्या मते क्रयशक्ती समता सिद्धांतात मागणीच्या लवचिकतेचा परिणाम विचारात घेतलेला नाही.

उदा. भारतीय वस्तूंना अमेरिकेतून मागणी वाढली तर पूर्वी ज्या एक रूपयासाठी अमेरिकन नागरिक २० सेंट्स देण्यास तयार होते, त्या एक रूपयासाठी २५ सेंट्स देण्यात तयार होतील किंवा अमेरिमन पूर्वी एक रूपयासाठी २० सेंट्स स्वीकारत असतील तर किंमत वाढीमुळे १५ सेंट्स देखील स्वीकारण्यास तयार होतील आणि त्यामुळे दोन चलनांचा विनिमय दर बदलेल.

१२. प्रा. नर्क्स यांच्या मते क्रयशक्ती समता सिद्धांतात विनिमय दरावर परिणाम करणारा किंमत पातळीतील बदल हा एकमेव घटक मानून इतर घटकांकडे दुर्लक्ष केले आहे. मागणी केवळ किंमतीवर अवलंबून नसते तर ती मिळणारे उत्पन्न आणि खर्च यामधील व्यापारचक्रामुळे होणाऱ्या बदलांवर देखील अवलंबून असते. त्यामुळे किंमत पातळी स्थिर राहून देखील व्यापारातील व्यापारचक्रामुळे होणाऱ्या बदलामुळे देखील विनिमय दरात बदल घडून येतात.

१३. देशाच्या आयात-निर्यात व्यापारावर सरकारकडून अनेक प्रकारचे निर्बंध लादले जातात. उदा. आयात निर्यात जकात, आयात परवाने, आयात कोरा आणि इतर निर्बंधामुळे आयात निर्यात व्यापारावर परिणाम होऊन त्याचा अंतिम परिणाम विनिमय

दरावर झालेला दिसून येतो. परंतु इतर घटकांकडे क्रयशक्ती समता सिद्धांतात फारसे लक्ष देण्यात आलेले नाही.

क्रयशक्ती समता सिद्धांतावर जरी वरील प्रकारचे आक्षेप घेतले जात असले तरी या सिद्धांताचे महत्त्व कमी लेखता येत नाही. कारण या सिद्धांतानेच विनिमय दरातील दीर्घकालीन बदलाचे सविस्तर विवेचन केले आहे. या सिद्धांतात व्यवहारतोल कसा निश्चित केला जाते. असे स्पष्ट करताना किंमत पातळीतील होणाऱ्या बदलाचा परिणाम व्यवहारतोल व व्यवहारतोल कसा होतो हे स्पष्ट केले आहे. त्यामुळेच दीर्घकाळात विनिमय दर किंमत पातळीतील बदलावरच अवलंबून असतात. किमतीतील बदलाचा विनिमय दरावर परिणाम होतो हे स्पष्ट झाल्याने या सिद्धांताचे महत्त्व मान्य करावे लागते. जरी या सिद्धांताच्या काही उणिवा असल्यातरी दीर्घकाळात विनिमय दर कसा निश्चित केला जातो आणि त्याचा व्यापारतोल आणि व्यवहारतोल यावर काय परिणाम होतो हे सिद्धांतात स्पष्ट करण्यात आले आहे. म्हणून क्रयशक्ती समता सिद्धांताने आपली उपयुक्तता टिकवून ठेवली आहे.

**आपली प्रगती तपासा:**

१. खरेदीशक्ती समता सिद्धांतातील सापेक्ष दृष्टीकोन व निरपेक्ष दृष्टीकोन स्पष्ट करा.

## ४.५ अन्योन्य मागणी सिद्धांत (Mill's Theory of Reciprocal Demand)

रिकार्डोचा व्यापार सिद्धांत दोन देशातील व्यापार कोणत्या वस्तू संबंधी व कसा असेल ? याचे स्पष्टीकरण देत नाही. व्यापारशर्थी समतोल कसा साधला जातो याचे स्पष्टीकरण मिलचा अन्योन्य मागणी सिद्धांत करतो एका वस्तूच्या मागणीसाठी तो देश आपल्या किती वस्तू देऊ शकेल, याचे स्पष्टीकरण मिलचा सिद्धांत देतो. व्यापारशर्थी निश्चितीत अन्योन्य मागणी महत्त्वाची असते. रिकार्डोच्या तौलनिक खर्च सिद्धांताची मिलच्या अन्योन्य मागणी सिद्धांतामुळे पूर्नमांडणी झाली आहे. दोन देशातील प्रत्येक वस्तूचे उत्पादन वेगवेगळ्या श्रमखर्चाने होत असते असे रिकार्डो म्हणतो मात्र ठरावीक श्रमाच्या आधारे वेगवेगळे उत्पादन होते असे मिलने सांगितले आहे.

**गृहीते :**

१. इंग्लंड व जर्मनी या दोनच देशांचा व्यापार विचारात घेतला आहे.

२. ताग व कापड या दोन वस्तू आहेत.

३. दोन्ही देशांमध्ये दोन्ही वस्तूचे उत्पादन स्थिर उत्पादनफल सिद्धांतानुसार होते.

४. वाहतूक खर्च नाही.

५. पूर्ण स्पर्धा आहे.

६. पूर्ण रोजगार आहे.

७. दोन्ही वस्तूंची सारख्याच प्रमाणात गरज आहे.

८. दोन्ही देशात तौलनिक खर्च सिद्धांतानुसार उत्पादन होते .

मिलचा अन्योन्य मागणी सिद्धांत पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतो.

**वस्तू उत्पादनाची संख्या**


| देश | ताग | कापड |
|---|---|---|
| जर्मनी | १० परिमाण | १० परिमाण |
| इंग्लंड | ०६ परिमाण | ०८ परिमाण |

(संदर्भ- आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र कुलकर्णी, ढमढेरे)

जर्मनीमध्ये एक माणूस एक वर्षाच्या श्रमात १० परिमाण ताग व १० परिमाण कापडाचे उत्पादन करतो. तेवढ्याच श्रमात इंग्लंडमध्ये ०६ परिमाण तागाचे व ८ परिमाण कापडाचे उत्पादन होते. मिलच्या मते, इंग्लंडने जर्मनीकडून ताग घेणे व जर्मनीला कापड निर्यात करणे फायदेशीर आहे. मात्र जर्मनीला ताग व कापड उत्पादनात इंग्लंडपेक्षा अधिक वाढावा आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे इंग्लंडला कापड निर्यातीत व जर्मनीला ताग निर्यातीत अधिक फायदा आहे जर्मनीचे खर्च प्रमाण १:१ तर इंग्लंडचे खर्च प्रमाण ३:४ आहे. मात्र प्रत्यक्ष वस्तूची देवाण- घेवाण अन्योन्य मागणीवर अवलंबून असते.

थोडक्यात व्यापाराशर्थी तौलनिक समानतेनुसार ठरतात. तसेच व्यापारशर्थी देशाच्या आयात कराव्या लागणान्या वस्तूंच्या मागणीनुसार ठरतात.


**आकृती क्र. ४.१**




वरील आकृतीत इंग्लंडने केलेले कापड उत्पादन 'अक्ष' अक्षावर तर जर्मनीने केलेले ताग उत्पादन 'अ' अक्षावर दर्शविले आहे. इंग्लंड कापडाचे तर जर्मनी तागाचे उत्पादन करणार असा जर्मनीचा तर 'अ' हा इंग्लंडचा प्रस्ताव वक्र आहे. प्रस्ताव चक्र हा कोणताही देश आपल्या उत्पादनाच्या बदली किती नग देऊ शकते हे दर्शवितो. 'ट' या बिंदूपाशी इंग्लंड व जर्मनीचा प्रस्ताव वक्र एकमेकांना छेदतात, तेथे समतोल होतो. इंग्लंड 'अक' कापड देऊन 'अ' मिळवतो. एखाद्या देशाची मागणी वाढण्यास प्रस्ताव वक्र बदलतो. उदा. इंग्लंडला जर्मनीकडून जास्त ताग हवा आहे. त्यासाठी इंग्लंड जास्त कापड देऊ शकेल हे 'अइ$_१$ '

प्रस्ताव वक्राने दर्शविले आहे. हा वक्र जर्मनीच्या 'अज' वक्रास 'ट$_१$' बिंदूत स्पर्श करतो. याचा अर्थ इंग्लंड कापड देऊन एवढा ताग घेतो. त्याचप्रमाणे जर्मनीला इंग्लंडकडून जास्त कापड हवे असल्यास जर्मनी 'अ' या प्रस्ताव चक्रावर येतो. येथे इंग्लंडच्या 'अइ' या प्रस्ताव वक्रास अज$_१$" प्रस्ताव व 'ट$_२$' या बिंदूत छेदतो. आता जर्मनी कापड मिळविण्यासाठी ' 'ताग देऊ शकतो. व्यापारार्थी प्रत्येक देशाच्या मागणीच्या लवचिकतेवर अवलंबून असतील. ज्या देशाचा प्रस्ताव वक्र अधिक लवचिक असतो. त्या देशाला व्यापारार्थी प्रतिकूल ठरतात.

**आकृती क्र. ४.२**




व्यापारापासून मिळालेल्या लाभांची विभागणी वरील आकृतीत दर्शविली आहे. 'अइ' हा प्रस्ताव व इंग्लंडचा आहे तर 'अज' हा प्रस्ताव वक्र जर्मनीचा आहे. 'अइ' आणि 'अज' हे स्थिर अंतर्गत खर्च प्रमाणावर आधारित वक्र आहेत. प्रत्यक्ष व्यापारार्थीच बिंदूपाशी निश्चित होतात. कारण 'अई' आणि 'अज' प्रस्ताववक्र एकमेकांस छेदतात.

इंग्लंडचे खर्च प्रमाण तागासाठी 'कस' युनिट आणि कापडासाठी 'अक' आहे. पण इंग्लंडला 'कप' परिमाण ताग व्यापारामुळे मिळतो. म्हणजेच 'सप' परिमाण ताग हा त्याचा लाभ आहे. जर्मनीचा ताग उत्पादनासाठी येणारा खर्च 'कर' आहे. इंग्लंडकडून कापड केल्यास 'कप' एवढा ताग जर्मनीला द्यावा लागतो. म्हणजेच 'पर' एवढा तागाच्या स्वरुपात जर्मनीला मिळतो.

**टिकात्मक परिक्षण:**

मिलचा सिद्धांत अवास्तव गृहीतावर आधारलेला आहे. रिकार्डोच्या सिद्धांतावरील टिका मिलच्या सिद्धांतास लागू पडते. त्याशिवाय विनर, ग्रॅहम आणि अन्य विचारवंतानी सिद्धांतावर टीका केली आहे.

१. अंतर्गत मागणीकडे सिद्धांतात लक्ष दिले नाही.

२. दोन देश आणि दोन वस्तू हे गृहीतक अवास्तव आहे. प्रत्यक्षात अनेक देश व अनेक वस्तू आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी होतात.

३. दोन्ही देशातील उत्पन्नातील चढउताराकडे मिलने लक्ष दिले नाही.

४. पुरवठा बाजू विचारात घेतलेली नाही. ग्रॅहमच्या मते, मिलने मागणीवर भर दिला त्या आधारे अन्योन्य मागणी सिद्धांत मांडला. आंतरराष्ट्रीय व्यापारात उत्पादन खर्च महत्त्वाचा असतो असे ग्रहमचे मत आहे.

५. अवास्तव गृहीतके मिलच्या सिद्धांतात आढळतात. स्थिर उत्पादन फल सिद्धांत, खर्चाचा अभाव, पूर्ण रोजगार, पूर्ण स्पर्धा या अटी अवाजवी आहेत.

## ४.६ मार्शल - एजवर्थ ऑफर वक्र प्रस्ताव वक्र / देयता वक्र व संतुलित व्यापारशर्थी (offer curves and Terms of Trade)

मार्शल व एजवर्थ यांनी देयता वक्र संकल्पनेद्वारे मिलच्या अन्योन्य मागणी संकल्पनेचे अधिक स्पष्टीकरण केलेले आढळते. त्यांच्या मते, व्यापारशर्थी अन्योन्य मागणीच्या तत्त्वानुसार आढळतात. कोणताही देश आयात केलेल्या वस्तूच्या मोबदल्यात आपल्या जवळील किती वस्तू देण्यास तयार आहे हे देकार वक्र दर्शवितो. मार्शल एजवर्थ प्रस्ताव वक्र पुढील गृहीतांच्या पायावर मांडला आहे.

**गृहीते :-**

१) दोन देश दोन वस्तू आहेत.

२) वाहतूक खर्चाचा अभाव आहे.

३) मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापार गृहीत धरला आहे.

४) उत्पादन घटक गतिशील आहेत.

५) तौलनिक खर्च लाभ होतो.

६) संपूर्ण विशेषीकरण शक्य आहे.

**प्रस्ताव वक्राचा उगम (Derivation of offer curves):**

पुढील उदाहरणाच्या साहाय्याने प्रस्ताव वक्र तयार करता येतील. उदा. भारत व जपान या दोन देशात कापड व साखर या दोन वस्तूचे उत्पादन होते. जपानमध्ये एका दिवसात श्रमिक १० परिमाण कापड किंवा १० परिमाण साखरेचे उत्पादन करतो. आणि भारतात १ दिवसात श्रमिक ५ परिमाण कापड किंवा १५ परिमाण साखरेचे उत्पादन करतो. तुलनात्मक सिद्धांतानुसार जपान कापडाच्या बाबतीत आणि भारत साखरेच्या उत्पादनात विशेषीकरण करेल.

**आंतरराष्ट्रीय व्यापारापूर्वी विनिमयदर :-**

१) जपान - १० परिमाण कापड = १० परिमाण साखर

म्हणजेच १ परिमाण कापड = १ परिमाण साखर


२) भारत - ५ परिमाण कापड = १५ परिमाण साखर

१ परिमाण कापड = ३ परिमाण साखर

जपान कापडाचे व भारत साखरेचे विशेषीकरण करण्यास सुरुवात करेल. जपान कापडाची व भारत साखरेची निर्यात सुरु करेल. भारतातून जशी साखरेची निर्यात होईल तसा साखरेचा साठा कमी कमी होत जाईल व त्याचे महत्त्व वाढेल. उलट कापडाची आयात झाल्यामुळे कापडाचा साठा वाढेल व त्याचे महत्त्व कमी होऊ लागेल. याचा परिणाम म्हणून भारताची साखरेच्या त्यागाच्या मोबदल्यात जपानकडून जादा कापडाची अपेक्षा केली जाईल. याप्रमाणे जपानसुद्धा कापडाच्या मोबदल्यात जादा साखरेची अपेक्षा करेल. परंतू विनिमयाचा कमीत कमी दर हा तुलनात्मक खर्चाच्या गुणोत्तराएवढा असेल.


**जपानचा भारतीय साखरेसाठी असलेला देकार वक्र :**

**आकृती क्र. ४.३**




**भारताचा जपानी कापडासाठी असलेला देकार वक्र:**


**आकृती क्र. ४.४**



## समतोल व्यापारशर्ती:



**आकृती क्र. ४.५**




वरील आकृतीत समतोल व्यापारशर्थी दर्शविल्या आहेत. जपानचा प्रस्ताव वक्र व भारताचा प्रस्ताव वक्र एकमेकांना 'म' बिंदूत स्पर्श करतात. त्याठिकाणी समतोल व्यापारशर्थी निश्चित होतील. यामध्ये 'अक' ही जपानची कापडाची निर्यात व भारताची कापडाची आयात आहे. 'अस' ही भारताची साखरेची निर्यात व जपानची साखरेची आयात आहे. यात कापडाची: किंमत साखरेच्या किंमतीच्या प्रमाणात व्यक्त करता येते. तसेच कापडाच्या साठ्याचा साखरेच्या साठ्याच्या मोबदल्यात विनिमय दर ठरवता येतो असे गृहीत धरले आहे परंतू व्यवहारात ही गृहीते अव्यवहार्य आहेत. तसेच दोन देश - दोन वस्तू ही परिस्थिती प्रत्यक्षात आढळत नाही. आंतरराष्ट्रीय व्यवहारात अनेक देशात अनेक वस्तूंचा विनिमय होत असतो. त्यामुळे ही पद्धत सोपी सुटसुटीत असूनही व्यवहारात ती उपयोगी पडत नाही असे म्हटले आहे.

## ४.७ व्यापारापासून लाभ

आंतरराष्ट्रीय व्यापार देशाला त्याच्या अतिरिक्त मालाची इतर देशांना निर्यात करण्यास आणि त्यासाठी चांगली बाजारपेठ सुरक्षित करण्यास मदत करतो. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय व्यापार देशाला अजिबात उत्पादित करता येत नाही किंवा जास्त किमतीत उत्पादित करता येत नाही अशा वस्तू आयात करण्यास मदत करतो. आंतरराष्ट्रीय व्यापारातून मिळणाऱ्या नफ्याचे चार शीर्षकांत वर्गीकरण केले जाऊ शकते.

**अ) कार्यक्षम उत्पादन:**

आंतरराष्ट्रीय व्यापार प्रत्येक सहभागी देशाला त्या वस्तूंच्या उत्पादनात विशेषत्व प्राप्त करण्यास सक्षम करतो ज्यामध्ये त्याचे परिपूर्ण किंवा तुलनात्मक फायदे आहेत. आंतरराष्ट्रीय स्पेशलायझेशन खालील फायदे देते.

१. संसाधनांचा उत्तम वापर.

२. वस्तूंच्या उत्पादनामध्ये एकाग्रता ज्यामध्ये त्याचा तुलनात्मक फायदा आहे.

३. वेळेत बचत.

४. उत्पादनातील कौशल्याची परिपूर्णता.

५. उत्पादनाच्या तंत्रात सुधारणा.

६. उत्पादनात वाढ.

७. व्यापारी देशांमधील उच्च राहणीमान.

**ब) देशांमधील किंमतींचे समानीकरण:**

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे सर्व व्यापारी देशांमधील किमती समान होण्यास मदत होऊ शकते.

१. वस्तूंच्या किमती देशांमधील समान आहेत (तथापि, प्रत्यक्षात तसे झाले नाही).

२. फरक फक्त वाहतूक खर्चाच्या संदर्भात आहे.

३. उत्पादनाच्या घटकांच्या किंमती देखील समान आहेत (तथापि, प्रत्यक्षात तसे झाले नाही).

**क) दुर्मिळ सामग्रीचे समान वितरण:**

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे व्यापारी देशांना दुर्मिळ संसाधनांचे समान वितरण होण्यास मदत होऊ शकते.

**ड) आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सामान्य फायदे:**

१. वापरासाठी विविध प्रकारच्या वस्तूंची उपलब्धता.

२. अधिक रोजगाराच्या संधी निर्माण करणे.

३. मागास राष्ट्रांचे औद्योगिकीकरण.

४. देशांमधील संबंधांमध्ये सुधारणा (तथापि, प्रत्यक्षात तसे झाले नाही).

५. श्रम आणि विशेषीकरण विभाग.

६. वाहतूक सुविधांचा विस्तार.

## ४.८ मुक्त व्यापाराच्या बाजूने किंवा विरुद्ध युक्तिवाद

मुक्त व्यापार धोरण राष्ट्रांमधील वस्तू आणि सेवांच्या मुक्त हालचालींना प्रोत्साहन देते. मुक्त व्यापार धोरणांतर्गत, वस्तू आणि सेवा आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून त्यांची देवाणघेवाण रोखण्यासाठी कमी किंवा कोणतेही सरकारी शुल्क, कोटा, सबसिडी किंवा प्रतिबंधांशिवाय

खरेदी आणि विक्री केली जाऊ शकते. मुक्त व्यापार ही संकल्पना व्यापार संरक्षणवाद किंवा आर्थिक अलगाववादाच्या विरुद्ध आहे. ॲडम स्मिथ आणि डेव्हिड रिकार्डो हे सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ मुक्त व्यापाराचे पुरस्कर्ते होते. ॲडम स्मिथच्या मते, मुक्त व्यापाराच्या फायद्यांचा आनंद घेण्यासाठी जकात काढून टाकले पाहिजेत.

## ४.८.१ मुक्त व्यापाराच्या युक्तिवाद:

### १) विशेषिकरणाचे फायदे:

प्रथम, मुक्त व्यापार श्रमांच्या आंतरराष्ट्रीय विभागणीचे सर्व फायदे सुनिश्चित करतो. प्रत्येक देश त्या वस्तूंच्या उत्पादनात विशेषज्ञ असेल ज्यामध्ये त्याचा व्यापार भागीदारांपेक्षा तुलनात्मक फायदा आहे. यामुळे संसाधनांचा कार्यक्षम वापर होईल आणि त्यामुळे उत्पादन खर्चात कपात होईल.

### २) सर्वांगीण समृद्धीः

दुसरे म्हणजे, देशांमधील मुक्त व्यापारामुळे, जागतिक उत्पादन वाढते कारण विशेषीकरण, कार्यक्षमता इत्यादींमुळे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. मुक्त व्यापारामुळे देशांना स्वस्त दरात वस्तू मिळू शकतात. यामुळे जगातील लोकांचे जीवनमान उंचावते. अशा प्रकारे, मुक्त व्यापारामुळे उच्च उत्पादन, उच्च वापर आणि उच्च अष्टपैलू आंतरराष्ट्रीय समृद्धी येते.

### ३) स्पर्धात्मक भावना विकसित करण्यास मदत करते:

तिसरे म्हणजे, मुक्त व्यापारामुळे अर्थव्यवस्थेत स्पर्धेची भावना निर्माण होते. मुक्त व्यापारांतर्गत तीव्र परकीय स्पर्धेची शक्यता असल्याने, देशांतर्गत उत्पादकांना त्यांचीबाजारपेठ गमावायचीनाही. स्पर्धेमुळे कार्यक्षमता वाढते. शिवाय, देशांतर्गत मक्तेदारी निर्माण होण्यापासून रोखण्यासाठी आणि ग्राहकांना निवड देण्याकडे त्याचा कल आहे.

### ४) वस्तू आणि सेवांची उपलब्धताः

चौथे म्हणजे मुक्त व्यापारामुळे प्रत्येक देशाला अशा वस्तू मिळू शकतात ज्यांचे उत्पादन तो अजिबात करू शकत नाही किंवा केवळ जास्त किंमतीवर उत्पादन करू शकतो. देशांतर्गत अनुपलब्ध वस्तू आणि कच्चा माल कमी किमतीतही मुक्त व्यापारामार्फत मिळवता येतो.

### ५) आंतरराष्ट्रीय सहकार्याला प्रोत्साहन देते:

पाचवे म्हणजे भेदभावाविरूद्ध मुक्त व्यापार संरक्षण. मुक्त व्यापारांतर्गत- कोणत्याही देशाद्वारे कच्चा माल किंवा वस्तूंवर लक्ष ठेवण्यास वाव नाही. मुक्त व्यापार अशा प्रकारे आर्थिक आणि राजकीय सहकार्याद्वारे आंतरराष्ट्रीय शांतता आणि स्थिरता वाढवू शकतो.

### ६) सरकारी हस्तक्षेपापासून मुक्त:

शेवटी, मुक्त व्यापार नोकरशाहीच्या हस्तक्षेपांपासून मुक्त असतो. जर एखाद्या देशाने मुक्त व्यापार धोरणाचे पालन केले तर त्याचा व्यापारात सरकारी हस्तक्षेप कमी असेल. नोकरशाही आणि भ्रष्टाचार हे संरक्षणवाद प्रकारच्या व्यापार धोरणाशी खूप संबंधित आहेत.

### ४.८.२ मुक्त व्यापाराच्या विरुद्ध युक्तिवाद:

#### १) विकसनशील देशांसाठी गैरसोयीचे :

प्रथम, मुक्त व्यापार प्रगत देशांसाठी फायदेशीर असू शकतो परंतु आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या देशांना नाही. जर पूर्वीचा अनुभव काही मार्गदर्शक असेल असेलमुक्त व्यापाराने गरीबकमी विकसित देशांना पुरेसा त्रास दिला आहे. १९४७ पूर्वी भारत हे ब्रिटनच्या साम्राज्यवादी सत्तेवर वसाहतवादी अवलंबित्वाचे उत्कृष्ट उदाहरण होते.

#### २) देशांतर्गत उद्योग/ उत्पादने नष्ट करणे:

दुसरे म्हणजे, यामुळे देशांतर्गत उद्योगांचा नाश होऊ शकतो. मुक्त व्यापारामुळे, आयात केलेला माल स्वस्त दरात उपलब्ध होतो. त्यामुळे देशांतर्गत आणि परदेशी उद्योगांमध्ये एक अयोग्य स्पर्धा निर्माण होते. या प्रक्रियेत देशांतर्गत उद्योगांना मोठा फटका बसला आहे.

#### ३) सर्वांगीण विकासाचा अभाव:

तिसरे म्हणजे मुक्त व्यापारामुळे उद्योगांचा सर्वांगीण विकास होऊ शकत नाही. तुलनात्मक खर्चाचे तत्त्व असे सांगते की देश काही वस्तूंच्या उत्पादनात माहिर आहे. दुसरीकडे अकार्यक्षम उद्योग दुर्लक्षित राहतात. अशा प्रकारे, मुक्त व्यापार अंतर्गत, सर्वांगीण विक नाकारला जातो.

#### ४) अति अवलंबित्वाचा धोका :

चौथे म्हणजे मुक्त व्यापारामुळे अवलंबित्वाचा धोका निर्माण होतो. एखाद्या देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यापार भागीदाराला आर्थिक मंदीचा सामना करावा लागू शकतो. १९२९-३० मध्ये अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेत निर्माण झालेल्या महामंदीने जगभर धुमाकूळ घातला आणि सर्व देशांची अर्थव्यवस्था तत्कालीन मंदीच्या कचाट्यात सापडली नसली तरीही त्याचा मोठा फटका बसला. अति अवलंबित्वामुळे आर्थिकदृष्ट्या कमी विकसित देशांवर अधिक शक्तिशाली देशांचे राजकीय वर्चस्व देखील होऊ शकते.

#### ५) हानिकारक विदेशी वस्तू:

शेवटी एखाद्या देशाला त्याच्या उपभोगाच्या सवयी बदलाव्या लागतील. मुक्त व्यापारामुळे, हानीकारक, निकृष्ट दर्जाची उत्पादने बहुराष्ट्रीय कंपन्या अविकसित देशांमध्ये निर्यात करतात. याचा स्थानिक उद्योगांवर परिणाम होतो आणि ग्राहक कल्याणाचे नुकसान होते. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी व्यापारावर निर्बंध घालणे आवश्यक आहे. मुक्त व्यापाराविरुद्धच्या या सर्व युक्तिवादाच्या पार्श्वभूमीवर, सरकारांना राष्ट्रीय हित जपण्यासाठी काही प्रकारचे व्यापार निर्बंध घालण्यास प्रोत्साहन देण्यात आले.

## ४.९ संरक्षित व्यापार धोरण (Protection Policy)

### ४.९.१ प्रस्तावना :

देशातील उद्योगांना परकिय राष्ट्रांमधील उद्योगांशी स्पर्धा होऊ नये म्हणून परराष्ट्रीय उत्पादनावर जकाती आयातीवर बंधन इ. उपाय योजणे व देशांतर्गत उत्पादकांना निर्यातीवर प्रोत्साहन, कर, सरकारी मदत, अनुदाने इ. सहाय्यकारक उपाय योजणे या धोरणाचा उल्लेख संरक्षित व्यापार धोरण असा केला जातो.

देशातील सरकारने देशांतर्गत अर्थव्यवस्थेची विविध हेतू पूर्तता करण्यासाठी किंवा हित जपण्यासाठी देशाच्या परकिय व्यापारावर लादलेली बंधने म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे संरक्षित धोरण होय. जेव्हा देश संरक्षणात्मक धोरणाचा अवलंब करतो तेव्हा जकात, नियंत्रण, अवपूजन, अर्थसहाय्य इ. मार्गाचा अवलंब केला जातो.

### ४.९.२ संरक्षण धोरणाच्या बाजूने युक्तिवाद (Argument for Protection Policy):

देशातील उद्योगांना प्रोत्साहन, मोठ्या आर्थिक वाढीसाठी संरक्षणाचा अवलंब १९७१ अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ अलेक्झांडर हॅमिल्टन यांनी उत्पादकांच्या अहवालात नमूद केला. हेनरी कॅरी (Henry Clary) या अर्थशास्त्रज्ञाने रोजगाराच्या विविध कारणासाठी संरक्षण सहाय्य केले जाते असे म्हटले आहे. फेडरिक लिस्ट या जर्मन अर्थशास्त्रज्ञाने बालोद्योगांना (insant Industry) संरक्षण देण्याचे मान्य केले. त्यांच्या कल्पना लवकरच लोकप्रिय झाल्या आणि अनेक देशांनी संरक्षणवादी व्यापार धोरणाचा स्विकार केला.

#### १) बालोउद्योग युक्तीवाद (Insant Industry Argument):

बाल्या अवस्थेतील उद्योगांना संरक्षण द्यावे हा युक्तीवाद सर्वमान्य झालेला आहे. बाल्यावस्थेतील युक्तिवाद म्हणजे अगदी नव्याने सुरु झालेले उद्योग अशा उद्योगांना परकिय स्पर्धेपासून संरक्षण मिळणे अत्यंत आवश्यक असते. अन्यथा हे उद्योग टिकणे वा त्यांचा विकास होणे शक्य नाही. विकसनशील देशांमध्ये नव्यानेच सुरु झालेल्या उद्योगांत सुरुवातीच्या काळात उत्पादन खर्च जास्त असतो. अशा उद्योगाला अंतर्गत व बर्हिगत लाभ तात्काळ मिळू शकत नाहीत अशावेळी कमीत कमी खर्चात दर्जेदार वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या परकिय उत्पादकांशी स्पर्धा करणे त्यांना शक्य नसते म्हणून संरक्षक जकातीद्वारे आयातीची अंतर्गत किंमत वाढवून देशातर्गत उत्पादन खर्चापेक्षाही ती अधिक राहील याची काळजी घेतली जाते. परकिय उद्योजकांना ती वस्तू स्वस्त दरात देशात विकता येणार नाही याची काळजी घेतली जाते व देशातील बाजारपेठ देशांतर्गत उद्योगांना उपलब्ध करुन दिली जाते. काही काळानंतर त्या उद्योगांचा विकास होऊन व कार्यक्षमता वाढून त्यांना परकिय उदयोजकां बरोबर स्पर्धा करणे शक्य होते संरक्षण हे कायम स्वरुपात न देता नवीन उदयोगांचा विकास होईपर्यतच दयावे व ज्यावेळी उदयोगधंदे पूर्ण कार्यक्षमतेने कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त उत्पादन करु शकतात त्यावेळी संरक्षण काढून घ्यावे सर्व उद्योगधंद्यांना संरक्षण देऊ नये तर ज्या उद्योगामध्ये संरक्षण दिल्यानंतर विकासाची क्षमता आहे. दिर्घकाळात जे कार्यक्षम ठरुन परकीय उद्योगांच्या स्पर्धेला सामोरे जाऊ शकतील अशाच उद्योगांना संरक्षण देणे हिताचे ठरेल.

**२) उद्योगांचे विविधीकरण युक्तिवाद:**

मुक्त व्यापार धोरणातून अतिरिक्त विशेषीकरण निर्माण होते. अशा प्रकारच्या विशेषीकरणामुळे देशाचा समतोल विकास होत नाही. अतिरिक्त विशेषीकरणामुळे विविध उत्पादनांसाठी परदेशावरील परावलंबित्व वाढते. अशाप्रकारचे परावलंबित्व देशांना धोकादायक ठरते. विशेषतः युध्दकाळात व आर्थिक आणिबाणीच्या प्रसंगी आयात होणे अवघड जाते. त्याचप्रमाणे निर्यात वस्तूच्या उद्योगात काही अडचणी निर्माण झाल्यास त्या देशाच्या अर्थव्यवस्थेवर व त्या वस्तूंवर अवलंबून असलेल्या अन्य देशाच्या अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होतात म्हणून देशाने विविध उद्योगांचा समतोल विकास साधावा व स्वयंपूर्ण व्हावे हे उद्दिष्ट महत्त्वाचे ठरते हे उदिष्ट्य गाठण्यासाठी संरक्षण धोरण उपयुक्त ठरते.

**३) व्यापारशर्ती युक्तिवाद:**

व्यापारशर्थी देशाला अनुकूल करून होण्यासाठी व व्यवहारतोलातील तूट भरून काढण्यासाठी संरक्षणाचे धोरण उपयुक्त ठरते असा युक्तिवाद केला जातो. व्यवहारतोलात तूट आल्यास व्यापारशर्थी अनुकूल करण्यासाठी देशाच्या आयातीवर जकाती लावल्या जातात. आयात मालावर जकाती लावल्यास त्यांची स्वदेशाल किंमत वाढून मागणी कमी होते. मागणी फार कमी होऊ नये म्हणून परकिय निर्यातदारांना आपल्या वस्तूंच्या किंमती कमी करणे भाग पडते. परिणामतः जकातीचा भार परकियावर पडतो. देशाला व्यापारशर्थी अनुकूल होतात. आयातीची मागणी मोठया प्रमाणात असेल व लवचिक असेल त्याचवेळी निर्यात होणाऱ्या वस्तूंची परदेशात मागणी अल्पलवचिक असेल तर आपल्या देशातील आयातीच्या किंमती मोठ्या प्रमाणात कमी होऊन व्यापाराशर्थी अनुकूल होतात. आयातीवर जकाती व अन्य नियंत्रणे टाकून ती कमी केल्यास व्यवहारतोलातील तुट भरून काढणेही शक्य होते.

**४) अवपूंजन विरोधी युक्तिवाद:**

देशातील उत्पादित वस्तू देशातील बाजारपेठेतील किंमतीपेक्षा दुसऱ्या देशातील बाजारात कमी किंमतीला विकली जाते. तेव्हा त्या धोरणास अवपूंजन म्हणतात. अवपूंजनाविरूध्द उपाय योजनेसाठी संरक्षित व्यापार धोरणाचे समर्थन केले जाते. जेव्हा परकिय देश आपल्या देशाची बाजारपेठ काबीज करण्यासाठी अवपूंजनाचा वापर करतात. तेव्हा अवपूंजनाविरूध्द आयात जकाती आकारल्या जातात. परिणामी आयात वस्तूंच्या किंमती वाढतात व आयात वस्तूंची मागणी कमी होते. म्हणून अवपूंजनविरोधी उपाय म्हणून संरक्षित धोरणाचा पुरस्कार केला जातो.

**५) रोजगार युक्तिवाद:**

देशातील रोजगार पातळी उंचावण्याच्या दृष्टीने संरक्षण धोरणाचा पुरस्कार केला जातो. परकीय उत्पादनावर आयात जकाती आकारुन देशातील उद्योगांना संरक्षण दिले तर आयात कमी होऊन देशांतर्गत उत्पादनाला मागणी वाढेल. मागणीत वाढ झाल्याने देशांतर्गत उद्योगात उत्पादन वाढीला प्रेरणा मिळेल. संरक्षण मिळालेल्या उद्योगात त्यामुळे श्रमाची मागणी वाढून रोजगार वाढेल. रोजगारात वाढ झाल्याने अनेकांना उत्पन्न मिळून वाढलेल्या उत्पन्नामुळे इतर उद्योगातील वस्तूंची मागणी वाढेल. रोजगार गुणकाच्या द्वारे

एका उद्योगातील श्रमाच्या मागणीतील वाढ अन्य उद्योगात रोजगार वाढविण्यास कारणीभूत ठरते.

आयात जकातीच्या व अन्य उपायांनी आयात कमी केल्याचा दुसरा लाभ म्हणजे परकिय देशांना या देशात निर्यात करणे अवघड जाते. अशावेळी या देशातील बाजारपेठा हातच्या जाऊ नयेत म्हणून परकीय संयोजक संरक्षण धोरण स्विकारलेल्या देशात आपल्या वस्तूंचे उत्पादन सुरु करण्यास प्रवृत्त होतात. अशाप्रकारे परकीय भांडवल देशात आकर्षित होऊन उत्पादन संस्था स्थापन झाल्यामुळे रोजगार आणखी वाढते.

**६) संरक्षण युक्तिवाद:**

राष्ट्राच्या दृष्टीने खनिजे, खनिजतेल इत्यादीचे साठे मर्यादीत असतात. अशा साधनांची निर्यात करणाऱ्या देशांना निर्यातीवर जकाती आवश्यक वाटतात कारण ही साधने भविष्यात देशाच्या विकासासाठी देशातच रहाणे आवश्यक असते.

**७) संरक्षण उद्योगधंदे युक्तिवाद:**

राष्ट्राच्या दृष्टीने संरक्षण उद्योगांना अत्यंत महत्त्व असते. संरक्षण साहित्याच्या उत्पादनासाठी परकिय देशावर अवलंबून रहाणे धोक्याचे असते. संरक्षण साहित्याचे उत्पादन करणाऱ्या उद्योगांना त्यामुळे संरक्षण देणे आवश्यक ठरते.

**८) स्वस्त श्रम युक्तिवाद:**

विकसित देशांच्या दृष्टीने हा युक्तीवाद केला जातो. विकसित देशातील उच्च वेतन दर टिकवून ठेवण्यासाठी संरक्षणाची आवश्यकता असते. अविकसीत देशात वेतनदर कमी असतात अशा कमी वेतनदरामुळे निर्माण होणारी स्वस्त वस्तू जास्त वेतनदर असलेल्या देशांना आयात होणे त्या देशांना हानीकारक असते म्हणून या देशातील उच्च वेतनदर टिकवून ठेवण्यासाठी संरक्षण आवश्यक ठरते. त्याचप्रमाणे श्रम स्वस्त असलेल्या देशात श्रमिकांचे शोषण होते म्हणून त्या देशातील वस्तू आयात करणे अयोग्य आहे असाही युक्तीवाद केला जातो.

**९) जशास तसे युक्तीवाद:**

बऱ्याचवेळा संरक्षणनीतीचा वापर इतर देशांना धडा शिकविण्यासाठी केला जातो. दुसऱ्या देशांना आपली निर्यात कमी केली तर त्यांना चोख उत्तर देण्यासाठी आपणही संरक्षण नीतीचा वापर करून त्यांची निर्यात घटवली पाहिजे.

**१०) राष्ट्रप्रेम व स्वयंपूर्णता युक्तीवाद:**

देशातील लोकांना स्वदेश व स्वदेशी वस्तू याबद्दल प्रेम जागृत करणे हाही संरक्षणामागचा हेतू असतो. आर्थिक स्वयंपूर्णता प्राप्त केल्यास परकीय देशांमध्ये उद्भवणारी आर्थिक संकटे टाळणे स्वदेशाला शक्य होते.

**११) महसूल युक्तिवाद:**

संरक्षित व्यापार धोरणामुळे आयात कमी होऊन आयात खर्चाच्या रुपाने परदेशात जाणारा पैसा स्वदेशातच रहातो. स्वदेशी वस्तू वापरल्यास स्वदेशी उद्योजकांना पैसा मिळेल परंतु असे धोरण प्रत्येक देशाने स्विकारण्याचे ठरविल्यास आतंरराष्ट्रीय व्यापारच बंद होईल व त्याचे फायदा देशाला मिळणारच नाहीत. संरक्षण व्यापार धोरणाचे युक्तिवाद हे बिगर आर्थिक घटकांवर अवलंबून आहेत हे खरे आहे. परंतु स्वतंत्र्य राजकीय अस्तित्व असणाऱ्या देशांच्या बाबतीत ती प्रभावी व निर्णयाक ठरतात. त्यामुळे संरक्षण धोरण अत्यावश्यक ठरते.

राष्ट्राची आर्थिक स्थिती पहाता या देशाच्या दृष्टीने संरक्षणाचे धोरण महत्वाचे ठरते. या देशात उद्योग नुकतेच स्थापन झालेले असतात. त्यांचा विकास झालेला नमतो. देशाचा औद्योगिक विकास साधण्यासाठी सुरुवातीच्या काळात या उद्योगांना संरक्षण उपलब्ध करून देणे आवश्यक ठरते. विकसनशील राष्ट्रांच्या विकासाच्या सुरुवातीच्या काळात व्यवहारातील प्रतिकूल असतो. हा अनुकूल करण्यासाठी संरक्षण आवश्यक असते. अविकसित देशांचा विकास जलद साधण्यासाठी संरक्षित व्यापार धोरण व लाभदायक ठरते. मुक्त व्यापार या देशांचे औद्योगिकरण आर्थिक विकास पाला पायबंद घालणाराच ठरतो.

**४.९.३ संरक्षित व्यापार धोरणाच्या विरोधातील युक्तिवाद (Argument against protection)**

संरक्षित व्यापार धोरणाला नियुक्तीवाद करण्यात येतात.

**१) सुस्त देशी उत्पादने:**

देशी उत्पादकांना संरक्षण दिल्यामुळे ते आळशी किंवा अकार्यक्षम बनतात त्यामुळे त्यांचे सुधारणा करण्याचे आणि विकासाचे धैर्य खचते व कार्यक्षमता कमी होते.

**२) नाहक सवयी लागतात:**

जेव्हा संरक्षण दिले जाते तेव्हा विकास आणि बालोद्यांना नाहक सवय लागते. बाल्यावस्थेपासून संरक्षणाची सवय लागते. त्यानंतरही तीच सवय रहाते. संरक्षण मग नेहमीच आधार घेण्याची सवय लागते.

**3) भ्रष्टाचाराला चालना मिळते:**

संरक्षण उपलब्ध झाल्यास त्या आधारे भ्रष्टाचाराचा विकास होतो. उद्योगांना संरक्षण टिकवून रहाण्यासाठी तसेच त्यांचा व्यापार मोठा व चांगला चालण्यासाठी अधिकारी वर्गावर राजकीय दबाव व भ्रष्ट मार्गाचा अवलंब केला जातो. त्यामुळे भ्रष्टाचार वाढतो.

**४) मक्तेदारीची निर्मिती:**

देशातील उत्पादकांना संरक्षण दिल्यास स्वार्थीपणा वाढतो आणि जास्तीत जास्त नफा मिळविण्याचा प्रयत्न करतात. आर्थिक शक्ती आणि मक्तेदारीची सवय यावरच लक्ष दिले जाते त्यामुळे मक्तेदारी निर्माण होते.

**५) नैसर्गिक साधनांचा दुरुपयोग:**

संरक्षण धोरणामुळे नैसर्गिक साधनांचा दुरुपयोग होतो. भांडवल आणि श्रमिक बदलतात. त्यामुळे उत्पादन मार्गापासून कमी उत्पादकता निर्माण होते.

**६) उत्पन्न आणि संपत्तीची विषमता:**

संरक्षण धोरणामुळे उच्च किंमतीपासून ग्राहकांवर आर्थिक बोजा इच्छेविरूध्द पडतो. संरक्षण हे भांडवलदारांना फायदेशीर ठरते. त्याचप्रमाणे कामगारांना उत्पन्न आणि संपत्तीची विभागणी अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने सामाजिक अन्यायकारक आणि पक्षपाती ठरते.

**७) ग्राहकांवर बोजा:**

ग्राहकांना स्वस्त आयातीमुळे संधी उपलब्ध होते मात्र संरक्षण धोरणामुळे उच्च किंमतीच्या निष्कृट दर्जाच्या देशातील वस्तू खरेदी कराव्या लागतात. शेवटी ग्राहकांवर उत्पादन खर्चाचा बोजा पडतो.

**८) महसुलात घट :**

संरक्षणामुळे महसुलात घट होते परिणामी सरकारचे उत्पन्न घटते.

**९) जकात युध्द:**

जेव्हा देश संरक्षण धोरण स्विकारते तेव्हा आयातीवर मोठे शुल्क आकारले जाते. इतर देश सुध्दा आयातीवर उच्च शुल्क आकारतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय द्वेष, मत्सर आणि देशात संघर्ष निर्माण होतो.

## ४.१० सारांश

थोडक्यात संरक्षण धोरणाचा काळजीपूर्वक अवलंब केला तरच दीर्घकाळात त्याचे परिणाम चांगले रहातील. परस्परामधून पूर्णपणे विरोधी असणाऱ्या ह्या धोरणांमधून एकाची निवड करणे सोपे नही. तथापि ते अशक्य नाही. अर्थव्यवस्थेच्या गरजा लक्षात होऊन लवचिक धोरण स्विकारणे निश्चित शक्य आहे.

## ४.११ प्रश्न

१) व्यवहारशेषातील असमतोलाची कारणे सांगून उपाय स्पष्ट करा.

२) व्यापारशेष आणि व्यवहारशेष यांचा अर्थ सांगून यांमधील फरक स्पष्ट करा.

३) खरेदी शक्ती समता सिद्धांत स्पष्ट करा.

४) अन्योन्य मागणी सिद्धांताचे स्पष्टिकरण द्या.

५) मार्शल – एजवर्थ देयता वक्र स्पष्ट करा.

६) व्यापारापासून नफा कसा प्राप्त होतो, स्पष्ट करा.

७) मुक्त व्यापाराच्या बाजूने किंवा विरुद्ध युक्तिवाद स्पष्ट करा.

८) 'संरक्षण धोरण' यावर टिप लिहा.

*****

# ५

# परकीय विनिमय बाजार आणि विनिमय दर निर्धारण

**घटक रचना**

५.० उद्दिष्टे
५.१ परकीय विनिमय बाजाराचा अर्थ
५.२ परकीय विनिमय बाजाराची कार्ये
५.३ विनिमय दराचे निर्धारण
५.४ परकीय विनिमय दरावर परिणाम करणारे घटक
५.५ सारांश
५.६ प्रश्न

## ५.० उद्दिष्टे

विविध देशातील संबंध आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या माध्यमातून जोडले गेले आहेत. प्रत्येक देशात स्वतंत्र चलन अस्तित्वात असते. त्यामुळे विविध देशात व्यापार चालन असताना चलनाची देखील देवाण - घेवाण करावी लागते. आंतरराष्ट्रीय व्यापारात भिन्न देशांतील चलनांचा वापर केला जातो. दोन देशातील विनिमयाचे व्यवहार मिटवण्याच्या दृष्टीने विदेशी विनिमय दरास महत्त्व प्राप्त झाले आहे. म्हणून या प्रकरणात आपण विदेशी चलन बाजार व विदेशी विनियम दर यासंबंधीत सर्व गोष्टींचा अभ्यास करणार आहोत.

**या पाठाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे:**

१. विदेशी विनिमय बाजाराचा अर्थ व त्याची कार्ये यांचा अभ्यास करणे.

२. विदेशी विनिमय बाजाराचे स्वरूप व घटक यांचा अभ्यास करणे.

३. विनिमयदराचे निर्धारण अभ्यासणे.

४. परकीय चलन दरावर परिणाम करणारे घटक अभ्यासणे.

## ५.१ परकीय विनिमय बाजाराचा अर्थ

**अर्थ:**

परकीय विनिमय व्यवहारात उत्पन्न आणि संपत्तीच्या हक्काचे एका देशाच्या चलनाचे परिवर्तन दुसऱ्या देशाच्या चलनाच्या शर्तीत करून हक्काचे चलनाच्या साहाय्याने परिवर्तन करता येते. या पद्धतीत काही बाबींचा अभ्यास केला जातो.

१. इतर देशांच्या आणि देशांच्या चलनांचा अभ्यास करणे,

२. विनिमय वाढीची कारणे,

३. विनिमयाच्या ठिकाणी विनिमय आणि समतोल मूल्य यांचा अभ्यास केला जातो.

विविध चलनांचे पतसाधनात रूपांतर करणे, प्रबळ साधनांचे पत रूपांतर वेगवेगळ्या चलनात करणे. जसे चेक, ड्राफ्ट, फॅक्स, हुंड्या, टेलिग्राफ, टान्सफर, प्रवासी चेक, तारेने पैसे पाठविणे, बँकेची पतपत्रे इत्यादींचा समावेश होतो. बँकाच्या खात्यात परकीय चलन आणि साधनांद्वारे चलनाच्या विनिमय बँक ताबडतोब करतात. चलन भौतिकदृष्ट्या बदल करता येत नाही. त्यांचा कायदेशीररीत्या संबंधित देशात विनिमय केला जातो व त्याची नोंद केली जाते.

**व्याख्या:**

"ज्या बाजारात परकीय चलनाच्या खरेदी विक्रीचे व्यवहार केले जातात. त्या बाजारास परकीय विनिमय बाजार असे म्हणतात."

परकीय विनिमयाचा उद्देश हा आहे की, बाजारात व्यवहार करणे. त्याचे वर्गीकरण हजर बाजार आणि वायदा बाजार असे असे केले जाते.

**१. हजर बाजार (Spot Market):**

परकीय विनिमयाची देवाण-घेवाणीचे व्यवहार त्या ठिकाणी २४ तासांत केले जातात. अल्पकालावधीत विदेशी चलनाची खरेदी विक्री करण्यासाठी विनिमयाचा जो दर निश्चित केला जातो. त्या विनिमय दरास हजर बाजार दर म्हणतात. हजर दरात विक्रीचा दर आणि खरेदीचा दर दोन्ही वेगवेगळे असतात. हजर दरात केबलदर, अंतरणदर, टपाल अंतरण दर यांचा समावेश होतो. ज्या वेळेस परकीय चलनाचा खरेदीदार परकीय चलनाची किंमत देशांतर्गत चलनामध्ये बँकेत जमा करते. तेव्हा त्यांच्या जमा खात्यावर हजर दराने रक्कम जमा केली जाते.

**२. वायदे बाजार:**

वर्तमान काळात प्रचलित दराने भविष्यासाठी लागणारी किंवा करावयाची खेरदी-विक्री परदेशी चलनाच्या विशिष्ट बाजारात करतात, तेव्हा त्या बाजारात 'वायदा बाजार' असे म्हणतात. वायदे बाजारात व्याजदर महत्त्वाचा असतो. देश तारणावर अधिक व्याज देतो. तेव्हा चलनाचा वायदा दर कमी असतो. जर खरेदीचा भविष्यकालीन कालावधी अधिक असेल तर कसर दर किंवा विनिमयाची किंमत अधिक राहते. 'वर्तमानकाळात ठरलेल्या ज्या दराने भविष्यकाळात खरेदी-विक्री होणार असेल तर त्यास वायदा दर असे म्हणतात.

विनिमय बाजाराला नियंत्रण नसल्यास मोठ्या प्रमाणात विनिमय दरात चढउतार होतात. त्यामुळे आयात-निर्यातीत अनिश्चितता निर्माण होते. अशा स्थितीत भविष्यात परकीय चलनाची खरेदी किंवा विक्री करावी लागणार असेल तर आयात-निर्यात व्यापारी ती खरेदी विक्री वर्तमानकाळातच करतात.

परकीय चलनाची असणारी मागणी ही वस्तू व सेवांची आयात करणारे आयात व्यापारी आणि सट्टेबाजीचे व्यवहार करणाऱ्या दलालांकडून केली जाते. हे दलाल परकीय चलनाची खरेदी वर्तमानकाळात करतात व भविष्यात विक्री करतात. तसेच परकीय चलनांचा पुरवठा वस्तू व सेवांची निर्यात करणारे व्यापारी आणि दलालांकडून केली जाते. त्यावेळेस भविष्यात वायदा दर घसरण्याची शक्यता असते. तेव्हा वर्तमानकाळात मोठ्या प्रमाणात परकीय चलनाची विक्री केली जाते. त्यावेळेस वायदा बाजारातील दलाल व सट्टेबाज किंमतीतील बदलानुसार आपआपल्या जवळीत विदेशी चलनाचे रूपांतर एका देशातून दुसऱ्या देशात करतात.

## ५.२ परकीय विनिमय बाजाराची कार्ये

परकीय विनिमय बाजाराची कार्ये पुढिलप्रमाणे आहेत.

### १. चलनाचे परिवर्तन करणे:

विदेशी विनिमय बाजाराचे प्रमुख कार्य म्हणजे विशिष्ट परकीय चलनाचे ग्राहकांच्या मागणीनुसार इतर देशांत चलनात परिवर्तन करणे हे असते.

### २. खरेदी शक्तीचे अंतरण:

विनिमय बाजाराचे एक महत्त्वाचे कार्य म्हणजे खरेदी शक्तीचे एका देशातून दुसऱ्या देशात हस्तांतर करणे असते. देशातल्या देशातील क्रयशक्तीचे हस्तांतरण मध्यवर्ती बँकेच्या समाशोधन ग्रहामार्फत होत असते. मात्र दोन देशात भिन्न प्रकारचे चलन अस्तित्वात असल्याने क्रय शक्तीचे अंतरण बँक ड्राफ्ट व चेकच्या सहाय्याने करता येत नाही. आंतरराष्ट्रीय पातळीवर समाशोधनाची स्वतंत्र अशी यंत्रणा नसते. त्यामुळे विविध देशांतील चलनाचे देण्याघेण्याचे व्यवहार विदेश विनिमय बाजारामार्फतच पार पाडले जातात.

### ३. परकीय चलनात कर्जपुरवठा:

आंतरराष्ट्रीय व्यापारात भाग घेणाऱ्या व्यापाऱ्यांना विदेशी चलनातील कर्जपुरवठा करणे हे विनिमय बाजाराचे एक महत्त्वाचे कार्य असते. कारण आयात व्यापाऱ्यांना आयातीची किंमत परकीय चलनात द्यावी लागते. त्यासाठी त्याला काही कालावधीची आवश्यकता भासते, तर निर्यात व्यापाऱ्यास त्याने निर्यात केलेल्या मालाची तात्काळ किंमत हवी असते. अशा वेळी आयात व्यापारी विनिमय बाजारातून परकीय चलनाच्या स्वरूपात कर्ज घेऊन आयातीची किंमत तात्काळ देऊ शकतो. आयात आणि निर्यात व्यापारी भिन्न देशाचे नागरिक असल्याने त्यांना एकमेकांच्या पतविषयी (Credit) माहिती नसते. अशा परिस्थितीत आयात व्यापाऱ्यांना विदेशी चलनातील कर्ज देणे हे विनिमय बाजाराचे महत्त्वाचे कार्य असते.

### ४. हमी स्वीकारणे:

आयात-निर्यात व्यापारात भाग घेणारे व्यापारी विविध देशांतील असल्याने त्यांचा एकमेकांवर विश्वास नसतो. अशा वेळी निर्यात व्यापाऱ्यांना त्यांनी निर्यात केलेल्या मालाची तात्काळ किंमत मिळावी अशी अपेक्षा असते. त्याच प्रमाणे आयात व्यापारी माल ताब्यात

मिळाल्याशिवाय त्याची किंमत देण्यास तयार नसतात. अशा वेळी आयात व निर्यात व्यापाऱ्यांना त्यांच्या व्यवहाराची हमी विनिमय बाजार घेत असतो. निर्यात व्यापाऱ्यांना त्यांनी निर्यात केलेल्या मालाची किंमत देण्याची हमी घेतली जाते. त्याचप्रमाणे आयात व्यापाऱ्यास त्याने खरेदी केलेला माल खात्रीशीर मिळेल अशी हमी घेतली जाते. अशा हमीमुळे व्यापारात विश्वासाचे वातावरण तयार होऊन व्यापार वाढण्यास मदत होते.

५. विदेश विनिमय बाजारामुळे आंतरराष्ट्रीय देण्या-घेण्याचे व्यवहार मिटविण्यासाठी समाशोधन गृहा (Clearing House) ची सुविधा उपलब्ध होते.

६. आंतरराष्ट्रीय व्यापारातून निर्माण होणाऱ्या हुंड्यांच्या मागणीनुसार पुरवठा करता येतो. विदेशी विनिमय बँकांकडून विदेशी चलनाच्या स्वरूपातील विनिमय पत्रे गोळा करून त्याची विक्री आयात व्यापाऱ्यांमध्ये करणे विनिमय बाजारामुळे शक्य होते.

७. विनिमय दरातील बदलामुळे होणारे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी विनिमय बाजार संरक्षक म्हणून कार्य करतो. विदेशी विनिमय बाजारातील देण्या-घेण्याचे व्यवहार पार पाडण्यासाठी विदेशी चलन, सोन्याची निर्यात आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या हुंड्या, बँक, ड्राफ्ट, टेलिग्राफीक ट्रान्सफर आणि प्रवासी चेकचा वापर केला जातो. विदेश विनिमयाचे व्यवहार करणाऱ्यामध्ये विनिमय बाजारातील मध्यस्थ, विनिमय बँका व मध्यवर्ती बँकेचा प्रामुख्याने समावेश होतो. देण्या-घेण्याचे व्यवहार करण्यासाठी विनिमय दराला अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. विदेशी विनिमय दर निश्चित करताना हुंड्या आणि कर्जरोख्याचाही विचार केला जातो.

८. दोन देशांतील चलनांची अदला-बदल करून देणे हे विनिमय बाजाराचे मुख्य कार्य असते.

**आपली प्रगती तपासा:**

१. परकीय विनिमयाचा अर्थ सांगा.

२. परकीय विनिमय बाजाराची महत्त्वाची कार्ये स्पष्ट करा.

## ५.३ विनिमय दराचे निर्धारण

### ५.३.१ विदेशी विनिमय दर संकल्पना:

स्वदेशी व्यापार हा त्या देशातील भौगोलिक सीमारेषाच्या अंतर्गत होत असल्याने व एकच चलन असल्याने विनिमयामध्ये कोणतीही अडचण निर्माण होत नाही. परंतु ज्यावेळी विदेशी व्यापार होत असतो त्यावेळी वेगवेगळ्या देशातील भिन्न भिन्न चलने परस्परांच्या चलनांमध्ये बदलून देण्याची एक मुख्य समस्या निर्माण होते.

### ५.३.२ विदेशी विनिमय दराचा अर्थ:

'विदेशी विनिमय दर म्हणजे एक चलनाची दुसऱ्या चलनात व्यक्त केलेली किंमत होय.' विनिमय दरामूळे दोन देशातील चलनांचा परस्परांशी असणारा संबंध स्पष्ट होतो. विनिमय

दराची अशी व्याख्या करता येते की देशांतर्गत चलनाच्या शर्तीत परकीय चलनाच्या एका एकाकाची किंमत होय.'

विनिमयाचा दर रुपया आणि डॉलरचा विचार करता किती रुपयामध्ये डॉलरची खरेदी केली जाते किंवा १ डॉलर मध्ये किती रुपये मिळतील यावर विनिमय दर अवलंबून असतो. जर विनिमय दर रुपया आणि डॉलर भारताच्या (Point) पासून (Expressed) रुपये ४५-१ अमेरिकन डॉलर असा असेल तर त्याचा अर्थ भारताला १ डॉलर मिळविण्यासाठी ४५ रुपये खर्च करावे लागतात.

### ५.३.३ विदेशी विनिमय दराचे महत्त्व:

आंतराष्ट्रीय व्यापारात विदेशी विनिमय दर ही संकल्पना अतिशय महत्त्वाची आहे. त्याचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे.

१) विदेशी विनिमय दरामुळे वेगवेगळ्या देशांचा आंतरराष्ट्रीय खर्च आणि किंमती समजण्यास मदत होते.

२) विनिमय दर हा एका चलनातून दुसऱ्या चलनाच्या संरक्षणासाठी उपयोगी ठरतो.

३) कोणत्याही प्रकारे देशांतर्गत किंमती कमी न करता देशाची निर्यात स्वस्तात करता येते.

देशातील चलनाचे अवमूल्यन करुन पैशाचा विनिमय दर कमी करता येतो. त्यामुळे निर्यात वाढते आणि परकीय चलनाद्वारे उत्पन्न वाढते.

**आपली प्रगती तपासा:**

प्र.१ विनिमय दर म्हणजे काय ?

प्र.२ विनिमय दराचे महत्त्व सांगा.

### ५.३.४ विदेशी विनिमय दर निश्चिती:

आंतराष्ट्रीय व्यापारात विदेशी विनिमय दर ही संकल्पना फारच महत्त्वाची आहे. परकीय विनियम दरामूळे दोन देशातील चलनांचा परस्परांशी असणारा संबंध स्पष्ट होतो. विनिमय दर निश्चितीचे अनेक सिद्धांत आहेत. त्यापैकी विदेशी विनिमय दर निश्चिच्या व्यवहारतोल सिद्धांतानुसार विनिमय दर हा पुढील दोन घटकांवर आधारित असतो.

i) विदेशी चलनाची मागणी (Demand for Foreign Exchange Df)

ii) विदेशी चलनाचा पुरवठा (Supply of Foregn Exchange Sf)

सुत्ररुपाने,

F.E.R = f (Df. Sf)

वरील सुत्रात,

FER = Foreign Exchange Rate विदेशी विनिमय दर

f = Functional Relationship फलनात्मक संबंध

Df = Demand for Foreign Exchange विदेशी चलनाची मागणी

Sf = Supply of Foreign Exchange विदेशी चलनाचा पुरवठा

**विदेशी चलनाची मागणी:**

विदेशी चलनासाठी केली जाणारी मागणी पुढील हेतूने होत असते.

**१) वस्तूंची आयात :**

हे विदेशी चलनाच्या मागणीचे एक प्रमुख कारण आहे. पक्क्या मालाच्या उत्पादनासाठी देशातील उत्पादकांमार्फत कच्चा माल, सुटे भाग, अर्ध उत्पादीत वस्तु इ. ची आयात केली जाते. तसेच अनेकदा यंत्रसामग्री, अवजारे, इ. भांडवली वस्तु जलद औद्योगिकरणासाठी विदेशातून आयात केल्या जातात

अशा आयातीचे मूल्य फेडण्यासाठी विदेशी चलनाला मागणी केली जाते.

**२) सेवांची आयात:**

देशातील नागरीकांमार्फत अनेकदा विदेशी सेवांना मागणी केली जाते. या सेवा पुढील दोन प्रकारच्या असु शकतात.

अ) व्यक्तीगत सेवा (डॉक्टर्स, वकिल, प्राध्यापक संगीतकार इ.)

ब) संस्थात्मक सेवा (बँका, विमा कंपन्या, शिक्षण, संस्था, वाहतुक, दळणवळण पर्यटन इ.)


अशा सेवांच्या किंमती व्यक्त करण्यासाठी विदेशी चलनाला मागणी होत असते.

**(३) विदेशातील देणी :**

अनेकदा इतर देशांना बक्षीस देणग्या अनुदाने, वित्तीय मदत इ. देणी देण्यासाठी विदेशी चलनाची मागणी होत असते.

परकीय चलनाची किंमत ज्यावेळी अधिक असते. त्यावेळी परकीय चलनासाठी केली जाणारी मागणी कमी असते तर ज्यावेळी परकीय चलनाची किंमत तर ज्यावेळी परकीय चलनाची किंमत कमी असते. अशा वेळी परकीय चलनाची मागणी अधिक केली जाते. म्हणूनच विदेशी चलनाच्या मागणीचा वक्र पुढील आकृतीत दर्शविल्याप्रमाणे ऋणात्मक उताराचा दिसून येतो.

आकृती ५.१




वरील आकृतीत x अक्षावर डॉलर्स संदर्भात पाऊंडला असलेली मागणी तर Y अक्षावर विदेशी विनिमय दर दर्शविलेला आहे. Df हा विदेशी चलनाचा मागणीचा वक्र असून तो डावीकडून उजवीकडे वरुन खाली येणारा ऋणात्मक उताराचा वक्र आहे. हा वक्र विदेशी विनिमय दर आणि विदेशी चलनाची मागणी यातील व्यस्त संबंध दर्शवितो.

ज्यावेळी डॉलर $ आणि पाऊंड £ यामधील विनिमय दर २$ = १£ असा आहे त्यावेळी इंग्लंडच्या १००० £ पॉउड ला मागणी केली जाते. परंतु ज्यावेळी विनिमय दर घडून १.५ डॉलर्स - १ पाऊंड झाल्यास डॉलरच्या तुलनेत पूर्वीपेक्षा पाऊंड स्वस्त झाल्याने पाऊंडसाठी मागणी वाढून ती १५०० पाऊंड अशी वाढलेली दिसून येते.

**विदेशी चलनाचा पुरवठाः**

विदेशी चलनाचा पुरवठा पुढील घटकांमार्फत निर्धारीत होतो.

**१) वस्तूंची निर्यातः**

विदेशी येण्यांचा पर्यायाने विदेशी चलनाच्या पुरवठ्याचा हा प्रमुख मार्ग आहे. विदेशी चलनाचा पुरवठा हा वस्तुच्या निर्यातीचा आकार निर्यात वस्तूंची किंमत यावर अवलंबून असते. निर्यातीचा आकार अधिक असतांना किंवा निर्यात मालाच्या किंमती अधिक असतांना विदेशी चलनाचा पुरवठा देखिल अधिक राहतो.

**२) सेवांची निर्यातः**


सेवा निर्यातीमध्ये 'व्यक्तीगत सेवा' आणि संस्थात्मक सेवा अशा सेवांच समावेश असून अशा सेवांची विदेशातील निर्यात जीतकी अधिक तितका विदेश चलनाचा पुरवठा अधिक राहील

**३) विदेशी येणी:**

देणग्या, अनुदाने, विदेशी वित्तीय मदत, व्याज, अशा विदेशी येण्यातून विदेशी चलनाचा पुरवठा वाढतो.

ज्या वेळी विदेशी विनिमय दर अधिक त्यावेळी विदेशी चलनाचा पुरवठा अधिक तर ज्यावेळी विनिमय दरात घट घडून येते त्यावेळी विदेशी चलनाच्या पुरव देखिल घडू लागतो. विनिमय दर आणि विदेशी चलनाचा पुरवठा यातील सम संबंधामुळे विदेशी चलनाचा पुरवठा वक्र पुढील आकृतीत दर्शविल्याप्रमाणे धनात्म स्वरुपाचा दिसून येतो.

**आकृती क्र. ५.२**





वरील आकृतीत X अक्षावर डॉलरच्या मोबदल्यात पाऊंडचा होणारा पुरवठा दर्शविलेला असून Y अक्षावर विदेशी विनिमय दर दर्शविलेला आहे. हा विदेशी चलनाच पुरवठा वक्र असून तो धनात्मक स्वरुपाचा आहे.

ज्यावेळी विनिमयाचा दर १.५ डॉलर = १ पाऊंड असा कमी असते त्यावेळी इंग्लंडमार्फत पाऊंडचा केला जाणारा पुरवठा १००० पाऊंड इतका आहे. परंतु ज्यावेळी विनिमयाचा दर वाढून 2$ = £1 असा होतो त्यावेळी जास्त डॉल मिळविण्यासाठी इंग्लंडमार्फत पाऊंडचा पुरवठा देखील वाढवून तो २००० पाऊंड झाल्याचे दिसून येते.

**संतुलन बिंदू आणि विनिमय दर निश्चिती:**

विदेशी चलनाची मागणी आणि विदेशी चलनाचा पुरवठा ज्या ठिकाणी समान बनतो तो संतूलन बिंदू असून त्या बिंदूत समतोलित विनिमय दराची निश्चिती होते. हेच पुढील आकृतीद्वारे स्पष्ट करता येईल.

**आकृती क्र. ५.३**




वरील आकृतीत x अक्षावर विदेशी चलनाची मागणी व विदेशी चलनाचा पुरवठा विचारात घेतलेला असून y अक्षावर विनिमय दर दर्शविलेला आहे. Df हा विदेशी चलनाचा मागणीवक्र तर Sf हा विदेशी चलनाचा पुरवठा वक्र आहे. हे दोन्ही वक्र परस्परांना E बिंदूत छेदून जातात. या ठिकाणी संतुलनाची अट पूर्ण होऊन E या संतुलन बिंदूत Y अक्षावर संतुलीत विनिमयाचा OR हा दर निश्चित होतो.

OR या संतूलीत विनिमय दरात वाढ झाल्यास नवीन विनिमय दर $OR_1$ असा निश्चित होतो. परंतु या विनिमय दराला विदेशी चलनाची मागणी a बिंदूमध्ये कमी तर विदेशी चलनाचा पुरवठा 'b' बिंदूमध्ये अधीक अशी असंतुलनाची परीस्थिती निर्माण होऊन $OR_1$ हा विनिमयाचा दर पुन्हा घडून OR अशा पुर्वपदावर येवून स्थिरावेल.

याउलट जर विनिमयाचा दर $OR_2$ असा कमी झाला तर d बिंदूत विदेशी चलनाची मागणी वाढून व c बिंदूत विदेशी चलनाचा पुरवठा घटून पुन्हा असंतुलन निर्माण होईल. अशा वेळी विनिमयाचा दर वरच्या दिशेने वाहून पुन्हा OR असा संतुलनाच्या ठिकाणी स्थिरावेल व हाच विनिमयाचा दर टीकून राहील.

**आपली प्रगती तपासा**

१) विदेशी विनिमय दर ही संकल्पना स्पष्ट करा.

२) विदेशी विनिमय दर निश्चितीची प्रक्रिया स्पष्ट करा.

## ५.४ परकीय चलन दरावर परिणाम करणारे घटक

**१. व्याज आणि चलनवाढीचे दर:**

महागाई म्हणजे ज्या दराने वस्तू आणि सेवांच्या किंमती कालांतराने वाढत जातात. व्याजदर हे पैसे कर्ज घेण्यासाठी बँकांकडून आकारण्यात येणारी रक्कम दर्शवतात. व्याजदर कमी असताना लोक कर्ज घेतात आणि जास्त खर्च करतात या वस्तुस्थितीमुळे हे दोन जोडलेले आहेत, ज्यामुळे खर्चात वाढ होते. हे दर देशाच्या वर्तमान आणि भविष्यातील आर्थिक कामगिरीचे थेट निर्देशक आहेत आणि जगभरातील विदेशी चलन गुंतवणूकदार आणि व्यापारी यांच्या निर्णयांवर प्रभाव टाकू शकतात. व्याजदरात वाढ सामान्यतः स्थानिक चलनाच्या मूल्यात वाढ होते. हे सहसा घडते कारण अर्थव्यवस्था खूप वेगाने वाढत आहे आणि केंद्रीय बँका चलनवाढ कमी करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

**२. चालू खात्यातील तूट:**

चालू खाते म्हणजे देश आणि त्याचे व्यापारी भागीदार यांच्यातील व्यापारातील शिल्लक. हे इतर देशांसोबत व्यापार केलेल्या वस्तू आणि सेवांमधील मूल्यातील फरकाचे वर्णन करते. जर एखाद्या देशाने विकल्यापेक्षा जास्त खरेदी केली तर व्यापाराच्या समतोलात तूट येते. याचा थेट विनिमय दरावर परिणाम होतो कारण एखाद्या देशाला अधिक परदेशी भांडवलाची गरज भासेल, त्यामुळे स्थानिक चलनाची मागणी कमी होईल. स्थानिक चलनाचा हा जादा पुरवठा विदेशी चलनाच्या तुलनेत त्याचे मूल्य कमी करतो.

**३. सरकारी कर्ज:**

हे केंद्र सरकारचे एकूण राष्ट्रीय किंवा सार्वजनिक कर्ज आहे. मोठ्या प्रमाणावर सरकारी कर्ज असलेल्या देशात विदेशी गुंतवणूक आकर्षित करण्याची आणि परकीय भांडवल मिळवण्याची शक्यता कमी असते, ज्यामुळे चलनवाढ होते. असे देखील होऊ शकते की सध्याचे विदेशी गुंतवणूकदार त्यांचे रोखे खुल्या बाजारात विकतील जर त्यांना सरकारी कर्जात वाढ होईल. यामुळे स्थानिक चलनाचा जास्त पुरवठा होईल, त्यामुळे त्याचे मूल्य कमी होईल.

**४. व्यापार अटी:**

व्यापार अटी किंवा शर्ती म्हणजे देशाच्या निर्यात किंमती आणि आयात किंमतींचे गुणोत्तर. जेव्हा एखाद्या देशाच्या निर्यातीच्या किमती त्याच्या आयात किमतीपेक्षा जास्त दराने वाढतात तेव्हा त्याच्या व्यापार अटी किंवा शर्ती सुधारतात. यामुळे उच्च महसूल, देशाच्या चलनाला जास्त मागणी आणि चलनाच्या मूल्यात वाढ होते. याचा एकत्रित परिणाम चलनाच्या विनिमय दरात वाढ होत आहे.

**५. आर्थिक कामगिरी:**

देशाच्या आर्थिक कामगिरीवर परिणाम करणाऱ्या अनेक घटकांपैकी एक म्हणजे त्याचे राजकीय स्थिरता. स्थिर राजकीय वातावरण असलेला देश अधिक विदेशी गुंतवणूक आकर्षित करतो आणि त्याउलट. परकीय भांडवलात वाढ झाल्यामुळे देशांतर्गत चलनाचे

मूल्य वाढते. अशा स्थिरतेचा थेट आर्थिक आणि व्यापार धोरणावर परिणाम होतो, त्यामुळे चलनाच्या मूल्यातील कोणतीही अनिश्चितता दूर होते.

**६. मंदी:**

मंदीच्या काळात, देशाचे व्याजदर घसरण्याची शक्यता असते, त्यामुळे परदेशी भांडवल मिळवण्याची शक्यता कमी होते. यामुळे देशाचे चलन कमकुवत होते, विनिमय दर कमकुवत होतो.

**७. सट्टा:**

नजीकच्या भविष्यात नफा मिळविण्यासाठी त्याचे मूल्य वाढण्याची अपेक्षा असताना गुंतवणूकदार देशाच्या चलनाची अधिक मागणी करतात. परिणामी, चलनाच्या वाढत्या मागणीमुळे त्याचे मूल्य वाढते. ज्याचा परिणाम विनिमय दरातही वाढ होतो.

अनेक घटकांचा समावेश असल्याने, विनिमय दर चढ-उतारांच्या अधीन असतात आणि जे लोक परदेशात वारंवार पैसे हस्तांतरित करतात त्यांच्यासाठी ते खूपच त्रासदायक असू शकते.

## ५.५ सारांश

या प्रकरणामध्ये परकीय विनिमय बाजाराचा अर्थ, तसेच परकीय विनिमय बाजाराची विविध कार्ये, तसेच विनिमय दराचे निर्धारण आकृतीच्या आधारे विशद केले आहे. तसेच परकिय चलन दराचा अर्थ आणि परकीय चलन दरावर परिणाम करणारे घटक विस्तृतपणे नमूद करण्यात आले आहेत.

## ५.६ प्रश्न

१) परकीय विनिमय बाजाराचा अर्थ सांगून परकीय विनिमय बाजाराची कार्ये स्पष्ट करा.

२) विनिमय दराचे निर्धारण आकृतीच्या आधारे स्पष्ट करा.

३) परकीय चलन दरावर परिणाम करणारे घटक

*****

# ६

# परकीय चलन बाजार: संबंधित संकल्पना

**घटक रचना**

६.० उद्दिष्टे
६.१ प्रस्तावना
६.२ व्यवस्थापित लवचिकता
६.३ स्वॅप मार्केट
६.४ परकीय चलन साठ्याचे घटक
६.५ प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक (FDI)
६.६ बहुराष्ट्रीय कंपन्या
६.७ प्रश्न

## ६.० उद्दिष्टे

- व्यवस्थापित लवचिकता ही संकल्पना आकृतीच्या आधारे समजून घेणे.
- स्वॅप मार्केट ही संकल्पना जाणून घेणे.
- परकीय चलन साठ्याचे घटक अभ्यासणे.
- परकीय सहाय्य विरुद्ध विदेशी व्यापार यांचा अभ्यास करणे.
- प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक (FDI) व बहुराष्ट्रीय कंपन्या ह्या संकल्पना अभ्यासणे.

## ६.१ प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण व्यवस्थापित लवचिकता, स्वॅप मार्केट, परकीय चलन साठा आणि त्याचे घटक, परकीय सहाय्य विरुद्ध विदेशी व्यापार, प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक (FDI) व बहुराष्ट्रीय कंपन्या या संकल्पना अभ्यासणार आहोत.

## ६.२ व्यवस्थापित लवचिकता

**व्यवस्थापित विनिमय दर:**

एका राष्ट्राने आपल्या चलनाची मूल्यघट (अवमूल्यन केल्यास प्रतिकारात्मक कारवाई म्हणून इतर राष्ट्रेही मूल्य घट करु लागतात. इ. स. १९३० नंतरच्या दशकात अनेक देशांनी अशी स्पर्धात्मक मूल्यघट केल्याची उदाहरणे सापडल्यावर प्रतिबंधात्मक उपाय

म्हणून दुसऱ्या महायुद्धानंतर आंतराष्ट्रीय मुद्रानिधीच्या (IMF) अंतर्गत जी पद्धती अस्तीत्वात आली तीला व्यवस्थापित विनिमय दर पद्धती म्हणता येते.


स्थिर विनिमय दर व लवचिक विनिमय दर यांच्यात काही दोष असल्याने एक परिपूर्ण विनिमय दर पद्धती म्हणून व्यवस्थापिक विनिमय दर पद्धती अस्तित्वात आली. या पद्धतीत स्थिर विनिमय दर व अस्थिर विनिमय दर या दोन्ही पद्धतींचे काही गुणधर्म असल्याने खऱ्या अर्थाने ही पद्धत या दोन्ही विनिमय दरांमधील 'सुवर्णमध्य' मानली जाते.

व्यवस्थापित विनिमय दर पद्धतीत सरकार म्हणजेच मध्यवर्ती बँकेची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असते. देशातील मध्यवर्ती बँक ही देशाची मौद्रिक व विस्तीय अधिसत्ता या नात्याने विदेशी विनिमय बाजारात विनिमय दर स्थिर राखण्यासाठी हस्तक्षेप करते. या पद्धतीनुसार विदेशी विनिमयाचा दर विशिष्ट मर्यादेपर्यंत लवचिक राहू शकेल अशी व्यवस्था केली जाते. म्हणून त्याला नियंत्रित (Controlled Flexibility) असेही म्हणतात.

ज्यावेळी विनिमय दरामध्ये सतत बदल होऊ लागतात त्यावेळी मध्यवर्ती बँक विदेशी विनिमय बाजारपेठेत हस्तक्षेप करुन विनिमय दर स्थिर राखण्याचा प्रयत्न करते. म्हणजेच ज्या वेळी विदेशी चलनासाठी मागणी वाढू लागते. त्यावेळी विनिमय दरातील वाढ रोखण्यासाठी मध्यवर्ती बँक आपल्याकडील विदेशी चलनाचा बाजारात पुरवठा म्हणजेच विक्री करुन मागणी पुरवठ्यात संतूलन राखून विनिमयाचा दर स्थिर ठरतो. याऊलट ज्यावेळी विदेशी चलनाचा पुरवठा वाढू लागतो त्यावेळी विनिमय दरातील घसरणे थांबविण्यासाठी मध्यवर्ती बँक बाजारातील विदेशी चलन खरेदी करते.

मध्यवर्ती बँकेची ही नियंत्रणात्मक भूमिका पुढील आकृतीद्वारे समजण्यास मदत होते

**आकृती क्र. ६.१**




### आपली प्रगती तपासा

**१)** स्थिर विनिमय दर आणि अस्थिर विनिमय दर पद्धती यातील फरक स्पष्ट करा.

२) व्यवस्थापित विनिमय दर म्हणजे काय ?

## ६.३ स्वॅप मार्केट

**स्वॅप म्हणजे काय?**

स्वॅप हा दोन पक्षांमधील एक व्युत्पन्न करार आहे ज्यामध्ये दोन आर्थिक साधनांच्या पूर्व-संमत रोख प्रवाहांची देवाणघेवाण समाविष्ट असते. रोख प्रवाह सामान्यतः काल्पनिक मुख्य रक्कम (पूर्वनिश्चित नाममात्र मूल्य) वापरून निर्धारित केला जातो. रोख प्रवाहाच्या प्रत्येक प्रवाहाला “लेग” असे म्हणतात.

१९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात सादर केले गेले, स्वॅप्स हा तुलनेने नवीन प्रकारचा डेरिव्हेटिव्ह आहे. जरी तुलनेने नवीन असले तरी, त्यांचा साधेपणा, त्यांच्या विस्तृत अनुप्रयोगांसह, त्यांना सर्वात वारंवार व्यापार केलेल्या आर्थिक करारांपैकी एक बनवते.

कॉर्पोरेट वित्त व्यावसायिक जोखीम हेज करण्यासाठी आणि विशिष्ट ऑपरेशन्सची अनिश्चितता कमी करण्यासाठी स्वॅप करार वापरू शकतात. उदाहरणार्थ, काहीवेळा प्रकल्प विनिमय दराच्या जोखमीच्या संपर्कात येऊ शकतात आणि कंपनीचे CFO हेजिंग साधन म्हणून चलन स्वॅप करार वापरू शकतात.

फ्युचर्स आणि ऑप्शन्सच्या विपरीत, अदलाबदलीचा व्यवहार एक्सचेंजेसवर होत नाही तर ओव्हर-द-काउंटर केला जातो. याव्यतिरिक्त, स्वॅपमधील प्रतिपक्ष सामान्यत: कंपन्या आणि वित्तीय संस्था असतात आणि व्यक्ती नसतात, कारण स्वॅप कॉन्ट्रॅक्टमध्ये प्रतिपक्ष डिफॉल्ट होण्याचा उच्च धोका असतो.

काही वित्तीय संस्था सामान्यतः स्वॅप मार्केटचे बाजार निर्माते म्हणून भाग घेतात. स्वॅप बँक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संस्था, प्रतिपक्षांची जुळवाजुळव करून व्यवहार सुलभ करतात.

**स्वॅपचे प्रकार:**

आधुनिक वित्तीय बाजारपेठे वेगवेगळ्या उद्देशांसाठी उपयुक्त अशा डेरिव्हेटिव्हची विस्तृत निवड वापरतात. सर्वात लोकप्रिय प्रकारांमध्ये हे समाविष्ट आहे:

**१.व्याजदर स्वॅप:**

प्रतिपक्ष पूर्वनिर्धारित काल्पनिक मुद्दल रकमेच्या आधारावर, भविष्यातील व्याज देयकांच्या एका प्रवाहाची दुसऱ्यासाठी देवाणघेवाण करण्यास सहमती देतात. सामान्यतः, व्याजदर स्वॅपमध्ये फ्लोटिंग व्याज दरासाठी निश्चित व्याजदराची देवाणघेवाण समाविष्ट असते.

**२.चलन स्वॅप:**

काउंटरपार्टी मूळ रक्कम आणि विविध चलनांमध्ये व्याज देयके यांची देवाणघेवाण करतात. चलन विनिमय दरातील चढउतारांविरूद्ध दुसऱ्या गुंतवणुकीची स्थिती हेज करण्यासाठी हे करार स्वॅप वापरले जातात.

**३. कमोडिटी स्वॅप:**

हे डेरिव्हेटिव्ह्ज फ्लोटिंग कॅश फ्लोची देवाणघेवाण करण्यासाठी डिझाइन केलेले आहेत जे कमोडिटीच्या पूर्व-संमत किमतीद्वारे निर्धारित रोख प्रवाहासाठी कमोडिटीच्या स्पॉट किंमतीवर आधारित आहेत. त्याचे नाव असूनही, कमोडिटी स्वॅपमध्ये वास्तविक कमोडिटीची देवाणघेवाण समाविष्ट नसते.

**४. क्रेडिट डीफॉल्ट स्वॅप:**

सीडीएस डेट इन्स्ट्रुमेंटच्या डिफॉल्टपासून विमा प्रदान करते. स्वॅपचा खरेदीदार विक्रेत्याला प्रीमियम पेमेंट हस्तांतरित करतो. मालमत्ता डीफॉल्ट झाल्यास, विक्रेता खरेदीदाराला डीफॉल्ट केलेल्या मालमत्तेच्या दर्शनी मूल्याची परतफेड करेल, तर मालमत्ता खरेदीदाराकडून विक्रेत्याकडे हस्तांतरित केली जाईल. 2008 च्या जागतिक आर्थिक संकटाच्या परिणामामुळे क्रेडिट डिफॉल्ट स्वॅप काहीसे बदनाम झाले.

## ६.४ परकीय चलन साठ्याचे घटक

ज्या प्रमाणे एखाद्या व्यक्तीला स्वतःची देणी किंवा कर्ज परतफेड करण्यासाठी स्वतःकडे राखीव उत्पन्न असावे लागते. त्याचप्रमाणे प्रत्येक देशाला त्याने केलेल्या वस्तू व सेवांच्या आयातींचे मूल्य फेडण्यासाठी कर्ज परतफेडीसाठी विदेशी चलन राखून ठेवणे आवश्यक असते. ह्या देणी देण्यासाठी प्रथम प्रत्येक देशाला वस्तू व सेवांच्या निर्यातीद्वारे परकीय चलन मिळवावे लागते. अशा प्रकारचे राखिव चलन प्रामुख्याने अमेरिकन डॉलर्स, सोने, पाऊंड, SDR या सारख्या आंतराष्ट्रीय मान्यता प्राप्त चलनांमध्ये ठेवावे लागते.

आंतराष्ट्रीय व्यापार आणि राथिव विदेशी विनिमय यामध्ये एक विशिष्ट प्रकारचा सहसंबंध दिसून येतो. ज्याप्रमाणे आंतराष्ट्रीय व्यापारात वाढ होत जाईल त्या प्रमाणात राखिव विनिमयाचे प्रमाण देखिल वाढत जाते. याउलट आंतराष्ट्रीय व्यापारातील घटीबरोबर राखिव विनिमयात देखिल घट घडून येते. ज्यावेळी राखिव विदेशी विनिमयासाठी असलेली मागणी आणि राखिव विदेशी विनिमयाचा पुरवठा समान असतो. त्यावेळी राखिव विदेशी विनिमयबाबत कोणतीच अडचण निर्माण होत नाही. परंतु ज्यावेळी राखिव विदेशी विनिमयाच्या पुरवठ्यापेक्षा मागणी अधिक असते त्यावेळी राखिव विदेशी विनिमयाचा प्रश्न निर्माण होतो.

राखिव विदेशी विनिमयाची संकल्पना ही देशाच्या आंतराष्ट्रीय अधिदान प्रणालिशी संबंधित असून ती आंतरराष्ट्रीय रोखतेचा एक भाग आहे. अनेकदा राखिव विदेशि विनिमय व आंतराष्ट्रीय रोखता या संज्ञा समानार्थी वापरल्या जातात. परंतु प्रत्यक्षात या दोन्ही संकल्पना भिन्न असून त्यामध्ये फरक आहे. 'आंतराष्ट्रीय रोखता' ही संकल्पना व्यापक असून राखिव विदेशी विनिमय ही एक संकुचित संकल्पना आहे. राखिव विदेशी विनिमय ही विविध विस्तीय मत्तांचा संच असून ती आंतराष्ट्रीय रोखतेचा एक भाग आहे. राखिव विदेशी विनिमयात पुढील घटकांचा समावेश होतो.

i) सोन्याची अधिकृत धारण क्षमता.

ii) परकीय चलन (उदा. डॉलर, पाऊंड, येन, युरो इ.)

iii) विशेष आहरण अधिकार (SDR)

iv) IMF कडील राखिव साठे इ.

## ६.५ प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक (FDI)

१९८० साली भारत सरकारने अप्रवासी भारतीय नागरिक, तेल विकास व नियीत देश व परकीय गुंतवणूकदार यांना भारतात थेट गुंतवणूकीसाठी याकृष्ट करण्यासाठी पुढील उपाययोजना केल्या.

१) नवीन कंपन्यांच्या तसेच आस्तित्वात असलेल्या कंपन्यांच्या भाग भांडवलात परकीय कंपन्यांना ४०% पर्यंत गुंतवणूक करण्याची परवानगी देण्यात आली.

२) किमान ३ वर्षे गुंतवणूक न काढण्याच्या अटीवर राहण्याची घरे, मालमत्ता यांच्यामध्ये परकीयांना १००% गुंतवणूक कमाल १६% नफा मिळण्यापर्यंत परवानगी देण्यात आली होती.

३) भारतातील जे उद्योग आजारी आहेत त्या उद्योगांचे पुर्नवसन करण्यासाठी पाच वर्षाची गुंतवणूक न काढण्याच्या अटीवर परदेशी कंपन्यांना १००% गुंतवणूक करण्याची परवानगी देण्यात आली.

४) हवाई क्षेत्रात अप्रवासी भारतीयांना १००% भागभांडवल सहकार्याची परवानगी देण्यात आली.

५) खाजगी बँकिंग क्षेत्रात परकीय गुंतवणूकीची मर्यादा ४०% पर्यंत भागभांडवल स्वरुपात गुंतवणूक करण्याकरिता परकीयांना परवानगी देण्यात आली...

६) जे उद्योग किंवा व्यापारी क्षेत्र किंवा व्यापार क्षेत्रात गुंतवलेले आहेत. अशा व्यवसायाबद्दल १००% भाग भांडवल गुंतवून भागीदारी स्वरुपात गुंतवणूक करण्याची परवानगी देण्यात आली.

### ६.५.१ क्षेत्रानुसार परकीय थेट गुंतवणूक:

खालील तक्त्यात १ ऑक्टोंबर १९११ ते ३१/५/१९९९ या कालाधीत झालेल्या गुंतवणूकीची टक्केवारी दिली आहे.

| क्षेत्र | थेट परकीय गुंतवणूक रु. |
|---|---|
| इंधन | ३१.३७% |
| टेलिफोन सेवा | १८.३३% |
| सेवा क्षेत्र (वित्तीय व अवित्तीय बँक) | |

| | |
|---|---|
| दवाखाने | ६.१२% |
| वाहतूक | ७.१३% |
| रसायने व खते | ५.८३% |
| धातू उदयोग | ५.७५% |
| अन्न प्रक्रिया व इतर उदयोग | ३१.१३% |

वरील आकडेवारी अशी दर्शविते की भारतात वीजनिर्मिती, तेल शुध्दीकरण, टेलिफोन सेवा, अन्नधान्य प्रक्रिया व इतर उद्योग यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक झालेली आहे.

### ६.५.२ थेट परकीय गुंतवणूक मिळण्याचे मार्ग:

१९९० ते २००१ या कालावधीत भारतात थेट गुंतवणूक करण्याच्या मार्गामध्ये फारसे बदल झालेले नाहीत. मॉरिशस, अमेरिका, जपान, जर्मनी या देशांमधून भारतात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक झालेली आहे. या गुंतवणूकीत संगणकाचे भाग, इंजिनिअरिंग, औद्योगिक क्षेत्र, सेवाक्षेत्र, इलेक्टॉनिक, इलेक्ट्रिकल व त्यासंबंधीत उपकरणे व तसेच रसायने, अन्न, सेवा क्षेत्र इत्यादी क्षेत्रामध्ये परकीय गुंतवणूक झालेली आहे..

### १) पोर्ट फोलिओ गुंतवणूक:

यानुसार परकीय गुंतवणूकदारांकडून भारतीय शेअर्स बाजारात व काही प्रकल्पांमध्ये भाग भांडवल स्वरुपात अल्पकालासाठी परदेशी गुंतवणूक केली जाते. १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणानुसार भारतात परकीय गुंतवणूक केली जाते. १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणामुळे भारतात परकीय गुंतवणूक वाढली. १९९६-९७ नंतर त्यात अनेक चढ-उतार झाले. पूर्व आशियातील संकटामुळे यात घट झाली. २००१ साली परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून १३.५ बिलीयन एवढी रक्कम काढून घेतली.

### २) अप्रवासी भारतीयांच्या ठेवी:

अप्रवासी भारतीयांकडून आलेल्या ठेवींमधून भारतातील आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या व्यवहार शेषातील असमतोल दूर करण्यासाठी महत्त्वपूर्ण मदत झालेली. १९८९-९० मध्ये अप्रवासी भारतीयांच्या ठेवी १.३ दशलक्ष एवढ्याच होत्या. त्या १९९०-९१ मध्ये २५० दशलक्ष इतक्या वाढल्या. वरील बदल आंतरराष्ट्रीय बाजारात भारतीय अर्थव्यवस्थेच्या चांगल्या कामगिरीमुळे निर्माण झालेल्या विश्वासाची खात्री देतो.

### संस्थात्मक परकीय गुंतवणूक:

१९९२-९३ नंतर भारतातील शेअर्स बाजारात परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून मोठ्या प्रमाणात गुंतवणूकीस सुरूवात झाली. भारताने परकीय चलन नियंत्रण कायदा १९९१ मध्ये रद्द केला (FERA) व १४ नोव्हेंबर १९९५ मध्ये परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारांपासून भारतात केल्या जाणाऱ्या गुंतवणूकीवरील निर्बंध उठवले. गुंतवणूक पध्दती, नोंदणीकरण, पात्रता, सामान्य जबाबदाऱ्या व कर्तव्य याविषयी मोठ्या प्रमाणात अनुकुल बदल केले. ते बदल पुढीलप्रमाणे

**परकीय गुंतवणूकदारांना:**

१) भारतीय कंपन्यांच्या तसेच सरकारच्च्या प्राथमिक व दुय्यम बाजारात गुंतवणूक करुन भागभांडवल, कर्जरोखे, नोंदणीकृत शेअर्स बाजारातून खरेदी करण्याची परवानगी देण्यात आली.

२) देशातील म्युच्युअल फंड, युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया (UTI) ने विक्रीस काढलेले युनिट खरेदी करण्याची परवानगी देण्यात आली.

**३) संयुक्त प्रकल्प:**

भारतातील बँका, उदयोगसंस्था, विमा कंपन्या तसेच परकीय संस्थात्मक गुंतवणूक संस्था यांना संयुक्तपणे व्यवसाय करून भारतात गुंतवणूक करण्याची परवानगी देण्यात आली.

**४) युरो इश्यू:**

भारतीय कंपन्यांद्वारे तसेच चलन परिवर्तनीय बाँड्स याद्वारे परदेशातून अमेरिकन डॉलरमध्ये भांडवल उभारण्याची परवानगी देण्यात आली. तसेच भारतीय कंपन्यांचे शेअर्स, डिबेंचर्स, जी. डी. आर यांची न्यूयॉर्क व इतर आंतरराष्ट्रीय शेअर बाजारात नोंद करण्यात आली.

पुढील तक्त्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारे परकीय गुंतवणूकदारांनी १९९२ ते १९९७-९८ या कालावधीत कशी व किती गुंतवणूक केली हे दर्शविले आहे.

| गुंतवणूकीचा प्रकार | १९९१-९२ | १९९२-९३ | १९९७-९८ |
|---|---|---|---|
| १) थेट गुंतवणूक | १५० | ३४१ | ३१९७ |
| २) पोर्टफोलिओ गुंतवणूक | ०९ | ९२ | १६०१ |
| अ) परकीय संस्था | - | ०१ | ७५२ |
| ब) युरो भाग भांडवल | - | ८६ | ६४५ |
| क) परकीय निधी व इतर | ८ | ५ | २०४ |

### ६.५.३ भारतातील थेट गुंतवणूक:

भारतातील औद्योगिक रचना, औद्योगिक धोरण व विकासाची धोरणे तसेच भारतात राजकीय बदलांबरोबर बदलणारी औदयोगिक व व्यापारी धोरणे यामुळे भारतात गुंतवणूक करताना परकीय गुंतवणूकदार खूप काळजीपूर्वक करतात.

भारतात पुढील कारणांमुळे परकीय गुंतवणूकीवर विपरित परिणाम झाला.

**१) सार्वजनिक क्षेत्राची मक्तेदारी:**

भारतात महत्त्वाच्या सार्वजनिक क्षेत्राची मक्तेदारी असल्याने या क्षेत्रात परकीय गुंतवणुकीला फारसा वाव नाही.

**२) परकीय तंत्रज्ञान:**

जेव्हा भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील उदयोगांना परकीय तंत्रज्ञान व भांडवलाची आवश्यकता असते तेव्हा बहुतेक वेळा भारत व परकीय सरकारकडून थेट गुंतवणूकीचे करार केले गेले.

**३) निवडक भांडवल धोरण:**

भारताने परकीय गुंतवणूकीसाठी निवडक धोरण स्वीकारले. त्यामुळे फक्त अपेक्षित क्षेत्रांपैकी काही क्षेत्रातच भारतात परकीय गुंतवणूक आली.

**४) मर्यादित गुंतवणूक:**

परकीय कंपन्यांना भारतात गुंतवणूक करण्यासाठी ४०% त्यानंतर ५१% व नवीन धोरणात फक्त काही क्षेत्रात ७४% गुंतवणूक करण्याची सीमा ठरवण्यात आली. त्यामुळे परकीय गुंतवणूक मर्यादित राहिली होती. ती आता वाढत आहे.

**५ ) फेरा कायदा (Foreign Exchange Regulation Act):**

१९७३ पर्यंत फेरा कायदयाने भागभांडवलावरील नफा, सहभागाचे भांडवल भारतात येणारी परकीय रक्कम या सर्वांवर फेरा कायदयाचे नियंत्रण होते. हा कायदा पुढे १९९१ मध्ये रद्द करण्यात आला.

**६) करांचे आर्थिक दर व गुंतागुंत:**

भारतात कंपन्यावरील करांचे दर अधिक आहेत व भारतातील कंपनी कायद्यामध्ये गुंतागुंत आहे. त्यामुळे परकीय कंपन्या भारतात गुंतवणूकीसाठी फार उत्साही नसतात.

**७) राजकीय धोरणातील अस्थिरता:**

भारतात प्रमुख राजकीय पक्ष उदा. भारतीय जनता पक्ष, इंदिरा कॉंग्रेस पक्ष, डावे पक्ष यांच्या परकीय गुंतवणूकविषयीच्या धेरणांमध्ये विरोधाभास आहे. त्यामुळे परकीयांमध्ये गुंतवणूकीसाठी विश्वास निर्माण होत नाही. त्यामुळे भारतात गुंतवणूक कमी होते..

## ६.६ बहुराष्ट्रीय कंपन्या

**६.६.१ प्रास्ताविक:**

आधुनिक अर्थव्यवस्थांमध्ये बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या विस्तारामुळे जागतिक व्यापार आणि अर्थव्यवस्थांचा विकास होण्यास मोठा हातभार लागला आहे. प्रसिध्द अर्थतज्ञ पिटर कर यांच्या मते, "बहुराष्ट्रीय कंपन्या आणि जागतिक व्यापारांचा विस्तार या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत." Multinational and expanding world trade are two sides of the same coinsPeher Drucker. सध्या विकसनशील देशांनी बहुराष्ट्रीय कंपन्यांना आपले प्रवेशद्वार खुले केले आहे. विदेशी सहभागाबरोबरच विदेशी भांडवल गुंतवणूक महत्त्वाची मानली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांनी प्रत्यक्ष भांडवल गुंतवणूक करुन विविध देशात

आपल्या संस्था स्थापन केल्या आहेत. बहुराष्ट्रीय कंपन्यांनी युध्दोत्तर काळात उल्लेखनीय प्रगती केली आहे. औदयोगिक क्रांती, तंत्रज्ञान क्षेत्रातील सुधारणा, वाहतूक व दळणवळण क्षेत्रात युध्दोत्तर काळात झालेली वाढ यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांना महत्त्व प्राप्त झाले आहे.

### ६.६.२ व्याख्या व अर्थ:

१) "बहुराष्ट्रीय कंपनी ही अशी व्यवसाय संस्था असते की जी एकापेक्षा अधिक देशांमध्ये कार्यरत असते."

२) बहुराष्ट्रीय कंपनीच्या व्यवस्थापनाचे मुख्यालय एका देशात (स्वदेशात) असते. परंतु अशी कंपनी इतर देशात कार्यरत असते.

### ६.६.३ आंतरराष्ट्रीय श्रम संघटना:

भारतातील १९७३ मध्ये विदेशी विनिमय नियंत्रण कायदा (FERA) करण्यात आला असून या कायदयात बहुराष्ट्रीय कंपनीची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

"बहुराष्ट्रीय कंपनी म्हणजे अशी कंपनी की जिच्या दोन किंवा अधिक देशात दुय्यम शाखा किंवा व्यापाराचे केंद्र असते आणि ती दोनपेक्षा अधिक देशात कार्यरत असते."

### ६.६.४ बहुराष्ट्रीय कंपनीची वैशिष्ट्ये:

१) बहुराष्ट्रीय कंपनीचे मुख्यालय स्वदेशात असते मात्र या कंपनीचे व्यवहार अनेक देशात सुरु असतात.

२) बहुराष्ट्रीय कंपनीच्या भांडवली संपत्तीत स्वदेशी नागरिकांचा वाटा मोठा असतो.

३) बहुराष्ट्रीय कंपनाच्या व्यवस्थापन मंडळातील बहुसंख्य सदस्य स्वदेशातील नागरिक असतात.

४) नवीन गुंतवणूकीसंबंधीचे निर्णय आणि उद्दिष्टे स्थानिक पालक कंपनीकडून ठरविली जातात.

५) बहुराष्ट्रीय कंपन्यांचे आकारमान मोठे असल्याने त्यांचाच आर्थिक व्यवहारांवर अधिक प्रभाव असतो.

६) अशा कंपन्या विकसित व विकसनशील देशातील प्रत्यक्ष गुंतवणूकीद्वारे उत्पादनावर नियंत्रण ठेवू शकतात.

७) बहुराष्ट्रीय कंपन्यांचे स्वरुप अल्पविक्रेताधिकाराचे असते. त्यामुळे उत्पादनात आधुनिक तंत्राचा वापर, व्यवस्थापनात कौशल्य, वस्तुभेद आणि जाहिरातीचा वापर ही बहुराष्ट्रीय कंपनीची वैशिष्ट्ये असतात.

८) बहुराष्ट्रीय कंपन्या विदेशी भांडवल गुंतवणूकिशिवाय निर्यात व्यापारात भाग घेऊ शकत नाहीत.

### ६.६.५ बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्गीकरण:

बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्गीकरण करण्यासाठी त्या कंपन्यांकडून केली जाणारी कार्ये, कंपनीची गुंतवणूक, उलाढाल, नियंत्रण आणि उत्पादन इत्यादी गोष्टी विचारात घेतल्या जातात. बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून केली जाणारी कार्ये विचारात घेऊन कंपन्यांचे वर्गीकरण ३ गटांत केले जाते.

**१) बहुराष्ट्रीय सेवा कंपन्या:**

ज्या कंपन्यांच्या एकूण महसुलापैकी ५०% पेक्षा अधिक महसुल पुरविलेल्या सेवांपासून प्राप्त होतो. त्या कंपन्या बहुराष्ट्रीय सेवा कंपन्या म्हणून ओळखल्या जातात. अशा कंपन्यांकडून बँकिंग सेवा, वित्त, विमा, वाहतूक, पर्यटन इ. सेवा दुसऱ्या पुरविल्या जातात. देशात

**२) बहुराष्ट्रीय उत्पादक कंपन्या:**

ज्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या एकूण महसुलापैकी ५०% पेक्षा अधिक महसुल उत्पदक कार्यापासून प्राप्त होतो. अशा कंपन्या उत्पादक कंपन्या म्हणून ओळखल्या जातात. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये उत्पादक कंपन्यांचे प्रमाण अधिक असते. उदा. कॅडबरी, चॉकलेट, कोलगेट, पामोलिव्ह, सोप, पॉड्स, डनलॉप, विविध प्रकारच्या पावडरी इत्यादींचा उत्पादक कंपन्यांमध्ये नावलौकिक आहे.

**३) बहुराष्ट्रीय व्यापारी कंपन्या:**

बहुराष्ट्रीय व्यापार कंपन्या म्हणजे अशा कंपन्या की ज्यांच्या एकूण महसूलापैकी ५०% अधिक महसूल व्यापारापासून प्राप्त होतो. हा बहुराष्ट्रीय कंपन्यांचा जुना प्रकार आहे. जागतिक निर्यातीपैकी ६०% पेक्षा अधिक वाटा बहुराष्ट्रीय कंपन्यांचा आहे. उदा. टाट, लिप्टन, हिंदूजा, ब्रेक बाँड.

### ६.६.६ विकसनशील देशात बहुराष्ट्रीय कंपन्यांची भूमिका:

जागतिक अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकाससामर्थ्य बहुराष्ट्रीय कंपन्यांनी महत्वाची भूमिका पार पाडली आहे.

१) बहुराष्ट्रीय कंपन्यांमुळे विकसनशील देशातील भांडवल गुंतवणूक, उत्पन्न आणि रोजगार पातळी वढण्यास मदत झाली आहे.

२) बहुराष्ट्रीय कंपन्या विकसनशील देशात व्यावसायिक व्यवस्थापनाला उत्तेजन देतात..

३) विकसनशील देशाच्या निर्यात वाढीला चालना देण्यासाठी बहुराष्ट्रीय कंपन्या मदत करतात.

४) बहुराष्ट्रीय कंपन्यांनी काही वस्तूंचे उत्पादन हाती घेतल्याने विकसनशील देशाचे आयातीसाठी दुसऱ्या देशावरील अवलंब कमी होते.

५) बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या व्यापक कार्यक्षेत्रामुळे जागतिक उत्पादन खर्चातील तफावत कमी होण्यास मदत झाली आहे.

६) बहुराष्ट्रीय कंपन्यांमुळे आर्थिक विकासाला चालना मिळून देशाचे औद्योगिकरणाची गती वाढण्यास मदत झाली आहे.

७) बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या प्रवेशामुळे विकसनशील देशात व्यवसाय पर्यावरणावर अनुकूल परिणाम होत आहे.

८) बहुराष्ट्रीय कंपन्या विकसनशील देशात आधुनिकीकरण व जलद आर्थिक विकास यांचे माध्यम ठरल्या आहेत..

९) बहुराष्ट्रीय कंपन्यांमुळे नवीन दृष्टिकोन आणि सांस्कृतिक देवाण-घेवाण वाढण्यास मदत झाली आहे.

१०) बहुराष्ट्रीय कंपन्यांमुळे विकसनशील देशांच्या व्यवहारतोलास प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

थोडक्यात बहुराष्ट्रीय कंपन्या महत्तम नफा मिळवण्यासाठी जागतिक अर्थव्यवस्थेतील सर्व प्रकारच्या साधनसंपत्तीचा वापर करण्याचा प्रयत्न करतात. जागतिकीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यावर त्यांचा अधिक भर असतो.

### ६.६.७ बहुराष्ट्रीय कंपन्या आणि भारत:

भारत हा एक विकसनशील देश असल्याने सरकारने विदेशी भांडवल गुंतवणूकीसाठी जे धोरण स्वीकारले आहे. तसेच धोरण बहुराष्ट्रीय कंपन्यांबाबत देखील स्वीकारले आहे. जर्मनी, जपान आणि अमेरिकेच्या आर्थिक विकासात बहुराष्ट्रीय कंपन्यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. सध्या या कंपन्या भारत आणि चीनची बाजारपेठ काबीज करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. भारतासारख्या विकसनशील देशाने आर्थिक विकसाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी बहुराष्ट्रीय कंपन्यांना आपले द्वार खुले केले आहे.

स्वातंत्र्यानंतरच्या प्रारंभीच्या काळात बहुराष्ट्रीय कंपन्यांनी केवळ लोखंड पोलाद - प्रकल्पात गुंतवणूक केली होती. परंतु अलीकडच्या काळात त्यांनी पेट्रोलिअमचे शुध्दीकरण, रसायने, औषध निर्मिती, अवजड यंत्रसामग्रीची निर्मिती, पोलाद, काचा आणि इतर उदयोगात आपला सहभाग वाढविला आहे. सध्या बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेत आपले स्थान अधिकच बळकट केले आहे. मागील दोन दशकात या कंपन्यांनी औदयोगिक क्षेत्रापैकी ५३.७% क्षेत्र नियंत्रणाखाली आणले आहे.

या बहुराष्ट्रीय कंपन्यांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य असे की या व्यवसायासाठी लागणारे भांडवल भारतातूनच जमा करतात.

१९८० नंतर भारत सरकारने उदारिकरणाचे धोरण स्वीकारल्यामुळे विदेशी भांडवल गुंतवणूकीला महत्त्व प्राप्त झाले आहे. भारतीय कंपन्यांशी करार करुन विदेशी गुंतवणूकीत वाढ केली आहे. नवीन आर्थिक धोरणामुळे विदेशी सहभाग वाढला आहे. १९४८ ते

१९८८ या ४० वर्षांच्या काळात विदेशी सहभागासंबंधी चे १२,७६० करार झाले. त्यापैकी ६.१६५ करार १९८० ते १९८८ या ८ वर्षांच्या कालावधीत झालेले आहेत.

अलीकडच्या काळात बहुराष्ट्रीय कंपन्यांनी विकसनशील देशात वाढत्या दराने गुंतवणूक केल्याचे दिसून येते. या कंपन्यांना एकूण विदेशी व्यापारातील वाटा वाढत आहे. या कंपन्या आपल्या उत्पादनाची विक्री वाढावी म्हणून आकर्षक स्वरुपाची जाहिरात करतात तसेच त्यांचा जागतिक बाजारपेठेतील नावलौकिक वाढल्याने एकूण व्यवहारात त्यांचे प्रभुत्व वाढत गेले. आहे. भारतीय कंपन्यांपेक्षा बहुराष्ट्रीय कंपन्यांची आर्थिक स्थिती मजबूत आहे. आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त झालेला असल्याने बहुराष्ट्रीय कंपन्यांना आंतरराष्ट्रीय वित्त संस्थांकडून सहजपणे निधी जमा करता येतो.

तसेच या कंपन्या उत्पादनात अत्याधुनिक उत्पादन तंत्राचा वापर असल्याने उत्पादनाचा दर्जा उच्च प्रतिचा असतो व उत्पादन खर्च कमी असल्याने उत्पादनाची विक्री सहजपणे करता येते. या कंपन्या सतत उत्पादनविषयक संशोधन करीत असल्याने उत्पादनाचा दर्जा उंचावण्यास मदत होते. या सर्व कारणांमुळे भारतात बहुराष्ट्रीय कंपन्यांचा विस्तार होण्यास मदत झाली आहे. १९९१ नंतर भारत सरकारने विदेशी भांडवल गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी विशेष प्रयत्न केल्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांचा अर्थव्यवस्थेतील प्रवेश सुलभ झाला आहे.

**त्याची कारणे पुढीलप्रमाणे:**

१) औद्योगिक परवाना पध्दती रद्द करण्यात आली आहे.

२) मक्तेदारी नियंत्रण कायदयाचे गुंतवणूकीसंबंधीचे निर्बंध उठविण्यात आले.

३) तंत्रज्ञान, भांडवली वस्तू आयातीच्या संदर्भीतल धोरण आणि पध्दतीमध्ये शिथिलता आणण्यात आली आहे.

४) अस्तित्वातील कंपन्यांना विदेशी भांडवल गुंतवणूक ५१% पर्यंत वाढविण्यास संमती देण्यात आली आहे.

५) विदेशी विनिमय नियंत्रण कायदयातील तरतूदी रद्द करण्यात आल्या आहेत. त्यामुळे एखाद्या कंपनीतील विदेशी गुंतवणूकीचे प्रमाण जरी ४०% पेक्षा अधिक असले तरी ती कंपनी भारतीय कंपनीप्रमाणे कार्यरत राहू शकते.

६) विदेशी कंपन्यांना त्यांच्या देशाचा ट्रेडमार्क (व्यापारी बोध चिन्ह) स्वदेशी बाजारपेठेत संमती देण्यात आली आहे.

१९९० च्या दशकात भारतातील विदेशी भांडवल गुंतवणूक वाढत गेल्याचे दिसून येते. भारत सरकारने १९९० मध्ये ६६६ विदेशी सहभागांना संमती दिली आहे. त्यात १९९२ मध्ये दुपटीने वाढ झाली होती. सध्या भारतातील गुंतवणूकीमध्ये अमेरिकेचा वाटा असून स्वीत्झलँड, जपान आणि इंग्लंडकडून देखील गुंतवणूक मोठ्या प्रमाणात होत आहे. विदेशी गुंतवणूकीपैकी अधिकाधिक गुंतवणूक तेलशुध्दीकरण केंद्र, वीज निर्मिती, रसायने आणि विद्युत उपकरणांची निर्मिती करणाऱ्या उदयोग क्षेत्रात झालेली आहे.

### ६.६.८ बहुराष्ट्रीय कंपन्यांचे दोष:

बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये पुढील प्रकारचे दोष असल्याची टीका केली आहे.

**१) अधिकतम नफा मिळवण्यावर भर:**

विकसनशील देशातील साधनसंपत्तीचा जास्तीत जास्त वापर करुन महत्तम नफा मिळविणे हे बहुराष्ट्रीय कंपन्यांचे प्रमुख उद्दिष्टे असते. त्यामुळे त्यांचे आर्थिक विकास व उत्पन्न वितरणात समानता आणण्यास दुय्यम स्थान आहे.

**२) दुर्मिळ विदेशी चलनाच्या साठ्यावर ताण:**

विकसीत देशातील बहुराष्ट्रीय कंपन्या स्वदेशाच्या लाभासाठी विकसनशील देशात मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतवणूक करतात. त्यामुळे विदेशी कंपनी रॉयल्टी नफा, शुल्क, लाभांशाच्या स्वरुपात विदेशी चलन आपल्या देशात पाठवितात. त्यांनी केलेल्या प्रारंभिक भांडवल गुंतवणूकीपेक्षा किती तरी अधिक प्रमाणात ते आपल्या देशातील संपत्ती स्वदेशात पाठवितात.

**३) रोजगार निर्मितीची कमी क्षमता:**

बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून विशेषतः भांडवलीप्रधान उत्पादन क्षेत्रात गुंतवणूक केली जाते. या तंत्रामध्ये श्रमाचा कमीत कमी वापर होत असल्याने रोजगार निर्मितीची क्षमता कमी असते. तसेच बहुराष्ट्रीय कंपन्या आपल्या उदयोगांत उच्च दर्जाचे तंत्रज्ञान आणि व्यवस्थापनामध्ये स्थानिक लोकांना फारशी संधी देत नाहीत.

**४) देशाच्या सार्वभौमत्वात हस्तक्षेप:**

बहुराष्ट्रीय कंपन्या सरकारचे आर्थिक धोरण ठरविण्यात आणि आंतरराष्ट्रीय आर्थिक राजकीय संबंधात हस्तक्षेप करतात. तसेच अशा कंपन्या राजकीय डावपेच आखून आपल्याला फायदेशीर ठरेल अशा विचाराच्या पक्षाला सत्तेवर आणण्याचा प्रयत्न करतात. बहुराष्ट्रीय कंपन्या देशात राजकीय हस्तक्षेप करुन सार्वभौमत्वास बाधा पोहोचवतात.

**५) सास्कृतिक हस्तक्षेप:**

बहुराष्ट्रीय कंपन्या जाहिरात मार्गाचा अवलंब करुन देशाच्या सांस्कृतिक विचारधारेत हस्तक्षेप करतात. त्यामुळे विकसनशील देशांची एक संस्कृती नष्ट होते. अशा कंपन्या जाहिरातीवर प्रचंड पैसा खर्च करुन ग्राहकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करतात. अशा जाहिरातीमुळे वस्तूंच्या किंमती वाढतात. मागणीत बदल होतो. साधनसंपत्तीचा जाहिरातीसाठी उपयोग केला जातो.

**६) महत्तम नफा मिळवण्याची प्रवृत्ती:**

बहुराष्ट्रीय कंपन्या उत्पादन खर्च कमीत कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात - उत्पादन करतात. देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील अपूर्णतेचा फायदा घेऊन जास्तीत •

जास्त नफा मिळविण्याचा प्रयत्न करतात. अशा कंपन्या ग्राहकांकडून - अधिक किंमत वसूल करून व पिळवणूक करुन महत्तम नफा मुळवतात.

**७) व्यवहारतोलावर प्रतिकूल परिणाम:**

बहुराष्ट्रीय कंपन्यांमुळे देशाच्या व्यवहारतोलावर प्रतिकूल परिणाम होतो. कारण अशा कंपन्या मिळालेला नफा स्वदेशी पाठवित असल्याने विदेशी चलनाच्या साठ्यावर ताण पडतो आणि देशाचा व्यवहारतोल प्रतिकूल बनतो.

**८) मक्तेदारीत वाढ:**

बहुराष्ट्रीय कंपन्या विकसनशील देशातील स्थानिक कंपन्यांशी अनिष्ट स्वरुपाची स्पर्धा करुन त्यांचे अस्तित्व संपुष्टात आणतात आणि त्या विशिष्ट वस्तूंच्या उत्पादनामध्ये स्वतःची मक्तेदारी निर्माण करतात. एकदा मक्तेदारी निर्माण झाली की जास्तीत जास्त नफा मिळविण्यासाठी ग्राहकांची पिळवणूक केली जाते.

**९) कर चुकविण्याची प्रवृत्ती:**

बहुराष्ट्रीय कंपन्या विविध प्रकारचे कर चुकविण्यासाठी विविध मार्गांचा अवलंब करतात.

**१०) आर्थिक धोक्याची भीती:**

बहुराष्ट्रीय कंपन्या विकसनशील देशावर आपले वर्चस्व निर्माण करुन व आर्थिक नाकेबंदी करुन विकसनशील देशांकडून व्यापारशर्ती आपल्यासाठी सतत अनुकूल कशी राहतील यासाठी दबाव आणतात. तसेच सरकारने अशा कंपन्यांना त्रास देण्याचे ठरविल्यास देशातून भांडवल काढून घेण्याची धमकी देतात.

**आपली प्रगती तपासा:**

प्र.१ बहुराष्ट्रीय कंपन्या यांचे गुणदोष सांगा ?

## ६.७ प्रश्न

१) व्यवस्थापित लवचिकता ही संकल्पना आकृतीच्या आधारे स्पष्ट करा.

२) स्वॅप मार्केटवर विस्तृत टिप लिहा.

३) परकीय चलन साठ्याचे घटक विशद करा. .

४) प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक (FDI) यावर टिप लिहा.

५) बहुराष्ट्रीय कंपन्याचे गुण व दोष विशद करा.

*****

# ७

# आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्था

**घटक रचना**

७.० उद्दिष्टे

७.१ प्रस्तावना

७.२ आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF)

७.३ जागतिक बँक

७.३.१ जागतिक बँकेची भूमिका

७.३.२ जागतिक बँकेची कार्ये

७.४ जागतिक व्यापार संघटना (WTO)

७.४.१ जागतिक व्यापार संघटनेची (WTO) उद्दिष्टे

७.४.२ जागतिक व्यापार संघटनेची (WTO) कार्ये

७.४.३ जागतिक व्यापार संघटनेचे (WTO) करार

७.४.३.१ TRIPS

७.४.३.२ TRIMS

७.४.३.३ GATS

७.४.३.४ AoA

७.५ सारांश

७.६ प्रश्न

## ७.० उद्दिष्टे

- आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची भूमिका व कार्ये समजून घेणे.
- जागतिक बँकेची भूमिका व कार्ये अभ्यासणे.
- जागतिक व्यापार संघटनेची उद्दिष्ट्ये, कार्ये व करार यांचा आढावा घेणे.

## ७.१ प्रस्तावना

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची स्थापना १९४६ मध्ये करण्यात आली असून, नाणेनिधीची प्रत्यक्ष कार्यवाही १९४७ पासून सुरु झाली आहे. विनिमयदरात स्थैर्य प्रस्थापित करणे. आंतरराष्ट्रीय व्यापारात घडवून आणणे हा नाणेनिधीच्या स्थापनेचा प्रमुख उद्देश आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आंतरराष्ट्रीय रोखतेची समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करते. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत परकीय भांडवलाची भूमिका किंवा महत्व याला विशेष महत्व

आहे. भारतामध्ये भांडवलबाजार अविकसित असल्यामुळे परकीय भांडवलाचा विविध प्रकारे ओघ वाढत आहे.

## ७.२ आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF)

### ७.२.१ प्रस्तावना:

दुसऱ्या महायुध्दानंतर सुवर्णचलन पध्दती संपुष्टात येवून कागदी चलनपध्दती अस्तित्वात आल्यामुळे भिन्न देशातील चलनाचा विनिमय दर ठरविणे आणि तो स्थिर ठेवण्यासाठी स्वतंत्र अशा संस्थेची स्थापना करणे आवश्यक वाटू लागले. जुलै, १९४४ मध्ये अमेरिकेतील 'ब्रेटनवूड' येथे भरलेल्या जागतिक अर्थतज्ञ आणि मुत्सदी यांच्या परिषदेत झालेल्या चर्चेतून आंतरराष्ट्रीय पातळीवर दोन वित्तीय संस्थाची स्थापना करण्यात आली त्यापैकी :

१. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (International Monetory Fund)

२. आंतरराष्ट्रीय पूनर्रचना व विकास बँक / जागतिक बँक (International Bank for Reconstruction & Development - IBRD).

या दोन संस्था आहेत. या दोन्ही संस्था संयुक्त राष्ट्रसंघाच्या दुय्यम संस्था म्हणून कार्य करीत आहेत. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची स्थापना १९४६ मध्ये करण्यात आली असून तिच्या प्रत्यक्ष कार्यवाहीस १९४७ मध्ये सुरुवात झाली आंतरराष्ट्रीय नाणेनिधी ही आंतरराष्ट्रीय चलनविषयक संस्था असून जागतिक व्यापाराचा विस्तार आणि संतुलित वृध्दी घडवून आणण्याच्या दृष्टीने स्थापन केलेली वित्तीय संस्था आहे. १९९६ मध्ये १८१ सभासद आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमध्ये सहभागी होते.

### ७.२.२ आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची उद्दिष्ट्ये (Objectives of IMF):

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या स्थापनेची मूलभूत उद्दिष्ट्ये म्हणजे चलनाचे स्पर्धात्मक अवमूल्यन टाळणे आणि विनिमय नियंत्रण करणे, व्यवहारतोलातील तुट कमी करणे तसेच देशांतर्गत उत्पन्न आणि रोजगारपातळीत वाढ करणे ही होती. नाणेनिधीच्या स्थापनेची पुढील तीन महत्त्वाची उद्दिष्ट्ये सांगितली जातात.

१. प्रचलित विनिमय नियंत्रणे कमी करणे.

२. विनिमय दर स्थिर राखण्यासाठी प्रयत्न करणे.

३. बहुपक्षीय व्यापारात वाढ करणे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या तिसऱ्या कलमामध्ये पुढील काही उद्दिष्टांचा समावेश आहे.

४. सभासद देशामध्ये चलनविषयक सहकार्य वाढीस लावणे आणि चलनविषयक समस्या सोडविण्यसाठी परस्पर सहकार्य निर्माण करणे.

५. आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ घडवून आणणे.

६. विनिमय दरात स्थैर्य प्रस्थापित करणे,

७. सभासद देशांचा व्यवहारतोल सुधारण्यासाठी सहकार्य करणे.

९. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विस्तार घडवून आणण्यासाठी व्यापारावरील संस्थात्मक नियंत्रणे (आयात जकाती, परवाना, कोटा इत्यादी) कमी करणे.

१०. व्यापारावरील निर्बंध कमी करुन सभासद देशांच्या आर्थिक विकासाला हातभार लावणे

११. सभासद देशात चलनप्रणाली विकसित करून देशाच्या व्यापारात वाढ घडवून आणणे.

### ७.२.३ आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) ची कार्ये / भूमिका:

#### १. आंतरराष्ट्रीय चलन विषयक सहकार्य:

विविध देशांमध्ये चलनविषयक सहकार्य प्रस्थापित करणे हे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे महत्वाचे कार्य आहे. जगातील देशात चलनविषयक सहकार्याचा अभाव असल्यामुळे दुसरे महायुध्द घडून आले. भविष्यात युध्द टाळण्यासाठी आंतरराष्ट्रीय चलनविषयक सहकार्य वाढविण्याच्या दृष्टीने नाणेनिधीची प्रमुख भूमिका आहे. तसेच सभासद राष्ट्रांमधील व्यवहारतोलातील समतोल राखण्यासाठी (व्यवहारतोलातील तुट भरुन काढण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी अल्पकालीन कर्जपुरवठा करते. कर्जपुरवठ्याचे प्रमाण देशाच्या स्वदेशी चलनाच्या साठ्यावर अवलंबून असते

#### २. विनिमय दर स्थिर राखणे :

विनिमयात स्थैर्य हे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे प्रमुख उद्दिष्ट्य होते. १९७१ पासून नाणेनिधीने स्थिर विनिमयदराऐवजी लवचिक विनिमय दर धोरणाचा स्विकार केल्यामुळे प्रत्येक देशाने आपल्या चलनाचे मूल्य सुवर्ण किंवा अमेरिकन डॉलरमध्ये ठरविले पाहिजे. आणि ते स्थिर ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

#### ३. तांत्रिक व आर्थिक मार्गदर्शन :

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आपल्या सदस्य देशांना तांत्रिक व आर्थिक सल्ला देण्याचे कार्य करते, असा सल्ला विशेषतः चलनविषयक व वित्तीय धोरण ठरविण्याच्या दृष्टीने महत्वाचा असतो. ज्या देशांना व्यवहारतोल तुटीची समस्या असते, अशा देशांना आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे तांत्रिक व आर्थिक मार्गदर्शन उपयोगी ठरते.

#### ४. विदेशी चलनाचा साठा सांभाळणे :

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे सदस्य राष्ट्रांकडून कोटा मध्यवर्ती बँक व सरकारकडून घेतलेला हप्ता कर्जाच्या स्वरुपात विदेशी चलन जमा होत असते. अशा विदेशी चलनाचा सांभाळ करणे आणि त्या चलनाची सभासद राष्ट्रांमध्ये खरेदी-विक्री करणे हे नाणेनिधीचे महत्वाचे कार्य मानले जाते.

### ५. व्यवहार तोलातील असमोल कमी करणे :

सभासद देशांच्या व्यवहारतोलात तूट असल्यास ती तूट भरून काढण्यासाठी नाणेनिधी त्या देशांना विदेशी चलनाच्या स्वरुपात कर्ज देते. (तात्पुरता व्यवहारतोल असमतोल असेल तर) मात्र चलनाच्या अवमूल्यन धोरणामुळे व्यवहातोल असमतोल असेल तर नाणेनिधीकडून आर्थिक मदत केली जात नाही.

### ६. विनिमय नियंत्रणे दूर करणे :

दुसऱ्या महायुध्दापूर्वी जवळपास प्रत्येक देशाने आपला विनिमय दर विशिष्ट पातळीत राखण्यासाठी विनिमय नियंत्रणाचा अवलंब केला होता. त्याचा आंतरराष्ट्रीय व्यापारावर प्रतिकूल परिणाम आलेला होता. त्यामुळे अशी विनिमय नियंत्रणे दूर करणे हे नाणेनिधीचे महत्वाचे कार्य मानले जाते.

वरिल महत्वाच्या कार्याव्यतीरिक्त आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आंतरराष्ट्रीय व्यापारास प्रोत्साहन, खुल्या अर्थव्यवस्थेला चालना बहुपक्षीय व्यापार व्यवस्था स्थापन करणे इत्यादी महत्वाची कार्येही पार पाडीत असते.

## ७.२.४ आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे यशापयश ( Achivements and Limitations of IMF):

### अ) IMF चे यशः

### १. विनिमय दरात स्थैर्य

विनिमय दरात स्थैर्य हे नाणे निधीचे मूलभूत उद्दिष्ट होते. विनिमयदरातील स्पर्धात्मक घसरण थांबविण्यासाठी सभासद देशांवर चलनविषयक बंधने टाकल्यामुळे नाणेनिधीला काही प्रमाणात यश मिळाले आहे. तथापि, व्यवहारतोलातील मुलभूत असमतोल दूर करण्यासाठी विनिमय दरात बदल करण्यास नाणेनिधीने परवानगी दिलेली आहे.

### २. व्यवहारतोलातील असंतुलनात सुधारणा:

नाणेनिधी स्थापनेपूर्वी व्यवहारतोलात समतोल राखण्यासाठी व्यापारावरील संस्थात्मक निर्बंध व विनिमय नियंत्रण साधनांचा वापर करण्यात येत असे. मात्र नाणेनिधीच्या स्थापनेनंतर नाणेनिधी व्यवहारतोलातील असमतोल दूर करण्यासाठी अल्पकालीन कर्जाची सुविधा निर्यात केली आहे. साहजीकच त्यामुळे नाणेनिधीला सभासद देशातील व्यवहारतोलातील असमतोल दूर करण्यात यश मिळाले आहे.

### ३. व्यापाराचा विस्तार :

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विस्तार घडवून आणण्यात महत्वाची भूमिका पार पाडली आहे. अल्पकालीन कर्जसुविधा, व्यवहारतोलातील तूट दूर करण्यास मदत विदेशी चलनाचा पुरवठा इत्यादीमुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विस्तार होण्यास मदत झाली आहे.

**४. तांत्रिक सल्ला व मार्गदर्शन :**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी ही तांत्रिक व व्यावसायिक मार्गदर्शन करणारी संस्था म्हणून कार्य करते. सभासद देशांचे वित्तीय धोरण व त्यांचा व्यवहारतोलावर होणारा परिणाम याविषयी नाणेनिधी मार्गदर्शन करते.

**५. बहुविध विनिमय दर :**

अलिकडच्या काळात नाणेनिधीने बहुविध विनिमय दर पध्दतीत सुलभता आणण्यास बरेच यश प्राप्त केले आहे त्यामुळे सभासद देशांना आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून वित्तीय मदत झालेली आहे.

**६. आंतरराष्ट्रीय रोखता :**

१९६७ पर्यंत अनेक सदस्य देशांपुढे रोखतेची समस्या निर्माण झाली होती. ही रोखतेची समस्या सोडविण्यासाठी नाणेनिधीने विशेष आहरण (उचल) अधिकार (Special Drawing Rights SDR) ही एक नविन व्यवस्था निर्माण केली आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय रोखतेची समस्या सोडवण्यास बऱ्याच प्रमाणात मदत झाली आहे.

**७. आर्थिक विकासाला मदत :**

नाणेनिधीच्या तज्ञ अधिकाऱ्यांमार्फत सभासद देशांना तांत्रिक व आर्थिक मार्गदर्शन करणे, देशाच्या व्यवहारतोलनीक असमतोल दूर करण्यासाठी अल्पकालीन कर्जसुविधा देणे, चलन व्यवस्थेत स्थैर्य प्राप्त करण्यास सहकार्य करणे इत्यादी अशा महत्वाच्या भूमिकांचा/कार्याचा अनुकूल परिणाम सभासद देशांच्या आर्थिक विकासावर झालेला दिसून येत आहे.

**ब) IMF चे अपयश :**

आंतरराष्ट्रीय पातळीवर चलनविषयक संस्था म्हणून नाणेनिधीने महत्वाची भूमिका पार पाडली आहे. रोखतेची समस्या सोडविण्यासाठी विशेष उचल अधिकार (SDR) ही नविन व्यवस्था निर्माण केली आहे. नाणेनिधीने उल्लेखनीय कामगिरी केली असली तरी नाणेनिधीच्या कार्यात अनेक दोष/उणिवा किंवा मर्यादा दिसून येतात. नाणेनिधीचे अपयश किंवा उणिवा पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१. मर्यादीत क्षेत्र :**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी सभासद देशांना व्यवहारतोलातील तात्पुरता असमतोल दूर करण्यासाठी अल्पकालीन कर्जाची सुविधा उपलब्ध करून देते. मात्र जुने कर्ज, युध्दखर्च अशा इतर समस्या नाणेनिधीकडून सोडविण्यात सहकार्य मिळत नाही.

**२. अधिक व्याजदर :**

नाणेनिधीकडून सभासद देशांना जो कर्जपुरवठा केला जातो त्यावर व्याजदर अधिक असल्यामुळे अविकसित व विकासनशील राष्ट्रांचे नुकसान होते.

**३. अमेरिकेचा वाढता प्रभावः**

अमेरिका, इंग्लंड, प. जर्मनी, फ्रान्स व जपान या विकसित देशांचा नाणेनिधींवर अधिक प्रभाव दिसून येतो. मात्र विकसनशील किंवा मागास देशांना नाणेनिधीकडून पुरेसा फायदा होत नाही.

**४. कोटा ठरविण्याची सदोष पध्दती:**

नाणेनिधीच्या सभासद देशांचा कोटा ठरविण्याच्या पध्दतीस कोणताही शास्त्रीय आधार नाही. कोटा ठरविताना देशाचा सुवर्णसाठा, डॉलरचा साठा व व्यापाराची स्थिती या गोष्टींना महत्त्व देण्यात आले. साहजीकच त्यामुळे अमेरिका, फ्रान्स, जर्मनी व जपानसारख्या विकसित देशांचे कोटा पध्दतीत वर्चस्व राहिले.

**५. विनिमय नियंत्रणे कमी करण्यात अपयश:**

आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ घडवून आणण्यासाठी नाणेनिधीने आयत- निर्यात, जकात, निर्यात प्रोत्साहन परवानापध्दती (विनिमय नियंत्रण साधने) नष्ट करण्यावर भर दिला होता, परंतु नाणेनिधीला त्यामध्ये फारसे यश प्राप्त झाले नाही.

**६. दुय्यम भूमिका**

जगातील दहा (१०) उद्योगप्रधान देशाच्या मध्यवर्तीबँकेने (Central Bank) दीर्घकालीन कर्जपुरवठा करण्याचे धोरण स्विकारले असल्यामुळे आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्थेत मध्यवर्ती बँकांची प्रमुख भूमिका तर नाणेनिधी अल्पकालीन कर्जाचा पतपुरवठा करत असल्यामुळे नाणेनिधीला दुय्यम भूमिका स्विकारावी लागत आहे. या नविन धोरणामुळेच जागतिक अर्थव्यवस्थेत डॉलरचे महत्व घटत आहे तर युरोडॉलरचे महत्व वाढत आहे.

**७. आर्थिक विकासास हातभार :**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे एक प्रमुख अपयश म्हणजे नाणेनिधीला चलनपध्दतीत स्थैर्य प्रस्थापित करण्यात आलेले अपयश होय.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कार्यपध्दतीत वरील उणिवा (अपयश ) असल्या तरीही नाणेनिधीमुळे चलनविषयक सहकार्य निर्माण होण्यास मदत झाली आहे.

**आपली प्रगती तपासा**

प्र. १ आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची उद्दिष्ट्ये व कार्ये अभ्यासा.

प्र. २ आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे यशापयश थोडक्यात सांगा.

## ७.३ जागतिक बँक

विकसनशील देशांना आर्थिक मदत देऊन त्यांचा विकास घडवून आणण्यासाठी जगातील १४८ देशांनी स्थापन केलेली बँक म्हणजे जागतिक बँक (world bank) किंवा विश्व बँक होय. या जागतिक बँकेलाच आंतरराष्ट्रीय पूर्नरचना आणि विकास बँक (International

Bank for Reconstruction & Development - IBRD ) असेही म्हणतात. या बँकेचे कार्यालय वाशिंग्टन येथे आहे. या बँकेमार्फत अविकसित व तिसऱ्या जगातील देशांना विकासनिधी (Development Funds) दिला जातो. त्यामध्ये कर्जरुपाने व तांत्रिक सहकार्य दिले जाते. आंतरराष्ट्रीय राजकारणात आर्थिक धोरणांना महत्व आहे. त्यामुळे विकसित देश अविकसित देशांवर आपला प्रभाव टाकण्यासाठी विश्वबँकेचा (World Bank) चा अवलंब करतात. तसेच कर्जे देताना विविध अटी त्यांच्यावर लादल्या जातात.

जागतिक बँक अंतर्गत पुढील आंतरराष्ट्रीय संस्थांचा समावेश केला जातो.

१. आंतरराष्ट्रीय पुर्नरचना आणि विकास बँक (IBRD)

२. आंतरराष्ट्रीय विकास संघटना (International Development Association - IDA)

३. आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळ (International Financial Corporation (IFC)

४. बहुपार्श्विक गुंतवणूक हमी संस्था (MIGA)

५. गुंतवणूक वाद निवारण आंतरराष्ट्रीय केंद्र ( ICSID)

जागतिक बँकेची संज्ञा म्हणून आंतरराष्ट्रीय पूनर्रचना आणि बँक (IBRD) आणि आंतरराष्ट्रीय विकास संघटना (IDA) म्हणून केला जातो. आज जागतिक बँकेचे १८५ इतके सदस्य आहेत.

### ७.३.१ जागतिक बँकेची भूमिका (Role of World Bank) :

जागतिक बँकेच्या स्थापनेचा मुख्य उद्देश्य म्हणजे अविकसित देशांचा आर्थिक विकास घडवून आणण्यास मदत करणे, दारिद्रय कमी करणे, गुंतवणूकीद्वारे आर्थिक वृध्दीस उत्तेजन देणे हा आहे. जागतिक बँकेची एक विकास संस्था म्हणून पुढील भूमिका महत्वाची आहे.

### १. आर्थिक व सामाजिक विकास (Economic & Social Development) :

जागतिक बँक एक वित्तीय स्त्रोत म्हणून अत्यंत उपयोगी आहे. अविकसित देशातील शाश्वत व समान वृध्दी घडवून आणण्याच्या दृष्टीने दारिद्रयाची समस्या कमी करण्यासाठी आणि राहणीमान दर्जा उंचावण्यासाठी जागतिक बँक महत्वपूर्ण भूमिका पार पाडत आहे.

अविकसित देशांना नेहमीच भांडवलाची समस्या भेडसावत असते म्हणून जागतिक बँक परकीय गुंतवणूकीला उत्तेजन देण्यासाठी प्रयत्नशील आहे. अविकसीत किंवा विकासनशील देशामध्ये मुलभूत आणि पायाभूत सुविधांचा विकास घडवून आणण्यासाठी सर्वतोपरी मदत किंवा सहकार्य करते म्हणूनच अविकसित देशांचा आर्थिक व सामाजिक विकास घडवून आणण्यात जागतिक बँकेची भूमिका महत्वाची आहे.

**२. दारिद्रयाची समस्या कमी करण्यासाठी प्रयत्न (Poverty Reduction) :**

बहुतेक सर्वच अविकसित व विकसनशील देशांना आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दारिद्रय या जुनाट समस्येला तोंड द्यावे लागत आहे. जागतिक बँक अविकसित देशातील दारिद्रयाची समस्या सोडविण्यासाठी महत्वाच्या आधार सुविधा देत असते. अशा देशातील निम्न व मध्यम वर्गीय लोकांचे उत्पन्न वाढवण्यासाठी भांडवल पुरविते. चिरतंन आर्थिक विकासासाठी आर्थिक, सामाजिक, वित्त, मौद्रिक आणि राजकोशिय धोरणांसाठी भांडवलाची सोय उपलब्ध करून देते. अविकसित देशातील दारिद्रय निवारण हे जागतिक बँकेचे एक प्रमुख उद्दिष्ट्य आहे.

**३. कर्जमुक्तीय पाठिंबा (Supports debt Relief) :**

१९८० पासून आंतरराष्ट्रीय कर्जाची समस्या सोडविण्यासाठी एक उपाय म्हणून जागतिक बँक कर्जमुक्तीसाठी लक्ष केंद्रित करून समर्थपणे पाठिंबा देत आहे. जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (IMF) अवजड उपकारबध्द गरिब देश (Heavily Indebted Poor Countries) (HIPC) प्रारंभीपासूनच सुरू केले आहे. २००२-२०२६ या दरम्यान कर्जदार देशांना बर्हिर्गत कर्जसमस्येपासून मुक्तता (relief) मिळेल. अशी अपेक्षा एच. आय. पी. सी. (HIPC) ची आहे.

**४. सुखी-समृध्व विकासाचे ध्येय मिळवणे (Achievements of Millenium Development Goal's - MDG's) :**

आज जागतिक बँक सुखी-समृध्द विकास या उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित करत आहे. १८९ राष्ट्रांनी या ध्येयाकरीता स्वाक्षरी केल्या आहेत. यामध्ये सामान्यपणे प्रमुख आठ (८) ध्येयांचा किंवा उद्दिष्टांचा समावेश आहे.

१. दारिद्रय निवारण

२. वैश्विक प्राथमिक शिक्षण

३. समानता आणि महिला सक्षमीकरण (Women Empowerment )

४. बाल मृत्युदर कमी करणे (Reduce Child Mortality )

५. आरोग्य सुधारणा (Improve matemal Health )

६. मलेरिया, एच. आय. व्ही. / (AIDS) यावर नियंत्रण

७. शाश्वत पर्यावरणाची हमी

८. विकासासाठी जागतिक भागीदारीचा विकास

२०१० पर्यंत सुख-समुध्दी विकासाचे उद्दिष्ट्य पूर्ण करण्याचे किंवा मिळवण्याचे जागतिक बँकेचे ध्येय आहे. त्यासाठी जागतिक बँकेने अविकसित देशांच्या सर्वांगिण विकासासाठी पुढील शोधले आहेत.

अ. वैश्विक प्राथमिक शिक्षण मिळवणे.

ब. एच. आय. व्ही आणि एड्स (H.I.V. आणि AIDS) शी मुकाबला करणे.

क. आरोग्य कार्यक्रमांना निधी पुरविणे..

ड. जैवविविधतेचे संवर्धन

**५. भ्रष्टाचारविरोधी सामना (Fight Against Corruption):**

अविकसित किंवा विकसनशील देशांत भ्रष्टाचाराची समस्या बळावत असते. भ्रष्टाचार विरोधी सामना करण्यासाठी जागतिक बँक महत्वाची भूमिका बजावत आहे..

**६. संघर्षमय देशांना मदत:**

३९ संघर्षमय देशांना जागतिक बँक पाठिंबा देत आहे. या देशांना संघर्षापासून किंवा युध्दापासून दूर राहण्यासाठी शिक्षण-प्रशिक्षण सोय उपलब्ध करुन देणे असे उपक्रम जागतिक बँकेने राबविले आहेत.

थोडक्यात, जागतिक बँक अविकसित देशांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक राजकीय अशा सर्वांगीण विकासासाठी भूमिका बजावत आहे तरीही भविष्यकालात विकसनशील देशांच्या विकासाबाबत नवीन आव्हाने निर्माण झाली आहेत. जागतिक बँकेचे कार्यक्रम योजना, उपक्रम ह्या देशाच्या आर्थिक विकासासाठी (चिरंतन) दारिद्रय निर्मूलनासाठी आणि मानवी विकासासाठी आहेत हे महत्वाचे आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१. जागतिक बँकेची भूमिका थोडक्यात अभ्यासा.

**७.३.२ जागतिक बँकेची कार्ये:**

- जागतिक बँक पुनर्बांधणीसाठी कर्ज देऊन युद्धामुळे उद्ध्वस्त झालेल्या देशांना मदत करते.
- ते भरपूर अनुभव प्रदान करतात आणि जागतिक बँकेची आर्थिक संसाधने गरीब देशांना आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी, गरिबी कमी करण्यास आणि चांगले जीवनमान साध्य करण्यास मदत करतात.
- ते विकसनशील देशांना विकास कर्ज देऊन मदत करतात.
- जागतिक बँक सिंचन, कृषी, पाणीपुरवठा, आरोग्य आणि शिक्षण यासाठी विविध सरकारांना कर्ज देते.
- कर्जाची हमी देऊन इतर संस्थांमध्ये विदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन देते.
- जागतिक बँक सदस्य देशांना सर्व प्रकल्पांबाबत आर्थिक, आर्थिक आणि तांत्रिक सल्लाही देते.

अशाप्रकारे, विविध आर्थिक सुधारणांचा परिचय करून, आम्ही विकसनशील देशांमध्ये उद्योगांच्या विकासाला चालना देत आहोत.

## ७.४ जागतिक व्यापार संघटना (WTO)

**प्रस्तावना:**

आंतरराष्ट्रीय व्यापार उदारीकरणाच्या प्रक्रियेत जागतिक व्यापार संघटनेची WTO स्थापना ही एक अत्यंत महत्त्वाची घटना मानली जाते. WTO च्या स्थापनेचा मूळ हे दोन विश्व युद्धाशी संबंधित आहे. पहिले विश्व युद्ध (१९१४-१९१८) आणि दुसरे महायुद्ध (१९३९-१९४५) हे विश्व युद्ध WTO च्या स्थापनेस जबाबदार मानले जातात. १९४४ मध्ये झालेल्या ब्रेटन वुड्स परिषदेमध्ये जागतिक स्तरावर पुढील ३ महत्त्वाच्या संस्थांच्या स्थापनेची शिफारस करण्यात आली त्या पुढीलप्रमाणे.

१) आंतरराष्ट्रीय मुद्रानिधी (IMF)

२) आंतराष्ट्रीय पुनर्रचना व विकास बँक (IBRD) किंवा जागतिक अधिकोष (World Bank)

३) जागतिक व्यापर संघटना (ITO)

वरील ३ संस्थापैकी IMF व IBRD या दोन संस्थांची १९४६ मध्ये त्वरीत स्थापना करण्यात आली. परंतु ITO च्या स्थापनेला मात्र काही देशांनी विरोध दर्शविला कारण त्यांच्या मते विश्व व्यापार संघटनेद्वारे काही महासत्ता देशांचा धोरणे तयार करण्याच्या बाबतीत हस्तक्षेप होऊन ITO चे स्वरुप एकतर्फी राहण्याची शक्यता होती. म्हणूनच विश्व व्यापार संघटने ऐवजी (ITO) व्यापार व जकातीविषयीचा सामान्य करार GATT अस्तित्वात आला.

१९४८ मध्ये WTO च्या ऐवजी GATT ची निर्मिती करण्यात आली. या संस्थेचे स्वरुप एक करार (Agreement) आणि संघटना (Organisation) असे दुहेरी होते. जगातील काही सदस्य देशांनी परस्परांमधील व्यापार शिथिल करण्यासाठी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

GATT च्या स्थापनेपासून वेगवेगळ्या ठीकाणी आठ फेऱ्या भरविण्यात आल्या. त्यापैकी उरुग्वे या ठिकाणी आयोजित करण्यात आलेली फेरी सर्वात महत्त्वाची आणि वादग्रस्त ठरली. GATT च्या करारात उत्पादीत वस्तूंचा समावेश होता तर WTO च्या करारात उत्पादीत वस्तुंबरोबरच सेवा व्यापार, कृषी क्षेत्र, TRIPS, TRIMs, व इतर महत्त्वाच्या घटकांचा अंतर्भाव करण्यात आला. सनातन व नवसनातनवादी अर्थतज्ञ मुक्त व्यापाराचा पुरस्कार करणारे होते. मुक्त व्यापारामुळे विशेषिकरण घडून येऊन श्रमविभाजन, तुलनात्मक लाभ, अल्प उत्पादन खर्च, मध्यम नफा असे व्यापारी लाभ मिळून एकूण व्यापारात वाढ घडून येण्यास मदत होते. सनातनवादी अर्थतज्ञांच्या याच मुक्त व्यापार धोरणाला GATT व WTO च्या स्थापनेने दुजोरा दिला असे म्हणता येईल. कारण नियंत्रण व निर्बंधमुक्त व्यापार हा GATT चे महत्त्वाचा उद्देश होता. व्यापारावरील जकात व

जकातेतर अडथळे दुर करुन व्यापार मुक्त करण्यासाठीच GATT ची स्थापना करण्यात आली. हीच उद्दिष्टे पुढे WTO ने अवलंबिली.

**WTO ची संकल्पना:**

"बहुपक्षीय व्यापारी प्रणालीसाठी असलेले वैधानिक आणि संस्थात्मक व्यासपीठ" अशी WTO ची थोडक्यात व्याख्या करता येईल.

WTO च्या स्थापनेला १९८६-१९९३ या काळात मान्यता मिळाली ८१ सभासद देशांच्या एकत्रित निर्णयाद्वारे उरुग्वे फेरी मान्य करण्यात आली. ही सभासद संख्या ८१ वरुन १३२ देशांपर्यंत वाढली. एप्रिल १९९४ मध्ये माराकस, १९९८ पर्यंत मोरोक्को येथे गॅटच्या उरुग्वे चर्चाफेरीच्या वाटाघाटी झाल्या. त्यानुसार १ जानेवारी १९९५ रोजी विश्व व्यापार संघटना (WTO) स्थापना झाली. १९१४ या वर्षापुरते GATT आणि WTO या दोन्ही संस्थांचे सहअस्तित्व राहणार होते परंतू ०१ जाने. १९९५ पासून GATT चे रुपांतर WTO मध्ये करण्यात आले. भारत हा WTO चा संस्थापक देश आहे. या उरुग्वे फेरीचे काही महत्त्वाचे परिणाम पुढील प्रमाणे होते.

१) गॅटची उरुग्वे फेरी ही सर्वाधिक गुंतागुंतीची आणि विवादास्पद ठरली. या फेरीतील वाटाघाटी सर्वाधिक म्हणजेच सात वर्षे चालल्या व्यापारावरील जकाती व जकातेतर निबंध हटविणे हे सर्वात मोठे यश या फेरीत मानले जाते.

२) उरुग्वे फेरीचा परीणाम म्हणून वास्तव जागतिक उत्पन्न २१२ बिलियन डॉलर्सवरुन वर्ष २००५ पर्यंत २७४ बिलियन डॉलर्स इतके वाढणार होते.

३) या वाटाघाटींचा सर्वाधिक अनुकूल परीणाम विकसित देशांना होणार असून मागासलेली राष्ट्रे, प्रामुख्याने, अन्नधान्य वस्तूंची आयात करणाऱ्या देशांसाठी हा करार काही अंशी प्रतिकूल परीणाम घडवून आणणारा होता.

४) या करारान्वये स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या प्रमाणात अमेरीकेच्या वास्तव उत्पन्नात ०.२ टक्के युरोपीयन संघामध्ये १.६ टक्के, जपान ०.९ टक्के, चिन २.५ टक्के, भारत ०.५ टक्के, दक्षिण अफ्रिका ० ९टक्के तर ब्राझिल ०.३ टक्के इतकी वाढ अपेक्षित होती.

**जागतिक व्यापार संघटनेचे संघटन:**

**१) मंत्री परिषद (Ministerial Conference):**

जागतिक व्यापार संघटनेच्या रचनेमध्ये मंत्रीपातळीवरील परिषद ही सर्वोच्च पातळीवरील कार्य करणारी यंत्रणा आहे. मंत्री परिषदेमध्ये सभासद देशाचे व्यापार मंत्री सदस्य म्हणून कार्य करतात. मंत्रिपातळीवरील परिषद ही सर्व बाबीसंबंधी अंतिम निर्णय घेते.

**२) सर्वसाधारण मंडळ (General Council):**

जागतिक व्यापार संघटनेचे दैनंदीन कामकाज पाहण्यासाठी अनेक मंडळांची स्थापना करण्यात आली आहे. या मंडळामध्ये सर्वसाधारण मंडळ हे सर्वांत महत्त्वाचे मानले जाते.

कारण हे मंडळ मंत्रिपातळीवरील परिषदेला कामकाजाचा अहवाल देण्यास बांधिल असते. सर्वसाधारण मंडळांतर्गत दोन स्वतंत्र मंडळे कार्यरत असतात. त्यापैकी एक देशादेशांत व्यापारातून निर्माण झालेले विवाद मिटविण्याचे कार्य करते तर दुसरे मंडळ व्यापार धोरणाचा आढावा घेण्याचे कार्य करीत असते.

**अ) वादविवाद निवारण मंडळ (Dispute Settlement Body):**

सर्वसाधारण मंडळ आपल्या कार्याची जबाबदारी इतर ३ स्वतंत्र मंडळांवर विभागून देते. त्यापैकी वस्तूच्या व्यापारासाठी मंडळ (Trade in Goods) सेवांच्या व्यापारासाठी मंडळ (Trade in Services) आणि व्यापारासंबंधी बौद्धीक संपदा अधिकारासाठी मंडळ TRIPs ही तीन्ही मंडळे सर्वसाधारण मंडळाच्या मार्गदर्शनाखाली कार्य करतात आणि सर्वसाधारण मंडळाने सोपविलेल्या जबाबदाऱ्या पार पाडतात.

**ब) व्यापार धोरण आढावा मंडळ (Trade Policy Review Body):**

वरील स्वतंत्र ३ मंत्रिमंडळाबरोबरच व्यापार धोरणाचा आढावा घेण्यासाठी सर्वसाधारण मंडळाकडून स्वतंत्र तीन समित्या नियुक्त करण्यात येतात. त्यापैकी एक व्यापार आणि विकास समिती (Committee of Trade and Development), दुसरे व्यवहारतोलावर नियंत्रण ठेवणारी समिती (Committee on Balance of payment Restriction) तिसरी समिती अंदाजपत्रक, वित्तव्यवहार आणि प्रशासन सांभळणारी (Committee on Budget, Finance and Administration) ही समिती जागतिक व्यापारसंघटना आणि सर्वसाधारण मंडळाने सोपविलेल्या जबाबदाऱ्या पार पाडते.

**३) WTO चे सचिवालय (Secretarial of WTO):**

WTO चे प्रशासन डायरेक्टर जनरल प्रमुख असलेल्या सचिव पातळीवरील मंडळामार्फत पाहिले जाते. डायरेक्टर जनरलची नियुक्ती मंत्रिपातळीवरील परिषदेमार्फत केली जाते. त्यांची मुदत चार वर्षांची असते. त्याला मदत करण्यासाठी चार स्वतंत्र डेप्युटी डायरेक्टर असतात. जे विविध सभासद देशांचे प्रतिनिधित्व करीत असतात. WTO चे वार्षिक अंदाजपत्रक तयार करून ते अंदाजपत्रक वित्त व प्रशासन मंडळाला आढावा घेण्यासाठी सादर केले जाते आणि त्याला अंतिम मंजूरी संबंधी शिफारसी करण्यासाठी सर्वसाधारण मंडळाकडे पाठविले जाते.

**७.४.१ जागतिक व्यापार संघटनेची (WTO) उद्दिष्टे:**

WTO ची प्रमुख उरिष्टे पुढील प्रमाणे सांगता येतील.

i) व्यापारातील जकात व जकातेतर अडथळे दूर करणे.

ii) आंतरराष्ट्रीय व्यापारातील संबंधांमधील भेदभाव करणारे धोरण नाहीसे करणे. व्यापार क्षेत्राच्या संबंधातील देशात लोकांचे जीवनमान उंचावणे, रोजगार पातळीत वाढ करणे, वास्तव उत्पन्नात वाढ करणे, परिणामकारक मागणीत वाढ करणे, उत्पादनात वाढ करणे, वस्तू व सेवा व्यापार वाढविणे.

iv) जागतिक साधनांचा जास्तित जास्त वापर करणे त्याचबरोबर स्थैर्यात्मक विकास करणे व आर्थिक विकास साह्य करणे.

v) विकसनशील देशांच्या आर्थिक विकासासाठी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून त्यांच्या व्यापारात वाढ घडवून आणणे.

vi) बहुपक्षीय करारानुसार व्यापारात समन्वय घडवून आणणे व त्यासाठी उत्तेजन देणे.

vii) व्यापार धोरणांमध्ये परिवर्तनात्मक धोरणे आणि स्थैर्यात्मक विकासासाठी समन्वय साधणे.

### ७.४.२ जागतिक व्यापार संघटनेची (WTO) कार्ये:

WTO ची प्रमुख कार्ये पुढील प्रमाणे

i) जकाती आणि व्यापारातील इतर निर्बंध कमी करण्यासाठी आचारसंहिता आणि नियमावली तयार करणे.

ii) व्यापारातील वाटाघाटी घडवून आणण्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यासपीठ म्हणून कार्य करणे.

iii) बहुपक्षीय व्यापारासंबंधी या कराराचे प्रशासन आणि अंमलबजावणी करणे.

iv) व्यापारात निर्माण झालेले कलह व वादविवाद सोडविण्याचा प्रयत्न करणे.

v) व्यापारातील निकोप स्पर्धेला प्रोत्साहन देणे आणि राष्ट्रीय व्यापार धोरणावर लक्ष देणे.

vi) जागतिक व्यापार धोरण ठरविणाऱ्या आंतरराष्ट्रीय मुद्रा निधी IMF व जागतिक बँकेसारख्या (IBRD) संस्थांना सहकार्य करणे.

### WTO च्या कार्याचे चिकित्सक परीक्षण

GATT ची उरुग्वे फेरी ही अधिक क्लिष्ट व विवादास्पद ठरली. या फेरीतील वाटाघाटी पूर्णत्वास येण्यासाठी सात वर्षाचा कालावधी लागला. या फेरीतील TRIPS, TRIMS सेवा व्यापार, कृषी क्षेत्र अनुदान व सवलती, बिगर जकाती नियंत्रणे शिथिल करणे, अधिक प्राधान्य करार या मुद्दयांमुळे ही फेरी अधिक गुंतागुंतीची व विवादास्पद ठरली. म्हणूनच उरुग्वे फेरीचे यश व भवितव्य त्यातील करारांच्या अंमलबजावणीवरच अवलंबून होते.

एका अहवालावरुन असा अंदाज व्यक्त करण्यात आला की उरुग्वे फेरीतील करारांच्या योग्य अंमलबजावणीतून वर्ष २००५ पर्यंत जागतिक वास्तव उत्पन्नात २७२ बिलिअन डॉलर्स ते २७४ बिलिअन डॉलर्स पर्यंत वाढ घडून येणार होती. GATT च्या अभ्यासगटाच्या अहवालानुसार हे प्रमाण जागतिक स्थूल उत्पादनाच्या १टक्के म्हणजेच ५१० बिलिअन डॉलर्स पर्यंत वाढणार आहे. परंतु हे सर्व व्यापारी लाभ विकसित देशांना सर्वाधिक मिळणार असून विकसनशिल व मागासलेले देश मात्र या लाभापासून काही प्रमाणात वंचित राहणार आहेत.

उरुग्वे फेरी मुळे युरोपिय महासंघाच्या वास्तव उत्पन्नात त्यांच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या GDP १.६ टक्के नी, अमेरीकेत ०.२ टक्केनी तर जपान मध्ये ०.९ टक्के नी वाढ होणार होती. परंतु एक स्वतंत्र देश म्हणून या कराराचा सर्वाधिक फायदा म्हणजेच ४२ बिलिअन डॉलर्स इतका जपानच्या वाट्याला येणार होता. तर अमेरिकेच्या वाट्याला २७ बिलिअन डॉलर्स व युरोपिय महासंघाला ६१ टक्के बिलिअन डॉलर्स ३६ ते ७८ बिलिअन डॉलर्स विकसनशील देशांच्या वाट्याला येणार होता. चिनसाठी एकूण GDP च्या हे प्रमाण २.५ टक्के, भारत ०.५ टक्के दक्षिण अफ्रिका ०.६ टक्के तर ब्राझिलसाठी ०.३ टक्के इतके राहणार.

**उरुग्वे फेरी आणि विकसनशील देश:**

उरुग्वे फेरी ही खऱ्या अर्थाने विकसनशिल राष्ट्रांचे भवितव्य ठरवणारी मानली जाते. मात्र या पूर्वीच्या फेऱ्यांप्रमाणेच उरुग्वे फेरीत सुद्धा विकसनशील देशांना झुकते माप दिल्याचे दिसून येते. The Wall Street Journal च्या अहवालानुसार, ज्यावेळी अमेरीका व युरोपिय संघाच्या वस्तूंना आंतराष्ट्रीय बाजारात उत्तम किंमत मिळत होती त्याचवेळी मात्र विकासनशिल देशांच्या वस्तूंच्या किंती दुष्टचक्रात अडकलेल्या होत्या असे मत व्यक्त करण्यात आले होते.

उरुग्वे फेरीतील TRIPs, TRIMs सेवा व्यापार क्षेत्र, कृषी क्षेत्र इ. विषयीचे करार विकसनशील देशांच्या बाबतीत अधिक संवेदनशील मानले जातात. या करारांनुसार वरील क्षेत्रातील सर्व निर्बंध व नियंत्रणे शिथिल करणे अपेक्षित आहे. परंतु त्यामुळे बलाढ्य स्पर्धक देशांपुढे विकसनशील देशांची स्पर्धाक्षमता कमी पडून त्यांचा निभाव लागणार नाही.

बहुतांश अप्रगत राष्ट्रांमध्ये शेती हा मूख्य व्यवसाय असल्याने त्यांचा तो जिव्हाळ्याचा प्रश्न होता. परंतु प्रगत देशांना अप्रगत देशांच्या बाजारपेठ करायच्या होत्या म्हणूनच त्यांनी शेती अनुदाने कमी करण्याबाबतचा अट्टाहास कायम ठेवला. अमेरीका आणि युरोपातील देशांनी त्यांच्या शेतकऱ्यांचे हित जोपासण्यासाठी दिल्या जाणाऱ्या भरमसाठ अनुदानांमध्ये कपात करायची नाही. परंतु विकसनशील देशांवर मात्र शेती अनुदान कमी करण्यासाठी दबाव आणावयाचा ही प्रगत देशांची चाल अप्रगत देशांनी संघटीतपणे अयशस्वी ठरविली.

प्रगत देश दरवर्षी शेतीक्षेत्राला ३२० बिलीयन डॉलर्स पेक्षाही अधिक अनुदान देतात. अमेरीकेने मागील वर्षी कापूस उत्पादन शेतकऱ्यांना २ अब्ज डॉलर्स पेक्षा अधिक अनुदान दिले होते. अशा परिस्थितीत अप्रगत देशांना जगा आणि जगू द्या या तत्त्वाप्रमाणे प्रगत देशांनी शेती अनुदानात कपात करुन त्यांची सेवा क्षेत्रे अप्रगत देशांसाठी खुली करण्याची मागणी कॅनकून परिषदेत जोरदारपणे मांडली. मात्र प्रगत देशातील शेती अनुदानात कपात करण्याच्या मुद्द्यावर तोडगा निघू शकला नाही.

या करारातील वस्त्र व कापड विषयक करार हा देखिल विकसनशील राष्ट्रांच्या बाबतीत असलेला एक महत्त्वाचा करार मानला जातो. या करारानुसार वस्त्र व कापड क्षेत्रात असलेला बहुधागा करार (MFA) २००५ सालापर्यंत टप्प्यां टप्पाने रद्द होणार आहे. त्यामुळे अप्रगत देशांच्या कापड निर्यातीतील सर्वांत मोठा अडथळा संपुष्टात येणार आहे. जागतिक कपडा व वस्त्र व्यापार प्रतिवर्षी २४० बिलियन डॉलर्स इतक्या किंमतीचा असून

बहुधागा करार संपुष्टात आल्यानंतर त्यामध्ये वाढ होऊन हा व्यापार प्रतिवर्षी २५ बिलियन डॉलर्स इतका होणार आहे. परंतु त्यामध्ये देखिल कापड, उद्योगात वर्चस्व असणाऱ्या चिन, तैवान, हॉगकॉग दक्षिण कोरीया इ. राष्ट्रांबरोबर अप्रगत देशांतील वस्त्र व कापड उद्योगांना स्पर्धा करावी लागणार आहे.

उरुग्वे कराराचा एक महत्त्वाच परीणाम म्हणजेच सेवा क्षेत्राला मिळालेला व्यापारी दर्जा होय. या करारानुसार सेवा क्षेत्रासंबंधिचे नियम शिथिल केल्याने जागतिक सेवा क्षेत्र व्यापारात वाढ घडून येणार आहे.

जशी उरुग्वे फेरीतील विविध करार हे सर्वानुमते संमत झालेले असले तरीही या कराराचे परिणाम मात्र प्रत्येक देशांवर वेगवेगळे दिसून येणार आहेत. त्यामध्ये विकसित अर्थव्यवस्थांवर अनुकूल तर विकसनशील देशांवर काही क्षेत्रांत प्रतिकूल परिणाम दिसून येणार आहेत असे जरी असले तरीही जागतिक व्यापार नियंत्र निर्बंध मुक्त करण्यासाठी व पारदर्शक व्यवहारांसाठी WTO ची भूमिका अत्यंत महत्तवाची ठरणार आहे.

**उरुग्वे करार आणि भारत:**

भारत १९९५ मध्ये जरी WTO मध्ये सामील झाला असला तरीही भारत पूर्वीपासूनच GATT चा सभासद देश राहीला आहे. परंतु भारताच्या या भूमिकेवरच काही विरोधी पक्ष व आंतराष्ट्रीय व्यापार परिस्थितीविषयी अनभिज्ञ असलेल्या विरोधकांमार्फत सतत टिका करण्यात आली. WTO चा करार हा विकसित राष्ट्रांना अधिक अनुकूल आहे हे जरी योग्य असले तरी असे म्हणता येणार नाही की भारताच्या बाबतीत हा करार संपूर्ण प्रतिकूल आहे. भारताला देखिल या करारामुळे फायदे मिळणार आहेत. परंतु ते विकसित राष्ट्रांच्या तुलनेत कमी असू शकतील.

या कराराचा सर्वात मोठा फायदा म्हणजे भारताला WTO सभासद देश म्हणून 'विशिष्ट परम मित्र राष्ट्रे ' ( Most Favoured Nations) MFM चा दर्जा मिळून भारत हा देखिल इतर विकसित सभासद देशांच्या समपातळीत राहणार असून त्यांना मिळणारे सर्व व्यापारी लाभ व सवलती भारताला देखिल लागू होणार आहेत.

शेती क्षेत्रातील सवलती व अनुदाने कमी केल्याने भारतीय शेती व शेतकऱ्यांवर त्याचे प्रतिकूल परिणाम दिसून येतील अशी एक टीका केली जात होती. परंतू शेती अनुदाने व सवलती कमी करण्याचे बंधन केवळ भारतावरच नसून इतर विकसित सभासद देशांवर देखिल आहे असे झाल्यास भारतीय कृषिजन्य वस्तू आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अधिक स्पर्धाक्षम बनतील. अल्प किंमतीमुळे भारतीय कृषी क्षेत्राला निर्यात वाढीच्या नवीन संधी उपलब्ध होणार आहेत.

भारत १९९५ मध्ये WTO मध्ये सामील झाला त्यामुळे जागतिक निर्यात व्यापारात १९९० मध्ये भारताचा ०.५ टक्के भाग होता, तो वाढून १९९५ मध्ये ०६टक्के झाला. आर्थिक सुधारणांच्या १२ वर्षाच्या काळात २००२ पर्यंत हा हिस्सा वाढून ०.८ टक्के झाला.

१९९० मध्ये भारताची एकूण निर्यात १८१४३ मिलियन डॉलर्स होती. ती वाढून १९९५ मध्ये ३१११७ मिलियन डॉलर्स झाली. इ.स. २००३-२००४ ह्या वर्षात भारताची निर्यात ६३८४३ मिलियन डॉलर्स पर्यंत वाढली. WTO च्या आधुनिक अहवालानुसार भारताच्या व्यापारी वस्तूंच्या निर्यातीत १५ टक्के वाढ झाली असून इ.स. २००२ मध्ये जगाच्या ३० प्रमुख निर्यातक व आयातक देशांमध्ये भारताने चीन नंतर दुसरा क्रमांक घेतला आहे.

इ.स. २००१-२००२ मध्ये भारताची आयात २४१९२९ वरुन वाढून २००३ २००४ मध्ये २९९७०८ कोटी रु. झाली. सन २००२ मध्ये जागतिक निर्यात व्यापारात भारताचा हिस्सा केवळ ०.८ टक्के होता, तर अमेरिकेचा १०.७ टक्के चीनचा ५.२ टक्के तर जपानचा ६.६ टक्के हिस्सा होता.. ह्याच कालावधीत एकूण जागतिक आयात व्यापारात भारताचा हिस्सा ०.९ टक्के चीनचा हिस्सा ४.५ टक्के तर जपानचा हिस्सा ५.२ टक्के होता. इ.स. २००४ मध्ये जागतिक निर्यात व्यापारात भारताचा हिस्सा ०.८ टक्के इतकाच राहिला परंतू निर्यातीत २८. १ टक्के वृद्धी घडून आली.

जागतिक व्यापारात भारताच्या हिश्श्यात अपेक्षित वाढ होत नाही याचे प्रमुख कारण विकसित देश विकसनशील देशांच्या निर्यात व्यापारात सतत विविध तऱ्हेचे अडथळे निर्माण करण्याचा पर्यत्न करीत असतात. ह्या विविध प्रकाच्या अडथळ्यामुळे जागतिक व्यापारात विकसनशील देशातील व्यापाराचा अत्यंत कमी हिस्सा असतो. WTO सारख्या संघटनेच्या दबावाकाली असलेल्या विकसनशील देशांना आपले व्यापार अडथळे काढून टाकण्यास व त्यांचा सतत प्रवाह चालू ठेवण्याकरिता विकसित व संपन्न देश भाग पाडीत असतात व त्याचवेळी विकसित देश स्वतःच्या फायद्याकरीता संरक्षण धोरण अंमलात आणण्याकरीता व्यापार अडसर उभे करीत असतात.

थोडक्यात विकसित देश हे विकसनशील देशांच्या निर्यात व्यापारात शक्यतो सर्व प्रकारचे अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहोत. ह्या कारणामुळे भारतासारख्या विकसनशल देशांचा जागतिक व्यापारातील हिस्सा वाढत नाही.

### ७.४.३ जागतिक व्यापार संघटनेचे (WTO) करार:

#### ७.४.३.१ व्यापाराशी संबंधित बौद्धिक संपदा करार (TRIPS):

व्यापाराशी संबंधित बौद्धिक संपदा करार ही उरूग्वे फेरीमधील एक प्रमुख परंतु वादग्रस्त तरतूद मानली जाते. TRIPs ही तरतूद ह्या अधिवेशनात का अंतर्भूत करण्यात आली व तशी गरज विकसित देशांना का निर्माण झाली ह्याची कारणे अभ्यासणे आवश्यक आहे.

तत्कालीन परिस्थितीतील तंत्रज्ञान व संशोधनाचे कोणत्याही विकसित देशाच्या वाणिज्यविषयक मालमत्तेचा दर्जा मिळाला होता. आंतरराष्ट्रीय स्पर्धाक्षमतेत टिकून राहण्यासाठी अद्ययावत तंत्रज्ञान हा एक प्रमुख मार्ग बनला होता. आपल्या वस्तूंना जागतिक पातळीवर स्पर्धाक्षम बनविण्यासाठी विकसित देशांनी उत्पादनाच्या पारंपारीक पद्धतींचा त्याग करून नवीन अद्ययावत तंत्रज्ञानाचा स्विकार करण्यास सुरुवात केली. या तंत्रज्ञानाच्या बळावर अशा विकसित देशांनी वाहतूक, माहिती तंत्रज्ञान, दळणवळण जैवतंत्रज्ञान इ. क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात प्रगती साध्य केली. परंतू या क्षेत्रातील विकसित देशांनी लावलेल्या शोध व त्याद्वारे उत्पादीत होणाऱ्या वस्तू यांची चांचेगिरी (Piracy)

वाढल्याने या देशातील बौद्धिक संपदा धोक्यात येऊ लागली. अशा बनावट वस्तूंचा विपरीत परिणाम विकसित देशांच्या उत्पादन व्यापार व नफ्यावर दिसून आला. म्हणूनच या Piracy च्या समस्येतून बाहेर पडून नवीन शोधांचे हक्क सुरक्षित राहण्यासाठी 'बौद्धिक संपदा व्यापार करार TRIPs ; तरतूद करण्यात आली.

TRIPs तरतूदीमध्ये बौद्धिक संपदेच्या पुढील क्षेत्रांचा समावेश करण्यात आला.

१) Copy Rights

२) बोध चिन्ह Trade Mark

3) भौगोलिक संकेत

(४) औद्योगिक प्रारूप (ट्रेडमार्क)

(५) पेटंट Patents

(६) व्यापारी गोपनिय माहिती इ. साठी १० वर्षाचा कालावधी निश्चित करण्यात आला असून पेटंटसाठी मात्र २० वर्षाचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. व्यापारी गोपनियता Trade Secret आणि संशोधनास व्यापारी मूल्य असल्याने त्याचे देखिल संरक्षण झाले पाहिजे असे या करारात स्पष्ट करण्यात आले आहे.

### ७.४.३.२ TRIMS

TRIMS मधील तरतूदीनुसार प्रत्येक सदस्य देशाने विदेशी गुंतवणूकीवरील सर्व प्रतिबंध हटवावयास हवेत ज्या सोयी सवलती स्वदेशी गुंतवणूकदारांना मिळतात त्या सर्व विदेशी गुंतवणूकदारांना मिळावयास हव्यात. ह्या करारानुसार ५ वर्षाच्या आत व्यापाराशी संबंधीत गुंतवणूकीवरील नियंत्रणे समाप्त करावयास हवी. हा निर्देश केवळ संख्यात्मक अडथळे व राष्ट्रीय व्यवहारांपुरताच आहे. प्रामुख्याने निवडक क्षेत्रातील गुंतवणूक, विदेशी कंपन्यांना राष्ट्रीय कंपन्यांच्या बरोबर आणण्याकरिता विदेशी गुंतवणूकीची पातळी, निर्यातीची जबाबदारी व घरगुती कच्च्या मालाचा उपयोग अशा निवडक क्षेत्रापुरताच मर्यादीत आहे. हा करार विदेशी चलनाची प्राप्ती, विदेशी समभाग व तांत्रिक स्थानांतरणाशी संबंधित विदेशी गुंतवणूकदार ह्यांच्यावर निर्बंध लावण्याचा निषेध करतो. हा करार आदेश देतो की विदेशी गुंतवणूकदार कंपन्यांना घरगुती कंपन्यांच्या बरोबर ठेवले पाहिजे. गुंतवणूक क्षेत्रातील अडथळ्यांना हा रोखतो. हा करार कच्चा माल व मध्यवर्ती वस्तू ह्यांची आयात मुक्त असावी अशी अपेक्षा करतो.

काही गुंतवणूकी ह्या व्यापारात अडथळे निर्माण करतात व व्यापारात विकृती निर्माण करतात. ही गोष्ट ह्या कराराला मान्य आहे. म्हणून विकसित देश दोन वर्षामध्ये विकसनशील देश ५ वर्षामध्ये व अल्पविकसित देश ७ वर्षांमध्ये सर्व गैर अनुरुप TRIMS ची अनिवार्यपणे सुचना देतील व समाप्त सुद्धा करतील अशी अपेक्षा आहे. TRIMS करिता एक समिती नेमली असून ती TRIMS मधील करारांचे बरोबर पालन होत आहे किंवा नाही ह्यांची देखरेख करेल व ह्याबाबतचा अहवाल वस्तुंच्या व्यापाराकरीता स्थापलेल्या समितीला देईल.

### ७.४.३.३ 'सेवा व्यापाराविषयी सर्वसामान्य करार' (GATS):

उरुग्वे फेरीच्या पूर्वी सेवा क्षेत्र व्यापाराबाबतीत कोणत्याही विशेष तरतूदी करण्यात आल्या नव्हत्या. उरुग्वे फेरीत प्रथमच सेवा क्षेत्र व्यापाराचा समावेश करण्यात आला.

या फेरीत 'सेवा व्यापाराविषयी सर्वसामान्य करार' (General Agreement on Trade in Service GATS) अस्तीत्वात आला. सेवा क्षेत्र व्यापाराचे चित्र अनुकूल पद्धतीने लादण्यासाठी ज्या मार्गात हा करार मैलाचा दगड ठरणार होता. उरुग्वे फेरीच्या पूर्वी प्रत्येक देशाच्या सामाजिक व आर्थिक तसेच राजकीय परिस्थितीचा विचार करून प्रत्येक देशाने सेवा क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात निर्बंध लादले होते. प्रत्येक देशाने सेवा क्षेत्रांवर काही प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष नियंत्रणे लादली होती.

उदा. VISA अनिवार्यता, गुंतवणुकीवरील कडक कायदे नियम, विपणन विषयक कडक नियंत्रणे परकीय नोकरदारांच्या रोजगार संधींवरील बंधने, बँका, दिमा वाहतूक मनोरंजन दळणवळण साधने अशा सेवांचा वापर करण्याची सक्ती इ. कडक नियंत्रणे लावली जात होती.

उरुग्वे येथील परिषदेत सेवांच्या व्यापाराचा करारात समावेश करुन त्या अंतर्गत बँकिंग सेवा, विमा, वाहतूक दळणवळण, सल्लागार मंडळे, करमणूक व मनोरंजन इ. नी पुरविलेल्या सेवांचा समावेश होता. त्या करारातील नमुद केलेल्या अटीनुसार व सेवा पुरविणे बंधनकारक असेल. वित्तीय सेवांमध्ये गुंतवणूकदार ठेवीदार आणि विमाधारक यांचे संरक्षण झाले पाहिजे. दुरसंचार सेवा व्यापाराच्या दृष्टीने महत्त्वाच्या असल्याचे मान्य करण्यात आले आहे.

GATS करारान्वये पुढील दोन महत्त्वाच्या कर्तव्यांचा समावेश करण्यात आला.

**i) अधिक प्राधान्य देश कलम (Most Favoured Nathions clause MFN):**

या कलमान्वये GATT च्या सभासद राष्ट्रांनी परस्परांशी सेवा व्यापार करतांना कोणताही भेदभाव न करता सर्व सभासद देशांना समान दर्जा देण्यात यावा.

**ii) पारदर्शकता:**

या तत्त्वानुसार असे ठरविण्यात आले की प्रत्येक सभासद राष्ट्रांने आपल्या सेवा व्यापारविषयीचे सर्व नियम व अटी प्रसिद्ध कराव्यात.

या करारात पुढील तीन उद्दिष्टे ठरविण्यात आली.

i) सेवा व्यापाराविषयी मुक्त धोरण स्विकारण्यासाठी बहुउद्देशिय नियमावली तयार करणे.

ii) सेवा क्षेत्राचे उदारीकरण व पारदर्शकता

iii) सर्व सभासद राष्ट्रांचा सर्वांगिण विकास, मुख्यत्वे विकसनशील देशांचा सर्वांगिण विकास घडवून आणणे.

### ७.४.३.४ कृषीविषयक करार (AoA):

१९३४ मध्ये डंकेल प्रस्ताव स्वीकारल्यापासून जागतिकीकरणाची प्रक्रिया अधिक देगाने सुरु झाली आहे. उरुग्वे फेरीत प्रथमच कृषी क्षेत्राचा समावेश करण्यात आला. म्हणूनच या फेरीत कृषीविषयक करारास अतिशय महत्त्व देण्यात आले असल्याने कृषीप्रधान अर्थव्यवस्थांचे लक्ष जागतिक व्यापार संघटनेच्या कृषीविषयक कराराकडे लागले. या करारानुसार विकसित देशांची स्वदेशि कृषीजन्य उत्पादनांना दिल्या जाणाऱ्या सवलती व अनुदाने प्रतिबंधित करण्याचे ठरविण्यात आले. जागतिक कृषी व्यापार अधिक सक्षम व पारदर्शक व्हावा हा ह्यामागील एक महत्त्वाचा हेतू होता.

या करारात जकात व बिगर जकात नियंत्रणांचा जागतीक स्पर्धेवर होणारा परिणाम विचारात होण्यात आला आहे या कराराच मुख्य उद्देश देशांतर्गत उत्पादन आणि निर्यात वाढीसाठी दिले जाणारे अर्थसहाय्य कमी करणे आहे. त्यानुसार पुढील गट करण्यात आले.

**(i) पहीला गट :**

हा गट विकसित देशांचा असुन या गटातील देशांनी १ जानेवारी १९५५ पासून पुढील ६ वर्षात कृषीजकाती ३६ टक्के नी कमी करणे.

**ii) दुसरा गट:**

हा विकसनशील देशांचा गट असून या गटातील देशांनी १ जानेवारी १९९५ पासून पुढील १० वर्षात कृषीजकाती २४टक्के नी कमी करण्याचे बंधन होते.

**(iii) तीसरा गट:**

ह्या गटात अविकसित व गरीब देशांचा समावेश असून ह्या देशांना जकाती कमी करणाचे कोणतेही बंधन नव्हते.

उरुग्वे फेरीत कृषी अर्थसहाय्याचे पुढील ३ गटात वर्गीकरण करण्यात आले

**अ) प्रतिबंधित सवलती:**

यामध्ये स्वदेशी निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी विदेशी आयात वस्तूंच्या खरेदीवर बंधने टाकण्यात आली अशा निर्यात वस्तू उत्पादनासाठी स्वदेशी कच्चा माल व आयातीत वस्तूला पर्यायी स्वदेशी वस्तूंच्या वापरासाठी सवलती देण्यात येत होत्या.

**ब) आक्षेपार्ह सवलती:**

या मध्ये अशा सवलतींचा समावेश करण्यात आला की ज्या सवलतींचा विपरित परिणाम इतर देशांच्या अर्थव्यवस्थांवर दिसून येत असेल.

**क) आक्षेपार्ह नसलेल्या सवलती:**

अनार्थिक क्षेत्राच्या व मागासलेल्या प्रदेशांचा विकास करण्यासाठी त्या क्षेत्रातील औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी औद्योगिक संशोधनासाठी, विकासकारी प्रकल्पासाठी दिल्या जाणाऱ्या सवलतींच्या समावेश अनाक्षेपार्ह सवलतींमध्ये करण्यात आला.

शेतमाल आंतरराष्ट्रीय बाजार सुयोग्य दिशेने जाण्यासाठी, शेतमाल व्यापारात पारदर्शकता निर्माण होण्यासाठी, कृषी व्यापारातील अडथळे दूर करण्यासाठी हा करार करण्यात आला. या करारात शेतमालाच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातील बाजार प्रवेशावर निर्बंध देशांतर्गत मदत आणि निर्यात उत्तेजनासाठी अर्थसहाय्य या तीन बाबींवर विशेष भर देण्यात आलेला आहे.

## ७.५ सारांश

प्रस्तुत प्रकरणामध्ये आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची भूमिका व कार्ये, जागतिक बँकेची पार्श्वभूमी, जागतिक बँकेची भूमिका, जागतिक बँकेची कार्ये, जागतिक व्यापार संघटनेची उद्दिष्टे, कार्ये, जागतिक व्यापार संघटनेचे करार, TRIPS, TRIMS, GAT व AoA इत्यादींचे सविस्तर विश्लेषण केले आहे.

## ७.६ प्रश्न

१) आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) ची कार्ये स्पष्ट करा.

२) जागतिक बँकेची भूमिका विशद करा.

३) जागतिक बँकेची कार्ये स्पष्ट करा.

४) जागतिक व्यापार संघटनेची (WTO) उद्दिष्टे स्पष्ट करा.

५) जागतिक व्यापार संघटनेची (WTO) कार्ये स्पष्ट करा.

६) टिपा लिहा.

अ) व्यापाराशी संबंधित बौद्धिक संपदा करार (TRIPS)

ब) 'सेवा व्यापाराविषयी सर्वसामान्य करार' (GATS)

क) कृषीविषयक करार (AoA)

*****

८

# आर्थिक एकात्मीकरण

**घटक रचना**


८.० उद्दिष्टे

८.१ प्रस्तावना

८.२ आर्थिक एकात्मीकरणाची उद्दिष्टे

८.३ आर्थिक एकात्मीकरणाचे स्वरूप

८.४ विक्री संघ (कार्टेल)

८.५ व्यापार गट

८.६ दक्षिण-पूर्ण आशियायी राष्ट्रांची संघटना

८.७ युरोपियन युनियन (EU)

८.८ नाफ्टा

८.९ सार्क

८.१० सारांश

८.११ प्रश्न


## ८.० उद्दिष्टे

आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्य आणि वित्तिय पद्धत यामध्ये आंतरसंबंध आहे. विकसित देशाकडून विकसनशील देशात मदतीचा प्रवाह वाढावा. विकसनशील देशातील उत्पादननिर्मिती वर अनुकूल परिणाम व्हावा यादृष्टीने आर्थिक एकात्मीकरण गरज भासू लागली त्याच अनुषंगाने जागतिक व्यापारपेठेत विविध व्यापारखाती निर्माण झाली. या प्रकरणात आपण आर्थिक एकात्मीकरण व व्यापारखाती याविषयी अभ्यास करणार आहोत.

**या पाठाची उदिष्टचे पुढीलप्रमाणे:**

१. आर्थिक एकात्मीकरणाची संकल्पना अभ्यासणे

२. आर्थिक एकात्मीकरणाची विविध प्रकारांचा अभ्यास करणे.

३. जागतिक व्यापार पेठेतील विविध व्यापारी गटांचा अभ्यास व मूल्यमापण करणे. (सार्क, साफ्ता आणि नाफ्ता इ. )

## ८.१ प्रस्तावना

जागतिक अर्थव्यवस्थेतील सर्व देश आज विभेदी व्यापारी धोरण अवलंबतात. विविध प्रकारच्या आर्थिक एकात्मीकरणामुळे देशातील व्यापारी बंधने विशेषतः जकात बंधने कमी होतात म्हणून व्यापार वृद्धीसाठी आर्थिक एकात्मीकरणाची आवश्यकता आहे.

**अर्थ:**

"प्रादेशिक आर्थिक एकात्मीकरण म्हणजे विकसनशील देशातील व्यापार वाढीची एक अनोखी /अभिनव कल्पना होय." युरोपियन आर्थिक संघटनेद्वारे या देशांना यशस्वी होण्यासाठी आकर्षित केले जाते, याचा अर्थ या क्षेत्रातील व्यापारवाढ होण्यास मदत होते. सहभागी देशात नविन तंत्रज्ञान, तांत्रिक नवनिर्मितीची अंमलबजावणी व आधुनिक औद्योगिकरण तसेच उत्पादनातील मितव्ययता मिळवण्यासाठी आर्थिक एकात्मीकरण गरजेचे असते.

**फायदे:**

आर्थिक एकात्मीकरणामुळे काही सकारात्मक फायदे सहभागी देशांना होतात ते पुढीलप्रमाणे:

१. आर्थिक एकात्मीकरणामुळे बाजारपेठेचा विस्तार होऊन सहभागी देशातील अंतर्गत व बहिंगत अशी उत्पादनातील मितव्ययत्ता वाढली जाते.

२. विस्तृत बाजारपेठेमुळे उत्पादनामध्ये विशेषीकरण करता येते परिणामी आधुनिक औद्योगिक विकास घडून येतो. अजूनही आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये तुलनात्मक लाभ मिळवण्यासाठी गुंतवणूकीचा प्रवाह उद्योगाकडे वळविण्यासाठी सहभागी देशांना प्रोत्साहन मिळते.

३. आर्थिक एकात्मीकरणामुळे परकिय व्यापाराच्या दिशेने व रचतेत तसेच वस्तूचा खर्च आणि किंमत रचना यामध्ये सकारात्मक (अनुकूल) परिणाम घडून येतो.

४. आर्थिक एकात्मीकरणामुळे नैसर्गिक साधनसामुग्रीचा पर्याप्त वापर. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व जागतिक स्पर्धेला तोंड देणे शक्य होते.

५. उत्पादन आणि उपयोग यामुळे सहभागी देशात सामान्य कल्याण साधता येते.

**आपली प्रगती तपासा:**

प्र.१ आर्थिक एकात्मीकरण म्हणजे काय ?

## ८.२ आर्थिक एकात्मीकरणाची उद्दिष्टे

आधुनिक आर्थिक व्यवस्था अशा तंत्रांवर आधारित आहे ज्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर झाले तरच आर्थिकदृष्ट्या ती फायदेशीर ठरते. यासाठी एकीकडे बाजारपेठांचा विस्तार करणे आणि दुसरीकडे लोकांची क्रयशक्ती वाढवणे आवश्यक आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या

प्रभावी वापरासाठी, लहान अंतर्गत बाजारपेठा असलेल्या काही देशांनी प्रादेशिक गटांमध्ये स्वतःला संघटित करण्याचा प्रयत्न केला आहे. आर्थिक एकात्मता, म्हणजे व्यापक अर्थाने वेगळ्या अर्थव्यवस्थेचे एका मोठ्या अर्थव्यवस्थेत एकत्रीकरण करणे होय. साल्वाटोरच्या मते आर्थिक एकीकरणम्हणजे "केवळ एकत्र सामील होणाऱ्या राष्ट्रांमधील व्यापार अडथळे भेदभावपूर्णपणे कमी करणे किंवा दूर करण्याचे व्यावसायिक धोरण आहे."

अशा प्रकारे आर्थिक एकत्रीकरण अशा व्यवस्थेचा संदर्भ देते ज्याद्वारे दोन किंवा अधिक देश मोठ्या आर्थिक प्रदेशात एकत्रित होतात आणि राष्ट्रीय सीमांवर विद्यमान असमानता आणि भेदभाव काढून टाकतात आणि समूहाबाहेरील देशांविरुद्ध समान दर आणि व्यापार धोरणांचे पालन करतात. टिनबर्जन यांनी आर्थिक एकीकरणाची व्याख्या "आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या सर्वात इष्ट संरचनेची निर्मिती, इष्टतम कार्यप्रणालीतील कृत्रिम अडथळे दूर करणे आणि समन्वय आणि एकीकरणाच्या सर्व इष्ट घटकांची जाणीवपूर्वक ओळख करून देणे" अशी केली आहे. टिनबर्जनने एकात्मतेच्या नकारात्मक आणि सकारात्मक पैलूंमध्ये फरक केला आहे.

एकात्मतेच्या नकारात्मक पैलूंमध्ये भेदभाव काढून टाकणे आणि सदस्य देशांमधील वस्तूंच्या हालचालीवरील निर्बंध यांचा समावेश होतो. एकात्मतेच्या सकारात्मक पैलूंमध्ये अशा धोरणात्मक उपायांचा अवलंब करणे आणि दिलेल्या आर्थिक क्षेत्रामध्ये बाजारातील विकृती दूर करणे सुलभ करण्यासाठी संस्थात्मक व्यवस्था यांचा समावेश होतो. आर्थिक एकात्मता ही एक प्रक्रिया आणि एक स्थिती म्हणून समजली जाऊ शकते. एक प्रक्रिया म्हणून, विविध 'राज्यांतील आर्थिक घटकांमधील भेदभाव नष्ट करण्याच्या उद्देशाने राष्ट्र उपाययोजनांशी संबंधित आहे. अशा घडामोडींची स्थिती म्हणून, हे विविध राष्ट्र राज्यांचा समावेश असलेले क्षेत्र म्हणून मानले जाऊ शकते ज्यामध्ये विविध प्रकारच्या भेदभावाची अनुपस्थिती आहे.

आर्थिक एकत्रीकरणाची दोन आवश्यक वैशिष्ट्ये आहेत:

(i) सदस्य राष्ट्रांमध्ये मुक्त व्यापाराचा परिचय.

(ii) सदस्य नसलेल्या देशांविरुद्ध सामान्य बाह्य शुल्क धोरण लादणे.

या दोन वैशिष्ट्यांवरून आर्थिक एकीकरण हे मुक्त व्यापार आणि शुल्क संरक्षण यांच्यातील संश्लेषण आहे.

**आर्थिक एकत्रीकरणाची उद्दिष्टे:**

दोन किंवा अधिक देशांमधील आर्थिक एकात्मता खालील मुख्य फायदे आणते:

**(i) प्रमाणाच्या बचती:**

अंतर्गत बाजारपेठ लहान असलेल्या वैयक्तिक देशांकडे उत्पादन वाढवण्याची क्षमता मर्यादित आहे. आर्थिक एकात्मता कोणत्याही सदस्य देशाने उत्पादित केलेल्या उत्पादनांचा अप्रतिबंधित प्रवेश प्रदान करते. हे उत्पादन वाढवण्यास आणि मोठ्या प्रमाणावर अर्थव्यवस्थेच्या फायद्यांचे पूर्णपणे शोषण करण्यासाठी मजबूत प्रोत्साहन देते.

**(ii) आंतरराष्ट्रीय विशेषीकरण :**

आर्थिक एकात्मता सदस्य देशांना उत्पादने आणि प्रक्रिया या दोन्हीमध्ये अधिकाधिक विशेषीकरण प्राप्त करण्यास सक्षम करते. सदस्य देशांद्वारे तुलनात्मक खर्चाच्या फायद्यावर आधारित विशेषीकरणामुळे उत्पादनात मोठ्या प्रमाणात विस्तार होऊ शकतो.

**(iii) उत्पादनामध्ये गुणात्मक सुधारणाः**

अनेक देशांमधील प्रादेशिक आर्थिक सहकार्यामुळे वेगवान तांत्रिक बदल होतात आणि मोठ्या आणि सुलभ भांडवलाच्या हालचाली होतात. सदस्य देश अशा अनुकूल परिस्थितीत उत्पादनात गुणात्मक सुधारणा घडवून आणू शकतात. सदस्य राष्ट्रांमधील व्यापार सुलभ करण्यासाठी पायाभूत सुविधांमध्येही गुंतवणूक केली आहे...

**(iv) रोजगाराचा विस्तार:**

काही देश प्रादेशिक आर्थिक गटामध्ये स्वतःला संघटित करतात आणि प्रदेशात श्रमांच्या अनिर्बंध प्रवाहाला परवानगी देतात, त्यामुळे रोजगार आणि उत्पन्न वाढू शकते. यामुळे लोकांचे कल्याण वाढते.

**(v) व्यापाराच्या अटींमध्ये सुधारणाः**

आर्थिक एकात्मतेमुळे सदस्य देशांची सौदेबाजी करण्याची शक्ती उर्वरित जगाच्या तुलनेत सुधारते. त्यामुळे त्यांच्या व्यापाराच्या अटींमध्ये लक्षणीय सुधारणा होते.

**(vi) आर्थिक कार्यक्षमतेत वाढ:**

आर्थिक एकात्मतेमुळे प्रदेशात स्पर्धा वाढते. त्यामुळे संपूर्ण गटाची उच्च पातळीची आर्थिक कार्यक्षमता राखण्यात मदत होते. यामुळे सहभागी देशांसाठी संसाधनांचा अधिक चांगला वापर होतो.

**(vii) राहणीमानात सुधारणाः**

काही देश स्वतःला प्रादेशिक गटांमध्ये संघटित केल्यामुळे, स्पर्धात्मक किमतींवर उत्तम प्रकारच्या वस्तूंची सहज उपलब्धता होते. रोजगाराच्या संधी आणि क्रयशक्ती वाढल्या लोकांचे जीवनमान सुधारण्यास हातभार लागतो.

**(viii) घटक गतिशीलतेत वाढ:**

आर्थिक एकीकरणामुळे सदस्य देशांमधील कामगार आणि इतर घटकांच्या हालचालींवरील अडथळे दूर होतात. वाढीव घटक गतिशीलता रोजगार वाढवते; घटक खर्च कमी करते; आणि सर्व सदस्य देशांमध्ये उत्पादक क्रिया प्रक्रियांना प्रोत्साहन देते.

**(ix) राजकीय सहकार्यः**

आर्थिक सहकार्यामुळे सदस्य देशांमधील चांगल्या राजकीय संबंधांचा पाया घातला जातो आणि अशा संबंधांचा उपयोग प्रदेशातील संघर्ष सोडवण्यासाठी केला जाऊ शकतो.

## ८.३ आर्थिक एकात्मीकरणाचे स्वरूप

आर्थिक एकीकरणाचे किंवा एकात्मीकरणाचे खालील मुख्य प्रकार आहेत:

**१) प्राधान्य व्यापार क्षेत्र:**

प्राधान्य व्यापार क्षेत्र किंवा असोसिएशन हा आर्थिक एकात्मतेचा सर्वात ढिला प्रकार आहे. या व्यवस्थेत, सदस्य देश एकमेकांकडून होणाऱ्या आयातीवर शुल्क कमी करतात. दुसऱ्या शब्दांत, सदस्य देश एकमेकांना प्राधान्य देतात. सदस्य नसलेल्या देशांसाठी, ते त्यांचे वैयक्तिक शुल्क कायम ठेवतात. प्राधान्य व्यापार क्षेत्राचे उत्तम उदाहरण म्हणजे १९३२ मध्ये स्थापन झालेली प्राधान्याची राष्ट्रकुल व्यवस्था होय. तिचे नेतृत्व ब्रिटन करत आहे आणि त्यात सर्व राष्ट्रकुल देशांचा समावेश आहे.

**२) मुक्त व्यापार क्षेत्र:**

आर्थिक एकात्मतेच्या या स्वरूपामध्ये, सदस्य देश आपापसात जकात आणि इतर व्यापार निर्बंध पूर्णपणे काढून टाकतात. तथापि, प्रत्येक सदस्य देश गैर सदस्य देशांविरुद्ध स्वतःचे व्यापार अडथळे राखण्यासाठी स्वतंत्र आहे. मुक्त व्यापार क्षेत्राचे महत्त्वाचे उदाहरण म्हणजे युरोपियन फ्री ट्रेड असोसिएशन (EFTA ). ही संघटना नोव्हेंबर, १९५९मध्ये स्थापन करण्यात आली. त्यात इंग्लंड, ऑस्ट्रिया, डेन्मार्क, नॉर्वे, स्वीडन, पोर्तुगाल, स्वित्झर्लंड आणि फिनलंड या देशांचा सहयोगी सदस्य म्हणून समावेश करण्यात आला. अशी दुसरी संघटना म्हणजे लॅटिन अमेरिकन फ्री ट्रेड असोसिएशन (LAFTA). हे १० लॅटिन अमेरिकन देशांनी जून १९६१ मध्ये तयार केले होते.

**३) सीमाशुल्क संघ:**

दोन किंवा अधिक देशांमधील एकीकरणाचा अधिक औपचारिक प्रकार म्हणजे सीमाशुल्क संघ होय. एकीकरणाच्या या स्वरूपामध्ये, सदस्य देश आपापसात सर्व शुल्क आणि इतर व्यापार अडथळे रद्द करतात. ते एक सामान्य बाह्य दर आणि व्यावसायिक धोरण देखील स्वीकारतात. सदस्य देशांसाठी सर्व व्यापार अडथळे दूर करण्याच्या बाबतीत सीमाशुल्क संघटना आणि मुक्त व्यापार क्षेत्र समान आहेत. परंतु गैर-सदस्य देशांविरूद्ध सामान्य बाह्य शुल्काच्या संदर्भात सीमाशुल्क संघमुक्त व्यापार क्षेत्रापेक्षा वेगळे आहे. मुक्त व्यापार क्षेत्राच्या बाबतीत, सदस्य देश गैर सदस्य देशांविरुद्ध त्यांचे स्वतःचे शुल्क आणि इतर व्यापार अडथळे कायम ठेवतात. अशा प्रकारे सीमाशुल्क संघ हा मुक्त व्यापार क्षेत्रापेक्षा एकीकरणाचा अधिक जवळचा विणलेला प्रकार आहे. सीमाशुल्क संघामध्ये, सर्व सदस्य देश सदस्य नसलेल्या देशांविरुद्ध एकल आर्थिक एकक म्हणून कार्य करतात. सीमाशुल्क संघाचे उदाहरण म्हणजे १९५७ मध्ये पश्चिम जर्मनी, फ्रान्स, इटली, बेल्जियम, नेदरलँड आणि लक्झेंबर्ग यांनी स्थापन केलेला युरोपियन आर्थिक समुदाय.

**४) सामाईक बाजार:**

सामाईक बाजार म्हणजे सीमाशुल्क संघापेक्षा देशांच्या समूहामध्ये अधिक एकत्रित व्यवस्था असणे होय. सामायिक बाजारामध्ये सदस्य देशांमधील जकात आणि व्यापार निर्बंध र करणे

आणि सामान्य बाह्य जकातीचा अवलंब करणे समाविष्ट आहे. यात सदस्य राष्ट्रांमध्ये श्रम आणि भांडवलाची मुक्त हालचाल समाविष्ट आहे. अशा प्रकारे समान बाजाराच्या बाबतीत, सदस्य देशांमधील वस्तू आणि घटकांची मुक्त आणि एकात्मिक हालचाल असते. युरोपियन सामाईक बाजार ( ECM) ज्याला युरोपियन आर्थिक समुदाय (EEC) असेही म्हटले जाते ते सामाईक बाजाराचे सर्वोत्तम उदाहरण आहे.

**(v) आर्थिक संघ:**

आर्थिक एकात्मतेचा सर्वात प्रगत प्रकार ज्यामध्ये सर्वात मोठ्या प्रमाणात सहकार्याचा समावेश आहे तो म्हणजे आर्थिक संघ. आर्थिक संघाच्या बाबतीत, दोन किंवा अधिक देश एक समान बाजारपेठ तयार करतात. याव्यतिरिक्त, एक सामान्य वित्तीय, आर्थिक, विनिमय दर, औद्योगिक आणि इतर सामाजिक-आर्थिक धोरणे स्वीकारतात. सदस्य देश एक समान चलन आणि बँकिंग प्रणाली तयार करण्याचा प्रयत्न करतात. आर्थिक संघाचे उदाहरण म्हणजे BENELUX (बेल्जियम, नेदरलँड्स आणि लक्झेंबर्गसह ) ज्याची स्थापना १९४८ मध्ये सुरुवातीला सीमाशुल्क संघ म्हणून झाली होती परंतु नंतर १९६० मध्ये त्याचे आर्थिक संघात रूपांतर झाले. हे देश आता EU मध्ये सामील झाले आहेत. युरोपियन आर्थिक समुदाय(EEC) ने १९९१ मध्ये युरोपियन युनियन (EU) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आर्थिक संघात स्वतःचे रूपांतर केले आहे.

## ८.४ विक्री संघ (कार्टेल)

आंतरराष्ट्रीय व्यापारात एकाधिकार प्रवृत्ती दोन स्वरुपात प्रकट होते. एक मूल्यावपाती विक्री (Dumping) आणि दूसरे कारखानदार नियंत्रक संघांची (Cartels ) स्थापना यातील नियंत्रक संघ हा प्रकार बहुचर्चीत आहे. कार्टेक या शब्दाचा संबंध मुळात सामाईक विक्री प्रतिनीधी संस्थेशी (Sales Agency) जोडलेला आहे. अशा प्रतिनिधी संस्था विशिष्ट उद्योगातील करारात सामील असलेल्या उद्योसंस्थाच्या विक्रीची संपूर्ण जबाबदारी स्विकारत असतात. त्यामुळे विक्री संघाचे मूळ स्वरूप विक्री प्रतिनिधी संस्था असे होते. सध्याच्या काळात अल्पाधिकारी बाजाररचनेतील कोणत्याही स्वरुपाच्या (किंमत, बाजारातील हिस्सा उत्पादन इ) सामंजस्य कराराला नियंत्रक विक्री संघ (Cartels) असे म्हणतात. साधारणपणे विक्रीसंघाचे मुख्य दोन प्रकार पडतात.

१) संपूर्ण विक्रीसंघ (Perfect Cartel)

२) अपूर्ण विक्रीसंघ (Perperfect cargels)

**१) संपूर्ण विक्रीसंघ** (Perfect Cartel)**:**

विक्रीसंघाच्या या प्रकारात मध्यवर्ती संस्था एकूण उद्योगाची तसेच वैयक्तिक संस्थांची उत्पादन पातळी निश्चित करते. कमाल संयुक्त नफा हे उद्दीष्ट गाठण्याच्या दृष्टीकोणातून मध्यवर्ती संस्था किंमत आणि उत्पादनविषयक निर्णयहोत असते. करारातील तरतुदीप्रमाणे नफ्याचे वाटप सभासद उत्पादनसंस्थामध्ये केले जाते. तसलेच सिमांत खर्च (MC) समान होईल याचीही काळजी घेतली जाते.

## २) अपूर्ण विक्रीसंघ (Imperfect cartel):

विक्रीसंघाच्या या प्रकारात उत्पादन निश्चिती आणि नफ्याचे वाटप मध्यवर्ती किंवा केंद्रीय संस्थेकडून केले जात नाही. तर बाजारात वाटा प्रत्येक वैयक्तीक संस्थेला प्राप्त होतो. ह्या प्रकारात बाजारातील मागणीचे वाटप होते. असा बाजार वाटा निश्चित करण्याच्या किंमत बाह्य स्पर्धा (Non price competition) आणि संख्यात्मक वाटा (Quota) अशा दोन पद्धती आहेत.

विक्रीसंघ निर्मितीचे प्रयत्न कायम चालू असले तरी अस्थिरता हा ह्या रचनेचा स्थायीभाव असतो. याचे कारण म्हणजे खर्चभिन्नता होय. कमी उत्पादनखर्चाचा संस्थाना विक्री आणि नफा वाढवण्यासाठी किंमत कमी ठेवणे लाभदायक असते. त्यामुळे विक्रीसंघाच्या अस्तित्वात धोका होवू शकतो. तसेच अशा बाजारात उद्योगसंस्थाना मुख्य प्रवेश असेल तर विक्रीसंघाचे अस्थैर्य वाढते. कारण नविन विक्री संस्था विक्रीसंघाना येण्याचे टाळतील व कमी किंमत आकारतील, यामुळेच विविध संस्थामध्ये किंमत युद्ध (Price War) सुरु होवून विक्री संघाचे स्थैर्य नष्ट होईल. विक्री संघातील सर्व सभासद उद्योगसंस्थांना एका नियोजित धोरणाच्या चौकटीत वागावे लागले. निर्धारित किंमतीत बाजारपेठेत माल विकणे आणि नियमांचे पालन करणे यामुळे उत्पादनसंस्थेला फायदा होतो. तेल उत्पादन देशाच्या संघटनेला (Organisation of Petroleum Exporting countries OPEC) महत्त्व आहे. अलिकडील काळातील आंतरराष्ट्रीय कार्टेलचे OPEC हे एक यशस्वी उपाहसा म्हणता येईल.

दुसऱ्या महायुद्धानंतर कार्टेल आणि त्यांच्या धोरणावर नियंत्रण ठेवण्याविषयी निरनिराळ्या देशात भरपूर चर्चा झाली तरी ती निरुपयोगीच ठरली. अलिकडच्या काळात काटैल्स प्रवृत्तीला आळा घालण्याचा एक प्रयत्न म्हणून युरोपीय सामाईक बाजाराचा (European Common Market) उल्लेख करता येईल. झणीकारक आणि गळेकापू स्पर्धेच्या परिणामातून कारखानदार नियंत्रक संघाच्या म्हणजेच कौटैल्सच्या स्थापनेला उत्तेजन मिळाले. आंतरराष्ट्रीय कार्टेल्सच्या स्थापनेसाठी अगोदरच स्वदेशात भक्कम एकाधिकार असे असलेल्या संघटना असणे गरजेचे असते. कारण अशा संस्था किंवा संघटनामुळे कार्टेल्स स्थापनेला चालना मिळू शकते.

सामान्यपणे कार्टेल्स तीन प्रकारचे असतात.

अ) संघ (Association)

ब) एकस्वाधिकार परवाना करार (Patent lingering agreement)

क) संयोग (Combines)

१) वरील तीन प्रकारापैकी संघ हा प्रकार अधिक रुढ आहे. निरनिराळ्या देशातिल उत्पादक-

बाजारात प्रति बंधनात्मक कारवाई करण्याच्याहेतूने आपली एक संघटना उभारतात आणि उत्पादन, विक्री, वस्तूची किंमत इत्यादीबाबत करार करतात. या करारातील तरतूदी

व्यापक स्वरुपाच्या असतात. करारात संपूर्ण नफा किंवा त्याचा काही भाग एकत्र करण्याची आणि त्याची फेरवाटणी करण्याची तरतूद आहे. कधीकधी कार्टेल स्वतःची एक विक्रीसंघटना उभारते आणि सर्व सभासद उत्पादकांना या संघटनेमार्फत विक्री करावी लागते. करारात नमूद केलेल्या सर्व तर्तुदींचे पालन करणे उत्पादकांना बंधनकारक असते. त्यामुळे कार्टेन संघटना शक्तीशाली बनते आणि तिला किंमत वाढवून ग्राहकांची पिळवणूक करणे सहज शक्य होते. काही वेळा कार्टेनसध्या नियमांचे पालन करणे उत्पादकांनाही जाचक वाटू लागते. तेव्हा कार्टेल्सला दूसरा प्रकार उत्पादकांकडून पसंत केला जातो.

२) एकस्वाधिकार परवाना करार हा संघ ह्या प्रकारापेक्षा सौम्य असल्यामुळे उत्पादक पसंत करतात. या करारातंर्गत एखादी मोठी वस्तूनिर्माण व्यवसायासंस्था लहान व्यवसाय संस्थांना त्यांच्या देशात एकस्वाधिकार व गुप्तप्रक्रिया वापरण्याचे हक्क देते. हक्क अनन्य (Exclusive) असल्यामुळे लहान व्यवसायसंस्थेला स्वकीय बाजारपेठेचे पूर्णसमुपयोजन करण्याची संधी मिळते.

३) संयोग या तिसऱ्या प्रकारात आंतरराष्ट्रीय बाजार पेठेवर कब्जा मिळवण्यासाठी स्पर्धक व्यवसायसंस्थाना एका संघटनेच्या अंतर्गत आणले जाते. या संघटनेचे स्वरुप बहुतेक बहुराष्ट्रीय सुप्रधार - सारखे असते.

कार्टेल्सचे स्वरुप लक्षात आल्यानंतर त्यांची कार्य पद्धती समजून घेणे कठीण नाही. कार्टेलच्या सर्व सभासद व्यवसाय संस्था स्पर्धात्मक परिस्थितीपेक्षा अधिक किंमत आकारण्याचा प्रयत्न करतात. किंमत निर्धारणाचा करार केला तरीही काहीवेळा उत्पादक वेगळे धोरण स्विकारतात. अशा वेळी उत्पादकांना नियमांची शिस्त लावण्यासाठी गरज पडल्यास किंमत युद्ध (Price war) देखील सुरु केले जाते. मालाची किंमत वाढवणे, पुरवठा मर्यादित करणे अशा युक्त्यांही कार्टेल्सद्वारे योजल्या जातात. उदा. रबर, कच्चे तेल इत्यादी. कार्टेल्सच्या प्रभावी पडिचालणासाठी क्षेत्र विभाजनाची युक्ती योजना आवश्यक आहे.

आंतरराष्ट्रीय कार्टेल्सच्या स्थापनेमुळे उद्योगधंद्यातील अनिश्चित उत्पादनक्षमता, मंदी इत्यादी स्वरुपाच्या सर्वसामान्य समस्या सोडविण्यात यश आले आहे. कार्टेल्सनी बहुतेक वेळा उपभोक्त्यांच्या शोषणाचा मार्ग स्विकारत आहे. बाजारावरील घट्ट पकड, किंमत वाढवून नफा कमविणे, पुरवठा मर्यादित ठेवणे, उत्पादनाची गुणवत्ता घटविणे यासारख्या हिन आणि अमानुष युक्त्यांचा वापर केला आहे. ग्राहकांच्या हिताची अपेक्षआ केली आहे. कार्टेलमुळे अकल्यानच जास्त झाले आहे. त्यामुळे कार्टेल्सचा त्याग करणे व त्यावर बंदी घालणेच योग्य ठरते. असे म्हणावयास हरकत नाही.

**आपली प्रगती तपासा:**

१. विक्रीसंघ ही संकल्पना अभ्यासा.

## ८.५व्यापार गट

**व्यापारी गट (Trade Blocks):**

व्यापारी गट ही संकल्पना व्यापार वाढीचे समान उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून परस्पर सहकार्याच्या तत्त्वावर एकत्रित आलेल्या विविध राष्ट्रांच्या एकात्मीकरणावर आधारलेली आहे. व्यापारी गटाचे स्वरुप मुक्त व्यापारा प्रमाणेच असुन त्यात सभासद देशांनी परस्परांच्या व्यापारावरील कृत्रिम निर्बंध (प्रशुल्क व प्रशुल्केतर) कमी करणे किंवा पूर्णतः समाप्त करणे अपेक्षित आहे. व्यापारी गट हे जकात संघाचेच एक रूप असुन त्याद्वारे सभासद देशांवरील जकात नियंत्रणे काढुन इतर असभासद राष्ट्रांशी व्यापार करण्याविषयी एक समान धोरण आखले जाते. या प्रकरणात आपण जागतिक स्तरावरील पुढील प्रमुख व्यापारी गटांचा अभ्यास करणार आहोत.

i) युरोपीय आर्थिक समुदाय (EEC) किंवा आर्थिक संघ (EU) (European Economic Union or Economic Union)

ii) उत्तर अमेरीकन मुक्त व्यापारी करार (NAFTA)
(North American Free Trade Agreement)

iii) आशिया-पॅसिफिक आर्थिक सहकार्य (APEC)
(Asia-Pacific Economic Co-operative)

iv) दक्षिण आशियायी देशांचे आर्थिक संघटन (ASEAN) –
(Association of South East Nations).

v) प्रादेशिक सहकार्यासाठी दक्षिण आशियायी संघटना –
(SAARC) (South Asian Association For Regional Co-operation )

## ८.६ दक्षिण-पूर्ण आशियायी राष्ट्रांची संघटना Association of South East Asian Nations - (ASEAN)

०८ ऑगस्ट, १९६७ ला ASEAN या संघाच्या स्थापनेची औपचारिक घोषणा बँकॉकमध्ये करण्यात आली. या संघटनेचे संस्थापक सदस्य देश म्हणजेच इंडोनेशिया, मलेशिया, थायलंड, फिलीपिन्स आणि सिंगापूर हे होय. त्यानंतर १९८४ मध्ये ब्रुनेई, १९९५ मध्ये व्हिएतनाम, व १९९७ मध्ये लाओस व म्यानमान (ब्रम्हदेश ) यांना ASEAN चे सदस्य बनविण्यात आले. ३० एप्रिल १९९९ मध्ये कंबोडियाला सभासदत्व देण्यात आले. सध्या ASEAN ची सदस्य राष्ट्रांची संख्या १० झालेली आहे. ASEAN चे प्रमुख सचिवालय 'जकार्ता' येथे आहे.

ASEAN च्या स्थापनेचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजेच दक्षिण पूर्व आशियामध्ये क्षेत्रातील सर्व राष्ट्रांना सामिल करून दक्षिण-पूर्व आशियात आर्थिक सहकार्याद्वारे सभासदत्व देण्यात आले. सध्या ASEAN ची सदस्य राष्ट्रांची संख्या १० झालेली आहे. ASEAN चे प्रमुख सचिवालय 'जकार्ता' येथे आहे.

ASEAN च्या स्थापनेचे प्रमुख उदिष्ट म्हणजेच दक्षिण पूर्व आशियामध्ये क्षेत्रातील सर्व राष्ट्रांना सामिल करून दक्षिण-पूर्व आशियात आर्थिक सहकार्याद्वारे प्रगती करुन आर्थिक स्थिरता निर्माण करणे हे आहे.

भौगोलिक परिस्थितीमुळे भारताला ASEAN चा पूर्ण सदस्याचा दर्जा देता येत नाही कारण भारत हा दक्षिण आशियाय आहे, तर ASEAN हे दक्षिण-पूर्व आशियायी देशांचे संघटन आहे. असे असुनही जुलै, १९३६ मध्ये भारताला ASEAN मध्ये महत्वाचा दर्जा देण्यात आलेला आहे. अमेरिकेला असा दर्जा फार पूर्वीच देण्यात आलेला आहे.

### ८.६.१ ASEAN च्या स्थापनेची उद्दिष्ट्ये:

१) परस्पर सहकार्यातून सभासद राष्ट्रांच्या विकासाला गती देणे.

२) सभासद राष्ट्रांमधील व्यापारी नियंत्रणे ( जकात आणि बिगर जकात) मोठ्या प्रमाणात कमी करणे.

३) आंतराष्ट्रीय व्यापार, वाहतूक यांचा विकास घडवून आणणे.

४) पायाभूत क्षेत्राचा विकास घडवून आणणे.

५) सभासद राष्ट्रांच्या व्यापारात स्थिरता निर्माण करणे.

६) विदेशी भांडवल आकर्षित करणे.

### ८.६.२ ASEAN ची वैशिष्ट्ये :

१) सभासद देशांचा परस्पर सहकार्यातून व्यापार वाढविण्यासाठी ही संघटना अस्तित्वात आली आहे.

२) या संघटनेचे सर्व सभासद देश विकसनशील देश आहेत.

३) या संघटनेतील सर्वच सभासद देश नैसर्गिक साधनसंपत्ती बाबत संपन्न देश मानले जातात.

४) या संघटनेला 'Asian Development Bank ADB कडून मोठ्या प्रमाणात आर्थिक सहकार्य प्राप्त झाले आहे.

५) केवळ दक्षिण-पूर्व आशियायी राष्ट्रांचेच सभासदत्व असलेला हा एक प्रादेशिक व्यापारी गट आहे.

### ८.६.३ ASEAN च्या सहाव्या शिखर संमेलनातील शिफारशी:

१५-१६ डिसेंबर १९९८ मध्ये व्हिएतनामच्या हनोई शहरात ASEAN चे सहावे शिखर संमेलन भरविण्यात आले त्यामध्ये पुढील शिफारशी करण्यात आल्या.

१) दक्षिण-पूर्व आशियायी मुक्त व्यापार क्षेत्राची (ASEAN Free Trade Area - AFTA) स्थापना करणे..

२) AFTA अधिक परिणामकारक होण्याबाबत तरतुदी करणे..

३) व्यापाराचे उदारीकरण करणे.

४) ASEAN च्या सहा संस्थापक राष्ट्रांनी पूर्ण स्वतंत्र्य व्यापाराचे उद्दिष्ट २००३ ऐवजी २००२ मध्येच पूर्ण करणे.

५) वित्तीय क्षेत्रातील सहकार्यात वाढ घडवून आणणे.

६) 'Vision 2020' या योजनेनुसार १९९९-२००४ या काळात सभासद राष्ट्राअंतर्गत क्षेत्रीय आर्थिक एकात्मीकरणासाठी विविध उपाययोजना करणे..

### ८.६.४ ASEAN- भारत:

आशियान क्षेत्रीय मंचाचा (ASEAN Regional Forum ARF) बैठक - २६ जुलै १९९९ ला सिंगापुरमध्ये झाली. ह्यात भारतातर्फे तत्कालीन विदेशमंत्री श्री. जसवंत सिंग हजर होते. या बैठकित पुढील ठराव मांडण्यात आले.

१) ARF ने परमाणू विरोधी, सीमेपलिकडील आतंकवाद व लाहोर प्रक्रिया ह्याबाबत असलेल्या भारतीय विचारांचे समर्थन करण्यात आले.

२) भारत व पाकिस्तानने 'सर्वंकष अणूचाचणी बंदी करारावर' (CTBT) सह्या कराव्यात.

३) पाकिस्तानला ARF चे सदस्यत्त्व देण्याबाबतचा विचार टाळावा.

४) ASEAN ला परमाणुरहित क्षेत्र बनविण्याच्या उद्देशाने 'दक्षिण-पूर्व आशिया परमाणू शस्त्ररहित क्षेत्र' (South East Asia Nuclear Weapon Free Zone-SEANWFZ) आयोगाची स्थापना करावी.

यानुसार २४ जुलै १९९९ रोजी सिंगापूर या ठिकाणी SEANWFZ ची स्थापना करण्यात आली.

ASEAN ह्या गटात सहभागी सर्व सदस्य राष्ट्रांना निसर्गतःच नैसर्गिक साधनसामुग्रीची देणगी मिळालेली असल्याने निर्यातीमध्ये प्राथमिक वस्तूंचा समावेश सर्वाधिक आहे. अलिकडील काळात सभासद राष्ट्रांमधील प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीत (FDI) सतत वाढ घडून येत आहे.

## ८.७ युरोपियन युनियन (EU)

### युरोपीय आर्थिक समुदाय (EEC) किंवा युरोपचा आर्थिक संघ (EU):

युरोपीय आर्थिक समुदायालाच (EEC) युरोपीय समुदाय (European Community EC) किंवा आता युरोपीय संघ (European Union EU) असेही म्हणतात. EEC ची स्थापना बेल्जियम, फ्रान्स, जर्मनी, इटाली, लक्झेंबर्ग आणि नेदरलँड या सहा देशांनी केली. त्यांनाच The Six असे म्हणतात. १९५७ मध्ये 'रोमच्या करारावर' (Treaty of Rome) स्वाक्षऱ्या करून १ जानेवारी १९५८ मध्ये या देशांनी EEC ची स्थापना केली. सध्या EEC चे

सभासदांची संख्या वाढुन ती २७ देश इतकी बनलेली आहे. त्यांनाच 'EU-27' या नावाने देखिल ओळखले जाते.

EEC च्या स्थापनेची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**८.७.१ EEC च्या स्थापनेची उद्दिष्ट्ये:**

१) EEC अंतर्गत सभासद देशांमधील प्रशुल्क, प्रशुल्केतर व इतर व्यापार निर्बंध व अडथळे दूर करणे.

२) सभासद राष्ट्रांमध्ये श्रमीक, भांडवल व सेवा यांची हालचाल मुक्त ठेवणे.

३) समुदयाबाहेरील असभासद देशांविषयी समान प्रशुल्क व समान व्यापारी धोरण राबविणे.

४) सामाईक वाहतूक व्यवस्था अंमलात आणणे.

५) सामाईक कृषीविषयक धोरण राबविणे.

६) सामाईक मौद्रिक धोरण व अंदाजपत्रकीय धोरण तयार करणे.

७) सामाईक युरोपीयन गुंतवणूक बँकेची स्थापना करणे.

८) सामाईक चलन अस्तित्वात आणणे.

९) सदस्य देशात रोजगाराच्या संधी वाढविण्याकरिता व राहणीमान उंचावण्याकरिता 'युरोपीय सामजिक कोषाची' स्थापना करणे.

१०) समुदयाची कार्यक्षमता वाढावी यासाठी देशांच्या कायद्यात एकरूपता आणणे.

**८.७.२. EEC चे प्रशासकीय संघटनः**

**१) युरोपीय संसदीय व्यवस्थापिका (European Parliament) :**

ही आवश्यक कायदे बनविण्याकरिता प्रत्येक देशाच्या संसदेद्वारे निवडलेल्या १९८ सदस्यांची व्यवस्थापिका आहे.

**२) मंत्रिपरिषद (The Council of European Union):**

या अंतर्गत EEC ने तयार केलेल्या धोरणांच्या अंमलबजावणीकडे लक्ष ठेवण्याची जबाबदारी टाकण्यात आली हे. मंत्रीपरिषदेची बैठक महिन्यातून किमान एकदा होते.

**३) युरोपीय सभा (European Assembly):**

या सभेला एका राष्ट्रीय संसदेसारखी भूमिका पार पाडावयाची होती व वेळोवेळी निर्माण होणाऱ्या समस्यांचे पुनर्विलोकन करावयाचे होते. २/३ बहुमताच्या पाठिंब्याने 'आयोग' या कार्यकारी संस्थेला राजीनामा देण्यास सांगण्याचा अधिकार ह्या सभेला देण्यात आला आहे.

**४) युरोपीयन आयोग European Commission):**

संकुचित राष्ट्रभावनेने समाज हितावर आघात करणाऱ्या समस्यांकडे लक्ष देण्याचे प्रमुख कार्य करते.

**५) न्यायालय (Court of Justice)**

युरोपीय समुदायासाठी सर्वोच्च न्यायिक संस्थेचे कार्य या न्यायालयाकडे सोपविण्यात आले.

**६) आर्थिक व सामाजिक परिषद (Economic & Social Committee): |**

ही सुध्दा एक परामर्श घेणारी संस्था असून हिच्यात गुंतवणूक, उपभोक्ता, श्रमिक, व इतर क्षेत्रातील प्रतिनिधी भाग घेतात. EEC चे आर्थिक व सामाजिक धोरणाचे सर्व अधिकार या परिषदेकडे सोपविण्यात आलेले आहेत.

**७) उच्च अधिकरण (Chudaman):**

ह्या सर्व समस्या निवाराणार्थ धोरण ठरविण्याचे व अंमलबजावणी करण्याचे कार्य करतो.

**८) युरोपीय मध्यवर्ती अधिकोष : (European Central Bank)**

ही युरोपीय समुदायाची सर्वोच्च मौद्रिक हक्क असलेली संस्था असून 'युरोचलन' (EURO) निर्मितीचा अधिकार या केंद्रीय बँकेकडे आहे. तसेच विदेशी चलनांचे व्यवहार करण्याची जबाबदारी या संस्थेकडे सोपविण्यात आलेली आहे.

**९) लेखापाल समिती (Court of Auditors):**

EEC च्या महसुल आणि खर्चाबाबतचे सर्व व्यवहार व्यवस्थित मांडणे व तपासण्याची मक्तेदारी या समितीकडे सोपविलेली आहे.

**८.७.३ युरोपियन आर्थिक समुदायाचे कार्य :**

EEC च्या स्थापनेनंतर EEC अंतर्गत करण्यात आलेली प्रमुख कार्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) सामान्य शेती धोरण :**

या धोरणानुसार 'ग्रीन रेट' प्रत्येक देशात आधार किंमत योग्य ठेवून राष्ट्रीय किंमत ठरवली जाते. शेतकऱ्यांना उत्पादनासाठी स्वातंत्र्य देणे, उत्पादनाचा दर्जा राखणे इ. प्रमुख कार्ये करणे.

**२) युरोपीय चलनविषयक संघ**

या संघाची स्थापना मार्च १९७९ मध्ये झाली. त्याचे स्वरूप पुढील प्रमाणे –

अ) विनिमय दर यंत्रणे अंतर्गत सभासद देशांचे व्याजदर वृध्दीवर नियंत्रण ठेवणे.

ब) युरोपीय चलन सहकार्य कायादान्वये चलन कार्यासाठी मध्यवर्ती बँक महत्वाचे काम करते.

क) मध्यवर्ती बँकेमार्फत 'समाशोधन गृहांची सुविधा देण्यात आली.

ड) EEC च्या मागासलेल्या सभासद राष्ट्रांना कर्ज कर्ज मुदतवाढ इ. ची खात्री देण्यासाठी 'युरोपियन गुंतवणूक बँक' कार्य करते.

इ) बेरोजगार श्रमिकांना रोजगार देणे, प्रशिक्षण देणे, दारिद्रय निर्मूलन कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी 'युरोपियन सामाजिक निधी' मार्फेत उचलली जाते.

फ) मागास प्रदेशांचा विकास करण्यासाठी 'युरोपियन प्रादेशिक निधी' द्वारे मदत केली जाते.

ज) EEC अंतर्गत श्रमिक व भांडवलाच्या मुक्त हालचालीस गती प्राप्त झाली आहे.

**३) सामान्य वाहतूक धोरण :**

या धोरणाअंतर्गत विविध वाहतूक सुविधा तसेच समुद्राच्या वाहतूक पध्दतीतील अडथळे दुर करणे, तसेच संघटन व नियंत्रण करणे, समुदायाची वाहतूक कार्यक्षमता व परिणामकारकता वाढविणे इ. कार्ये करणे.

## ८.८ नाफ्टा (NAFTA)

अमेरिका भूतपूर्व राष्ट्रपती बिल क्लिंटन ह्यांच्या पुढाकाराने "नाफ्टा'ची निर्मिती झाली. हा समझोता किंवा करार अमेरिका, कॅनडा व मेक्सिको ह्या तीन देशांच्या एका नव्या सामर्थ्यवान क्षेत्रीय संघटनेचा निर्माता आहे. एका नव्या सामर्थ्यवान क्षेत्री संघटनेचा निर्माता आहे. ह्या करारामुळे कडव्या अशा अंतर्विरोध असलेल्या संयुक्त राज्य अमेरिका (USA) नवजीवन प्राप्त झाले आहे. नाफ्ट लागू झाल्यानंतर अमेरिकेचा ६५ टक्के माल कोणत्याही प्रकारचे आयात शुल्क न लागता मेक्सिकोच्या बाजारपेठेत विकला जाईल. ह्याशिवाय भांडवल गुंतवणूकीवरील सर्व नियंत्रणे क्रमशः हटविण्यात येतील.

नाफ्टा अंतर्गत अमेरिका, कॅनडा व मेक्सिको हे देश व्यापारावर असलेली सर्व नियंत्रणे हटवून मुक्त व्यापार क्षेत्र बनतील. सांप्रत नाफ्टा म्हणजे सर्वात मोठे मुक्त व्यापार क्षेत्र मानले जाते. प्रादेशिक आर्थिक सहकार्य वाढवण्याचा प्रयत्नाचा एक भाग म्हणून या संघटनेकडे पाहता येईल.

उत्तर अमेरिकी देश एकमेकांकडून ज्या वस्तू विकत घेतात त्या यंत्रसामुग्री, वाहतूक सामूग्री अशा स्वरूपाच्या भांडवली वस्तू असतात. या वस्तू निर्यात करणाऱ्या देशावर संघटनेमुळे परिणाम होत असतो. भारताच्या बाबतीत अशी शक्यता नाही. अमेरिकेची संयुक्त संस्थाने सोडल्यास इतर देशांशी भारताचा मोठा व्यापार नाही. अमेरिकेच्या संयुक्त संस्थानाचा विचार केल्यास भारत अमेरिकेकडे ज्या वस्तूंची निर्यात करतो अशा वस्तू संघटनेतील इतर देश अमेरिकेच्या संयुक्त संस्थाना पुरवीत नाहीत. त्यामुळे या संघटनेचा भारताच्या

निर्यातीवर प्रतिकूल परिणाम होत नाही. संघटनेतील देशांनी आपसात व्यापार खूला केल्यामुळे भारताचे नुकसान होण्याची शक्यता नाही तर फायदा होण्याची शक्यता आहे.

**आपली प्रगती तपासा:**

प्र.१ "नाफ्टा" (NAFTA) वर टिपा लिहा.

## ८.९ सार्क (South Asian Association for Regional Co-operation- SAARC)

डिसेंबर १९८५ मध्ये दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटनेची स्थापना झाली. या संघटेनेत सात देश कायमस्वरूपी सदस्य आहेत. भारत, बांगला देश, पाकिस्तान, नेपाळ, श्रीलंका, भूतान आणि मालदिव या देशांचा समावेश होतो. या संघटनेचे मुख्य कार्यालय नेपाळची राजधानी काठमांडू येथे आहे "सार्क'चे सर्व सभासद देश प्रामुख्याने कृषीप्रधान देश म्हणून ओळखले जातात.

प्रादेशिक सहकार्यासाठी दक्षिण आशियाई संघटना (सार्क) यांनी अंतर्गत स्पर्धा नाकारली असून व्यापाराच्या शर्तीत सुधारणा केली आहे. जर धोरणाचा स्वतःची ओळख विकसित करणे व व्यवहार करणे, तर प्रादेशिक व्यवहारात द्विपक्षीय शर्तीत विस्तार करणे, ही महत्त्वाची तत्वे आहेत.

**सार्कचे संघटन स्वरूप (Organisation of SAARC):**

सार्कच्या कार्यकारी मंडळाने "उच्च धोरण ठरविले आहे. त्यानुसार सभासद देशांच्या सरकारचा प्रमुख घटनेनुसार कार्यकारी मंडळावर असतो. कार्यकारी मंडळाची बैठक दोन वर्षातून एकदा होते विदेश व्यापार संचिवांची स्थायी समिती असते.

ही समिती मागील कार्याचा आढावा घेऊन नवीन योजना मंजूर करून त्याची कार्यवाही करते. सार्कच्या कामकाजाच्या दृष्टीने एकूण ११ समित्या कार्यरत आहेत..

**तांत्रिक समिती:**

या समितीमध्ये सदस्य देशांच्या प्रतिनिधीचा समावेश असतो. या समितीवर सार्कच्या धोरणाची अंमलबजावणी, समन्वय आणि देखरेख ही जबाबदारी असते. सभासद देशांच्यासाठी घटनेनुसार पुढील कार्य केली जातात.

प्रादेशिक सहकार्यासाठी दक्षिण आशियाई संघटना (सार्क) मुख्य ध्येय मानवी आणि भौतिक साधनसंपत्तीचा अधिकाधिक उपयोग करून सामाजिक आणि आर्थिक विकास साध्य करणे.

**सार्कची उद्दिष्ट्ये (Objectives of SAARC):**

सार्क संघटनेच्या चार्टर कलम मध्ये पुढील उद्दिष्ट दिली आहेत.

१. दक्षिण आशियातील लोकांच्या सामाजिक आर्थिक कल्याणात सुधारणा करणे आणि त्यांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारणे.

२. आर्थिक वाढीचा वेग वाढविणे, प्रदेशातील सामाजिक प्रगती आणि सांस्कृतिक विकास साधणे, सर्व व्यक्तींना आत्मसन्मानाने जगण्याची संधी देणे आणि त्यांच्या क्षमतेचा पूर्ण उपयोग करून घेणे.

३. दक्षिण आशियातील देशामध्ये सामुदायिरीत्या आत्मनिर्भरता वाढवून ती बळकट करणे.

४. एकमेकांच्या समस्या समजावून घेऊन एकमेकांवरील विश्वास वाढविणे.

५. सभासद देशांच्या विकासाचा वेग वाढविण्यासाठी एकमेकांतील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, तांत्रिक आणि विज्ञान क्षेत्रातील सहकार्य वाढविणे.

६. समान हितसंबंधी प्रश्नांवर आंतरराष्ट्रीय मंचावर आपापसातील सहकार्य वाढविणे.

७. समान उद्दिष्ट आणि हेतू असलेल्या आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक संघटनेबरोबर सहकार्य करणे.

**तत्वे (Principales):**

चार्टर (Charter) च्या नियम ११ मध्ये खालील तत्यांचा समावेश केला आहे.

व्यवहारतील

१. संघटनेच्या आराखड्यामध्ये सहकार्य करण्यासंदर्भात म्हणजेच सार्वभौम समता, प्रादेशिक अबाधितता, राजकीय स्वातंत्र्य, इतर देशांच्या देशांतर्गत व्यवहारात अलिप्तता बाळगणे आणि एकमेकांचे फायदे पाहणे.

२. असे सहकार्य द्विपक्षीय किंवा अनेक पक्षीय बंधनाच्या विरोधी नसेल.

३. अशा सहकार्यात असंगततेबरोबर द्विपक्षीय आणि बहुपक्षीय बंधने नसतील.

सार्क देशांचे आर्थिक संबंध आणि व्यापारवाढीस मोठा वाव आहे. हे देश जागतिक व्यापारात इतर देशांबरोबर स्पर्धा करू शकतील. सार्कच्या सदस्य देशात.

१) प्रतिनिधीच्या क्षेत्रात कार्यक्रम आणि प्रकल्पांची उभारणी करणे.

२) मुख्य प्रकल्पांची अंमलबजावणी करणे.

३) प्रकल्प कमिटीचा अहवाल स्थायी समितीला सादर करणे.

**सार्कच्या तांत्रिक समितीचा संबंध:**

१. कृषी २. पर्यावरण ३. विज्ञान आणि तंत्रज्ञान ४. दळणवळण ५ आरोग्य आणि लोकसंख्या ६. ग्रामीण विकास ७. पर्यटन इत्यादींशी असतो.

सार्कने २००१ ते २०१० हे दशक बालकल्याणासाठी राबविण्याचे ठरविले आहे.

सार्कच्या सभासद देशांच्या प्रमुखाची वर्षातून एकदा बैठक आयोजित केली जाते. सार्कची पहिली बैठक १९८५ मध्ये बांगला देशाची राजधानी ढाका येथे भरली होती दुसरी बैठक १९८६ मध्ये बेंगलोर येथे तिसरी बैठक नेपाळची राजधानी काठमांडू येथे १९८७ मध्ये चौथी बैठक इस्लामाबाद येथे १९८८ मध्ये भरली होती. नंतरच्या काळात मात्र प्रतिवर्षी बैठक आयोजित करण्याऐवजी दोन वर्षांतून एकदा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. पाचवी बैठक माले येथे १९९० मध्ये, सहावी कोलंबो येथे १९९१ मध्ये भरली होती. तेरावी बैठक २००५ मध्ये ढाका येथे पार पाडली.

जानेवारी २००४ मध्ये इस्लामाबाद येथे भरलेली सार्क शिखर बैठक ऐतिहासिक समजण्यात येते. ह्या संमेलनात भारत व पाकिस्तान हे दोन देश परस्परांजवळ आले. सात देशांच्या ह्या संमेलनात घोषणापत्र जाहीर करण्यात आले. ह्या दोन्ही देशांनी एकत्रितपणे आंतकवादाचा बंदोबस्त करण्याची घोषणा केली तसेच “खुल्या व्यापाराबाबत" ही सहमती दर्शविण्यात आली. ह्या घोषणा पत्रातील प्रमुख मुद्दे पुढील प्रमाणे:

१. दक्षिण आशिया एक शांतीपूर्ण व स्थिर क्षेत्र बनविणे.

२. विवाद; मतभिन्नता व संघर्ष ह्यावर शांततेच्या उपाय योजना करणे.

३. सार्वभौमिकता, समानता, क्षेत्रीय अखंडता व राष्ट्रांचे स्वातंत्र्य ह्यांच्या आधारावर समंजस शेजारी म्हणून राहणे व विकास साधणे.

४. शस्त्रास्त्रांचा वापर न करणे, इतरांच्या कारभारात हस्तक्षेप न करणे. तसेच दुसऱ्या देशाच्या भानगडीत न पडणे ह्यावर जोर देण्यात आला.

५. सार्कच्या छोट्या छोट्या देशांच्या विशेष समस्यां बद्दल जागरूक राहणे.

**सार्कच्या सर्वसाधारण तरतूदी (SAARC):**

१. सार्कमधील देश कोणताही निर्णय एकमताने घेतात.

२. संघटनेत विवाद्य मुद्दे टाळले जातात.

**भारताचा सार्क देशांशी व्यापार:**

(India's Trade with SAARC) भारताने नेपाळ, बांगलादेश, भूतान व श्रीलंकेबरोबर द्विपक्षीय करार केले आहेत. 'सार्क'च्या सभासद देशांत भारत भौगोलिक व आर्थिक दृष्ट्या प्रगत असल्याने सार्कच्या व्यापारामध्ये भारताचा वाटा सर्वाधिक आहे. भारताचा सार्क देशांशी असणारा व्यापारतोल हा सतत अनुकूल आहे. १९८० मध्ये भारतातून सार्कच्या इतर देशात झालेल्या निर्यातीचे मूल्य ३०७ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स तर आयातीचे मूल्य १४१ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स होते १९८७-१९८८ मध्ये भारतातून सार्कच्या इतर देशात झालेल्या निर्मितीचे मूल्य ४०६ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स तर आयातीचे मूल्य ९८ दशलक्ष डॉलर्स होते व भारताच्या व्यापारात ४०८ दशलक्ष डॉलर्सची शिल्लक होती. १९९८-९९ मध्ये भारताचे सार्क देशात आसलेल्या निर्यातीचे मूल्य ७१८७ दशलक्ष

डॉलर्स होते आणि भारताच्या सार्क देशांशी असणारा व्यापार ५२४० दशलक्ष डॉलर्स एवढा शिलकी होता. म्हणजे व्यापारतोल अनुकूल होता.

भारताच्या निर्यातीपैकी सर्वाधिक निर्यात बांगलादेशात व त्यानंतर श्रीलंकेत झाली आहे.

भारताच्या सार्क सदस्य देशाशी असणाऱ्या व्यापाराबाबत असे दिसून येते किंवा निष्कर्ष येतात की,

१. भारताचा व्यापारतोल सतत अनुकूल आहे.

२. भारताचा सार्क देशांशी असणारा निर्यात व्यापार १९८० मध्ये ३०७ दशलक्ष डॉलर्स वरून १९९८-९९ मध्ये ७१८७ दशलक्ष डॉलर्स पर्यंत वाढला.

३. भारताच्या एकूण निर्यातीत सर्वाधिक निर्यात बांगला देशात होते.

४. भूतान व मालदीव देशात झालेल्या निर्यातीचे मूल्य अतिशय कमी दिसून येते

५. निर्यातीप्रमाणे आयातीचा सुद्धा मालदीवचा वाटा अतिशय कमी होता.

६. श्रीलंकाच्या असणाऱ्या व्यापाराचा विचार केल्यास भारतातून होणाऱ्या निर्यातीचे मूल्य आयात मूल्यांपेक्षा नेहमीच अधिक राहिले आहे.

**आपली प्रगती तपासा:**

१. सार्कची उद्दिष्ट्ये कोणती ?

२. सार्कवर थोडक्यात टिप लिहा.

## ८.१० सारांश

- प्रादेशिक आर्थिक एकात्मीकरण म्हणजे विकसनशील देशातील व्यापार वाढीची एक अनोखी /अभिनव कल्पना होय.
- आर्थिक एकीकरणाचे किंवा एकात्मीकरणाचे खालील मुख्य प्रकार आहेत:

१) प्राधान्य व्यापार क्षेत्र

२) मुक्त व्यापार क्षेत्र

३) सीमाशुल्क संघ

४) सामाईक बाजार

५) आर्थिक संघ

- १९५७ मध्ये 'रोमच्या करारावर' (Treaty of Rome) स्वाक्षऱ्या करून १ जानेवारी १९५८ मध्ये या देशांनी **युरोपीय आर्थिक समुदाय** ची स्थापना केली.

- डिसेंबर १९८५ मध्ये दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटनेची स्थापना झाली. या संघटनेत सात देश कायमस्वरूपी सदस्य आहेत.

## ८.११ प्रश्न

१) आर्थिक एकात्मीकरणाचा अर्थ आणि उद्दिष्टे स्पष्ट करा.

२) आर्थिक एकात्मीकरणाचे स्वरूप विशद करा.

३) सविस्तर टिपा लिहा.

अ) कार्टेल
ब) व्यापार गट

क) नाफ्टा
ड) सार्क

इ) युरोपियन युनियन (EU)
ई) दक्षिण-पूर्ण आशियायी राष्ट्रांची संघटना

*****

## प्रश्नपत्रिकेचा नमुना (केवळ IDOL च्या विद्यार्थ्यांसाठी)
## TYBA SEM VI (अर्थशास्त्र) - सर्व सहा पेपर्ससाठी

**वेळ: 3 तास** **एकूण गुण: १००**

**कृपया तुम्हाला योग्य प्रश्नपत्रिका मिळाली आहे का ते तपासा.**

**सूचना:** १. सर्व प्रश्न अनिवार्य आहेत. प्रश्न क्र. ५ मध्ये (अ) व (ब) उप प्रश्नांमधील कोणताही एक उप प्रश्न सोडवा.

२. उजवीकडील आकडे पूर्ण गुण दर्शवतात.

3. प्रादेशिक भाषेत उत्तर देणाऱ्या विद्यार्थ्यांनी शंका असल्यास पेपरच्या मुख्य मजकुराचा इंग्रजीमध्ये संदर्भ द्यावा.

4. आवश्यक तेथे नीटनेटक्या आकृत्या काढा.

**प्र १. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे द्या.** **२०**

अ)

ब)

क)

**प्र २. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे द्या.** **२०**

अ)

ब)

क)

**प्र 3. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे द्या.** **२०**

अ)

ब)

क)

**प्र ४. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे द्या.** **२०**

अ)

ब)

क)

**प्र ५ .खालीलपैकी कोणत्याही दोहोंवर थोडक्यात टिपा लिहा.** **२०**

अ)

ब)

क)

ड)

**किंवा**

**ब) खालील बहु पर्यायी प्रश्नांसाठी योग्य पर्याय निवडा. (20 बहु पर्यायी प्रश्न)** **२०**

***********